TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192757
UNIVERSAL LIBRARY

# कॉलेजच्या मार्गावर

लेखक

**भा. श्री. जोशी,**

बी. ए., एल्एल्. बी., वकील,

बालाघाट (C. P.)

सन ] **किंमत १। रुपाया** [ १९३८

—प्रकाशक—
भा. श्री. जोशी,
बी. ए., एल्एल्. बी.,
वकील, बालाघाट (C. P.

या पुस्तकास २८ रतली, डबल क्राऊन (२०"×३०")
आकाराचा, व्हाइट प्रिंटिंगचा कागद वापरला आहे.

[भाषांतरासुद्धा सर्व हक्क लेखकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.]

—मुद्रक—
शंकर रामचंद्र दाते, बी ए.
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ पुणे २.

# प्रस्तावना

रा. भास्करराव जोशी यानी प्रस्तुत पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा मला आग्रह केला. मी कांही लेखक नव्हे. तेव्हा ही मागणी मला जरा अस्वाभाविक वाटली. पुस्तक वाचून पाहिल्यावर मात्र प्रस्तावना लिहून देण्याचे मी कबूल केले. माझी विद्यार्थीदशा सपून ५० च्या वर वर्षें झालीं आहेत त्या वेळच्या पुष्कळशा आठवणी बुजून गेल्या होत्या लेखकाची लिहिण्याची हातोटी मोहक खरी ! पुस्तक वाचून आमच्या लहानपणच्या किती तरी गोष्टी आठवू लागल्या. त्या वेळची परिस्थिति व विद्यार्थ्यांच्या मार्गांतील अडचणी आठवल्या म्हणजे आजकालचे विद्यार्थी दैववान आहेत, असे वाट लागते 'आनदपूरची शाळा' या चौथ्या प्रकरणात वर्णन केलेल्या गोष्टी लेखकाला स्वानुभवान परिचित असणे सभवत नाही. ते वर्णन आमच्या वेळच्या शाळाना ततोतत लागू पडते. म्हणून लेखकाच्या कल्पकतेची प्रशसा करावी लागते इतर प्रकरणात आमच्या विद्यार्थीदशेनतरचें वर्णन आहे. तेहि मनोरजक आहे पुस्तकातील विशेष हाच आहे की, पुस्तक वाचताना आपल्या विद्यार्थीदशेंतील अनेक गोष्टी एकदम डोळ्यांसमोर उभ्या राहून मनाला आल्हाद वाटू लागतो. मी फारशा कादबऱ्या वाचल्या आहेत असे नाही कादबरी या दृष्टीने पुस्तकाची योग्यता मला ठरवतां येणार नाही या पुस्तकाकडे जीवनाचे चित्र या दृष्टीने मी पाहतों. जीवनाचे चित्र लेखकाने ततोतत उतरवले आहे यात कांही शका नाही. यात मारामाऱ्या नाहीत, लूट, खून, दरवडे नाहीत अगदी साधी गोष्ट पण ती चित्ताकर्षक करण्यात लेखकाने आपले पूर्ण चातुर्य खर्च केले आहे.

पुस्तकाच्या वाचनाने चालू शिक्षणपद्धतीसबधाने अनेक प्रश्न मनात उभे राहतात. शिक्षणाचे माध्यम कोणते असावें ? इग्रजीचें चालू पद्धतीत स्थान कोणते ? शिस्त व मुलाच्या भावना याचा तोल कसा सांभाळावा ? शिक्षणाचे ध्येय काय ? हे प्रश्न प्रामुख्याने मनांत येतात.

मॉटेग्यु सुधारणानतर मध्यप्रातात पहिलें प्रधानमंडळ स्थापन झालें. त्या प्रधानमडळाने मातृभाषा हेच शिक्षणाचें माध्यम असावें असे

ठरवून त्याप्रमाणे उपक्रमही केला. त्या उपक्रमाची तामिली नतरच्या मत्रिमंडळाकडून कळकळीने मुळीच झालेली दिसत नाही, व मातृभाषेतून शिक्षण देणे हा उद्देश मागे पडत चालल्यासारखा दिसतो क्रमिक पुस्तकांकडे द्यावें तितके लक्ष दिले जात नाही. निरनिराळ्या सस्था-मधून निरनिराळी पुस्तके चालू असतात. शास्त्रीय भाषेची अडचण दूर करण्याचा करावा तितका प्रयत्न केलेला दिसत नाही. कमेटचा नेमून शाळेत चालणारी पाठय पुस्तके तयार करवली पाहिजेत त्या त्या वर्गाला योग्य मुलाना सहज समजण्यासारखी, व पायरीपायरीने मुलाचे प्रत्येक विषयाचे ज्ञान वाढविणारी ती असावीत इतरानी तयार केलेली पुस्तके ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने वाचली तर चालतील पण ती पाठय पुस्तकें म्हणून कमेटीने स्वीकृत केल्याशिवाय असू नयेत. एका वेळेला सर्व शाळातून तीच पुस्तके चालू असावीत.

हिंदुस्थानला लोक गौरवाने "One of the English speaking nations" असे कितीहि म्हणोत. पण देशातील फारच थोडचा लोकांचा सबध इग्रजीशी येतो हे उघड आहे. बाकीच्या सर्व लोकाचा फक्त मातृभाषेशी सबध येतो. आतरराष्ट्रीय व राजकीय दृष्टीने इग्रजीची योग्य मर्यादा ध्यानात घेऊनहि असे म्हणण्याला काहीच अडचण नाही की, मातृभाषेतून सर्व शिक्षण द्यावे, व इग्रजी हायस्कूल किंवा कॉलेजमध्ये आवश्यक विषय समजून शिकविले जावे. प्राताप्रातातील व्यवहाराकरता हिंदी वापरावे लागेल ही गोष्ट लक्षात घेऊनच ही इग्रजी शिकविण्याची व्यवस्था ठीक आहे असें दिसते.

मला स्वत.ला शिस्तीची आवड आहे.शिस्तीच्या योग्य मर्यादा ओळखल्या पाहिजेत. शिस्तीच्या नावाखाली जेव्हा मुलाच्या राष्ट्रीय भावनाना धक्का पोंहचतो तेव्हा १९१८ साली रिस्ले सर्क्युलर अमलात आणल्यानतर जसे प्रसग उद्भवले तसे प्रसंग उद्भवण्याचा सभव असतो. शिस्तीचा अमल विद्यार्थ्यांपुरताच नसावा. राष्ट्राचे भावी घटक निर्माण करण्याचे पवित्र काम ज्यांच्यावर सोंपविले आहे त्याच्या कार्याचा नैतिक दर्जा एक प्रकारे उच्च आहे. म्हणून मुलांचे आचरणाला चागले वळण लावण्यासाठी मास्त-रांचे आचरण त्यांच्यासमोर कित्त्याप्रमाणे असणे श्रेयस्कर आहे. औचि-

त्याच्या भंग करणारे कांही प्रकार कलेच्या नावाखाली शाळेत सोज्वल समजले जातात तेव्हा शिस्तीचा विसर या लोकाना पडलेला दिसतो. आमच्यासारख्या जुन्या लोकाना हे प्रकार पटत नाहीत खास! आपल्या उच्च नैतिक दर्जाला शोभेल असे शिक्षकांचें आचरण असले तर वादाचे प्रसंग उपस्थित होण्याचे कारण राहणार नाही. गुन्हेगाराप्रमाणे विद्यार्थ्यांना दडाच्या शिक्षा करण्याचे कारण असू शकते काय? अशा शिक्षांचे मुलाच्या मनावर वाईट परिणाम होतात. शिक्षा मात्र पालकाना भोगावी लागते.

आमच्या वेळी विद्यार्थ्यांना फार अडचणी असत. घरची मडळी प्रतिकूल असे त्या वेळी वाहतुकीची साधने नव्हती. मुलाना आपली घरें-दारे सोडून पायी किंवा बैलगाडीने प्रवास करावा लागे व दूर शहर-वस्तीला राहावे लागे मातापित्याचे दर्शन वर्षवर्ष होत नसे. उन्हाळा नाही, हिवाळा नाही, पावसाळा नाही, हातात मधुकरीची झोळी घेऊन कित्येक मुलाना आपला शिक्षणक्रम पुरा करावा लागे व मिळालेल्या दक्षिणेवर इतर खर्च भागवावा लागत असे फार मेहनत करावी लागल्यामुळे कित्येक होतकरू तरुण अकाली मृत्यूच्या मुखात पडले हें सर्वांना माहित आहे. या गोष्टी नजरेसमोर असल्यामुळे सध्या शिक्षण घेत असलेल्या मुलाच्या शिक्षणावर होणारा खर्च पाहिला म्हणजे मन कष्टी होते. असे वाटू लागतें की या खर्चाचा मोबदला राष्ट्राला पुरा पुरा मिळत नाही. तरी कोणी इकडे लक्ष द्यावयाला तयार नाही. सुशिक्षिताची बेकारी व त्यावर उपाय धुडाळून काढण्याच्या कामांत दिसून येणारी दिरगाई व बुद्धीचा कमकुवत-पणा पाहिला म्हणजे सुशिक्षिताच्या शिक्षणांतहि कोठे चूक झाली आहे व होत आहे असे वाटू लागते. बौद्धिक शिक्षणावर होणारा खर्च अनाठायीं जात आहे. तेव्हा त्या जागी जीवनाला उपयोगी अशी शिक्षणपद्धति अम-लात आणणे हेच श्रेयस्कर आहे. प्रातात खनिज पदार्थ विपुल आहेत, कच्चा माल आहे, जंगल आहे, याचा उपयोग केला पाहिजे. ठिकठिकाणीं घरघुती धदे शिकवण्यासाठी टेक्निकल स्कूल्स काढणे जरूर आहे. शेती फायदेशीर होईल असें शिक्षण देण्याची जरूरत आहे. कोऑपरेशन, स्थानिक-स्वराज्य, ग्रामसुधारणा हे विषय टेक्निकल आहेत. यांत तज्ञ निर्माण केलें पाहिजेत.

आमच्या वेळी सरकारी नोकरी, वकीली वगैरे २–४ प्रतिष्ठित धद्यांकरतां शिक्षण घेतले जात असे. शिक्षणाचा व्याप आता वाढला आहे राष्ट्राच्या गरजा वाढल्या आहेत. त्या दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठेवले पाहिजे. शिक्षणाचें ध्येय कितीही उच्च असले तरी व्यवहाराची दृष्टी सोडून चालणार नाही.

विद्यार्थ्यांची जबाबदारी फार आहे. अनुकूल असेल त्यानी खर्च केल्यास फारसे नुकसान नाही. पण शाळांतून विशेष भरणा गरीब, मध्यम स्थितींतील मुलांचा असतो. अशानी दुसऱ्यांची फॅशन पाहून फाजील खर्च करण्याच्या भरीस पडूं नये घरचो मडळी पोटाला चिमटा घेऊन प्रत्येक महिन्यात वेळच्या वेळी पैसे धाडतात त्याचा गैरवाजवी फायदा विद्यार्थी मुलानी घेऊं नये. आजकाल विद्यार्थ्यामध्ये फॅशन फार बोकाळली आहे व चैनीवर त्याचा खर्च होतो. मितव्ययाचें शिक्षण मुलानी विद्यार्थी-दशेत घेतले पाहिजे. ‘ सुखार्थिन: कुतो विद्या। विद्यार्थिन: कुत सुख ’ हे सुभाषित विद्यार्थ्यांनी आपल्या हृदयावर कोरून ठेवावे अशी माझी त्याना सूचना आहे.

पुस्तक वाचून सुचलेले विचार वाचकासमोर माडले आहेत. कोणाचे मन दुखविण्याचा त्यात मुळीच हेतु नाही. उलट विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सुचलेले विचार येथे नमूद केले आहेत.

शेवटी उदयोन्मुख राष्ट्राच्या विद्यार्थ्याना आपले उचित कर्तव्य करण्याची परमेश्वर बुद्धि देवो अशी प्रार्थना करून ही प्रस्तावना समाप्त करतों.

बालाघाट<br>ता. २८–१०–१९३७

नारायण कृष्ण केळकर

# लेखकाचे दोन शब्द

आपल्या बालसवगड्याशी दोन गोष्टी बोलाव्या असे मला वाटलें. ज्या माझ्या बालमित्राकरता हे पुस्तक लिहिले आहे त्याना आनंद व उपयोग झाला तर मला सार्थक वाटेल स्मृतिशेष झालेल्या बालपणाच्या सुखद आठवणींनी थोराची घटकाभर करमणूक झाली तर 'अधिकस्य अधिकं फलम्.'

शुद्धलेखनाची नवीन पद्धति अनुसरण्यात आली आहे. 'खिळयाच्या भुताची' पुष्कळाना भीति वाटते. मला ते मुळीच अपायकारक झालें नाही म्हणून त्याच्या सचालकाचे मी आभार मानतों.

श्री नारायणराव केळकर माजी शिक्षणमत्री मध्यप्रदेश यांनी मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्याचा आभारी आहे. श्रीमत राव-बहादूर कुवरलालसिंग जमीदारसाहेब फुलचूर यानी प्रस्तुत पुस्तक छापण्याला दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्याचा ऋणी आहे.

'या अर्भकाचे गालगुच्चे घेऊन बाललेणे चढविण्याचा' आपला अधिकार गाजवणारे माझे मित्र केशवराव जोशी, वकील जळगांव (वऱ्हाड); याचे आभार मानणे आमचे व्यक्तिश संबध लक्षात घेता औपचारिक दिसले तरी प्रसंगास अनुसरून आहे.

लोकसग्रह कारखान्याचे व्यवस्थापक रा. शकरराव दाते यानी आस्थापूर्वक पुस्तक सुबक रीतीने छापून दिले याबद्दल आणि माझे पुतणे गो. गो. जोशी व मित्र रा. म. रा. वाईकर वकील यांनी केलेल्या मदतीबद्दल आभार मानून मी लाबलेल्या या दोन शब्दांना पूर्णविराम देतो.

—लेखक

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | आनंदपूरचे जमीदार | १ |
| २ रें | रामा नाइकाच्या गोष्टी | ८ |
| ३ रें | रामा नाइकाच्या गोष्टी (पुढे चालू) | १७ |
| ४ थें | आनंदपूरची शाळा | २५ |
| ५ वें | बाळपणचे सवंगडी | ३४ |
| ६ वें | बाळ शाळेंत जाणार | ४१ |
| ७ वें | दोन मित्र | ४६ |
| ८ वें | अस्वलाच्या पिंजऱ्यांत उडी | ५३ |
| ९ वें | वाढता परिचय | ५७ |
| १० वें | वर्गांत दुर्लक्ष | ६४ |
| ११ वें | झेंड्याचा खेळ व पहिली चकमक | ७२ |
| १२ वें | बाळ वसतिगृहांत राहावयास गेला | ७७ |
| १३ वें | विचित्र मुलगा | ८२ |
| १४ वें | चटोर चौकडीचे चाळे | ८७ |
| १५ वें | चोरी की अजाणपणा | ९५ |
| १६ वें | परत येण्याला उशीर | १०१ |
| १७ वें | भांडण विकोपास गेलें | १०५ |
| १८ वें | कट का केला. | ११३ |
| १९ वें | मास्तरांची सभा | १२० |
| २० वें | त्रिकूट तुटलें | १२५ |
| २१ वें | अभ्याससंबंधी मुलांचे विचार | १३३ |
| २२ वें | भांडणाची पुनरावृत्ति | १४१ |
| २३ वें | कुस्ती मारली | १४८ |
| २४ वें | दिवाळीची सुट्टी | १५५ |
| २५ वें | शाळेंतील खेळ | १६२ |
| २६ वें | परीक्षेनंतर | १६९ |
| २७ वें | शाळेला पुन्हां भेट | १७६ |

# कॉलेजच्या मार्गावर

## प्रकरण १ ले

## आनंदपूरचे जमीदार

आनंदपूरची जमीदारी सातपुडा पर्वताच्या रागेतील एका शाखेच्या पायथ्याशी वसलेली होती मूळ पर्वताच्या रागातून अलग निघालेली ही शाखा डोगराच्या ओळीच्या रूपाने अनेक कोसपर्यंत दूरवर पसरली होती. या पर्वतश्रेणीच्या पायथ्याशी वैनगगा नदीच्या खोऱ्यात या जमीदारीचा बराचसा भाग वसला होता. नदीच्या खोऱ्यात असलेला जमीदारीचा भाग सुपीक होता आणि येथील सृष्टिसौदर्य अनुपम व हवापाणी सुखावह असल्या-कारणाने सुरुवातीपासून नागपूरकर भोसल्याचे लक्ष या प्रातावर होते.

नागपूरहून बगालकडे जाणारा रस्ता याच जमीदारीतून गेला होता. रस्ता जेथे घाट चढू लागतो त्या चढणाच्या अर्ध्यात व घाटाच्या तोंडाशी पूर्वीच्या काळी जमीदारीतली महत्त्वाची नाकी होती. जमीदारीच्या तैनाती-तील शिपायांप्यादे व घोडेस्वार याच्या मदतीने रस्त्यावर चागलीच देखरेख होत होती; त्यामुळे चोराचिलटाचा व जगली जनावराचा उपद्रव व्यापारी-उदमी लोक, यात्रेकरू व इतर वाटसरू याना न होऊ देण्याच्या कामात त्या देखरेखीचा उपयोग होई. जगन्नाथपुरी व गया इत्यादि ठिकाणांकडे यात्रेकरिता जाण्याचा हाच मुख्य रस्ता होता. त्याचप्रमाणे बंगाल व पूर्वे-कडील दुसऱ्या प्राताशी व्यापारी दळणवळण याच रस्त्याने चाले, व त्या-पासून आनदपूरच्या जमीदाराना जकातीचें उत्पन्नहि चागले होई. त्यामुळे नागपूरकर भोसल्याच्या दरबारी आनदपूरच्या जमीदाराचें चांगले वजन होतें. बगालवर स्वारी [illegible] जाण्याचा नागपूरकर भोसल्यांचा हाच रस्ता होता. भोसले जेव्हा या रस्त्याने मुलुखगिरीस जात तेव्हा सरं-जामाची सर्व व्यवस्था या भागात येथील जमीदारांकडून होत असे.

जमीदारीचा बराचसा मोठा भाग जंगलाने व्यापला असल्यामुळे या प्रांतांत शिकारीचें वैपुल्य होते. केव्हा केव्हा भोसले सरकार येथे शिकारीस येत, तेव्हा शिकारीची व्यवस्था जमीदारसाहेब फार दक्षतेने करून देत असत. येथील जगलांत चरण्याकरिता हजारो एकर कुरणाची जागा असल्यामुळे नागपूरकडची गुरें दर वर्षी येथे चरावयास येत होती. अशा रीतीने या प्रांतांत लोकाचें जाणेंयेणें सारखें असल्याने लोकाना या प्रांताची माहिती होत जाऊन हळूहळू येथे लोकवस्ती देखील सारखी वाढत होती.

येथील किर्र् झाडी पाहून चांगला धीट मनुष्यहि चपापत असे व एकटदुकट हिंडण्याची हिंमत सहसा कोणाला होत नसे. डोगरावर व आसपास आडजातीच्या झाडाची इतकी दाट झाडी होती की, तेथून मार्ग काढणें कठीण होतें; व एखादा अपरिचित मनुष्य इकडेतिकडे भटकून मार्ग चुकला, तर त्या दाट झाडीच्या गर्दीत त्याची दिशाभूल होऊन मार्ग उमगणें अशक्य होत असे. सपाट जागी सरळ उच गेलेल्या गगनचुंबित साल वृक्षांचीं वनें दिसत; त्याचे सौंदर्य पाहून कोणाचेहि नेत्र धन्य होत. भर उन्हाळ्यांतहि सर्व प्रदेश हिरवागार व आल्हाददायक दिसे. त्यांतून पावसाळा नुकताच सपून गेला आहे, अशा वेळी येथील सौंदर्यात विशेष भर पडत असे. हाच देखावा डोगरावरून मनुष्य पाहू लागल्यास, एकीकडे सापाप्रमाणे सरपटणारी नदी, कड्यावरून उड्या घेत जाणारे ओढे, खाली दूरपर्यंत मनोहर दिसणारी कोवळी भाताची शेतें व जागजागी दिसणारे तुडुब भरलेले तलाव आणि त्यांच्या काठची खेडी, व दुसरीकडे क्षितिजापर्यंत पसरलेला लतावृक्षाच्या हिरवळीचा समुद्र व वाऱ्याने हालल्यामुळे त्यांतून होणारा लाटांचा भास—असा हा देखावा फारच प्रेक्षणीय दिसे. त्यावर सकाळ, संध्याकाळ, दुपार वगैरे निरनिराळ्या वेळी आकाश निरभ्र असतां हिरव्या, पिवळ्या, गुलाबी, शेंदरी, जाभळ्या रगांच्या त्या विस्तीर्ण मैदानावर आलटून पालटून दृग्गोचर होणाऱ्या छटा व आकाश अभ्राच्छादित असतां शांत पण भीतिप्रदेशी त्या हिरवे रणावर आलेली कृष्णवर्णाची छाया पाहून पाहणाराच्या मनांत सुख, दुःख, आनंद, आश्चर्य, खिन्नता या छटा आलटून पालटून उमटत असल्या तर त्यांत नवल नाही.

आनंदपूरच्या जमीदारीत सुरुवातीस सातआठ जगली गावें होती. एवढ्या विस्तीर्ण जगलांत ही गावें कोठेच लपून जात. जमीदारांच्या पूर्वजांनी पुष्कळ मेहनत करून बरीच नवीन गावे वसविली होती. हीं गावें सातपुड्याच्या नैॠत्येकडे असल्यामुळे येथे पाऊस चांगला पडत असे येथील मुख्य पीक धानाचे होते. लोक गरीब असले तरी जमीदारसाहेबांच्या देखरेखीखाली सुखी होते. जगल तोडून नवीन गावे वसविली जात, फार झाले तर एका गावात दहावीस घरें असत. गावाच्या आसपास चारी बाजूला जगलच जगल असे. जगली जनावरापासून लोकाना असह्य त्रास झाला म्हणजे कटाळून एखादे दिवशी सारा गावचा गाव ती जागा सोडून जाई व त्या ओस पडलेल्या जागी पुन्हा जगल उगवून चार दिवसापूर्वी तेथे असलेल्या झोपड्याचे नावनिशाणहि राहत नसे. पण सर्व अडचणीना न जुमानता आनदपूरच्या जमीदारानी लोकाना धान्य, ढोरे, नागर वगैरे देऊन व सर्व प्रकाराने मदत करून हा प्रदेश हळूहळू आबाद केला होता.

या प्रदेशास झाडी हे नाव मिळालें असून, येथील लोक झाडपी या नांवाने सबोधिले जात. हे लोक मागासलेले असले तरी प्रामाणिक होते. कोणी त्याचा अपराध केल्यास खून करून सूड घेण्यास, मनावर ताबा ठेवण्याची सवय नसल्यामुळे, ते मागेपुढे पाहणारे नव्हते. तरी पण एकदरीत हे लोक स्वभावाने गरीब असून मित्रेहि होते; एककल्ली व लोकाच्या उपयोगी न पडणारे असले तरी त्याच्या अगी आदरसत्कार करण्याची तत्परता दिसून येत होती. या खोऱ्यात पाणी विपुल व जमीन सुपीक असल्यामुळे जागजागी उसाचे मळे होते व हिवाळ्याच्या दिवसात ऊस गाळण्याकरता चालणाऱ्या चरख्याचा कर्कर् आवाज अप्रतिहत ऐकू येत असे. अशा वेळी वाडीवरून जात असलेल्या वाटसरांस आपल्या आदरातिथ्याचा सत्कार घ्यावयास लावल्याशिवाय मळेकरी सहसा जाऊ देत नसत. याप्रमाणे जगली, मागासलेल्या व जनसमुदायापासून दूर राहणाऱ्या लोकात दिसून येणारे बरे वाईट गुण येथील लोकात दिसून येत होते.

जमीदारीचे मुख्य ठाणे आनदपूर हे होते व या गावाच्या नावावरूनच जमीदारीसहि तेच नाव पडले होते. गाव जमीदारीच्या मध्यभागी नदीच्या काठी होता. आसपास जगल व जवळच पूर्वेस डोगर, यामुळे

गावाचें सौन्दर्य दर्शनीय होतें. गाव टुमदार होता; एक दोन देवळें व बगीचेहि तेथे होतें. गावाभोवती परिकोट होता; तो निरुपयोगीपणामुळे व डागडुजी नसल्यामुळे पडित झाला होता. गावाच्या मध्यभागी किल्ल्यावजा चौमजली वाडा होता. हा वाडा फार जुना व मजबूत होता. पुढील भाग नवीन बाधलेला असून नवीन तऱ्हेचा होता. समोरचा दिवाणखाना प्रशस्त व मोटा होता. त्यात एका बाजूला खुर्च्याटेबले नीटनेटकी माडून ठेवलीं होतीं, व दुसऱ्या बाजूला बिछाईत घालून नव्या जुन्या तऱ्हेची जोड केली होती. हडयाझुबरें, नव्याजुन्या चित्रकारानी काढलेली चित्रे आणि इतिहासप्रसिद्ध पुरुषाच्या, आधुनिक पुढाऱ्याच्या तसबिरी यानी दिवाणखान्याला शोभा आणली होती. दिवाणखाना वैभव व नीटनेटकेपणा यांचें आदर्शच होते म्हटलें तरी चालेल. वाडयाच्या आसपास मोठी भित घातलेली होती. तीतून आंतल्या अगाने धान्याची कणघरें व जनावरांकरता पडव्या काढल्या होत्या. धान्याने भरलेली कणघरे, पडव्यांतून ठेवलेली औतें वगैरे सामान, गोठ्यात गाईंभोवती उड्या मारणारी वासरे, वाड्यासमोर हत्तीप्रमाणे झुलणाऱ्या त्या बैलांच्या पांढऱ्या शुभ्र जोडया, हे सर्व वैभव पाहून कोणाचेहि मन प्रसन्न होई व त्याला खेड्यांतील खऱ्या संपत्तीची कल्पना येई. वाड्याच्या समोर फुलाचा व मागील बाजूस फळफळावळ व भाजीपाला यांचा बगीचा होता.

सध्याचे जमीदार याचा त्याच्या वाडवडिलाप्रमाणे चांगला नांवलौकिक होता. त्याच्या चागुलपणाबद्दल व परोपकाराबद्दल जमीदारीतील सर्व लोक त्यांना धन्यवाद देत होते. दानधर्मांत त्याचा हात सढळ होता; त्यायोगें त्यांचा कीर्तिपरिमल दूरवर पसरला होता व उन्हाळ्यांत छायेच्या आशेने वृक्षाचा आश्रय करणाऱ्या वाटसराप्रमाणे गरजू लोक मदतीच्या आशेने त्यांच्याकडे येत असत. ते शूर होते व चुरशीस लागून प्राणाचीही पर्वा न करतां व्याघ्र आदि हिंस्र पशूंच्या शिकारी त्यानी केल्या होत्या. भिंतीच्या आश्रयाने पेंडा भरून ठेवलेले शिकारीत मारलेल्या जनावराचे जबडे त्यांच्या शिकारीच्या कौशल्याची साक्ष पटवीत होते. [illegible] त्याच्या शिकारीचीं शस्त्रास्त्रे व्यवस्थित रीतीने टांगलेली होती. त्यांच्या पूर्वजांची शस्त्रास्त्रें ठळक दिसतील अशाच रीतीने मध्यभागी ठेवलेलीं

होती. आपल्या पूर्वजांच्या शौर्याचा योग्य अभिमान त्याच्या हृदयात सदैव जागृत असे. सध्याच्या काळी वैयक्तिक शौर्यास योग्य अवसर नाही याबद्दल त्याना दिलगिरी वाटत असली, तरी या युगातील सुधारणेकरता लोकानी दाखविलेल्या शौर्याबद्दल त्याना योग्य अभिमान होता. आधुनिक शिक्षणाची ते प्रशसा करीत असले तरी पूर्वीच्या पिढीतील लोकाच्या करारी व बाणेदार वर्तनाची त्याना मातबरी जास्त वाटे. विद्येचे भूषण शील आहे व शीलाशिवाय विद्या निष्फल आहे, असे ते म्हणत. ते शरिराने धिप्पाड होते व त्याच्या रुबाबदार चेहऱ्याकडे पाहण्याची किंचित् आदरयुक्त भीतीच वाटे, पण त्याचें अत:करण मात्र अत्यत कोमल व दयावत होतें त्याचा बराच वेळ जमीदारीच्या देखरेखीत जात असे; कारण प्रजेवर त्याचें पोटच्या पोराप्रमाणे प्रेम असून, त्याचें सुख तेच माझे सुख असें ते नेहमी म्हणत. ख्यालीखुशालीचा त्याना अत्यत तिटकारा होता. ख्याली-खुशाली, अज्ञान व आळस याच्यामुळे आमच्या लोकाना विपन्नावस्था आली आहे हे त्याचें मत प्रसिद्ध होते शरीर कह्यात राहून आपण नेहमी कार्यक्षम असावे म्हणून ते नियमितपणे व्यायाम घेत. जुन्या चाली-रीती व आचार पाळण्याविषयी ते फार दक्ष असत व अतिथि-अभ्या-गताचा परामर्ष ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे ते घेत.

जमीदारसाहेबाच्या पत्नी रूपाने सुदर, मनाने उदार व स्वभावाने सुशील होत्या. रयतेला तर त्या माउलीप्रमाणे होत्या व जमीदारसाहेबां-पाशी एखाद्या गोष्टीसबधाने जीभ उचलण्याचे आश्रित लोकाना धाडस होत नसले की त्यानी खुशाल जाऊन जमीदारीणबाईंचे पाय धरावे—मग त्याची याचना कधीच वाया जावयाची नाही. त्या हाताच्या सढळ होत्या व कधीहि कोणी त्याच्याजवळून विन्मुख गेला नाही. त्याच्या हातून दान-धर्मापायी बराच खर्च होत असल्यामुळे जमीदारसाहेब नेहमी थट्टेने त्यांना म्हणत की, 'धन मिळविण्याकरिता किती यातायात करावी लागते तें बाय-काना माहीत नाही; केवळ त्यामुळे त्या खर्चात उधळेपणा करितात.' यावर त्याहि उत्तर देत, 'हे सर्व वैभव देवाचें देणें आहे. त्याचा देव-कार्यी उपयोग केला पाहिजे.'

जमीदारसाहेबांस तीन वर्षांचा नक्षत्राप्रमाणे देखणा एक मुलगा

होता. त्याचें लाडकें नांव 'बाळ' असें होते. त्याचें कोडकौतुक करणे हा एक सर्वांना विषय होऊन बसला होता.

यमुना नांवाची जमीदारीणबाईच्या पदरी एक मोलकरीण होती; तिच्याकडे बाळाला सांभाळण्याचें काम असे. तीहि त्याच्या बाळलीलांचें कौतुक करीत त्याला घेऊन गावभर फिरत होती. मात्र दुसऱ्या माणसाने त्याची स्तुति केली की दृष्ट होऊं नये म्हणून बाळाला ती पदराखाली झाकून घेई व इडापिडा टळो म्हणून त्याच्यावरून मुठी ओवाळून आपल्या हातांचीं बोटें आपल्या कानशिलावर मोडून घेई. त्या माणसाची खरडपट्टी काढून आपला मोठेपणा जाहीर करण्यास ती विसरत नसे. बाळाच्या बाललीलाहि हृदयाला चटका लावून टाकण्यासारख्या होत्या. एकदा जमीदारीणबाई गाईची धार काढीत होत्या. यमुनेचा हात धरून बाळ जवळच उभा होता. यमुनेला झुकाडी देऊन तो धावतच आईकडे निघाला. 'बाळ! गोऱ्हा मारील' असें घाबऱ्या घाबऱ्या ओरडत यमुना बाळाच्या मागून येत होती, तोंच आईच्या पाठीशी जाऊन बाळ उभा राहिला. जवळच गड्याने गोऱ्ह्याला आवरून धरले होतें. धार काढीत असलेल्या जमीदारीणबाई व त्यांच्या पाठीशी दूध मागत उभा असलेला बाळ याना पाहून यशोदा गोदोहन करीत आहे व पाठीशी गोपालकृष्णाची बालमूर्ति पेला घेऊन दूध मागत उभी आहे या चित्राची यमुनेला आठवण होऊन प्रेमाचें भरतें आले. तिने बाळाला चटकन उचलून घेतले व ती पटापट त्याचे मुके घेत सुटली.

बाळ जसजसा मोठा होत चालला तसतसा तो यमुनेला आवरेनासा होऊं लागला. तो केव्हाच यमुनेला झुकांडी देई व कुत्र्यापाशीं जाऊन बसे. यमुनेला कुत्र्याची भीति वाटते याची त्याला गंमत वाटत असे. कधी कधी तो धावत सुटे व यमुनेला दमवून टाकी. केव्हा तो एखाद्या मोठ्या धिप्पाड गोऱ्ह्याच्या मागे काठी घेऊन लागत असे, तेव्हा तर यमुनेला जीव मुठीत घेतल्यासारखे होऊन जाई. एखाद वेळ तो झाडाच्या उंच फांदीवर जाऊन झोके घेत बसे व यमुना घाबरली आहे असें पाहून मोठ्याने हासत सुटे किंवा तिला वाकुल्या दाखवी. बाळ एकदा असाच झाडाच्या एका उंच फांदीवर बसून झोके घेऊं लागला व टाळ्या

वाजवून आणि ओरडून यमुनेला हाका मारू लागला. कोणी पाहिल्यास ते आपल्यावर रागावतील या भीतीने यमुना घाबरून गेली. ती त्याला हळू बोलण्यास सांगू लागली पण तो जास्तच आरडाओरड करू लागला. यमुना लाडीगोडी दाखवून त्याला खाली उतरण्यास सांगत होती व तो अधिक उंच जात होता. शेवटी यमुना रडकुंडीला आली. रामा नाईक नांवाचा एक म्हातारा जमीदारसाहेबांच्या पदरी होता. तो बाळाच्या लीला कौतुकाने पाहत होता. यमुनेची घाबरगुंडी झालेली पाहून तिची त्याने थट्टा केली शेवटी त्याने बाळाला हाक मारली. बाळाला रामा नाइकाचा फार लळा होता. झाडावरून तो भराभर उतरला व उड्या मारीत रामा नाइकाकडे निघून गेला.

बाळ मोठा होत चालला होता व त्याला आताशी यमुनेची संगत आवडेनाशी होत चालली होती. यमुनेबरोबर झोपाळ्यावर बसून तिचें गाणे ऐकणे आता त्याला आवडत नसे यमुना मैत्रिणीशी गोष्टी बोलण्याच्या नादात लागली आहे असे पाहून, बाळ पळून रामा नाइकापाशी जाई व बसून राही. इकडे यमुना बाळाला शोधून रडकुंडीला येई. बाळ रामा नाइकाकडे फार जातो याचे यमुनेला वैषम्य वाटत असे. तिने जमीदारीणबाईंपाशी बरेच वेळा रामा नाइकाच्या द्वाडपणाबद्दल कुरकुर केली व बाळाला त्याच्याकडे न जाऊं देण्याविषयी सांगून पाहिले. पण शेवटी बाळाच्या मर्जीप्रमाणें त्याला रामा नाइकाच्या सांभाळी घालणे प्राप्त झाले व त्याप्रमाणे जमीदारबाईंनी हुकूम दिला. तो ऐकून यमुनेला जितके वाईट वाटले, तितकाच आनंद बाळाला झाला व त्याहून अधिक आनंद रामा नाइकाला झाला.

# प्रकरण २ रें

# रामा नाइकाच्या गोष्टी

बाळाला साभाळण्याचे काम रामा नाइकाकडे आल्यापासून त्याला आपल्या मोठेपणांत भर पडल्यासारखे वाटू लागले. जमीदारसाहेबाच्या आजोबाच्या वेळेपासून रामा नाईक–आनंदपूरच्या जमीदारांच्या पदरी होता. तो फार शूर असून मालकाच्या अगदी मर्जींत होता ऐन जवानीत तो शिपाईगिरीच्या नोकरीला लागला होता, व प्रत्येक प्रसगी त्याने इमानेइतबारे मालकाची नोकरी बजावली होती जिवावरच्या अनेक प्रसगी त्याने आधी संकटात उडी घालून मालकाची मर्जी मिळविली होती. त्याची इमानदारी व धैर्य पाहून, सध्याच्या [illegible] वडलाबरोबर संरक्षक या नात्याने नेहमी राहण्याचे काम त्याला तरुणपणातच देण्यात आले होते. तेव्हापासून तो सतत त्याच्या बरोबर राहत असे, व ते जेथे जातील तेथे त्याच्याबरोबर सरक्षणाकरता जात असे शिकारीच्या व धाडसाच्या कामात तो त्याना हिंमत देऊन साहाय्य करीत असे ; त्यामुळे हल्लीच्या जमीदारसाहेबांचे वडील रामाला आपल्या मित्राप्रमाणे वागवून "रामाजी नाईक" असे बहुमानाने सबोधीत असत. हल्लीच्या जमीदारांना तर त्याने लहानपणी शिपाईगिरीचे शिक्षण दिले होते आपल्या पिढीजात नोकराला जमीदारसाहेब सन्मानाने वागवीत व तोही घरच्या एखाद्या वडील माणसाप्रमाणे घरात राहत असे.

आजकालच्या 'करारा'च्या नोकरीप्रमाणे त्या वेळच्या पिढीजात नोकरीला हीनपणा आलेला नव्हता; नोकरांनाहि मालकाचे घरी आपण हक्काने आहोंत असेच वाटत असे—ते इतके की, कित्येक प्रसगी नोकर व मालक हें नातें न राहता जिव्हाळ्याचे नाते दिसून येत असे. आपण घरचें कोणी वडीलधारें माणूस आहों असेच रामा नाइकाला वाटत असे. एखाद वेळ जमीदारसाहेबाची चूक असली किंवा त्याचे करणें रामा नाइकाच्या मनाला आलें नाही, की तो त्यांच्यावर रागावतहि असे व त्यांत

त्याला कांहीच वावगे वाटत नसे. जमीदारसाहेबाच्या वडिलांनी वृद्धापकाळीं रामा नाइकाला नीट जपण्याविषयी त्यांना अनेक वेळां बजावून सांगितलें होते. जमीदारसाहेबाचेहि या आपल्या पिढीजात नोकरावर प्रेम होतें, व त्याच्याबद्दल त्याना वाटत असलेल्या आदरामुळे त्याच्या वृद्धापकाळी त्याची नीट व्यवस्था राहील याची ते काळजी घेत.

सध्या रामाजी नाइकाकडे कांही काम नसल्यामुळे नोकरचाकरावर रागावणे, बाळाच्या लीला पाहणे व आपले शिपाईगिरीचे पोशाख व शस्त्रं याजकडे पाहून गत कालच्या आठवणीत तन्मय होणे, या गोष्टींत त्याचा वेळ विभागला जात असे.

बाळाची जिम्मेदारी रामा नाइकावर पडल्यापासून त्याच्याकडे एक मोठा ठेवा जतन करण्यास दिल्याप्रमाणे त्याला कोठें ठेवू अन् कोठे न ठेवू असें रामाजीस होऊन गेले होते. आपल्या छोटया मालकास एक क्षणहि तो विसवून राहात नसे; तो त्याला फिरावयास नेई, त्याला निरनिराळे खेळ शिकवी, त्याच्याबरोबर गोटया, विटीदाडू, पतग वगैरे खेळ खेळू लागे, आणि आपल्या छोटया मालकाबरोवर खेळांत रंगला म्हणजे तो आपली तहानभूकहि विसरून जाई. त्याच्या या आनदांत त्याचा हेवा करणारी एक यमुना होती. बाळ हातून गेल्यापासून–निसटल्यापासून–आपले महत्त्व कमी झाले याबद्दल तिला वैषम्य वाटत होते. बाळाला घरी आणण्यास रामा नाइकाला उशीर झाला आहे किवा खेळण्यात बाळाचे कपडे मळले आहेत, असे स्वतःला अनुकूल प्रसग पाहून बाळाला सांभाळण्याचें काम पुन्हा आपल्याकडे मिळविण्याचा प्रयत्न यमुनेने करून पाहिला. म्हातारपणामुळे रामाजी बाळाला साभाळू शकत नाही, तो बाळाला पाडतो, बाळाला जगलाकडे फार दूर नेऊन थकवून टाकतो अशी चुगली खावून, तिने जमीदारीणबाईंच्या मातृहृदयात भीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण जमीदारीणबाईंनी तिच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केलें. एकदा बाळाला घेऊन येत असतां यमुनेने बाळाला खेळवण्याचे काम स्वतःकडे परत मिळवण्याचा अखेरचा प्रयत्न करून पाहिला. तिचें बोलणें ऐकत असतां जमीदारीणबाई सहज बाळाला म्हणाल्या, "तुला यमुनाच खेळवीत जाईल बरं का बाळ." यमुनेच्या कडेवरून उडी मारून

तिला भेवडावत बाळ म्हणाला, "नको मला ती भित्री यमुना ! रामाजी नाईक मला छान छान गोष्टी सांगतात व गमत गमत दाखवितात." बाळाचें उत्तर ऐकून मोठ्या कौतुकाने त्याच्याकडे पाहत आई म्हणाली, "आहेतच बरे बेटा आपले रामाजी नाईक तसे. तुला त्याच्याबरोबर राहणें आवडतें तर तू त्याच्या बरोबरच राहत जा." यमुनेचा तो शेवटचा प्रयत्न फसला व तेव्हापासून तिने तो नादच टाकून दिला

म्हाताऱ्या लोकाना लहान मुलाचे मन कळते व लहान मुलांना म्हाताऱ्या माणसांचे मन हेरता येते म्हणतात. म्हणून त्याची सहज मैत्री एकमेकांशी जमते, ते एकमेकांचा कैवार घेतांना दिसतात व एकमेकाच्या मनाप्रमाणें वागतात. रामा नाईक बाळाच्या अगदी मर्जीप्रमाणे वागत असे व त्याची करमणूक करण्याकरता झटत असे. बाळालाहि त्याचा इतका लळा लागला होता की रामा नाइकाशिवाय त्याला करमेनासे होई. निरनिराळ्या गोष्टीनी रामा नाईक त्याचे मनरजन करी कधी रामा नाईक त्याला दिवाणखान्यांत घेऊन जाई आणि पूर्वजाच्या तसबिरी दाखवून व गोष्टी सागून त्याच्या शौर्याची व मोठेपणाची स्तुति करीत त्याच्याविषयी योग्य अभिमान त्याच्या मनात उत्पन्न करीत असे; कधी त्याला तरवारीचे हात दाखवी किंवा त्याच्या हातांत धनुष्य देऊन नेम धरण्यास शिकवी; आणि कधी त्याला घोड्यावर बसवून हिडवी. अशा वेळी रामा नाइकाच्या अंगीं जो आवेश भरत असे त्याची कल्पना करणें आम्ही वाचकावर सोपवतों. एखाद्या सणाच्या दिवशी बाळाला नीटनेटका पोशाख घालून व स्वत: आपले शिपाईबाण्याचे जुने कपडे चढवून, लोकांचे मुजरे घेत बाळा-बरोबर हिंडताना रामाजीच्या मुखावर प्रकट झालेला आनद पाहिल्याचे सांगणारे लोक आनदपुरात कित्येक सापडतील.

खेड्यांतील लोकाना दिवाळीचा सण किती महत्त्वाचा व आनदाचा असतो याची वास्तविक कल्पना शहरवासियाना होणार नाही. वर्षभर काबाडकष्ट केल्यानंतर आज पीक हातीं पडत आहे, चार दिवस तरी दोन घास सुखाने खाण्याला मिळतील अशा उल्हासित वृत्तीने व प्रफुल्लित मनाने, गरिबी अंगवळणी पडल्यामुळे अल्पसतुष्ट असलेले हे लोक जाडे-भरडे नवीन कपडे घालून मंडई पाहण्यांत चार–आठ दिवस घालवून

आनंद मानून देवाजवळ आपली कृतज्ञता व्यक्त करितात. हाच काय तो काबाडकष्ट विसरण्याचा व नेहमीच्या विवंचना व यातायातीतून मन काढून चैनीत हिंडून फिरून सुख मानून घेण्याचा प्रसग ! दिवाळीत तरी खेड्या-पाड्यांतून चहूकडे आनदीआनद दिसून येतो व त्या आठपंधरा दिवसांच्या सुखाच्या ठेव्याच्या भरवशावर खेड्यातील लोक पुढील दिवस कंठीत राहतात. महत्त्वाच्या सर्व खेडेगावात आळीपाळीने मड्या भरत असतात. आनंदपूरच्या मडईपासूनच अजूनहि मंड्याना सुरुवात होते. साधारणपणें त्या त्या गावच्या बाजारच्या दिवशी मडई भरत असे. रामा नाइकाबरोवर बाळ मडईला गेला होता. मडईभर स्वतत्रपणे हिडण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसग होता. मडईत दुकानांची गर्दी व खेळतमाशाची रेलचेल होऊन गेली होती. 'चक्रनेमिक्रमेण' खालीवर चक्राकार फिरणाऱ्या झुल्यांत किवा खावाभोवती चक्राकार फिरणाऱ्या चक्रपाळण्यातल्या सळयातून लटकणाऱ्या जनावराच्या लाकडी पुतळ्यावर बसून काही लोक मौज करीत होते व जवळ ती मजा पाहून आपली करमणूक करून घेणाराची गर्दी लागून राहिली होती. काही लोक पानाचे विडे खाऊन हसत खेळत एकमेकाशी बोलत उभे होते. काहीजण नवीन सामान खरीद करीत होते तर काही आपल्या मित्राच्या भेटी घेत होते. पायात घुगरू व गळ्यांत कवड्याच्या माळा घालून व हातात मोराच्या पिसांच्या चवऱ्या घेऊन नाचणाऱ्या गोवारी लोकांचे घोळके ठिकठिकाणी उभे होते. झाडांच्या सावलीत दढारी किंवा प्रहसनवजा नाटके चालू असून ती पाहण्याकरता लोकांची गर्दी लोटून राहिली होती. काहीजण वाघ वगैरे जनावराचे मुखवटे घालून विचित्र आवाज काढीत हिंडत होते व लहान मुलांना भेवडावयाला कारणीभूत होत होते. वाचक जर आनदपूरच्या मडईत हजर असते तर हाच देखावा त्यांच्या नजरेस आला असता. अहमहमिकेने चांगले काम दाखवून प्रत्येकजण जमीदारसाहेबांपासून इनाम व शाबासकी व इतर लोकापासून वाहवा मिळवण्याकरिता झटत होता. रामा नाईक बाळाला त्या सर्व मौजा दाखवीत हिंडत होता, व आला गेला इसम आपल्या छोटचा मालकाला उद्देशून कौतुकाचे दोन शब्द रामा नाइकाशी बोलल्याशिवाय पुढे जात नव्हता. रामा नाइकाला अगदी फुरसत नव्हती—परीक्षकाची भूमिका घेऊन प्रत्येक-

खेळ लक्षपूर्वक पाहा, कोणाची तारीफ कर, कोणास काम चांगलें करण्यास बजाव, कोणी चुकत असल्यास स्वत: करून दाखव, अशा रीतीने सर्व ठिकाणी हिंडून तो सर्वाचा परामर्ष घेत होता. मधून मधून बाळाच्या प्रश्नाची झोड लागे, त्याकडेहि त्याला लक्ष द्यावे लागत होतें.

बाळाला त्याच्या पूर्वजांच्या गोष्टी सांगण्यात रामाजीला मोठे स्फुरण चढत असे बाळहि त्या अद्‌भुत कथा अगदी लक्ष लावून ऐकत असे. रामा नाइकाने या गोष्टी पुनः पुन्हा कितीदा तरी बाळाला सांगितल्या असतील, तरी त्याला त्या पुनः पुन्हा सांगाव्याशा वाटत.

"श्री शिवाजी महाराजाच्या पदरी मुधोजी नावाचे शिलेदार होते. शूरपणाची अनेक कामे करून महाराजाकडून शाबासकी मिळविण्यात त्यांनी आपलें सर्व आयुष्य वेचून त्यातच धन्यता मानून घेतली होती. मुधोजीचा मधला मुलगा परसोजी हा बापाप्रमाणे शूर होता. त्याने राज्यकारभारांत निरनिराळी कामे केली होती. त्याची हुशारी पाहून त्याला वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमण्यांत आले. परसोजीच्या वेळी औरंगजेब बादशहा दक्षिणेत आला होता. त्या भानगडीत परसोजीचा सर्व वेळ गेला. परसोजीचा मुलगा कान्होजी शूर व महत्त्वाकांक्षी होता. वऱ्हाडची सुभेदारी त्याच्याकडे आल्यानंतर त्याने प्रथम कांही काळ शाहूराजास मदत करून ताराबाईच्या पक्षाचा मोड करण्यात घालविला. या कामातून फुरसत झाल्यावर त्याने गोंडवण किंवा झाडीचा प्रांत यावर आपला मोर्चा फिरविला. या स्वारीत त्याच्याबरोबर आबाजी नावाचा एक तरणाबांड शिपाई होता. त्या प्रांताचें नैसर्गिक सौंदर्य व समृद्धि मिळविण्याची साधने पाहून, त्याला तो मुलुख आपल्याला मिळावा व आपलें तेथे कायमचें वास्तव्य व्हावे अशी इच्छा झाली. हेच बाळ तुझ्या कुळाचे मूळ पुरुष ! गोंडवणांत कायमचें येऊन राहावें, ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा त्यांना नाद लागून राहिला होता. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी कान्होजीचा धुरंधर पुतण्या रघूजी याने नागपूरकर गोंड राजाला हाताखाली घालून नागपूर येथे आपले सुभेदारीचे मुख्य ठिकाण स्थापित केले व तेथून त्याने सतत १५ वर्षेपर्यंत उत्तरेस प्रयाग, दक्षिणेस कर्नाटक व पूर्वेस बंगाल या प्रांतांवर स्वाऱ्या करून अलोट संपत्ति मिळविली. बंगाल प्रांत सतत दहा वर्षे लुटून त्याने त्या प्रांतावर

आपला दरारा बसविला. या सर्व स्वाऱ्यात आबाजी रघुजीबरोबर होते. आबाजीच्या शौर्यावर व स्वामिनिष्ठेवर खूष होऊन रघुजीने त्यांना गोंड-वणांतील म्हणजे वैनगंगा नदी व सातपुड्याची शाखा सालेटेकडी यांमधील प्रांत जमीदारी वसविण्याकरिता दिला. तपश्चर्या फळाला येऊन आबाजीची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. तेव्हापासून तुमच्या कुळात ही जमीदारी चालू आहे.

"आबाजीच्या पदरी माझे आजोबा शिपाईगिरीवर होते. मालका-बरोबर जातीने हजर राहून सर्व मुलुखगिरी व लढाया यांत त्यानी भाग घेतला होता. आपल्या मालकाबरोबर ते या प्रांतात राहावयास आले. माझे बाबाहि याच जमीदारीच्या नोकरीत लहानाचे मोठे झाले व शेवटी त्यानी स्वामीकार्यी आपला देह अर्पण केला. तेव्हा मी केवळ तीन वर्षांचा बालक होतो. बाळपणापासून याच जमीदारीच्या अन्नावर हा देह पोसला आहे. आज तीन पिढ्याची नोकरी मी निमकहलालपणाने केली आहे. आता तुझ्यावरून हा देह ओवाळून टाकला म्हणजे त्याचे सार्थक होईल.

"सागरकर मराठ्याबरोबर पानपतच्या लढाईवर जाण्यासारखे वृद्धापकाळामुळे आबाजीचे वय नव्हते. म्हणून त्याचे चिरंजीव दामाजी पानपतच्या स्वारीवर गेले. पानपतच्या लढाईनंतर प्रयाग, बंगालच्या रस्त्याने नागपूरकर भोसला रघुजी आणि त्याचे धाडसी मदतनीस आबाजी याच्या पराक्रमाचे प्रदेश पाहत ते घरी परत आले. पानपतचे वृत्त–मराठेशाहीच्या अफाट दर्याला अनेक पाटामध्ये विदारण करणारे ते वृत्त–ऐकून आबाजीच्या हृदयाला धक्का बसला. किती वेळा तरी पानपतचा वृत्तांत त्यानी आपल्या मुलाला सांगावयाला लावला असेल.

"महाराष्ट्रात दुहीचे बीज रघुनाथराव पेरू लागला. माधवरावाचे लहान वय पाहून रघुनाथराव याने नागपूरकर जानोजीराव यास सातारची गादी मिळवून देण्याचा मोह घालून आपल्या पक्षाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. आबाजीला ही हकीकत कळताच उतार वयांत देखील ते नागपुरास गेले व रघुजीच्या पराक्रमाची जानोजीस आठवण देऊन आणि मोहाला वश झाल्याबद्दल त्याची निर्भर्त्सना करून मराठेशाहीत झगडे वाढविण्याच्या

विद्रोही कार्यापासून त्याला त्यांनी परावृत्त केलें. लवकरच तेथेच त्यांचें देहावसान झालें.

" नागपूरकर भोसल्याबरोबर खडर्याच्या लढाईंत दामाजी होते. त्या लढाईत विजय मिळविल्यावर पानपतच्या पराभवामुळे खालावलेला महाराष्ट्र सावरत आहे असा घटकाभर दामाजीस हुरूप आला. संध्यासमयी दिसणाऱ्या टवटवीचें तें दृश्य होते! इंग्रजांशी झालेल्या मराठ्यांच्या दुसऱ्या युद्धांत आरगाव येथे दामाजीने स्वामीकार्याकरता जीर्ण झालेला देह धारातीर्थी अर्पण केला. या वेळी दामाजीचे चिरंजीव तुझे पणजोबा ऐन जवानीत होते. पितृनिधनामुळे त्याना दुःख झाले; कटक व वऱ्हाड प्रांत नागपूरकरांकडून इंग्रजाकडे गेला याची त्यात भर पडली. स्वत च्या शरिराचा अवयव तुटून पडावा यासारखे त्याना त्यामुळे दु ख झालें. कलकत्त्याभोवती खंदक खणून स्वतःच्या जीविताचें व मालमत्तेचे सरक्षण करणारे इंग्रज यानतर नागपूर प्राती दिसू लागले व तेथे त्याची हुकमत गाजूं लागली.

" यानंतर पंधरा वर्षांनी नागपूरकर आप्पासाहेब यानी इंग्रजाचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न केला. स्वराज्यशाही पूर्ववत् चालू करण्याच्या नागपूरकरांच्या या प्रयत्नाला तुझ्या पणजोबानी साथ दिली. पेंढाऱ्याच्या लुटीमुळे प्रजा त्रस्त झाली होती. कुपणाने शेत खावे त्याप्रमाणे त्या वेळी कारभाऱ्याचें वर्तन असल्यामुळे प्रजेचा त्याच्यावरचा विश्वास उडाला होता. सैन्यात गैरशिस्तपणा बोकाळला होता व नालायक सेनानायक भेदनीतीला बळी पडण्यास तयार होते. इंग्रजांत देशभक्ति होती; त्यांच्या सैन्यांत शिस्त व टापटीप होती. आप्पासाहेबांचा हा प्रयत्न फसला. वाळूचा बाध प्रलयापुढे किती टिकाव धरणार!

" गोंडवणांतील हरएक किल्ला व गढी लढविण्याची तुझ्या पणजोबांनी पूर्ण तयारी करून ठेवली होती. प्रत्येक टिकाण त्यांनी निकराने लढविलें. आनंदपूरच्या टापूत शत्रू येऊन भिडला तरी त्यानी हिंमत सोडली नाही. आनंदपूरचा किल्ला त्यांनी बरेच दिवस लढविला. स्वराज्यशाहीला लागलेल्या उतरणीमुळे व इंग्रजांच्या सद्दीमुळे तुझ्या पणजोबाला शेवटीं हार खावी लागली. तुझ्या पणजोबाच्या स्वामीभक्तीवर व

शौर्यावर खूष होऊन गुणग्राही इग्रजबहाद्दरानी ही जमीदारी पूर्वीप्रमाणें तुमच्या कुळांत चालू ठेवली. नागपूरचे स्वातत्र्य मात्र नष्ट होऊन नागपूरकराना इग्रजाच्या ओंजळीने पाणी पिण्याची वेळ आली.

"आप्पासाहेब वऱ्हाडच्या बाजूस नापत्ता झाले; शेवटीं त्यांचे काय झालें याचा पत्ता लागला नाही. आम्हीं आप्पासाहेबांचा पुष्कळ शोध केला पण काही उपयोग झाला नाही. त्यानतर वीस वर्षांनी म्हणजे गदरच्या अगोदर वीस वर्षे तुझ्या पणजोबाचे निधन झाले. यानंतर सुमारे दहा वर्षांनी आप्पासाहेबाचा तोतया अवतार काही दिवस वऱ्हाडात उचल करू पाहत होता. पण त्याच्यावर कोणीच फारसा विश्वास ठेवला नाही. ग्रीष्माच्या तापानंतरच्या मृगशीतळाईप्रमाणे असलेली इग्रजी अमलातली शातता बऱ्याच दिवसानतर लोकाना लाधली होती व धामधुमीचे दिवस केव्हा एकदाचे सपतील असे त्याना झाले होते. उदयापूर्वीच ग्रहण लागावें त्याप्रमाणे असहाय्य स्थितीत त्या तोतयाचें अवतारकृत्य समाप्त झाले. आम्हीही आतून बारीक चौकशी केली. तो तोतया असल्याचे निश्चित कळल्यावर आम्ही त्याच्याकडे लक्ष द्यावयाचे सोडले.

"स्वराज्यशाही पुन्हा प्रस्थापित करण्याचा अखेरचा प्रयत्न १८५७ साली करण्यात आला. तो फसून त्याचे बड या सदरात परिवर्तन झाले. तात्या टोपी जेव्हा दक्षिणेकडे यावयास निघाला व नर्मदेच्या काठीं येऊन ठाकला, तेव्हा दक्षिणेत पुन्हा सर्वांची मने उद्दीपित होऊन नागपूरकडे थोडी कुजबूजही सुरू झाली, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. तुझ्या आजोबानीहि सामन्याची तयारी चालविली होती पण नागपूरकरानीच हातपाय गाळल्यावर आम्हालाही स्वस्थ बसावे लागले."

या गोष्टी चालू असता रामाजीस स्फुरण चढत असे. जणू काय कालच या गोष्टी घडल्या आहेत अशा आवेशाने तो त्या बाळाला सागत असे. आपल्या गोष्टी बाळाला कटाळवाण्या होत नसतील काय, किंवा त्या ऐकून त्याला काय वाटत असेल याबद्दल रामाजीने कधी विचार केला असेल काय? बाळाजवळ मोठा ठेवा आपण विश्वासाने देत आहोत व तोहि तितक्याच विश्वासाने स्वीकारीत आहे असेच रामाजीला वाटत असावे. सुरुवातीस बाळ त्या गोष्टी त्यातील अद्भुतपणामुळे ऐकत होता. जसजसा

तो मोठा होत चालला तसतसा तो त्या गोष्टी प्रेमाने व आपलेपणाच्या जिव्हाळ्याने ऐकू लागला. पुढे पुढे तर त्या गोष्टी वारंवार सांगण्याचा रामाजीस तो आग्रह करू लागला. किती तरी वेळा त्या त्याने ऐकल्या असतील पण प्रत्येक वेळीं त्याला त्यांत नवीनपणाच वाटत होता.

## प्रकरण ३ रे

# रामा नाइकाच्या गोष्टी ( पुढे चालू )

रामा नाइकाच्या अंगी असलेल्या टुणटुणीतपणावरून हा म्हातारा शंभर वर्षांच्या जवळपास असेल असे कोणासहि वाटत नसे. त्याचे चक्रीदार मराठेशाही पागोटे, चुडीदार चोळणा, घोळदार अंगरखा, कल्लेदार मिशा व म्हातारपणामुळे सर्वांग कापत असले तरी ती बसण्याउठण्याची ऐट, याची बाळाला मोठी गमत वाटत असे.

सहृदय श्रोता मिळाला नसेल म्हणून म्हणा पण जुन्या आठवणी सांगत बसलेला रामाजीला कोणी पाहिले नव्हते. पण बाळासारखा प्रेमळ श्रोता मिळाल्यापासून रामाजी त्याला त्या गतकालच्या अद्भुत गोष्टी आस्थेने सांगत बसे व त्या सांगत असता भावनांनी त्याचे हृदय उचबळून येत असे. त्या आठवणींनी त्याची घटकाभर करमणूक होई. बाळहि तत्परतेने त्या ऐकत असे.

"गोंडवणातील झाडीचा प्रांत वसवण्याचे काम तुझ्या पूर्वजांनी हाती घेतले होते, पण ते काही सोपे नव्हते. जंगल तोडण्याची दगदग करून १०–५ झोपड्यांची जागा तयार करावी, व तेथे घरे बांधावी, तो उन्हाळ्यांत ती सर्व वणव्याने जळून जावी व वस्तीला आलेल्या लोकांना पावसाळ्याच्या तोंडी ती जागा सोडून जावे लागे. एखाद्या ठिकाणी सर्व बैल गट्ट करून वाघाने त्याच्या शांततेचा भंग केल्याबद्दल शिक्षा करावी; वाळवीने शेतें उध्वस्त करून तेथे राहाणेच अशक्य करून टाकावे.

"या प्रदेशात बैगा नावाची एक रानटी जात होती. त्या लोकांना माणसाळवण्याचे अनेक प्रयत्न करूनही लवकर यश आले नाही. मनुष्यवस्तीपासून दूर डोंगराच्या आडोशाने दाट जंगलात हे लोक राहत. त्यांचें खाणें कंदमुळांचे होते. लहर लागल्यास एखादी जागा जाळून तीत थोडे दाणे टाकून कोदोकुटकीसारखी हलकी धान्ये ते पिकवीत. एका ठिकाणीं फार दिवस ते राहत नसत व मनुष्याचा सहवास तर

त्यांना मुळीच सहन होत नसे. आसपास माणसांची थोडी चाहूल लागली की आपला तळ हालवून तेथून ते ताबडतोब दुसरीकडे जात. मीठ, तंबाखू वगैरे कांही पदार्थांच्या लालुचीने ते क्वचित् माणसाला जवळ येऊं देत. आम्ही सहानुभूति दाखवून त्याचा विश्वास सपादन केला होता.

"एकदा मोठ्या मिनतवारीने त्याना आपल्या वाड्यासमोर जमवून आणले होते. त्या लोकांना फार चागलें नाचता येतें. दारू पिण्यास दिली तर विसावा न घेतां रात्रभरही ते नाचत राहू शकत होते. नाचण्यासाठी डोक्याला शिगें बाधून, गळ्यांत कवड्याच्या माळा व पायांत घुगरू घालून आणि मोराची पिसे दडाला बांधून त्यांनी सोंगें आणली. गाणीं म्हणून पावाढोलकांच्या तालावर ते रात्रभर नाचत राहिले. मधून मधून ते आरोळ्या ठोकत होते. नाच झाल्यावर आम्ही त्यांना जेवावयास घातलें व धोतरें दिली. शिवाचे गणच होते म्हणाना ते! त्यांनी ती डोक्याला गुडाळली किंवा पाघरलीं, कारण लगोटीशिवाय दुसरा कपडा नेसण्याची कल्पनाहि कधी त्याना शिवली नसावी. भर हिवाळ्यांतहि उघडे राहणें त्यांना काहीच वाटत नव्हते. आम्ही त्यांना एक एक रुपया दिला तोहि त्यांनी तेथेच टाकून दिला.

"त्या लोकाना वाघ वगैरे जगली जनावराची भीति कधीच वाटली नाही. पाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ते वाघाला समजत होते व 'कुकुर' या तुच्छतादर्शक नांवाने ते त्याला सबोधीत होते.

"हे बैगा लोक शिकार व पारध करण्यांत फार पटाईत होते. एकदा जगलांतून येत असतां मी त्यांना हाका करताना पाहिलें. एका ठिकाणी त्यांनी जाळें लावून ठेवलें होतें व तिकडे ते एका रानडुकराला पिटाळून लावीत होते. रानडुकर त्या जाळ्यात सापडतांच चेंडूप्रमाणे उच फेकला गेला व तेथेच लटकून केकटत राहिला. नंतर त्या लोकांनी खाली जाळ करून त्याला भाजून खाल्लें. एकदा त्यांनी रानरेड्याची शिकार चालविली होती. तेव्हा मी त्यांच्याबरोबर होतों. एके ठिकाणीं एक भला मोठा खड्डा खोदून त्यावर त्यांनी झाडपाला अशा रीतीने टाकून ठेवला की कोणासहि तेथे साधी जमीन आहे असें वाटावें व खाली दगा आहे असा संशय येऊं नये. मग हाका करून त्यांनी पुष्कळशा रानरेड्यांना त्या

खड्ड्याकडे हाकून लावलें, व खड्ड्याजवळ आल्यावर ढोलकी वाजवून व आरोळ्या ठोकून इतकी लगट केली की, भीतीने बेफाम धावणाऱ्या रानरेड्यांपैकी दोन रेडे त्या खड्ड्यांत पडून बैगे लोकांना सापडले.

" हे जंगलांतले लोक कसे धीट असतात याची तुला एक गोष्ट सागतों. एकदा एक गोंड, बायको बरोबर घेऊन, किर्र झाडीतून पायवाटेने चालला होता. अचानक एक वाघ समोर येऊन उभा राहिला. वाघाला समोर पाहून गोंड जरा घाबरला. त्याची ती स्थिति पाहून बायकोने त्याला मागे घातले व वाघाला काठीने झोडपून पळवून लावले. काठीने झोडपून वाघाच्या जबड्यांतून आपल्या जनावराना हे लोक नेहमी सोडवून आणतात. एकदा तर दोन मुलांनी अस्वलीला दगडानी पळवून लावून तिची पिलें पकडून आणलेली मी पाहिली आहेत.

" हे जगली लोक जंगली जनावराविषयी इतके धीट असले तरी मनुष्य पाहिला की हे अगदी घाबरून जातात. आपल्या ज्ञानाचा व सुशिक्षितपणाचा टेंभा मिरविणारे लोक फसवेगिरी करतात असें त्यांना वाटत असावे म्हणून जगलाबाहेर राहणाऱ्या लोकावर विश्वास ठेवण्यास ते सहसा धजत नसत. पण जर का एकदा तुम्ही त्याचा विश्वास सपादन केला तर ते तुमच्या ॲ।ं।ा।र।। आपला जीवही देण्यास मागे पुढे पाहणारे नव्हते.

" एकदा वाट चुकून त्यांच्या खेड्याजवळ मी जाऊन पोहोचलों. मी वाट चुकून इकडे आलो व बराच थकलेला होतो, हे लक्षांत येऊन त्या जगली टोळीच्या नायकाने मला सन्मानाने ठेवून घेतले व कदमुळे देऊन माझा सत्कार केला. रात्रभर गावून नाचून आपल्या रिवाजाप्रमाणे त्यांनी पाहुण्याचें आदरातिथ्य केलें. मीं नायकाला विचारलें ' तुम्ही शेती करीत नाही तर तुम्हाला दुष्काळाची भीति वाटत नाही काय ? ' यावर त्याने उत्तर दिलें, ' परमेश्वराने निर्माण केलेलें जगल तुम्ही तोडता म्हणून आम्हांला भीति वाटते. नाही तर कंदमूलादि कितीतरी अन्न परमेश्वराने आम्हांकरता जंगलांत उत्पन्न करून ठेवलें आहे. '

" तुला आताच्या लोकांच्या शिकारीची गंमत सागतों. कसली ती शिकार ! बदूक घेऊन येतात काय आणि दुरूनच वाघाला गोळी घालतात काय ! यांत काय शौर्य आहे ? पण येवढेदेखील हे वीर हिमतीने करूं

शकत नाहीत म्हणून मचणावरून बदूक घालून त्या पशुराजाला धोक्याने मारतात.

"असेच एक शूर वीर शिकारीच्या हेतूने आपल्याकडे आले होते. मचाण बाधून त्यावर बसण्याची त्यानी तयारी चालविली. ते पाहून तुझ्या आजोबांना हसू आले. ते म्हणाले "थांबा, मी दाखवितो तुम्हाला शिकार कशी करतात ती !" गाऱ्याच्या जागेपासून जवळच वाघ घोरत पडला होता. दगड मारून तुझ्या आजोबांनी त्याला जागा केले. मनुष्य दिसतांच तो एकदम झपटला. त्याच्या पंजाचा आवेश ढालीवर झेलून त्यांनी त्याला बगल दिली व एक वार करून ते अलग झाले. त्या यमराजाच्या दुताने चवताळून मोठी गर्जना केली व पुन्हा तो चाल करून आला एका वारा-सरशी त्याचे शीर तुझ्या आजोबानी धडापासून अलग केले तो एकंदर प्रकार पाहून मचाणीवर बसणाराची बोबडीच वळली. शिकारीचा आव आणण्यापेक्षा तो नाद सोडून देण्यास मी त्या लोकाना सागितले.

"एकदा नागपूरच्या हत्तीखान्यातून एक हत्ती पळाला व आपल्या जगलात घुसला. त्या मातलेल्या हत्तीने बरीच नासधूस चालविली. शेत राखण्याकरता बांधलेले माळे तोड, त्यावरील माणसाला झुगारून दे, गावात घुसून नासधूस कर, एखादी झोपडी उध्वस्त करून टाक, माणूस दिसला की त्याचा पाठलाग कर, असा त्याने धुमाकूळ चालविला. ही बातमी कळतांच आम्ही ताबडतोब त्याच्या शोधास निघालों. आम्ही त्याला दिसलो तेव्हाची हकीगत सागतो. आम्हाला पाहताच तो आमच्यावर धावून आला. मी एकदम पुढे उडी घातली व मालकाच्या संरक्षणास सिद्ध झालो. त्यांची शिकार मी घेतली म्हणून ते मला अद्वातद्वा बोलूं लागले. हत्ती धावून आला तेव्हा या हाताने पट्ट्याच्या एका वारासरशी त्याची सोड जायबंदी केली. व शेपटाकडून त्याच्या पाठीवर मी चढलों व अकुशाने त्याला ताळ्यावर आणलें. नागपूरकर भोसले सरकारानी खुश होऊन तो हत्ती आपल्याला इनाम दिला. पुष्कळ दिवस तो आपल्या येथे होता; तो नुकताच मेला. तो पिपळाखालचा चबुत्रा त्याच्याच नांवाचा आहे.

"पेंढारी लोकांनी या प्रांतांत पुष्कळ धुमाकूळ घातला. शिंदे, होळकर, भोसले व इतर देशी राजे यांच्या सैन्यांतून निघालेले हे लोक

होते. शिरजोर सरदाराच्या हाताखाली जमून त्यानी लोकाचा असह्य छळ मांडला. लुटालूट व जाळपोळ करून त्यांनी लोकाना हैराण करून टाकले. राजे लोकाना त्याचा बदोबस्त करता येईना व त्याची राज्ये नष्ट होण्याच्या मार्गाला लागली. एकदा नागपूरहून परत येत असतां संध्याकाळ झालेली पाहून एका खेड्यांत मी मुक्काम केला. पावसाळा सपून हिवाळा सुरू होण्याचे ते दिवस. शेतातून जागोजागी पिकाचे ढीग करून ठेवलेले होते. शेतकऱ्याचा मुक्कामहि शेतांतील खळ्यातच होता. सध्याकाळची वेळ होती. लोकांचें स्वयपाकपाणी सुरू होते अशा वेळी एकदम टोळधाड यावी त्याप्रमाणे ३०० घोडेस्वार आले. त्यानी गावाला वेढा घातला! लोक हवालदील झाले. त्या गावचा मालगुजार सधन आहे अशी खबर पेंढाऱ्याना लागली असावी मालगुजाराच्या घरी अपेक्षेप्रमाणे द्रव्य न मिळाल्यामुळे पेंढारी गावभर जाळपोळ करू लागले.

"मालगुजाराच्या वाड्यासमोर मी त्या लुटारूंना आवरून धरण्याचा प्रयत्न केला होता. पण माझ्यावर एकदम आठ दहा जण तुटून पडले व त्या हातघाईंत माझी तलवार मोडली मी नि.शस्त्र होऊन त्याचा कैदी झालों. पेंढाऱ्याचा माझ्याभोवती गराडा पडला. त्याच्या नायकासमोर मला नेण्यात आले. 'याला झाडाला टागून फाशी द्या' 'गोळी घालून मारा,' असा त्या पेंढाऱ्यांनी कल्लोळ माजविला इतक्यात त्याच्या नायकाने माझ्याकडे न्याहाळून पाहिले व मी कोठला राहणार, माझ्या वडिलाचे नांव काय अशी चवकशी केली. मी आनंदपूरचा राहणारा व माझ्या वडिलांचें नांव राणोजी हे कळताच, त्याने मला बधमुक्त करण्याचा हुकूम दिला, व आपल्या लोकाना उद्देशून तो म्हणाला, 'याना सोडून द्या. यांच्या वडिलानी माझे प्राण वाचविले. आरगांवच्या लढाईच्या वेळी मी शिद्यांच्या सैन्यांत होतों. आमचा पराभव झाला मला जखमी होऊन पडलेला यांच्या वडिलांनी पाहिला. त्यानी मला सुरक्षित जागी नेले व शुश्रूषा करून प्राणदान दिलें. माझ्या उपकारकर्त्याचे ऋण फेडण्याची संधि मिळालेली पाहून मला फार आनंद झाला आहे."

"त्याने दाखविलेली कृतज्ञता व भूतदया त्याच्या प्रस्तुत उपक्रमाशीं मला विसंगत वाटली. माझ्याशी होणारी त्या लोकांची सौजन्याची वाग-

णूक पाहून, या उमद्या लोकांनी लूटमार का करावी असा विचार मनांत येऊन मी बुचकळ्यांत पडलों.

"तो नाईक माझ्याकडे वळून म्हणाला 'या पोरवयात तुम्ही दाखविलेले शौर्य पाहून मला तुमच्याबद्दल फार कौतुक वाटतें. तुमची तशी इच्छा असेल तर मोठ्या खुशीने आमच्यामध्ये तुम्हाला सामील करून घेऊं.'

"त्यांचें सलगीचें बोलणें ऐकून मी मोकळेपणाने विचारण्याचें धाडस केलें, 'तुम्ही लूटमार का करितां?'

"त्याने स्वतःची तरफदारी केली, 'मालकाकडे पगार थकला असतां आम्ही वसूल करूं नये तर काय भुके मरावें?' जणूं काय राजेरजवाड्यांच्या घरूनच ते आपला पगार वसूल करून राहिले होते!

"दुसऱ्या दिवशी सकाळी घोड्यावर बसून मी निघालों. जिकडे पाहावें तिकडे दिसणारी बेचिराखी पाहून माझ्या डोळ्याला पाणी आले गावांतली घरे उध्वस्त झाली होती. शेतातली पिके जळून खाक झाली होती व हतबल प्रजा मूढ बनून दैवाला दोष देत आक्रोश करीत होती.

"तुझ्या पणजोबाची एक गोष्ट सांगतों. आप्पासाहेबानंतर रघूजी गादीवर बसला. त्याचा कारभार वास्तविक टोपीवाल्याकडूनच चालत होता. एक तरणाबांड टोपीवाला आपल्याकडे खंडणी मागावयास आला व 'कपनी सरकारची खडणी द्या' असे म्हणाला. तेव्हा तुझे पणजोबा म्हणाले 'कुपणी सरकारचे आम्ही काही लागत नाही.' टोपीवाल्याला राग आला. तो म्हणाला 'कंपनी सरकारने तुम्हाला जमीदारी दिली आहे. आमचा हुकूम न ऐकाल तर आम्ही तुमची जमीदारी काढून घेऊ.'

"टोपीवाले येण्यापूर्वीची आमची जमीदारी. आम्हाला ती रघुजीने दिली. कोणाची माय व्याली आहे आम्हांकडून ती काढून घेण्याकरिता?" तुझे पणजोबा रागाने म्हणाले व त्यांनी त्या टोपीवाल्याला हाकून दिलें.

"त्याने आपल्या वरिष्ठाकडे तक्रार केली. पण त्याचा वरिष्ठ हुशार मनुष्य होता. त्याने कबूल केलें की त्याच्या हाताखालच्याच मनुष्याचा दोष होता. तो म्हणाला, 'खडणी मागावयाला आलेला मुलगा मूर्ख होता. त्याला आपल्यासारख्या थोरांशी कसें वागावें हें कळत

नाही. खंडणी रघूजी राजानेच मागितली आहे. आम्ही रघूजीचे गुमास्ते आहोंत."

"ते ऐकून तुझे पणजोबा शांत झाले व त्यांनी खडणी देऊन टाकली. मरेपर्यंत रघुजीशिवाय कोणाचाच हुकूम त्यांनी मानला नाही.

"आप्पासाहेबानी जेव्हा नागपुरातून इंग्रजाना घालवून लावण्यासाठी उठाव केला, तेव्हा आनंदपुरांत दोन दिवस लढाई झाली. त्या वेळीं तुझ्या पणजोबांनी भीष्माप्रमाणे जो पराक्रम केला तो आठवला म्हणजे अजूनही अगांत स्फुरण चढतें. इग्रजांनी केलेल्या तोफेच्या माऱ्याने त्या पलीकडल्या भितीला भगदाड पडले. इंग्रजानी किल्ल्यात शिरण्यासाठी तीन वेळा हल्ला केला पण तिन्ही वेळां तो पिटाळून लावण्यांत आला. त्या भगदाडाच्या तोंडाशी लढत असतां गोळी लागून मी जखमी झालो. मला त्या वेळी नुकती मिसरूड फुटत होती. अखेर इंग्रजांच्या पल्लेदार तोफांपुढे हार खावी लागली. त्यांनी तुझ्या पणजोबाना सन्मानाने वागविले.

"१८५७ साली आनदपुरास एक साधू आले होते. बंडाची धुमश्चक्री माजून राहिली होती. तुझे आजोबा फार अस्वस्थ होते. त्या साधूनी तुझ्या आजोबाना सागितले, 'बेटा आपण फार पाप केले आहे! त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागेल. आता आपले राज्य झालें तरी प्रजेस काही लाभ होणार नाही. इग्रजाचे राज्य १०० वर्षें हिंदुस्थान-वर चालेल. त्या काळांत आपले पाप नाहीसे होईल प्रजेंत विद्वान् व सुशील कार्यकर्ते निर्माण होतील. खुशालचेडूचे वर्चस्व निघून जाईल. हिंदुस्थानच्या विद्येचा, दयाधर्माचा व कर्तृत्वाचा प्रभाव सर्व जगावर पडेल. तोंपर्यन्त कालचक्राला आडवून धरण्याची चेष्टा करणें व्यर्थ आहे." त्यानंतर ते साधू जे अदृश्य झाले, तो आजपर्यंत त्याचें नांव निशाण नाही."

रामाजीच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून सर्वांना माहीत होत्या. पण त्याला आत्मस्तुति करतांना केव्हा कोणीच ऐकलें नाही. बाळाला मात्र मन मोकळें करून रामाजी आपल्या पराक्रमाच्या काळच्या गोष्टी सांगत असे; तेव्हा मी आत्मप्रशंसा करीत आहे ही कल्पना देखील त्याच्या मनाला शिवली नसावी. मृत्युलोकाच्या देवडीवर उभा राहून अनेक

वर्षांच्या दडपणाखाली दडलेला संदेश तो नवीन युगाला सांगत होता. त्या दोघांकडे पाहिले म्हणजे पृथ्वीच्या गोलावर एकीकडे—पुढे दृष्टि टाकली तर सकाळ व दुसरीकडे—मागे दृष्टी टाकली तर सायंकाळ असें एका ठिकाणावरून दिसणाऱ्या दृश्याचे प्रतीक समोर आहे असा भास होत होता.

---

# प्रकरण ४ थें

# आनंदपूरची शाळा

आनंदपुरात एक लहानशी शाळा होती. गावाच्या बाहेरच्या अगास नदीच्या बाजूला एक लहानसे मैदान होते. त्या मैदानात आठवड्याचा बाजार भरत असे. त्या मैदानाच्या उत्तरेस पिंपळाच्या पारावर मारुतीची मूर्ति होती मैदानाच्या दुसऱ्या टोकाला शाळा होती. मारुतीरायाच्या पारासमोरील भागात रोज संध्याकाळी गुजरी भरत असे. नदीला घाट बांधला होता आणि घाटावर शिवालय होते रोज संध्याकाळी देवदर्शनाच्या किंवा बाजार करण्याच्या हेतूने आलेल्या लोकांची गर्दी मैदानांत जमत असे. शाळेच्या समोर मैदानाच्या दक्षिणेकडील [illegible] मुलांची गर्दी असे. म्हणून रोज संध्याकाळी ते मैदान माणसांनी फुलून निघाल्यासारखे दिसे. खरोखरच ती जागा फार रमणीय होती. शाळेसमोर ते मैदान, मैदानात नदीच्या काठची मंदिरे, नदीपलीकडे डोंगराची उंच रांग व पायथ्याशी झाडी, या सर्वांच्या अस्तित्वाने तो देखावा उठावदार दिसत होता व शाळेला योग्य असेंच वातावरण तेथे होते

आमच्या मास्तरांनी शिक्षक या नात्याने आपली रौप्य व सुवर्ण ज्युबिली पार पाडली होती अन्य शाळांमध्ये कितीहि फरक झाले असले तरी आनंदपूरच्या शाळेची जुनी परंपरा अबाधितपणें चालू होती.

शाळेच्या इमारतीला एकच दालन होते. त्या एका दालनातच सर्व वर्ग एकत्र बसत. शाळेचे चार वर्ग होते व चारी वर्ग एका मास्तरच्या हाताखाली एकत्र बसून शिक्षण घेत होते. सारवलेल्या जमिनीवर तरटे टाकून त्यांवर मुले बसत, मध्यभागी रॉबिसन क्रुसोच्या नमुन्याचे ओबडधोबड टेबल व तशीच खुर्ची होती. शिक्षकाच्या टेबलावर हाजरीबुक, दऊत, बोरू इत्यादि शाळेला अवश्य असलेल्या सामानामध्ये एक छडी होती. खुर्चीच्या मागे भिंतीशी फळीवर डमरूच्या आकाराचे रेतीचें घड्याळ होते. ते घड्याळ कांचेचे होतें, व वरच्या चंबूंतली बारीक रेती खालच्या

चंबूंत उतरतांना साफ दिसे. वरच्या चंबूतली रेती खालच्या चंबूत उतरली की एक तास होई. वरचा रिकामा चबू खाली व खालचा भरलेला चंबू वर करून ठेवला की पुन्हा काळाला गती मिळे. असे तीन तास झाले म्हणजे मुलांना सकाळची सुट्टी मिळे. दुपारी पुन्हा दोन तास शाळा असे; तेव्हाहि कालाची अदृश्य गती त्या दोन चबूच्या घडचाळांत वाळूच्या मार्गाने दृश्य रूपास येई. एखाद्या वेळी वरच्या चबूतली सगळी वाळू खालच्या चंबूंत उतरली तरी कोणाचे लक्ष तिकडे जात नसे अशा समयी तो वालुकामय मार्ग खुटल्यामुळे कालाची गती बद पडे व जास्त वेळ बसण्याचा भुर्दंड बिचाऱ्या मुलांना भरावा लागे. पतोजीच्या उजव्या हाताच्या बाजूला छपराच्या सिवारातून (वाशांतून) रिकाबीसारखी किंवा जानव्यासारखी एक दोरी लोबकळत ठेवली होती. याच दोरीला टागून मुलाना घोडीची शिक्षा देण्यात येत असे. मानसशास्त्राचे काही आडाखे बाधून निरनिराळ्या अपराधाकरिता मास्तरनी निरनिराळ्या शिक्षा ठरविल्या होत्या घाबरट मुलांकरिता छडीचा मार पुरे आहे असे त्याचे मत होते उनाड व धिम्या मुलाना, त्यांनी शिक्षणाचा मार्ग द्रुत गतीने आक्रमावा म्हणून, घोडीची शिक्षा देण्यात येई. वर्गांत दुर्लक्ष करणाऱ्या मुलाला खुर्चीची शिक्षा देण्यांत येऊन त्याच्या मानेवर खडा ठेवला जाई तो खडा पडल्यास या दुसऱ्या अपराधाबद्दल छडीच्या माराची जादा शिक्षा देण्यात येई. ही उत्तरोक्त शिक्षा मुलांना अवधान शिकविण्याकरिता आहे असे मास्तर म्हणत असत.

आमच्या पतोजीना शिस्तीची फार आवड असे. मुलगा खेळताना दिसला म्हणजे शिस्तीचा भग व गुरूचा अपमान करणे या दोन पातकाचा तो भागीदार होई व या पातकाचे परिमार्जन छडीचा मार खाऊन त्याला करावें लागे. मुले चिंचा, पेरू वगैरे खाण्याच्या वस्तू किवा भोवरे, गोट्या, गोफण यासारख्या खेळण्याच्या वस्तू शाळेत घेऊन येत. पतोजीच्या लक्षांत आल्यास शाळेच्या पवित्र चतुःसीमेत आलेल्या त्या निषिद्ध वस्तू जप्त केल्या जात व त्याच्या मालकाला चांगली अद्दल घडे.

चुकार मुले शाळा चुकवून घरी राहात. एखाद्या मुलाची गैरहाजरी पतोजीच्या लक्षात आली की त्याला आणण्याकरिता ते पांच सहा मुलांना

धाडून देत. ती मुलें त्याला धुडाळून काढून व उचलबांगडी करून शाळेंत घेऊन जात. तोहि मुलगा बिलदर असल्यास शाळेंत पोहचेपर्यंत सुटून जाण्याकरिता धडपड करी. पण ती त्याची धडपड शाळेंत पोहचतांच अगदी बंद होऊन पतोजीपुढे तो अगदी गोगलगाय बनून जात असे. ती गंमत पाहावयास मिळावी म्हणून कोण गैरहजर आहे याचा तपास शाळेंत आल्याबरोबर मुले करीत. अशा रीतीने पकडून आणलेल्या मुलाची, ज्ञानप्राप्तीच्या मार्गात टाळाटाळ केल्याबद्दल पतोजी सूर्याची पिले दाखवून, कानउघाडणी करीत. उचलबागडी करून चुकार मुलाला शाळेत नेणाऱ्या मुलांचा घोळका दारासमोरून जाताना दिसला की लहान मुलगा गडबड करीत असल्यास आई त्याला शाळेत धाडण्याचा धाक घाली, व तेवढ्याने तो लहान जीव चपापतहि असे. पण उचलबागडी करणाऱ्या मुलाचा घोळका पाहून त्या लहान मुलाला गंमत वाटे हेहि खरेच.

घोडी किवा खुर्ची देणे याखेरीज कोलदंडा घालणे, आगठे धरावयास लावणे वगैरे शिक्षेचे आणखी काही प्रकार जरूरीप्रमाणे अमलात येत. आम्ही ज्या काळासबधाने लिहीत आहोत त्या काळी शाळेत उच्चासनावर बसून एखाद्या विजेत्या एकतत्री राजाप्रमाणे क्षात्रगणावर हुकमत गाजविणारे मास्तर लहान मुलाना राक्षसाप्रमाणे भासत असल्यास नवल नाही. भली मोठी काठी घेऊन पोराना ढोराप्रमाणे झोडण्यांत त्याचा हातखंडा असे. मुलाना छड्या मारल्या नाही तर ती मठ्ठ होतात अशी कदाचित त्यांची प्रामाणिक समजूत असेल; आणि म्हणूनच मारताना 'छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम्' असे ते म्हणत व घाम निघेतो मुलाना मारत. गुरूच्या प्रसन्नतेवर विद्या अवलंबून असते या गोष्टीवर कदाचित् भाविक विद्यार्थ्यांचा भरवसा असावा म्हणूनच ते हा प्रसाद मोठ्या लीनतेने ग्रहण करीत.

शिक्षणाच्या दृष्टीने जसे शाळेचे ४ वर्ग केलेले होते त्याचप्रमाणे विद्यार्थ्याच्या ऐपतीप्रमाणे किवा मास्तरच्या सोईप्रमाणे आमच्या शाळेत विद्यार्थ्यांचे ४ वर्ग केले होते. गरीब, श्रीमत, लहान, मोठे असे हे ४ वर्ग होते. मोठी किवा श्रीमंत मुलें स्वभावतःच हुशार असतात व 'छम् छम् घम् घम्' च्या रीतीने विद्या शिकण्याची त्यांना जरूरी नसते, उलट

गरीबांची किंवा लहान वयाची मुले स्वभावतःच मठ्ठ असतात असा मास्तरांचा ठाम सिद्धात होता; म्हणून त्यांना छडीच्या सहाय्याने विद्या शिकविण्याची ते फार मेहनत घेत. ही वर्गवारी वार्षिक परीक्षेकरता केलेल्या वर्गवारीप्रमाणे न बदलणारी नव्हती. मुलाच्या बदलत्या स्थितीच्या मानाने विद्या ग्रहण करण्याच्या त्याच्या पात्रतेंतहि पालट पडे. पुराणांत वर्णिलेल्या गुरूप्रमाणे मास्तरचे प्रेम विद्यार्थ्यावर होते. पूर्वीचे गुरु ज्याप्रमाणे शिष्याची पूर्ण परीक्षा पाहिल्यावर प्रसन्न होऊन त्याला विद्या देत त्याप्रमाणे आमचे मास्तर विद्याप्रदान करीत मास्तरच्या घरी पाणी भरणे, लाकडे आणणे व त्याच्या घरची इतर कामें करणे, यांत जो विद्यार्थी तत्पर असे त्यावर–तो लहान असो वा गरीब असो–गुरूची मर्जी बहाल होत असे. त्याचप्रमाणे गुरुपौर्णिमा, नागपचमी व इतर सणास मास्तरला शिधा आणून देण्याची जो मुलगा आठवण ठेवी, त्या मुलाच्या चांगुलपणाची मास्तरना खात्री वाटे. मात्र मोठ्या मुलाशी मास्तरना त्या मुलाच्या मोठेपणास शोभेल अशाच रीतीने वागावे लागे.

आपल्या लहान वयात मास्तरनी शिक्षणाचें कार्य हाती घेतले होते. मास्तरच्या वयाच्या किवा मास्तरहून मोठ्या त्या वेळच्या विद्यार्थ्यांची विद्यार्जनाची हौस पुरवतां पुरवता मास्तरच्या नाकी नव येत असल्यास नवल नाही. अध्यापकपणाच्या अखेरच्या दिवसात वृद्धापकाळीं जेव्हा आमच्या मास्तराना या धडधाकट विद्यार्थ्यांची आठवण होत असे, तेव्हा समोर बसलेल्या कोमल अर्भकाची त्यांना कीव येत असे, व त्याच्या पात्रतेबद्दल त्याच्या मनात जबरदस्त शका उत्पन्न होई.

शिक्षक या नात्याने आमच्या मास्तरांनी ज्या काली कार्यास प्रारंभ केला, त्या सुरुवातीच्या काळात त्याना किती अडचणीना तोंड द्यावे लागले असेल याची कल्पना आज होणें कठीण आहे. त्या काळी विद्यार्जनासंबधी साधारण कल्पना एवढीच असे की मोत्यासारखे अक्षर लिहिता यावें व आला कागद घडघड वाचता यावा. ब्राम्हणाचा मुलगा असल्यास द्रोण पत्रावळी लावता येणें हा एक जरूरीचा विषय समजला जाई व या विषयात मुलगा पारंगत नसला तर सोयरीकही तुटण्याचा सभव असे. गांवांतली शिष्ट मंडळी आधुनिक विद्येची थट्टा करी व मुलांना पाटीवर

उदाहरणे करताना पाहिले की म्हणे "चार पैशाची वागी आणावयास सांगितले की ही मुले बाजारांत पाटी घेऊन हिशेब करीत बसतील व तो हिशेब मपेपर्यंत बाजार राहिल्यास उरलेली किडकी वागी घेऊन येतील." रेखागणितांतल्या रेघा पाहून हे शिष्ट म्हणत "आता हा मुलगा गवंड्याचा रोजगार करणार की काय ?" अशा कोटया करून नवीन शिक्षणाची थट्टा करीत ते मास्तरची टर उडवीत असत. पृथ्वी गोल आहे, व ती चेंडूसारखी आपल्या आसाभोवती फिरते हे ऐकून तर त्याना हसूच लोटत असे, व ते विचारीत "काय मास्तर? गंगा नदी खाली पाताळाकडे गेली असतां तिचे पाणी शेषाच्या डोक्यावर साडणार नाही म्हणता! धन्य आहे तुमची!" अशा रीतीने त्या लोकाच्या कोटया सुरू झाल्यावर त्याच्या दहा तोंडाना मास्तरांचें एक तोड किती उत्तर देऊ शकणार? अशा प्रकारें कोटया करून ते मोठ्याने हसून गिल्ला करूं लागले की मास्तरांचें बोलणेंच ऐकू येत नसे; त्यावरून मास्तर वादात टिकू शकत नाहीत व त्याचा पराभव झाला, हे सर्वानुमते सिद्ध होई. हीच मते पोरकट मास्तराचे मिशाळ बापे विद्यार्थी मास्तरापुढे प्रतिपादू लागले की, मास्तरांना प्रथम त्याचे कौतुक करून घेऊन नतर सवडीप्रमाणे विद्यार्थ्यांची मर्जी पाहून आपली मते त्याना पटवून द्यावी लागत असत

तरी पण लोकाची मास्तरावर मर्जी होती यात बिलकूल सदेह नाही. लहान वयातहि मास्तराची बुद्धि किती विशाल आहे, याचे त्या गावकऱ्यांना कौतुक वाटे. मास्तराचे शील, लोकाच्या उपयोगी पडण्याची त्याची तत्परता, त्याचा मनमिळावूपणा व सौजन्य, या गुणांमुळे मास्तर सर्व लोकाना आवडू लागले होते. विशेषतः जमीदार साहेबानी त्यांची निवड शाळेकरिता केली असल्यामुळे लोक त्यांना मान देत व त्यांच्याशी अदबीने वागत. लोकाची पत्रे लिहून देणे, जगातील खबरा सागणे व दोन प्रहर रात्रपर्यंत गोष्टी सागून लोकांचे मनरंजन करणे इत्यादि प्रकारांनी त्यांचा चांगुलपणा दिसून आल्यामुळे मास्तर सर्वांना प्रिय झाले होते. लोकहि मास्तरांच्या हरतऱ्हेनें उपयोगी पडत. सणावारी कोणी शिधा आणून देई, कोणी त्यांस जेवावयास बोलावी व कोणी घरी झालेली फळें 'प्रथमफळ

देवाला ' म्हणून मास्तरला आणून देत. अशा रीतीने गावकरी मास्तरांचे कांही उणें पडू देत नसत व त्याचा चरितार्थ नीट चाले.

त्या काळी परीक्षांचे निकाल चांगले होत यांत काही शंका नाही. मग विद्यार्थी चांगले होते म्हणून म्हणा किंवा परीक्षक परीक्षा चागली घेत म्हणून म्हणा, पण आजच्यासारखे फारसे विद्यार्थी तेव्हा नापास होत नसत. एकदा तिसऱ्या वर्गांतील २० मुलांपैकी सर्व विषयांत फक्त ८ मुले पास झाली तेव्हा मास्तरांनी एका विषयांत नापास झालेल्या मुलांना वर चढवून दिलें. तरी खाली आठ मुलें राहिली. नतर मास्तरांनी क्रमाने दोन विषयात व तीन विषयात नापास झालेल्या मुलाना वरच्या वर्गांत चढवून दिलें. शेवटी सर्व विषयात नापास झालेला एकच मुलगा उरला. आपल्या बरोबरीची सर्व मुलें वरच्या वर्गांत गेली व आपल्याला लहान मुलांमध्ये बसावें लागणार या कल्पनेने त्या मुलाला रडू आले. मास्तरचे हृदय कळवळलें. ते म्हणाले, 'तूंच काय पाप केलें आहेस, तूहि वरच्या वर्गांत जा.' मुलें नापास होणें याचा अर्थ मास्तरला शिकवना येत नाही असेच त्याचे नेहमी म्हणणे असे माझ्या हाताखाली शिकलेला विद्यार्थी कसाहि असला तरी तो नांवलौकिकास चढलाच पाहिजे असें ते वारंवार म्हणत. मास्तरांच्या म्हातारपणी एखाद्या हुद्देदाराची गोष्ट निघाली की, 'तो ना! तो माझ्या हाताखाली शिकला. का नाही नावलौकिकास चढणार! काढल नाव पोरानं!' असे ते अभिमानाने म्हणत.

शाळा तपासावयास कोणी वरिष्ठ अधिकारी येणार असें कळल्यास शिस्तीच्या कवायतीस आमच्या शाळेत ऊत येत असे. मुलाची ऊठबैस, मास्तरांचे खडे हुकूम, शाळा साफसूफ करण्याची गर्दी, या कारणामुळे एकच गोंधळ माजून जाई. त्यांतून इन्स्पेक्टर यावयाचे असल्यास तर या सर्व गोष्टीचा अतिरेक होई. मुले व मास्तर वेळेवर शाळेत येतात किंवा नाही याबद्दल इन्स्पेक्टर साहजिकच चौकस असत. कित्येक ठिकाणी जावयास लागत असल्यामुळे त्याना कधीकधी अवेळी यावे लागे. त्यातून इन्स्पेक्टर साहेबांची येण्याची पक्की तारीख माहीत नसल्यास त्या आठवड्यांत वेळी अवेळीं शाळेंत जावयास लागून मुले अगदी कटाळून जात. स्वत:च्या धांदलीत मुलांची तहानभूक वगैरेसबंधी होणारी गैरसोय मास्तर विसरून

जात व इन्स्पेक्टर जाईपर्यंत त्याच्या जिवांत जीव नसे. या सर्व त्रासामुळे मुलांना असें होऊन जाई की नको ते इन्स्पेक्टर अन् नको ती परीक्षा. प्रत्यक्ष इन्स्पेक्टर येत त्या दिवशी, तहानभूक सर्व विसरून ते जाईपर्यंत मुलांना मुठीत नाक धरून बसावें लागून, त्यांच्या सहनशक्तीची परीक्षा होत असे.

एकदा तर शाळेपासून कांही अंतरावरून कमिशनरची स्वारी जाणार होती. त्यासाठी त्या दिवशी सकाळपासून दिवस चांगला वर येईपर्यंत मुलांना शाळेसमोर उभे करण्यात आले होते. त्या कवायतीच्या धांदलींत कमिशनर केव्हा निघून गेले हे देखील कळले नाही. कमिशनर गेल्याचे वृत्त नंतर काही लोकानी येऊन सांगितल्यावर मुलांना सुटी देण्यांत आली.

कधी कधी आमच्या मास्तराना शाळेंत विनोद करण्याची लहर येई. अशा वेळी मनमुराद हसून मास्तरांच्या विनोदाचे कौतुक करण्याची मुलाना पूर्ण मोकळीक असे. मधून मधून बाळहि शाळेत जात असे, तेव्हा तर मास्तराच्या विनोदप्रियतेस अधिक भरते येई. बाळाचे शिक्षण घरीच होत असे. दुपारी त्याला बराच रिकामा वेळ मिळत असे. मित्रमडळी त्या वेळी शाळेंत असल्यामुळे शाळेकडे जाण्याची एखाद वेळ त्याला इच्छा होई. शाळेपाशी येऊन बाळ खेळताना दिसला की मुलाचे वर्गात दुर्लक्ष होई. ही गोष्ट लक्षांत आली की मास्तर बाळाला शाळेंत बोलावून घेत व एक दोन प्रश्न विचारून त्याची उत्तरे बरोबर आली म्हणजे त्याची प्रशसा करून इतर मुलांना बाळासारखी हुशारी अगी आणण्याचा उपदेश करीत. बाळ शाळेत आला की इतरहि मुलाच्या अगांत खेळण्यासाठी हुरूप येई. तेव्हा मास्तर सर्व मुलांना खेळण्याची परवानगी देऊन किवा चारपांच मुलाना बाळाबरोबर खेळावयास देऊन निभावून नेत. अशा वेळी शाळेतली शिस्त थोडी ढिली झाली तरी मास्तर त्याकडे कानाडोळा करीत.

आमच्या मास्तरना निरुपद्रवी चिमण्यांची भारी चीड असे. शाळेत येऊन त्या भराऱ्या मारीत सुटतात व वर्गांत मुलाचें दुर्लक्ष होण्याला कारणीभूत होतात यामुळे मास्तर त्यांचा राग करीत. मुलांप्रमाणे चिमण्यांचीहि शिक्षा करण्याच्या बाबतींत मास्तर कधी उपेक्षा करीत नसत.

कित्येकदा चिमण्याना पकडून, त्याच्या पंखांना शाईचा लाल व काळा रंग लावून किवा त्यांच्या पायात वाळ्यासारखे कांही तरी अडकवून देऊन मास्तर त्याना सोडून देत. अशी एखादी चिमणी दिसली की गावकरी तिच्याकडे बोट दाखवून आपल्या मुलाना म्हणत "पाहा ती उनाड चिमणी. मास्तरांनी शिक्षा दिल्यापासून कशी वठणीवर आली आहे." मास्तर कडक आहेत हे आनदपूरच्या बहुतेक चिमण्यांना ठाऊक झाले असावे असे वाटते, कारण पुढे पुढे शाळेकडे येताना त्या फारशा दिसत नसत. त्यातून एकादी भाबडी चिमणी 'चिव' 'चिव' करीत शाळेंत घुसली की मास्तरचे लक्ष ताबडतोब तिकडे जाई; किवा एखादा विद्यार्थी मास्तरचे लक्ष तिकडे वेधी ताबडतोब खिडक्या व दारे बद करण्याचा हुकूम मास्तर मुलाना देत. मास्तरचा हुकूम होताच एका क्षणात सर्व दारे व खिडक्या बद होत, व चिमणीस पकडण्याकरता मुलाच्या टोप्या भराभर हवेत उडू लागत. चिमणी गोधळून जाई व भराऱ्या मारीत इकडे तिकडे गैरावैरा उडत फिरे. पोराची टोप्या फेकण्याची एकच गर्दी उडून जाई. शेवटी चिमणी थकून हताश झाली की धापा टाकीत एखाद्या कोपऱ्यात बसून भिर् भिर् भिऱ्या डोळ्यांनी मुलाकडे पाहत राही. त्या शरण आलेल्या चिमणीला पायाला दोरा बाधून टेबलावर ठेवण्यात येई व दोऱ्याचें दुसरे टोक टेबलाच्या पायाशी बाधून ठेवण्यात येई. प्रतिभावान कवीच्या कल्पकते-प्रमाणे भराऱ्या मारणाऱ्या व जराशी हालचाल झाली की भुरकन उडून जाणाऱ्या त्या चिमणीची स्थिति, गति कुठित झाल्यामुळे, केविलवाणी होई व निराशेचे 'चिव चिव' दुःखोद्गार तिच्या इवल्याशा चोचीतून बाहेर पडत. मुलाचे धडे पुन्हा चालू होत व शाळा सुटेपर्यंत त्या चिमणीकडे पाहावयाचें नाही अशा निश्चयाने मास्तर पूर्ववत् शिकवणे सुरू करीत. पुस्तकाच्या आडून चोरून पाहणाऱ्या प्रत्येक मुलाला वाटे की त्या चिमणीकडे दुसऱ्या कोणाचें लक्ष नाही. शाळा सुटण्याच्या वेळी मुलाना उनाडक्या शिकविण्याच्या अपराधाबद्दल त्या चिमणीला कांही तरी दड करून सोडून देण्यांत येई दुसऱ्या दिवशी शाळेंत जमल्यावर पूर्व दिवसाच्या गमतीची आठवण झाली की पोट धरधरून हासून मुलें आपली करमणूक करून घेत. कधी असेंहि घडे की, प्रश्न विचारून चुकलेल्या मुलांना मास्तर

मारताहेत व अभ्यास झाला नसल्यामुळे एखादा मुलगा अडचणींत सापडला आहे. अशा वेळी खिडकीच्या बाहेर चिमणी दिसली असतां, "ये ग ये ग चिमणी, तुला देईन दाणापाणी" असें त्या मुलाचें पुटपुटणें ऐकूं येत असे.

## प्रकरण ५ वें

# बाळपणचे सवंगडी

बाळ आता चांगला ९–१० वर्षांचा झाला होता. त्याचें प्राथमिक शिक्षण जमीदारीणबाईंनी घरीच करून घेतले होतें. त्या सकाळी उठून भूपाळ्या, स्तोत्रे वगैरे म्हणून प्रात.स्मरण करीत. ऐकून ऐकून बाळाचे पुष्कळ पाठांतर झाले होते. लहानपणापासून त्याला गोष्टी ऐकण्याची सवय होती. गोष्टी ऐकल्याशिवाय रात्री त्याला झोपच येत नसे. गोष्टी ऐकता ऐकतां झोप लागेपर्यंत आईचे गोष्टी सांगणे चालू राही ऐकून ऐकून रामायण महाभारतांतल्या पुष्कळशा गोष्टी त्याला पाठ येत होत्या. "सायंकाळची करमणूक" व "बाळमित्र" यांसारखी सोपी पुस्तकेहि तो वाचीत असे.

बाळ बाहेर खेळावयास जाण्यासारखा मोठा झाला होता. त्याचा अभ्यास सकाळी दोन अडीच तासात होऊन जाई व दुपारचा वेळ त्याला रिकामा असे. बाळ खेळावयास जाऊं लागल्यावर मुलेहि त्याला मोठ्या आनदाने बोलावूं लागली. हळूहळू बाळाची गावांतल्या मुलांशी मैत्री होत गेली, व त्यांच्याशी खेळण्यात त्याचा वेळ जाऊ लागला बाळ मुलांशी खेळत असतां त्याचे कौतुक करीत राहण्याशिवाय रामाजीला उद्योग उरला नव्हता.

सायंकाळी मुलांचे खेळ सुरू झाले की त्याचे खेळ पाहात रामाजी मारुतीच्या पारावर बसून राही. बाळाच्या या मित्रांपैकी काही त्याच्या वयाचे तर कांही त्याच्याहून मोठे होते. सगळी मुले जमली की बाळ त्यांना रामलक्ष्मणाच्या व भीमार्जुनाच्या गोष्टी सागत असे. मुले अनुकरणप्रिय असतातच. बाळाने सांगितलेल्या गोष्टी ऐकून रामरावण किंवा कौरवपांडव युद्धांतील प्रसंगाचें नाटक करण्याची त्या मुलांना इच्छा होत असे. रामाजी-कडून बाळाने या खेळाकरिता एक गदा व एक तीरकमठा बनवून घेतला होता. खेळांत कोणी अर्जुनाची भूमिका घेई; कोणी लुटुपुटूची गदा घेऊन भीमाचें काम करी. बाळाला धनुष्यबाणाने अचुक निशाण साधतां येत

असे म्हणून बहुधा तो अर्जुनाचें काम करीत असे. रामरावणाच्या युद्धांत बाळाकडे कधी रामाचें, कधी लक्ष्मणाचें तर कधीकधी मारुतीचेहि काम असे.

खेड्यांत खेळले जाणारे लगोऱ्या डाबडुबली यासारखे खेळ ती मुले खेळत असत. नदीच्या काठी एक भला मोठा चिंचेचा जुनाट वृक्ष होता. त्या झाडावर सुरपारंब्याचा ( याला कांही ठिकाणी डाबडुबली म्हणतात) खेळ खेळणें मुलांना फार आवडत असे. चिंचेच्या बारीकहि फांद्या लवचीक व बळकट असतात. त्यांवरून माकडासारख्या इकडून तिकडे उड्या मारणाऱ्या मुलांना पाहून प्रथम बाळाला त्यांचा हेवा वाटे. अगच्या स्वाभाविक धीटपणामुळे त्याने तो खेळ लवकरच हस्तगत करून घेतला, व तोहि झाडाच्या फांद्यावरून उड्या मारू लागला. बाळाच्या मित्रापैकी नाना नावाचा एक मुलगा होता, तो फार चपळ होता; दुसरा गोविंदा नावाचा होता तो इतरापेक्षा अगापेराने मोठा व मजबूत होता. सुरपारब्याच्या खेळात एकदा नाना इकडून तिकडे बारीक फांद्यावरून भराभर उड्या मारीत चालला होता. उडी मारताना त्याचा हात निसटला व तोल जाऊन तो खालच्या फांदीवर कोलमडला. तें पाहून सर्व मुले गांगरून गेली. गोविंदा खाली उभा होता. जमिनीवर पडण्यापूर्वीच नानाला त्याने अधर झेलून धरले. तेव्हा भीतीनें गांगरलेली मुले पुन्हा उल्हसित झाली, व त्या पराक्रमाबद्दल त्यानी गोविंदाला भीमाची पदवी दिली. प्रत्येक मुलाला गोविंदाच्या शक्तीबद्दल आदर वाटू लागला व प्रत्येकजण त्याची बरोबरी करण्याची इच्छा बाळगू लागला. बाळहि गोविंदाप्रमाणे बलवान होण्यासाठी झटून प्रयत्न करूं लागला.

आनदपूरच्या शाळेत जितकें शिक्षण मिळू शकत होते तितकें बाळाकडून घरीच करवून घेतले होतें, म्हणून त्याला शाळेंत जाण्याची जरूरी नव्हती. सुटीखेरीज इतर दिवशी दुपारच्या वेळी बाळाचे मित्र शाळेत असत. शाळेच्या सुटीचा दिवस मित्रांबरोबर खेळण्याला मिळे म्हणून बाळाचा मोठ्या आनदाचा दिवस असे. नदीकाठच्या देवळात, शाळेसमोरील मैदानात किंवा नदीच्या वाळवटात ती सर्व बालगोपाल मंडळी एकच गर्दी करून सोडी. सध्याकाळ होईपर्यंत त्या मुलांचे मनसोक्त खेळ चालू राहात. केव्हा लांब तसेंच उंच उड्या मारण्याची त्यांची चढाओढ लागे. कधी घाटाच्या उंच

भिंतीवरून खाली वाळवटांत उड्या मारण्याचा नाद त्यांना लागे. या उपरोक्त खेळांत मुलांना मोठी मौज वाटत असे. घाटाची भिंत बरीच उंच होती. अलिकडे उडी पडल्यास पाण्यांत आपटून कपडे भिजून जाण्याची भीति असे, म्हणून सर्वच मुलें उडी मारण्याला धजत नसत. उडी चुकून पाण्यांत पडलेल्या मुलांची गंमत पाहण्याला मिळावी म्हणून एखादा गमत्या मुलगा 'उडी मारणार नाही त्याला रामाची शपथ' घालून टाकी. रामाची शपथ मोडावी लागू नये म्हणून सर्व मुलें मग उडी मारण्यास तयार होत. उडी वेडीवाकडी जाऊन एखादा मुलगा पाण्यांत पडून चिंब भिजला की ओशाळा होई व इतर मुले पोट धरधरून हासत सुटत. तो मुलगा धीट असला तर तसाच पोहत राही. ज्या मुलाला उडी मारण्याचें धाडस होत नसे तो 'आडांत पडली साखळी आमची शपथ मोकळी' असें म्हणून शपथेंतून मोकळा होई.

मुलांची लहर वाऱ्याच्या लहरीप्रमाणे क्षणिक पालटणारी असते. तो खेळ सोडून मुलें खो खो खेळू लागत. खो खोचा कंटाळा आला की खो खो बंद होऊन डू डू सुरू होई. तोहि खेळ नकोसा झाला की ती मुलें कुस्त्या खेळू लागत. बाळ सर्व मुलांशी कुस्ती खेळला होता. तो सर्वांना कुस्तीत पाडू शकत होता. गोविंदाने बाळाला पुष्कळ युक्त्या व पेच शिकविले होते. तो जात्याच चपळ व मजबूत असल्यामुळे आपल्यापेक्षा मोठ्या मुलांना पाडू शकत असे. गोविंदाशीं बरोबरीने कुस्ती खेळण्याचें त्याला बरेच दिवस धैर्य होत नसे. आपले सामर्थ्य अजमावण्याकरिता तो एकदा गोविंदाशीं कुस्ती खेळू लागला. गोविंदाने त्याला क्षणांत चीत केलें. तेव्हा त्याला वाईट वाटलें. गोविंदाने एक पेच बाळाला सांगितला नव्हता. त्याच्याच साहाय्याने त्याने त्या वेळीं बाळाला चीत केलें होतें. गोविंदाने ती युक्ति शिकविली तेव्हा बाळाला फार आनंद झाला.

रामाजीने एकदा नदीच्या वाळवंटांत मुलांना मेजवानी दिली. अशा मेजवान्या बाळाच्या मित्रांना तो नेहमी देत असे. त्या वनभोजनाची देखरेख अर्थातच रामाजीने त्या बाळगोपाळ मंडळीकडे ठेवली होती. कितीतरी वेळ वाळवंटांत ते सर्व बाळ गोपाळ वनभोजनाची व्यवस्था करीत होते. कोणाकडे पाणी आणण्याचें, कोणाकडे पानें मांडण्याचें, अशा रीतीने

त्या मुलांमध्ये कामें वाटून देण्यांत आली. कामें करतांना मुलांच्या कुरापती चालू होत्या व कागाळ्या ऐकण्याचा रामाजीला एक धदाच होऊन बसला. लक्ष्मण नांवाचा एक तोतरा मुलगा होता. 'नाना मला तोतरा म्हणतो' अशी कागाळी करण्याकरिता तो आला होता; पण त्याच्या तोंडांतून नीट शब्द निघेना व तो 'तो–तो–तो' च करीत राहिला. इतक्यांत रागाचा आविर्भाव आणून नाना त्याच्यासमोर येऊन उभा राहिला व गोविदा लक्ष्मणाच्या मागे जाऊन बसला. नानाने लक्ष्मणाला एकदम मागे ढकलून दिले. गोविंदाच्या पाठीवरून तो धपकन् वाळवटात आपटला, व सर्व मुले हासू लागली. त्या थट्टेमुळे कागाळ्या करणारी इतर मुले आपल्या कागाळ्या विसरून गेली. त्या हास्याच्या वातावरणांत मुलें पानावर बसली. रामाजी आग्रह करकरून वाढण्याला सागत होता. बाळ त्या सर्व मुलांच्या मध्यभागी बसला होता तो देखावा पाहून त्याला फार आनंद झाला होता. कार्तिकांतील ते दिवस, सायकाळचे कोवळे ऊन त्या प्रदेशावर पडले होते, त्यामुळे नदीच्या काठच्या वनाची शोभा अपूर्व दिसत होती. मंद वारा वाहत होता. पाण्यावर लहरी उठून वृक्षांच्या छाया त्यांत लबायमान झालेल्या दिसत होत्या. गाई चरून परत येत होत्या. मुलांचें कौतुक पाहण्याकरिता सूर्य पश्चिम क्षितिजावर कांही वेळ थांबलासा रामाजीला दिसला. रामाजी तीन तीनदा आनंदाने म्हणत होता "काय अपूर्व देखावा! जणूं काय गोपालकृष्ण आपल्या सवगड्याना घेऊन यमुनेच्या तीरी गोपालकाला करीत आहे."

रविवारचा दिवस. आनंदपूरचा बाजार रविवारी असे. शाळेला सुटी होती. मैदानांत बाजारच्या लोकाची गर्दी लागून राहिली होती; मैदानांत खेळण्याकरिता जागा नव्हती. मुलें नदीच्या वाळवंटांत खेळण्याकरिता जमली. गोविदाने सुचविले, "चला, आज आपण रानात बोरे खाण्यासाठी जाऊं." सर्वांना तो विचार आवडला, व ताबडतोब मुलें रानांत शिरलीं. रानांत जिकडे तिकडे बोरें, आवळे, चिंचा यांची झाडे दिसत होती. फळांचे ते घोसावर घोस पाहून मुले अगदी खूष झाली. त्यांनी भराभर ती फळें खाण्यास व खिशांत भरण्यास सुरुवात केली. जों जों मुलें घनदाट जंगलात शिरूं लागली तों तों तेथील सौंदर्याची चित्ताकर्षकता वाढत गेली. आपण

कोठे आहों या गोष्टीचें मुलाना भानहि राहिलें नाही. इतक्यात झुडुपांतून निघून पळून जातांना सशाला एका मुलाने पाहिले. त्या मुलानें शेजारच्या मुलाला दाखवण्यापूर्वीच तो ससा झुडपाआड लपला. तो दुसरा मुलगा जरा भित्रा होता. तो म्हणूं लागला 'तो कोल्हा होता मी त्याला बरोबर पाहिलें.' त्याहूनहि एक भित्रा मुलगा होता. तो घाबऱ्या घाबऱ्या बोलला, "तो लांडगा होता. मी खात्रीने सागतो." एक अतिशय घाबरट मुलगा होता. तो म्हणाला, "चित्ता असेल कदाचित् ! चला आपण परत जाऊ."

जगली जरा पुढे झाला व आवेशाने म्हणाला, "काय भिता रे ? आमच्या आजोबाने किती तरी चित्ते मारले आहेत."

"मोठी ऐट मारतोस आपल्या हिमतीची," तो भित्रा मुलगा जंगलीला म्हणाला.

आपण सर्वांत धीट आहो ही गोष्ट मुलाना दाखवावी असें गोविंदाला वाटलें. तो शौर्याच्या बाता मारूं लागला. सर्वांचाच त्याच्यावर भरवसा असल्यामुळे भित्र्या मुलांनाही धीर आला.

बाळाने जनावरांच्या पुष्कळ गोष्टी वाचल्या होत्या. त्याला एक गोष्ट आठवली. तो सागू लागला:—"एकदा एक बाई आपल्या लहान मुलाला घेऊन अगणात निजली होती. एक लांडगा गुपचूप आला व त्या मुलाला उचलून घेऊन गेला. गुहेत गेल्यावर त्याने त्या मुलाला आपल्या पिलांमध्ये नेऊन ठेवलें. ती पिले त्याच्याबरोबर खेळू लागली. भुकेने व्याकूळ होऊन तें मूल रडू लागलें तेव्हा लांडगीने त्याला ममतेने दूध पाजले. त्या लांडगीची त्याच्यावर ममता जडली. तिने त्याला लहानाचा मोठा केला. पिलांनाहि ते त्यांचे नवें भावंड आवडलें. मोठा झाल्यावर तो मुलगा लाडग्यांबरोबर शिकारीस जाऊ लागला. तो चार पायांवर चालत होता व लांडग्याचीच भाषा बोलू लागला होता.

"ती लांडगी या आपल्या पाळीव पिलावर भारी प्रेम करीत होती. तिला वाटले की 'सर्वच माणसांना लाडगेपणा शिकविल्यास किती बरें होईल. मग या दुष्ट व कपटी लोकांपासून आपल्याला बिलकूल त्रास होणार नाही, व लांडग्यांना जगलात निर्धास्त राहतां येईल.' लांडग्यालाहि नेहमी भीति वाटत असे की, "मी याचें प्रेमाने पालनपोषण केलें आहे.

माणसें दुष्ट असतात; ती याला घेऊन जातील. मग याला जगलांतला मोकळेपणा कोठून मिळेल." प्रेमामुळे तो त्या मुलाला आपल्यापासून दूर जाऊं देत नसे, व फसव्या माणसांच्या तो दृष्टीस पडू नये अशी खबरदारी घेत असे."

गोविंदाने मध्येच प्रश्न केला, "तो मुलगा आपल्याला भेटेल तर किती मजा होईल! आपण त्याला जगलांतली सर्व मजा विचारू."

नाना म्हणाला, "तो तर लाडग्याप्रमाणे बोलू लागेल. आपल्याला ते समजणार नाही."

जगली म्हणाला, "त्यात काय आहे? मी लाडग्याची भाषा शिकीन."

बाळ पुढे सागू लागला, "त्या मुलाला एकदा कांही लाकूडतोड्यानी पाहिले. त्याला पाहून त्याना आश्चर्य वाटले. प्रथम तो लाकुडतोड्याना पाहून पळून जात असे. पण गोंजारून गोंजारून लाकुडतोड्यानी त्याला जवळ येण्यास शिकविले व त्याची भीति कमी झाल्यावर त्यानी त्याला माणसाळवण्यास सुरुवात केली, व थोड्या प्रयत्नानतर त्याला माणसासारखें बोलतांहि येऊं लागले. शेवटी त्याच्या सत्य स्वरूपाची त्याला ओळख करून देण्याकरिता लाकुडतोड्यानी विचारले 'तू कोण आहेस?' 'मी लांडगा आहे' हे त्याचें उत्तर ऐकून लाकुडतोड्यानी त्याला त्याची पडछाया पाण्यांत पाहण्यास सागितले. त्याप्रमाणे त्याने केले, तेव्हा मी मनुष्य आहे हें त्याला समजून आले. लाकुडतोड्यानी त्याला घरी नेले. त्या लोकांनी त्याला माणसासारखे चालायला, कपडे घालायला व लिहा-वाचायला शिकविले. माणसामध्ये राहण्याची प्रथम त्याला अडचण पडूं लागली. घरांत राहणे, हाताने जेवणे, कामे करण या गोष्टी त्याला कठिण वाटल्या. तो सांगत असे 'लांडग्यांना माणसाचा मोठा राग येतो. ते म्हणतात माणसें खोट्या गुहेंत राहतात, खोटी नखे वापरतात व रात्रीं लहान लहान सूर्य जवळ ठेवतात'."

अशा रीतीने गोष्टी करीत ती मुले जंगलात भटकत होती. वाट फुटेल तिकडे त्यांचे पाय भटकत होते व विचार नेतील तिकडे त्यांचे मन भटकत होतें. चिमण्या नांवाचा एक लहानसा मुलगा होता. तो चालून

अगदी थकून गेला होता. तो म्हणाला "मला दुष्ट लांडगा व्हावेसें वाटत नाही. मला पक्षी व्हावेसें वाटते. जगलांतून जातांना पायांत काटे मोडतात, चालतांना रस्ता दिसत नाही. आभाळातून उडताना खालचे सर्व कांही दिसतें, पायाला काटे बोचत नाहीत की पाय थकत नाहीत."

आपण कोठे आहों व आपणाला कुणीकडे जावयाचें आहे याचें त्यांपैकी कोणालाच भान नव्हतें. सध्याकाळ व्हावयाला आली होती. तेव्हां सर्वांना भीति वाटू लागली. जगली चाणाक्ष होता. तो म्हणाला, "तो तिकडून बाजारच्या लोकाचा कल्ला ऐकू येत आहे. त्या बाजूनें आपण जाऊं म्हणजे झाले. भिता कशाला !"

सर्व मुलें त्या बाजूने जंगलीच्या मागून गेली व थोडयाच वेळांत नदीच्या काठी आली, तेव्हा त्यांना फार आनद झाला, व जंगलीच्या अंगात पिढीजात शिकाऱ्याचें कौशल्य आहे याची खात्री पटली

## प्रकरण ६ वें

# बाळ शाळेंत जाणार

बाळाचें प्राथमिक शिक्षण घरीच पूर्ण झालें. प्राथमिक शिक्षणाच्या पुढील शिक्षणाची सोय आनंदपूरला नव्हती. पुढील शिक्षणाकरता अन्य ठिकाणी जाणे प्राप्त होते. त्यासबधी जमीदारसाहेबाचे विचार सुरू होते. तसे म्हटले तर एका वर्षापूर्वींच बाळाचा प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास पुरा झाला होता. पण तो, वयाने लहान व आईबापाचा एकुलता एक लाडका मुलगा असल्यामुळे, वर्षभर घरीच राहिला होता. त्याला अकरावे वर्ष लागल्यावर जास्त दिरंगाई करणे जमीदारसाहेबास योग्य न वाटून ते त्याला शाळेंत घालण्याच्या व्यवस्थेला लागले. जमीदारीणबाई मात्र मधन मधून म्हणत "बाळ अजून लहान आहे. आणखी काही दिवस घरी राहिल्यास नाही का चालणार?" या त्याच्या म्हणण्यामुळेच बाळ वर्षभर घरी राहिला होता. यानतर मात्र जास्त आढेवेढे घेणें शक्य आहे असें त्यांनाहि वाटत नव्हतें.

या विषयावर या दांपत्याचे एके दिवशी सभाषण झालें. जमीदारीणबाई म्हणाल्या "आणखी काही दिवस बाळ घरीच राहिल्यास नाही का चालायचं?"

"शिक्षणाची हयगय करून कस चालेल?" जमीदारसाहेब म्हणाले.

"पण मी म्हणतें बाळ अजून लहान नाही का?" जमीदारीणबाई पुन्हा म्हणाल्या.

"म्हणूनच मी म्हणतों शिक्षणाचें वळण लहानपणी लागणें चांगले," जमीदारसाहेब हसत हसत म्हणाले.

त्यानंतर कशी काय व्यवस्था करावी यासबंधाने त्यांच्या मध्ये वाटाघाट चालली. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं, कमळपूरला हायस्कूल होतें. त्यांत नुकतीच वसतीगृहाची सोय केली होती. वसतीगृहांत बाळाला ठेवण्याला जमीदारीणबाईंचें मन तयार नव्हतें—नव्हे अत्यंत प्रतिकूल होते.

" तेथे बाळाची नीट व्यवस्था होणार नाही व मी त्याला एकट्याला राहूं देणार नाही," असें त्या निक्षून म्हणाल्या. कमळपूर जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असल्यामुळे कामानिमित्त जमीदारसाहेबांना तेथे नेहमी जावे लागत असे. कमळपूर गावी त्यांनी बंगलावजा टुमदार दुमजली घर बांधले होते. बाळाला घेऊन जमीदारीणबाईंनी कमळपूरच्या घरांत राहावें व जमीदारीचें काम सांभाळून जमीदारसाहेबानी तेथे जाऊन येऊन असावे असें दोघांच्या मताने ठरलें.

बाळ शिकण्याकरता कमळपूरला जाणार ही बातमी लवकरच बाळाच्या मित्रांना कळली. बाळ फार हुशार होणार या कल्पनेचें त्याना मोठें कौतुक वाटत होते. कमळपूर गाव व तेथील शाळा कशी असेल याबद्दल त्या मुलांचे तर्क सुरू झाले.

नाना म्हणाला, "तिथली शाळा किती मोठी असेल नाही!"

गोविंदा म्हणाला, "मुले किती हुशार असतील!"

नाना पुन्हा म्हणाला, "मास्तरहि हुशार असतील नाही रे!"

बाळालाहि काही कल्पना नव्हती त्याचे बोलणे ऐकून त्यालाहि गमत वाटू लागली. आपण काय शिकणार याची त्याला कल्पना नव्हती.

जगलीने विचारले, "तू इग्रजी शिकायला जाणार असे आमचे बाबा म्हणत होते. तू कस शिकशील इग्रजी सांग बर."

बाळ काय सागणार ? तो विचार करीत राहिला. गोविदाला चूप राहवेना. तो ऐटीत म्हणाला, "त्यात काय आहे ? येस् फेस् शिकेल आणखी काय ?"

सर्व मुले गोविंदाला म्हणाली "तुला कांही येत नाही." सुट्टीत परत आल्यावर तेथील मजा सागण्याकरिता सर्व मुले बाळाला बजावून सागत होती.

बाळाचा जाण्याचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतशी उत्सुकता व कुतूहल जाऊन त्या जागी खिन्नता उत्पन्न झाली. त्यांना वाटावें आमच्या येथे का नाही मोठी शाळा केली ? बाळ इथेच शिकला असतां व आम्हीहि बाळबरोबर त्याच शाळेत शिकलो असतो. एका दोघांनी, 'आम्ही बाळाबरोबर शाळेत जातो,' असा आपल्या आईबापा-

जवळ हट्ट धरला. त्या मातापितरांनी आपल्या मुलांचें कौतुक केलें. पण शहर-वस्तीला आपलीं मुले कशी राहतील या कल्पनेने ती बापडी भिऊन गेलीं. त्यानी आपल्या मुलांची समजूत घातली, "आपल्याला गरिबाला शिकून काय करायच ? तुम्ही शिकला तर तुम्हांला नागर धरायची लाज वाटेल. नागर सोडलात तर तुम्ही काय खाल ? "

तें बोलणे ऐकून एका मुलाने आपल्या आईला विचारले, " बाळ काय खाईल ग ? "

यावर आईने उत्तर दिलें, "ती मोठी माणस आहेत. जमीदार लोकाची वगेबरी करून आपल्याला कस चालेल."

आईच्या या उत्तराने मुलाचें समाधान झालें नाही. तो आपल्याशीच विचार करू लागला, "आम्ही का नाही मोठी माणसे झालो. जमीदार झाले म्हणून काय झाल ! त्याच्या मुलांनी एकट्यांनीच शाळेत का जावे ? "

एक एक दिवस भराभर जात चालला. शेवटी बाळाचा कमळपुरला जाण्याचा दिवस उजाडला. नोकराचाकरांची गाड्या तयार करण्याची व सामान बाधून गाड्यात भरण्याची गर्दी सुरू झाली. गावातील स्त्रियांनी जमीदारीणबाईला निरोप व बाळाला आशीर्वाद दिला. म्हाताऱ्याकोताऱ्यांना बाळाच्या ज्ञानाचा अचबा वाटूं लागला. मोठमोठी पुस्तकें बाळ कसा वाचू शकेल याचे त्याना कोडें पडले. गावातली चार मडळी "शुभास्ते पथानः" चितीत बऱ्याच दूरपर्यंत आपल्या लहानग्या मालकाला निरोप देण्याकरिता गेली होती. बाळाची मित्रमडळी त्याच्याबरोबर गप्पागोष्टी करीत चालली होती. वडील मंडळी "आता परत फिरा" म्हणून मधून मधून सांगत होती. ते ऐकले नाहीसे दाखवून ती मुले तशींच पुढे जात होती.

मुलांच्या मनाला उत्साह व हुरहुर याची मिश्र भावना अधीर किंवा अस्थिर करीत होती. त्यांना बाळाशी कितीतरी बोलावे असें वाटत होतें.

गोंविदा म्हणाला, "आमचे मास्तर किती चांगले आहेत. तुला मिळतील का चांगले मास्तर ?" बाळाने काहीच उत्तर दिलें नाही.

" तू तेथल्या मुलांशीं बोलशील का ?" कांहीतरी बोलायचें म्हणून नाना बोलला.

"इथल्यासारखें तिथे तुला खेळायला मिळणार नाही, " गोविंदानें म्हटलें. बाळाला कांहीच उत्तर सुचले नाही. त्याच्याबद्दल नानानेंच उत्तर दिलें.

" नाही तर ! आमच्यापेक्षा चांगले खेळ मिळतील त्याला. "

बाळाच्या मनात निरनिराळे कल्पनातरग चालू होते. नवीन शाळा पाहण्याविषयी त्याच्या मनांत उत्सुकता होती, त्याबद्दल त्याला आनंद होत होता. आपल्या जुन्या मित्रांबरोबर खेळायला मिळणार नाही याबद्दल त्याला दुःख होत होतें. पुढील सुटी केव्हा येईल व आपल्या जुन्या मित्रांना भेटून कमळपुरच्या शाळेच्या मजेदार गोष्टी केव्हा सांगीन असे त्याला झाले होते. परत जातांना बरेंच अंतर चालावे लागणार होते व दिवस चागलाच वर आला होता म्हणून नाइलाजाने बाळाचा निरोप घेऊन ते बाळमित्र परत फिरले.

बाळाला शाळेंत घातल्यानतर तेथील व्यवस्था करून जमीदारसाहेब आपल्या गावीं परत जावयाचे होते. मास्तरांना भेटून त्यांनी बाळाची शाळेंत भरती केली. नंतर दोन दिवसांनी परत आपल्या गांवी जावयाचे त्यांनी ठरविलें. आजपर्यंत बाळ त्यांच्यापासून अलग कधीच राहिला नव्हता, त्यामुळे बाळाला सोडून परत जातांना त्यांना बरें वाटत नव्हतें.

गावाला जाण्याच्या वेळी त्यांनी बाळाला आपल्याजवळ बोलावलें, व समोर उभा करून वात्सल्याने पण गंभीरपणाने ते म्हणाले, " बाळ मजपासून दूर राहण्याचें काम तुला कधी पडले नाही. तुझे शिक्षण चांगलें व्हावें व आपल्या पायावर उभे राहण्यास तू शिकावें म्हणून तुला येथे राहणें जरूरीचे आहे. मी सांगतों तें नीट लक्षांत ठेव. सूर्योदयापूर्वी उठून रोज चांगला व्यायाम घेत जा. सडकन भूक लागली पाहिजे. शरीर स्वच्छ ठेव. सकाळीं स्नान करून मारुतीचें स्तोत्र म्हण व नमस्कार घाल. नीटनेटके व स्वच्छ कपडे घालण्याची खबरदारी घेत जा. अभ्यास नीट कर. खेळावयाच्या वेळी खेळ व अभ्यासाच्या वेळीं अभ्यास कर.

सत्याला स्मरून वाग. आपल्या कुलाचें नांव मलीन होईल असें एकहि कृत्य तुझ्या हातून घडू नये याची आठवण ठेव."

बोलतां बोलतां जमीदारसाहेबांचे मन प्रेमवश झाले रिकिबीत पाय देऊन ते चटकन घोड्यावर बसले व घोड्याला टाच देऊन तेथून रवाना झाले.

## प्रकरण ७ वें

# दोन मित्र

शाळा सुरू होऊन एक महिना झाला होता. बाळ प्रथमच शाळेत जाणार होता. शेजारी राहात असलेल्या गोपाळ नावाच्या मुलाबरोबर तो शाळेत जावयास निघाला. वाटेंत गोपाळ बाळाला शाळेसबधी माहिती सागू लागला. मास्तर कसे आहेत, गोपाळचे दोस्त कोण, ते कोणकोणते खेळ खेळतात, त्याचा अभ्यास किती झाला आहे, इत्यादि गोष्टी गोपाळ इतक्या सफाईने सांगत होता की बाळाला त्याच्या हुशारीबद्दल अचबा वाटूं लागला.

ते शाळेजवळ आले तेव्हा त्याना निरनिराळचा रस्त्यानी पुष्कळ मुले शाळेकडे येतांना दिसली. काहीची पुस्तके हातात होती, काहीची दप्तरांत होती व एकदोघाचें दप्तर नोकर मागे घेऊन येत होता. रस्त्याने काही मुले रेगाळत होती, काही खेळत होती, कांही गप्पागोष्टी व थट्टा-मस्करी करीत होती आणि कांही धक्काबुक्की व मारामारी करीत चालली होती. एक मुलगा धडचातले कांही शब्द बडबडत चालला होता. त्याच्या मागून येणारा मुलगा त्याला मोठमोठचाने हाका मारीत होता. त्या दोघाच्या मागून दोन मुले त्याना पकडण्याकरिता झरझर येत होती.

त्या गर्दीचें निरीक्षण करीत गोपाळबरोबर बाळ शाळेपाशी येऊन पोहोचला. त्या मुलाचे हसणे. विनोद, आनद व त्याच्या मुखावरील तरतरीतपणा यांनी बाळाचे मन आकर्षित करून घेतले शाळेच्या पटागणा-वर मुलाचा समुदाय पसरला होता. गोटचा खेळणे, उडचा मारणे, धावणें, शिवाशिवी, अशा तऱ्हेचे मुलाचे खेळ चालू होते. चार मुले येण्याजाण्याच्या रस्त्यावर बसून टारगटपणा करीत होती. दृष्टी चुकवून आडोशाच्या जागी बसून अभ्यास करीत बसलेला मुलगा दिसला की त्याच्या मित्रांना स्वर्ग-प्राप्तीचा आनंद होत होता व त्रास दिल्यामुळे तो चिडला की त्याच्या आनदांत आणखी भर पडत असे.

आनंदपूरच्या शाळेच्या मानाने ती किती तरी मोठी होती. आनंदपूरच्या शाळेएवढ्या येथे अनेक खोल्या होत्या. त्या सर्वांच्या समोर एक चौफेर पडवी होती. तीतून गोपाळ बाळाला बरोबर घेऊन भराभर चालला. शाळेला थोडा वेळ होता म्हणून मुलें अजून खेळत होती. गोपाळबरोबर आलेल्या नवीन मुलाला पाहून गोपाळचे मित्र त्या दोघांच्या मागे धावत आले. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून गोपाळ तडक आपल्या वर्गांत गेला व त्याने आपले व बाळाचे दप्तर एका बाकावर ठेवलें. इतक्यांत गोपाळचे दोस्त या दोघांच्या भोवती जमले, व कोणी गोपाळला तर कोणी बाळाला तो कोण आहे, त्याचे नांव काय, कोठून आला, कोणत्या वर्गांत बसणार इत्यादि प्रश्नांची झोड सुरू केली. तो आपल्या वर्गात येणार हे ऐकून त्या मुलांना मोठा आनंद झाला. त्यांनी बाळाला एकाच वेळी इतके प्रश्न विचारण्यास सुरुवात केली की, बाळ शतावधानी असता तरी त्या सर्वांकडे त्याला लक्ष पुरवतां आले नसते. इतक्यात गोपाळने 'चल तुला सर्व शाळा दाखवतो' असें म्हणून त्या सर्वांच्या घोळक्यातून बाळाला ओढून नेले.

शाळेच्या मुख्य इमारतीची रचना अशी होती:—खोल्यांच्या दोन उभ्या रांगाच्या मध्ये एक आडवी रांग होती व त्या सर्वांच्या आतल्या अंगाने पडव्या असून मध्ये चौकोनी अंगण सोडले होते. डाव्या उजव्या हाताकडच्या उभ्या रांगामध्ये वर्ग बसण्याकरिता पाच पाच खोल्या होत्या, व मधल्या आडव्या भागात मध्ये प्रशस्त दालन व बाजूला एक एक खोली होती. गोपाळने एका टोकापासून सुरुवात केली. पहिल्या खोलीसमोर येऊन तो म्हणाला 'हा मॅट्रिकचा वर्ग.' दुसऱ्या खोलीसमोर पुन्हा म्हणाला हाहि मॅट्रिकचा वर्ग. तिसऱ्या खोलीसमोर पुन्हा तेंच! बाळाला त्याचें सांगणें बरोबर कळले नाही. त्याने विचारले "एका वर्गाला तीन खोल्या कशाला?" गोपाळने त्याला समजावून सांगितलें की, वर्गात मुलें मावत नसलीं की त्याच्या तुकड्या करतात.

जरा पुढे गेल्यावर मास्तरांची बसण्याची खोली लागली. अगदी चूप राहण्याचा इशारा करून गोपाळ बाळाला एक एक मास्तर दाखवू लागला, " ते पहा, मोठी शेंडी असलेले, उभें गंध लावून उपरणें घेऊन बसलेले संस्कृतचे मास्तर आहेत." 'तेच का?' म्हणून बाळाने बोटाने दाख-

विण्यापूर्वीं गोपाळने झटकन त्याचा हात खाली केला व हळूच म्हटलें, 'बोट दाखवूं नकोस, मास्तर रागावतील?' आनंदपूरच्या मास्तरची त्याला कधी भीति वाटली नव्हती. पण गोपाळने दिलेल्या इशाऱ्यामुळे त्याला या मास्त-रांची भीति वाटली. सस्कृतच्या मास्तरांच्या पलीकडे बसलेले सायन्सचे मास्तर, त्यांच्या पलीकडे इतिहासाचे मास्तर, गणिताचे मास्तर, इंग्रजीचे मास्तर, ड्रॉईंगचे मास्तर असे एक एक मास्तर गोपाळने मास्तरांचा डोळा चुकविण्याची खबरदारी घेऊन बाळाला दाखविले.

"आणि ते कोणत्या वर्गाचे मास्तर," बाळाने अलमारीशी पुस्तक पाहत असलेल्या एका मास्तरांकडे बोट दाखवून विचारलें. गोपाळने ते मराठीचे मास्तर असल्याचे सांगितलेले ऐकून बाळाने पुन्हा विचारले, "ते कोणत्या वर्गाला शिकवितात?"

गोपाळ म्हणाला "ते सर्व वर्गांना मराठी शिकवतात."

बाळाने पुन्हा प्रश्न केला, "ते आणखी काय शिकवतात?"

"दुसरें कांही शिकवत नाहीत बरें," हा असे प्रश्न का विचारतो अशा दृष्टीने पाहत गोपाळ म्हणाला.

बाळ स्वतःशीच पुटपुटला, 'सारखें तेच तेच शिकवताना मास्तरना कंटाळा कसा येत नाही?'

निरनिराळ्या विषयाना निरनिराळे मास्तर, एकेका वर्गाच्या दोन दोन, तीन तीन तुकड्या, ती भव्य शाळा व मुलांचा तो असंख्य समुदाय हें दृश्य पाहून बाळ आश्चर्याने थक्क झाला. आनदपूरची लहानशी शाळा, सर्व वर्गांना शिकविणारे एकच पतोजी, व तीं जमिनीवर बसणारी मुले, हें दृश्य त्याच्या मनःचक्षूपुढे उभे राहिले व तुलनेने दोहोंमध्ये त्याला जमीन-अस्मानाचा फरक दिसूं लागला.

नतर ते ड्राईंगच्या वर्गासमोर आले. तेथील निरनिराळे नमुने व सुदर चित्रें पाहून ते पुढल्या खोलीशीं आले. या खोलींत अनेक देशांचे नकाशे भिंतीशी टांगलेले होते. काचेच्या चौकटींत हिंदुस्थानचा भौतिक नमुना ठेवला होता. पृथ्वीचा गोल व ऋतु दाखविणारें यंत्र पाहून ते पुढल्या खोलींत गेले. बाटल्या, तराजू, काचेच्या वाकड्यातिकड्या नळ्या व इतर उपकरणें यांनी ती खोली भरली होती. बाळाने विचारलें, 'हें रे काय?'

गोपाळ ऐटीने म्हणाला, "ही सायन्सची खोली आहे."

"सायन्स म्हणजे रे काय?" असें बाळाने पुन्हा विचारलें तेव्हा गोपाळ थोडा चपापला. कारण त्यालाहि माहीत नव्हते. पण मी जुना; मला माहीत नाही असें न दिसावें म्हणून गोपाळ ऐटीने म्हणाला, 'असतें रे सायन्स! तुला नाही इतक्यात कळणार;' व असें म्हणून त्याने वेळ मारून नेली. तेथून ते हॉलसमोर आले. तो मोठा व भव्य होता. शाळेला सामन्यांत मिळालेली विजयचिन्हें तेथे ठेवलेली होती. तीं पाहात ते हॉलच्या बाहेर पडले. हेडमास्तरच्या खोलीसमोरून त्यांना पुढे जावें लागत होतें. पाय न वाजवतां गोपाळ पुढे गेला. त्याच्या मागून त्याच्या-प्रमाणे चपापत बाळहि गेला. त्याने ओझरतेच आंत पाहिले होते. त्या बाजूने एकहि मुलगा फिरकत नव्हता व त्या खोलीच्या आसपास अगदी शांतता नांदत होती. मास्तर पुस्तक वाचत होते. त्यांची शांत दृष्टी पुस्तकावर खिळली होती, त्याचें मन वाचनात गढून गेलें होतें व त्यांची मुद्रा गंभीर दिसत होती. या दृश्याचा बाळाच्या मनावर योग्य परिणाम झाला. हेडमास्तरांविषयी त्याच्या मनांत आदर उत्पन्न झाला—त्याला किंचित् भीतिहि वाटली यात शका नाही.

बाळाला मी शाळा दाखविली व सर्व गोष्टी समजावून सांगितल्या यांत माझ्या हातून महत्त्वाची कामगिरी झाली असें गोपाळला वाटत होतें. मला कितीतरी जास्त माहिती आहे असा विचार त्याच्या मनांत डोकावला असावा. बाळाशिवाय इतर मुलाशी तो आज ऐटीने वागत होता. त्यांच्याशी तो फारसा बोललाहि नाही. एका दोघानी 'फार ऐटीत आला आहेस' असें म्हणून त्याला हटकलेहि. एरवी खूप बडबड व दगा करणारा गोपाळ आज अगदी शात होता. वर्गातहि तो पुस्तकें दाखविणें, वेळापत्रक सांगणे, अभ्यास काय आहे, कोण मास्तर रागीट व कोण मास्तर शांत, कोण मास्तर हसविणारे व कोण मास्तर हुशार या सर्व गोष्टींचा बाळासमोर पाढा वाचीत होता. निरनिराळे विषय शिकव-णारे निरनिराळे मास्तर, त्यांचें तासातासांनी बदलणें, तासातासांनी होणाऱ्या घटचा, प्रत्येक वेळी वर्ग बदलणें हे सर्व नवीन प्रकार पाहून बाळाला मोठी गंमत वाटत होती; त्यामुळे वेळ किती लौकर गेला याचें

त्याला भानहि राहिलें नाही. दोन वाजतां मधल्या सुटीची घंटा झाली. वर्गाच्या बाहेर आल्यावर गोपाळ बाळाला म्हणाला, "चल आपण विश्रांती-गृहांत जाऊं!" ही काय नवीन गोष्ट आहे तें पाहण्याची बाळाला उत्सुकता वाटली.

दोघे एका घराशीं येऊन पोहोचले. दारावर 'मनोहर विश्रांति गृह' अशा अक्षरांची पाटी लावलेली होती. समोर मोठाली तीन दारें होती. अर्ध्या दाराला खालच्या बाजूने कळीचे पडदे होते. आंत बाहेर जातांना जरा ढकललें की ते पडदे बाजूला होत व माणूस गेला की पुन्हा मिटून जात. समोर एका काचेच्या आलमारीत ठळक दिसतील अशा रीतीने लाडू, अनारसे, श्रीखंड, पुऱ्या, बासुंदी वगैरे गोड व शेव, चिवडा, भजी वगैरे तिखट पदार्थ ठेवलेले होते. शेगडीवर एका भल्या मोठ्या पिपांत पाणी उकळत होतें. एका लहानशा टेबलावर किटली, चहा साखरेचे डबे व दुधाचें भांडें हे सामान होते. खराड्यांत विश्रांति घेत असलेल्या कबुतरांप्रमाणे एका उघड्या कपाटांत कपबशा मांडलेल्या दिसत होत्या. एक मनुष्य तेथे उभा राहून सारखा चहा करून देण्यांत गर्क होता. समोरच्या बाजूला एक मोठें दालन होतें. त्यांत लहान लहान पुष्कळ टेबलें मांडली होती व प्रत्येक टेबलाभोवती खुर्च्या मांडलेल्या होत्या. टेबलांशी बसून मुलें खाण्याच्या पदार्थांवर ताव मारीत होतीं, व नोकराची सारखी धावपळ चालू होती. आंत शिरतांच एक रिकामे टेबल पाहून तेथे एका खुर्चीवर गोपाळ बसला व दुसऱ्या खुर्चीवर त्याने बाळाला बसायला सांगितले. 'दोन भजी, दोन श्रीखंड, दोन पुऱ्या, व दोन चहा' असा हुकूम—कोणा विशिष्ट व्यक्तीला उद्देशून नाही असें निदान बाळाला तरी वाटलें—त्याने ऐटीत सोडला. थोडक्याच वेळांत एका नोकराने ते सर्व पदार्थ आणून त्यांच्यासमोर मांडले, व त्या दोघांनी त्यांचा समाचार घेण्यास सुरवात केली. मुलांनी चालविलेली थट्टा, नोकरांना सुटणारे हुकूम, 'तीन इसम चार आणे' असें नोकरांचें संदिग्ध ओरडणें, त्या अर्थहीन शब्दांतून अर्थ काढून मालकाचें बिनचूक पैसे घेणें या सर्व गोष्टीचें बाळ लक्षपूर्वक अवलोकन करीत होता.

त्या दुकानांत काम करणारा एक भला लठ्ठ व उंचसा पोऱ्या होता.

त्याचे हातपाय शरीराच्या मानाने आखूड पण लठ्ठ होते. त्याचा देह बराच स्थूल होता, त्यामुळे त्याचें पोट एखाद्या मोठ्या मातीच्या घड्याप्रमाणे शरिराला चिटकवल्याप्रमाणे दिसत होतें. त्याच्या डोक्याप्रमाणे त्याचे डोळे लहान होते व त्याचें धबाडें नाक त्याच्या डोक्याला चिटकवल्याप्रमाणे लोंबकळत असलेलें दिसत होतें. तें पाहून असेंच वाटत होतें की हत्तीच्या सोंडेशीं स्पर्धा करण्याकरिता तें उत्क्रांतीची वाट पाहात आहे. तें एकदर रूप पाहून मुलांना हसू येत असे. चालतांना त्याचे हातपाय थलथल हालत व डोळे लुकलुकत तेव्हा गटापर्चाच्या बाहुलीच्या हालणाऱ्या हातापायाची व उघडझाप करणाऱ्या डोळ्यांची त्यांना आठवण होई. हा मुलगा दुकानांत येणाऱ्या सर्व मुलांच्या थट्टेचा विषय होऊन बसला होता. कोणी त्याला चापटी मारी, कोणी त्याचा कुडता ओढी व कोणी त्याला भजी फेकून मारी. मुद्दाम बोलावून आणून व त्याची चेष्टा करून ते त्याला रडकुडीला आणीत व तो चिडला म्हणजे सर्व हसत सुटत. मुलांनी त्याला आपल्याजवळ बोलवावें व खुर्चीवर बसावयास सांगावें व तो बसू लागला की, एकाने खुर्ची हळूच उचलून घ्यावी व तो पडला की टाळ्या पिटून सर्वांनी हसण्याने ते दालन दुमदुमवून टाकावें. तोहि इतका निर्बुद्ध होता की हा प्रयोग त्याच्यावर अनेकदा झाला असूनही तें सर्व तो विसरून जाई व तोच प्रयोग पुन्हा कोणी त्याच्यावर करू लागल्यास तो अशा रीतीने वागत असे की जणू काय पूर्वी कांही झाल्याची त्याला आठवण नाही. गोपाळ नेहमी त्याची खोडी करीत असे. एकदा कागदाच्या तुकड्याला थोडें श्रीखंड लावून तो कागद त्याने त्या मुलाला न कळत त्याच्या रस्त्यांत टाकून दिला. कागदावरून पाय घसरून तो धपकन भोपळ्याप्रमाणे जमिनीवर आपटला. तेव्हा बाहुलें आपटलें असें म्हणून गोपाळ ओरडला व सर्व मुलें हसू लागलीं.

मधली सुट्टी संपल्याची घटा झाली व सर्व मुलें भराभर आपल्या वर्गाकडे धावत गेलीं. साडेचारला शाळेची सुटी झाली. मोठी मुलें फुटबॉल खेळण्याकरता पटांगणावर जमलीं. बाळ व गोपाळ खेळ पाहात उभे राहिले. खेळांत दोन मुलें कमीं होतीं म्हणून एकीकडे बाळाला व एकीकडे गोपाळाला घेतलें. मोठे गडी चेंडू आकाशांत उच उडवीत होते व जोराने लाथाडून, एका गोलाकडून दुसऱ्या गोलाकडे ढकलीत होते. एकमेकावर

डाव देण्यासाठी मोठ्या चुरशीने लढत चालली होती. डाव रंगांत आला होता. चेंडू आला की बाळ त्याला लाथेने सपाटून उडवून देऊं लागला. बाळाला हा खेळ नवीन होता; मोठ्या चुरशीने तो खेळत होता. मारे धावून धावून तो खेळूं लागला. सर्व गडी पुढे व बाळ एकटाच मागे आहे, अशा वेळी विरुद्ध बाजूचा एक गडी चेंडू घेऊन जोराने धावत येत होता. त्याला अडविण्यास कोणीच नव्हतें. बाळने एकदम पुढे होऊन चेंडूला लाथ मारली. त्यासरशी चेंडू उंच उडून दूर निघून गेला. पण त्या मोठ्या मुलाचा धक्का लागून बाळ कोलांट्या खाऊन जमिनीवर आपटला. त्या मुलाने ताबडतोब बाळाला उचलून घेतलें. त्याला लागले नाही हें पाहून सर्वांना आनंद झाला. सर्व मुलें जमली व त्याच्या धैर्याची वाखाणणी करूं लागलीं. बाळ कपडे झटकून पुन्हा उभा झाला, तेव्हा नायकाने (कॅप्टनने) दोन्ही दंड धरून बाळाला कौतुकाने गदगदा हालवलें व म्हटले "तूं चांगला खेळणारा होशील, मोठा झालास म्हणजे आमच्या मोठ्या तुकडी (टीम) मध्ये तुला घेऊ." बाळाला उंच उचलून धरून तो आपल्या मित्रांना म्हणाला "हा मुलगा चांगला होतकरू दिसतो." अशा रीतीने या आकस्मिक प्रसंगाने पहिल्याच दिवसापासून बाळाची शाळेंतील मोठ्या मुलांशीं ओळख झाली.

बाळाला रात्री लवकर झोप लागली नाही. मुलांचा गोंगाट, मास्तरांचे अस्खलीत वाक्प्रवाह व मधून मधून होणाऱ्या घट्या त्याच्या कानाला ऐकूं येत होत्या. शाळेची इमारत, मुलांचा घोळका व वर्गात टेबलासमोर उभे असलेले मास्तर हे दृश्य त्याच्या डोळ्यांसमोर उभे राहात होतें. मधून मधून या सर्व दृश्याला मागे सारून त्या थुलथुलीत मुलाची मूर्ति त्याच्या डोळ्याला दिसू लागे. नायकाने (कॅप्टनने) त्याला उंच उचलून धरलें आहे व सर्व मुलें त्याची वाहवा करीत आहेत हा देखावा समोर दिसूं लागला तेव्हा बाळाला थोडें हसूं आलें. त्याने डोळे उघडून पाहिलें तों लख्ख ऊन पडलें होतें व त्याला उठविण्याकरिता आई जवळ उभी होती. बाळाला वाटलें मला रात्रभर झोप लागलीच नाही.

## प्रकरण ८ वें

# अस्वलाच्या पिंजऱ्यांत उडी

बाळाला कमळपूरच्या शाळेत जाऊ लागून अडीच तीन वर्षे झालीं होती. आता तो शाळेत चांगला मुरला होता. इंग्रजी पहिली व दुसरीची परीक्षा संपवून तो आता तिसरीत होता. शाळेच्या पटांगणात खेळण्यास तो नेहमी येत असे. तो चणचणीत व कणखर होता; व चांगल्या खेळाडूचे गुण त्याच्या अंगांत उतरले होते. शाळेतील सर्व मुलें त्याला ओळखू लागली होती. फुटबॉल असो, हॉकी असो किंवा दुसरा एखादा खेळ असो. बाळाचे नांव खेळणाऱ्या मुलांमध्ये निवडलें जाई. खेळाडूपणामुळे बाळाची मोठ्या मुलांशी ओळख झाली होती, व वरच्या वर्गांतील मुलांमध्ये त्याला बसा-खेळावयास मिळाल्यामुळे त्याच्या बरोबरीची मुले त्याला वचकत असत. बाळ धिप्पाड, दुहेरी हाडाचा, मजबूत बांध्याचा व चलाख होता. त्याचा चेहरा देखणा व मोहक होता व त्याचे डोळे पाणीदार होते. गर्व तर त्याला मुळीच माहीत नव्हता. तो सर्वांशी गोडीगुलाबीने व मोकळ्या मनाने वागत असे, व सर्व मुलांमध्ये त्याची चहा असे.

शाळेला लागून शाळेचे वसतीगृह होते. त्यात शंभर मुले राहण्याची सोय होती. वसतीगृहांत बाळाच्या वर्गातला विष्णू नांवाचा मुलगा राहत होता, बाळ व गोपाळ त्याच्याकडे नेहमी जात येत असत. अभ्यासाकरिताहि ते विष्णूच्या खोलीत जमत असत. सुटीच्या दिवशी विष्णूच्या खोलीत ते गप्पा मारण्याकरिता येत असत. मध्ये एखादा तास सुट्टी असल्यास किंवा शाळेनंतर खेळ सुरू होण्यापूर्वी ते विष्णूच्या खोलीत जाऊन बसत असत.

बाळाची शाळा गावाच्या उत्तरेस एका उंचशा सपाट जागेंत होती. शाळेपासून थोड्याशा अंतरावर पूर्वेच्या अंगाला वसतीगृह होते व या दोन इमारतींच्या मध्ये वसतीगृहाला लागून हेडमास्तराचें राहण्याचें घर होतें. शाळेच्या आसपास मुलांना खेळण्यासाठी मोठालीं पटांगणें होतीं. शाळेच्या आवाराच्या पलीकडे पूर्वेस एक ओढा होता, व त्या ओढ्याच्या

पलीकडे एक बगीचा होता. शाळा गावाला अगदी लागूनच होती व गावाच्या पूर्वेच्या अंगास एक सुंदरसें वन होतें.

एकदा बाळ, विष्णू व गोपाळ शेजारच्या बगिच्यांत फिरावयास गेले. बगीचा चांगला आखलेला व सुंदर दिसत होता. फुलझाडांच्या ताटव्यांनी सुशोभित झालेली गवताची हिरवीगार राखीव पटांगणे ठिकठिकाणीं स्वागताकरिता तयार होती. त्या ताटव्यांतून येणाऱ्या परिमळाने सारा बाग दरवळून गेला होता. जवळच गगनचुंबित वृक्षांच्या समूहामध्ये घरासारखा मोठा पक्षांचा पिंजरा होता. त्यांत चित्रविचित्र लहानमोठे पक्षी निरनिराळे आवाज काढीत होते. कांही लहान पक्षी मंजुळ सुरांच्या लकेरी आसमंतात् पसरवीत भिरभिर उडत होते. एक नवीनच आलेला पक्षी होता. तो उंच जाण्याकरिता भरारी घेई पण पिंजऱ्याच्या जाळीवर आदळून कांही वेळ तेथेच पंख फडफडवत राही व निराशा होऊन पिंजऱ्यांतल्या एखाद्या झाडावर जाऊन बसे. पक्षांच्या पिंजऱ्याच्या एका बाजूला वाघ, चित्ते, सिंह आदि हिंस्र पशूंचा पिंजरा होता व दुसऱ्या बाजूला ओढ्याच्या काठाने हरणांचा कोंडवाडा होता. हिंस्र पशूंच्या पिंजऱ्याच्या पलीकडे जमिनीपासून दहा फूट उंच विहिरीसारखी गोल भिंत बांधून एक पिंजरा तयार केला होता. त्यांत अस्वलाची दोन पिलें होतीं. भिंतीच्या बाहेरच्या बाजूस माती टाकून त्या पिंजऱ्याला उंचवटयाचें स्वरूप दिलें होतें. उंचवटयाच्या वरच्या अंगाला तीन फूट भिंत वर उघडी ठेवली होती, व तिचा उपयोग कठड्याप्रमाणे लहान मुलांच्या बचावाच्या कामी होत होता. उंचवटयावर सुंदर रोपें लावली होती व मधून पाहण्याकरिता वर चढून जाण्यासाठी वाटा ठेवल्या होत्या. पिंजऱ्याच्या मध्यभागीं एक खांब रोवला होता व त्यावर अस्वलांना चढण्याकरिता खाचा केल्या होत्या. विहिरीप्रमाणे असलेल्या त्या पिंजऱ्याला लागून पूर्व व पश्चिमेच्या अंगाला अस्वलाकरिता गुहावजा दोन खोल्या उंचवटयाखाली काढल्या होत्या; त्याचप्रमाणे दक्षिणेला व उत्तरेला बोगद्याप्रमाणे लहान पिंजरे केले होते. या लहान पिंजऱ्यांना मोठ्या पिंजऱ्यांत जाण्याकरिता आतल्या बाजूने व पिंजरा धुण्याकरिता आंत जाण्यासाठी बाहेरच्या बाजूने गजांचीं लोखंडीं दारें होतीं. या लहान पिंजऱ्यांपैकी एकांत अस्वलांना कोंडलें की दुसऱ्या बाजूच्या लहान पिंज-

ऱ्याच्या मार्गाने मोठा पिंजरा उघडतां येत असे. या लहान पिंजऱ्याच्या मार्गाने त्यांना अन्न देण्यांत येत असे.

फिरतां फिरतां ती मुले अस्वलाच्या पिंजऱ्याशी आली व वरच्या बाजूने अस्वलाच्या पिलांची गंमत पाहात उभीं राहिली. पिलें कुस्ती खेळत होतीं. कांही वेळाने एक पिलू मधल्या खांबावर चढू लागले व चढतां चढतां धपकन खाली आपटले. नतर ती पिलें एकमेकांच्या मागे धावत सुटली. त्याचे खेळ पाहून बाळ व त्याच्या मित्रांना मौज वाटली. बाळ, गोपाळ व विष्णू तिघेहि आनंदांत होते. ते एकमेकाना ढकलूं लागले. ढकलाढकलीत विष्णूची टोपी बाळचा धक्का लागून पिजऱ्यांत पडली. अस्वलांची दृष्टि त्या टोपीकडे गेली पण आपला खेळ सोडून त्यांना तिकडे लक्ष द्यावेसे वाटले नाही. तारेवर नाच करणाऱ्या डोंबाऱ्या-प्रमाणे लहान मुलांचा मार्ग अपघातमालिकेने आखलेला असतो. पावलो-गणी अपघातावरून उडया मारीत जाणाऱ्या मुलाचें रक्षण देवच करूं जाणे! एकाएकी एका अस्वलाची टोपीकडे धावण्याची लहर लागली. विटी-दांडूचा खेळ सपवून बाळ, गोपाळ व विष्णू बागेत सहल करावयास आले होते. बाळच्या हातांत दाडू होता. बाळाने एकदम पिजऱ्यात उडी घातली. त्याला पाहून एक अस्वल त्याच्याकडे धावला. बाळने त्या अस्वलाच्या नाकावर दांडूने एक टोला लगावला, तेव्हा तो अस्वल जरा मागे सरला व गुरगुर करीत आपल्या सोबत्याजवळ गेला. अस्वलाचें लक्ष नाहीसे पाहून बाळाने चटकन टोपी उचलून घेतली. दोन्ही अस्वल आता क्रुद्ध मुद्रेने बाळकडे पाहूं लागले. मधला खांब अस्वलाना जवळ व बाळाला दूर होता. बाळ खांबावर चढण्याचा विचार करीत होता, व अस्वलांचा रोख बाळावर हल्ला करण्याचा दिसून येत होता. अणीबाणीची वेळ पाहून गोपाळनेही पिंजऱ्यांत उडी घातली व बाळावर दोन्ही अस्वलाचा हल्ला येण्यापूर्वी तो बाळाच्या मदतीस जाऊन उभा राहिला. हे नवीन सकट पाहून आस्वल जरा थबकले, व नंतर जरा चिडून जोराने त्यांच्याकडे धावले. एकेकाने एकेका अस्वलाच्या नाकाडावर पुन्हा जोराचा तडाखा लगावला. तेव्हा पहिला अस्वल तर भिऊनच पळाला; पण दुसरा गुरगुरत मागे सरला.

विला. इतक्यांत विष्णूने साखळी ओढून एकीकडील लहान पिंजऱ्याचें आंतलें दार उघडलें. अस्वल चिरचिर करीत त्या खोलीत घुसले व ताबडतोब दार बद होऊन ते लहान पिंजऱ्यांत कोंडले गेले.

बाळ व गोपाळ यांच्यावरील सकट दूर झाले. यानंतर ते वर येण्याच्या विचाराला लागले. दोन्ही लहान पिंजरे बाहेरून बंद होते. एकांत अस्वल कोंडले होते व दुसऱ्यास कुलूप असल्यामुळे त्याहि मार्गानें बाहेर येणे शक्य नव्हते. बागेंतील नोकर रागावतील म्हणून त्यांना बोलावण्याचा मुलांना धीर होईना. कपडे साफसूफ केल्यावर बाळ मधल्या खांबावर चढला व तेथून ताडकन उडी मारून भितीची वरची बाजू त्याने हाताने घट्ट धरून घेतली व भितीवर चढून तो बाहेर निघाला. गोपाळहि तसाच बाहेर आला.

हा सर्व गोंधळ चालू आहे तो बरीच मुले तेथे गोळा झाली. बाळ व गोपाळ बाहेर आल्यावर त्या जमलेल्या मुलांना समाधान वाटले. काहीजण अस्वलाबरोबर त्यानी केलेल्या लढाईची व कांहीजण खांबावरून भितीवर उडी मारण्याच्या त्यांच्या हिकमतीची तारीफ करूं लागले. इतक्यांत फिरत फिरत हेडमास्तर तेथे येऊन पोहचले. त्यांना सर्व प्रकार विदित झाला. इजा वगैरे झाली की काय याची त्यांनी दोघांजवळ विचारपूस केली व तसें काही झाले नाही हे ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केलें. नंतर त्यांनी शाबासकी देऊन दाखविलेल्या धैर्याबद्दल दोघांची तारीफ केली, परतु पुन्हा जीव विनाकारण धोक्यात न घालण्याबद्दल बजावलें. साखळी ओढून अस्वलांना खोलीत कोंडण्याची युक्ति अमलांत आणून प्रसगावधान दाखविल्याबद्दल त्यानी विष्णूचीही प्रशंसा केली.

## प्रकरण ९ वें

# वाढता परिचय

शाळेच्या वसतिगृहाच्या मध्यभागी एक चौक होता. त्या चौकाच्या पूर्वेस व पश्चिमेस चार चार मुलें राहतील येवढ्या मोठ्या खोल्यांच्या दोन रागा होत्या. उत्तरेस एक एक मुलगा राहील अशा काही खोल्या होत्या व सर्व मुलांना जमण्यासाठी एक दालन होते. दक्षिणेस स्वयंपाकगृह, कोठी व स्नाहगृह वगैरेच्या खोल्या होत्या. खोल्यांच्या रांगांस आंतल्या बाजूला चौकाच्या चौफेर एक पडवी होती. मधला चौक मोठा व खुला होता. कांही फुलझाडे नीटनेटकी लावून त्या जागेला शोभा आणली होती.

वसतिगृहात केव्हाहि जा, मुलांची वरदळ तेथे नेहमी चालू असते. वाचकहो, आपण सकाळी तेथे गेलो असतो तर आपल्याला कोणतें दृश्य दृष्टीस पडले असते बरे ! कोणी गात आहे, कोणी वादविवाद करीत आहे, कोणी अभ्यास करीत आहे, कोणी स्नान करीत आहे असे अनेक व्यवसायात गढलेले तत्रस्थ विद्यार्थी दिसून आले असते. त्या एकंदर गडबडीमुळे व चिलबिलीमुळे ते वसतिगृह पक्षाच्या खोपटाच्या समूहाने गजबजून गेलेल्या वृक्षाप्रमाणे भासत असल्याम नवल नाही. एखादा पक्षी पाण्याच्या डबक्यांत डुबक्या मारून स्नान करीत आहे, दुसरा पख फडफडवून आवाज करीत आहे, तिसरा उन्हात एकएक पाऊल टाकीत ऐटीने इकडून तिकडे फिरत आहे, चवथा वृक्षावर बसून ती सर्व हालचाल नुसती पाहात बसला आहे, कांही भराभर इकडून तिकडे वृक्षावर उडत आहेत. अशा रीतीने वनात पक्षाच्या सहजमनोहर क्रिया चालू असाव्या, त्याप्रमाणे त्या वसतिगृहात मुलाचीं कामें चालू होती. पख फडफडवून वृक्षाच्या एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर एखादा पक्षी भरकन उडून गेला की, त्याच्या मागून पांचसात पक्षांनी उडून जावें व त्याच फांदीवर जाऊन बसावें त्याप्रमाणे एखाद्या खोलीतून भरकन एखादा मुलगा निघाला की आणखी

खोलींत जाऊन गोंगाट करावा. इतक्यांत त्यांची थट्टा करण्याकरिता बाहेरून एखाद्या मुलानें मास्तर आले म्हणून ओरडावें की एका क्षणांत कल्ला बंद होऊन मुलांची पांगापांग व्हावी व जणूं काय अभ्यास करून थकलों आहोंत किंवा अभ्यासांत अगदी गढून गेलों आहोंत अशी मुद्रा त्यांनी धारण करावी. पण ही थट्टा आहे व मास्तर आलेले नाहीत, अशी त्यांची खात्री होतांच हास्याचा एकच स्फोट व्हावा व पुन्हा गोंगाट पूर्ववत् सुरू व्हावा.

विष्णूची खोली पूर्वेच्या रांगेत उत्तरेकडून पहिली होती. त्या खोलीत विष्णु, त्याच्या वर्गांतील एक व वरच्या वर्गांतली दोन अशी चार मुलें राहात होती. प्रत्येक मुलाकरता क पलंग, एक टेबल, एक खुर्ची, कपडे टांगण्याच्या खुंट्या आणि पुस्तकें व चिल्लर सामान ठेवण्याकरतां भिंतीला असलेले एक उघडे फडताळ अशी सोय होती. प्रत्येकाची ट्रंक त्याच्या टेबलाखाली होती. सर्व खोल्यांतून सहज एकदा चक्कर मारली असतां मोठें सुंदर व उद्बोधक दृश्य दृष्टीस पडले असते; व त्यावरून तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वभाववैचित्र्याची, 'मूर्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें, माहिती होऊं शकली असती. एखाद्या मुलाचे सामान चांगलें उंची असूनहि गचाळपणामुळे अस्ताव्यस्त पडलेलें, पुस्तकें आंथरुणावर इतस्ततः पसरलेली व टेबलावर पुस्तकांच्या जागी कोटटोपी पडलेली दिसली असती. दुसऱ्या मुलाच्या सामानाकडे पाहिले तर सर्व सामान साधेंसुधें पण नीट व्यवस्थेनें ठेवलेलें-खुंटीवर कपडे, आलमारीत पुस्तकें व टेबलावर लिहिण्याचे सामान व्यवस्थित मांडलेलें दिसलें असतें. तिसऱ्या मुलाच्या सामानाकडे पाहिले असतां टापटीप व छानछोकीची आवड दिसून आली असती. त्याचे रेशमी व लोकरीचे कपडे व्यवस्थितपणें ठेवलेले, निरनिराळ्या रंगांचे पुठ्ठे घालून पुस्तकें व वह्या आलमारीत नीटपणें ठेवलेल्या आणि टेबलावर फुलदाणीमध्ये फुलांचा गुच्छ व त्याच्या शेजारी कंगवा, आरसा व सुवासिक तेलाची बाटली मांडलेली दिसली असती. नीटनेटक्या पोशाखांत काढलेला त्याचा एक फोटो टेबलावर उभा केलेला दिसला असता. विष्णूच्या खोलींत दिसणारें हें दृश्य थोड्याफार फरकानें इतर खोल्यांतूनहि दिसून आलें असतें.

विष्णू स्वभावतः फार खोडकर व खेळाडू वृत्तीचा होता. तो फारसा अभ्यास करीत असलेला दिसत नसे. त्याच्या कांही ना कांही खोड्या सारख्या चाललेल्या असत. त्यांतून बाळ व गोपाळ यांची जोड त्याला मिळाली की त्याच्या खोड्यास अधिकच ऊत येत असे.

विष्णूच्या खोलीत जो गबाळया मुलगा होता त्याचें नांव बडू होते, पण नांवाच्या अगदी उलट त्याची स्थिति होती. म्हणून 'नांव बड पण करणीत थड' असे विष्णू त्याच्या स्वभावाचे गमतीने वर्णन करीत असे. एका ठिकाणी बसून गप्पा मारणें यातच त्याला आनद वाटे; उठून धडपड व मेहनत करणे म्हणजे त्याच्या जिवावर येई. अस्ताव्यस्त पडलेली पुस्तकें, शाई सांडलेले कपडे आणि आलमारीतले सामान आथरुणावर व आंथरुणांतलें पाघरूण खुटीवर अशी सगळी अव्यवस्था त्याच्या सर्व सामानाची असे. सामान नीट लावण्याचे तर त्याच्या मनात कधीच येत नसे, व आलें तरी कृतीत उतरणे अशक्य असे. अस्ताव्यस्त धोतर, आतलें अस्तर बाहेर डोकावत आहे अशी टोपी, गुड्या नसलेला कोट, मळकट सदरा अशा वेषात, त्या दिवशीचा अभ्यास काय आहे हे माहीत नसल्यामुळे भलतेच एखादें पुस्तक व सर्वसग्राहक जाडशी वही घेऊन शाळेस जावयास निघालेली बडोपंताची ती मूर्ति पाहिली की विष्णूला हटकून त्याची थट्टा करावीशी वाटे, आणि बाळ व गोपाळ विष्णूला सामील होऊन ते तिघे त्याची टवाळी करीत. बडू खादाडहि तसाच होता. खाण्याची चढाओढ लावण्याकरता तो नेहमी तयार असे. त्याच्या टेबलावर चिवडा, भजी वगैरे पदार्थांनी तेलकट झालेले कागद नेहमी पडलेले असत. त्याच्या खादाडपणावर त्याच्या [illegible] ताण होती. एकदा शनिवार सध्याकाळपासून सोमवार सकाळपर्यंत छत्तीस तास निजून काढून त्यांने अधिकाधिक निजण्याची होड जिकली होती. असाच एकदा पुष्कळ खाऊन तो निजल्यावर बाळ, गोपाळ व विष्णू यांनी कंठशोष केला तरी त्याची कुंभकर्णी झोप मोडली नाही; तेव्हा विष्णू म्हणाला 'हा अजगर असाच पडून राहिला तर वारूळ होईल याच्या अंगावर.' यावर त्या मुलांना एक कल्पना सुचली. त्यांनी त्याच्या अंगावर कपडे, पुस्तकें व ट्रंका यांचा ढीग

पडून धाडधाड आवाज झाल्यामुळे शेजारच्या खोलींतलीं मुलें जमलीं पण त्याने हू की चू केलें नाही.

विष्णूच्या खोलींत दुसरा मुलगा होता. त्याचें नांव त्रिंबक होतें. त्रिंबक टापटिपीचा आणि व्यवस्थेशीर होता. त्याचीं पुस्तकें व सर्व सामान नीटनेटकें लावून ठेवलेलें असे. पहाटे तो अगदी नियमित वेळीं उठत असे. स्नानसंध्या, अभ्यास, खेळणें, खाणेंपिणें, देवदर्शन व झोप हीं सर्व कामें तो घड्याळाबरहुकूम अगदी नियमितपणाने करीत असे. त्याची शांत, तेजस्वी व चणचणीत मुद्रा पाहून कोणाचेंहि मन प्रसन्न होई. तो मनाने उदार व मनमिळाऊ पण दृढनिश्चयी व स्पष्टवक्ता होता. कोणाच्याहि उपयोगी पडावयास तो अगदी तत्पर असे. आपल्या हाताने कोणतेंहि काम करण्यांत त्याला कमीपणा वाटत नसे. अव्यवस्थितपणाबद्दल तो बंडूला कित्येक वेळां रागावला होता व त्याचें सामान त्याने कित्येक वेळां नीट लावून दिले होतें. बडू एक त्रिंबकला मात्र भीत असे व एक वेळ आळस मागे सारूनहि त्याचें म्हणणे ऐकत असे.

विष्णूच्या खोलीत तिसरा मुलगा होता त्याचें नांव नारायण होते. त्याचा सर्व वेळ पुस्तकें नीटनेटकी लावण्यांत, कपडे साफसूफ करण्यांत व कंगवा घेऊन वारंवार भांग काढण्यात जात असे. टापटीप व नखरेबाजी याशिवाय दुसरें कांहीच त्याला सुचत नसे. कपडे मळतील म्हणून खेळणेंहि त्याला आवडत नसे. पुठ्ठा खराब होईल म्हणून दुसऱ्याच्या हातांत आपलें पुस्तक देणे त्याच्या जिवावर येई. टापटिपीच्या दगदगीमुळे अभ्यास करण्याला त्याला फुरसत मिळत नसावी.

बंडूसारख्या धिम्या स्वभावाच्या मुलाला चिडविणें, व तो चिडला म्हणजे त्याची मजा पाहावयास मिळणें, हें त्याच्या धिम्या स्वभावामुळे शक्य नव्हतें, म्हणून त्याच्या वाटेला जाण्यांत बाळ, गोपाळ व विष्णू यांना फारशी हौस राहिली नव्हती. त्रिंबकसारख्या उमद्या मुलाची थट्टा करण्याची त्यांना सहसा इच्छा होत नसे, व एखाद वेळ त्यांनी थट्टा केली तरी त्रिंबक त्यांच्या थट्टेंत सामील होऊन आनंद व्यक्त करी म्हणून तोहि फारसा थट्टेचा विषय होऊं शकत नव्हता. राहतां राहिला नारायण. त्याची बारीकसारीक गोष्टींविषयी दक्षता व थोडेंहि मनाच्या विरुद्ध झाल्यास चिडण्याचा

स्वभाव यामुळे नारायणाला चिडविण्याची त्या त्रिकुटाला अनावर इच्छा होत असल्यास नवल नाही. त्यांनी नारायणाचें पुस्तक एकदम उचलून घ्यावें, त्याचें इकडचें सामान तिकडे करून ठेवावें, आरसा लपवावा किंवा खेळावयास नेण्यासाठी त्याला जबरदस्तीने ओढावे व तो कपडयांची घडी मोडेल म्हणून कुरकुर करूं लागला की त्याच्या केसाचा भांगहि मोडून टाकावा. त्यावरून चिडून नारायण त्यांच्याशी दोनदोन दिवस बोलत नसे. नारायणाचा तुसडा स्वभाव त्याला दुसऱ्या मुलाशी खेळीमेळीने वागू देत नव्हता, त्यामुळे तो एकलकोंडा व पुस्तकांतील किडा बनला होता. एकदा फुटबॉलचा सामना पाहण्यासाठी चल म्हणून विष्णूने नारायणाला आग्रह केला, परंतु बाह्यतः अभ्यास करावयाचा आहे या सबबीवर पण वास्तविक रस्त्यांतील धुळीने कपडे मळतील म्हणून नारायण गेला नाही. परत आल्यावर विष्णूने नारायणाला चिडविण्यास सुरवात केली. "इतका अभ्यास करूनहि कधी वर नंबर मिळवितोस काय?" असें म्हणून विष्णूने त्याची थट्टा केली व बासरी वाजवून तो त्याला त्रास देऊ लागला. नारायण चिडला व एका ठिकाणावरून उठून दुसऱ्या ठिकाणी अभ्यासाला जाऊन बसला. पण बासरीचा नाद चालू असल्यामुळे त्याला अभ्यास सुचेना. नंतर आपल्या खोलीतून उठून तो दुसऱ्या खोलीत जाऊन बसला, पण तेथेहि विष्णूच्या बासरीने त्याचा सारखा पिच्छा पुरवला. शेवटी कंटाळून नारायण निजून राहिला. दुसरा दिवस रविवारचा होता. सकाळी उठून नारायणाने पुस्तक हाती घेण्यापूर्वी विष्णूच्या बासरीचा नाद खोलीत भरून गेला. त्या नादाला बाळ व गोपाळ यांच्या बासरीच्या नादाची जोड मिळाली. नारायण स्नानाला गेला. स्नानगृहांत तो नाद त्याच्या मागून चालत गेला; तो जेवावयास गेला तेथेहि तो नाद हजर. जेथे जेथे नारायण गेला तेथे तेथे त्या नादाने त्याची पाठ पुरविली. नारायणाला क्षणभरहि स्वास्थ्य मिळालें नाही किंवा पुस्तक हातीं धरतां आलें नाही. तो मनस्वी संतापला व अद्वातद्वा बोलूं लागला. पण बासरीच्या नादाशिवाय दुसरें उत्तर त्याला मिळालें नाही. उलट चार मुलें जमून त्याचेंच हसें होऊं लागलें. शेवटीं तो रडकुंडीला आला व विष्णूला शरण गेला, तेव्हा कुठे त्याच्या मागचा ससेमिरा सुटला. त्याने रोज खेळ-

विष्णूच्या शेजारीं दक्षिणेकडच्या खोलींत पाचव्या वर्गांतील चार मुले राहात होतीं. त्यांची नांवें गणेश, मधु, विनायक व रघू अशी होतीं. ती मुलें उनाड होतीं. त्या चौकडीला मुलानी 'गणेशकंपू' या नांवाने संबोधण्यास सुरुवात केली होती. लहान मुलांना मारणे, त्यांच्या वस्तू हिसकावून घेणे, त्याना आपली कामें करावयास लावणे, अशा तऱ्हेच्या व्रात्यपणाच्या गोष्टी करीत राहणें हाच त्यांचा नेहमीचा उद्योग असे. त्यांनी कोणाकडून पैसे उसने घ्यावे व ते त्याला परत देऊ नये, आणि तो मागू लागला की त्याला धाक दाखवावा. अभ्यासात त्यांचे फारसे लक्ष नसे. खाणेपिणें, चकाट्या मारणें, व उनाडक्या करणे यात त्यांचा सारा वेळ जात असे. लहान मुलें खेळत असली की त्यांचा खेळ उधळून लावण्यांत त्यांना मौज वाटत असे. हुशार मुलाची नक्कल करून व चुकारपणा करून वर्गात दोन चार तास निभावून नेले की हे आपल्या उद्योगाला तयार. त्यांच्या विरुद्ध तक्रार करण्यास कोणी धजत नसे आणि असा एखादा मुलगा निघाला, की ते त्याला मारण्याचा धाक घालीत व चुगलखोर म्हणून त्याचे नांव बद्दू करीत. याप्रमाणे त्याचा व्यवसाय चालू होता.

विष्णू आल्यापासून मात्र त्याचे प्रस्थ बरेच कमी होऊ लागले होतें. तो स्वतः त्याचें ऐकत नसे; व त्याच्या प्रोत्साहनाने इतर मुले त्यांना भीक घालीत नाहीत अशा समजुतीने त्या चांडाळ चौकडीला विष्णूचा राग येई. बाळ व गोपाळ यांची जोड मिळाल्यामुळे विष्णू फार शेफारला आहे, अशी त्यांची कल्पना झाली होती. पूर्वी विष्णू थोडा तरी दबत असे, पण या दोघांच्या शिकवणीमुळे तो उद्दाम झाला आहे अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती. म्हणून या तिघांची खोड मोडून त्यांना वठणीवर आणण्याचा बेत गणेश कंपूने ठरविला.

एके दिवशीं मास्तर आले नव्हते म्हणून मध्ये एका तासाची सुटी मिळाली. विष्णूबरोबर बाळ व गोपाळ वसतिगृहांतील विष्णूच्या खोलींत येऊन बसले. बडू, नारायण, त्रिंबक व इतर मुलें शाळेतच होतीं. पांचवा वर्गहि लवकर सुटला होता. गणेशकंपू विष्णूच्या पाळतीवर होताच. तिन्ही शत्रु एकत्र सांपडल्यामुळे त्या कंपूला फार आनंद झाला. गणेश व त्याचे मित्र तडक आपल्या खोलींत गेले. आता आपल्याला

यांचा खरपूस समाचार घ्यावयास मिळेल म्हणून त्या चौकडीला आनंदाने गुदगुल्या होत होत्या. कर्कश आवाजांत गणेश ओरडला "दिप्ण्या इकडे ये." त्याच्या कर्कश ओरडण्याने विष्णू, बाळ व गोपाळ यांनी चटकन ओळखलें की, या दुष्टांच्या मनात कांही तरी कुरापत काढून भांडण करावयाचे आहे. काय करावें या विचारास ते लागणार इतक्यांत गणेश पुन्हा ओरडला "विष्ण्या येतोस की आली आहे तुझी कांही." त्या दुष्ट कपूचा इरादा ओळखून बाळने चपळाई करून आंतून दरवाजा लावून घेतला. इतक्यात हातपाय आपटत गणेश व त्याचे तिन्ही दोस्त आले व जोराने दारावर धक्के मारूं लागले. दरवाजा बंद असल्यामुळे त्या चौकडीच्या निरुपद्रवी कोणापासून आपणाला बाधा होणार नाही या भरवशावर आंतील मुलें निर्धास्त होती. दरवाजा उघडा असता तर त्यांची धडगत नव्हती हे ते जाणून होते. मागची खिडकी उघडी होती. ती बद करण्याकरता गोपाळ हात पुढे करणार तोंच खिडकीच्या गजावर खणाखण दगडाचा वर्षाव सुरू झाला. बाळ, गोपाळ व विष्णू चटकन खिडकीच्या बाजूला भितीशीं जाऊन उभे राहिले. त्या चौकडीच्या दुष्ट-पणाची मजल कोठपर्यंत जाऊ शकते हें पाहून त्या तिघाना भीति वाटली. सर्व खोलीभर दगड पसरले होते. पण आतील मुलें भितीशीं सुरक्षित उभी होती. आपला कांही इलाज! चालत नाही व खिडकीचें एक तावदान फुटलें असे पाहून ते दुष्ट लोक चडफडत व शिव्या देत निघून गेले. हातची शिकार गेली व अशी संधि पुन्हा लवकर येणार नाही अशा विचाराने त्यांना वाईट वाटत होतें.

ती दुष्ट चौकडी निघून गेल्यावर विष्णू, बाळ व गोपाळ यांना बरें वाटलें. त्यानी ते दगड बाहेर फेकून दिले व जागा साफसूफ केली ती दुष्ट चौकडी आपला सूड घेण्यास चुकणार नाही याची त्यांना पक्की खात्री झाल्यामुळे यापुढे एकमेकांना सोडून राहावयाचें नाही व जरूर पडल्यास त्यांच्याशी दोन हात करावयाचे असा निश्चय त्या तिघांनी केला तेव्हा त्यांचें समाधान झालें.

# प्रकरण १० वें

# वर्गांत दुर्लक्ष

बाळ जसजसा मोठा होत गेला तसतसा शाळेंतील मुलात हूडपणाच्या कामांत प्रसिद्धी पावू लागला होता. त्याच्या हूडपणाच्या गोष्टी मास्तरांच्याहि कानी जात असत. वर्गात अभ्यासाकडे त्याचें फारसे लक्ष नसे. अभ्यासी मुलांपैकी तर तो खास नव्हता. अभ्यासाचा त्याला कटाळा होता; नव्हे अभ्यासाकरिता त्याला फुरसत नव्हती म्हटले तरी चालेल. तो एकदाहि नापास झाला नव्हता म्हणून आतापर्यंतच्या त्याच्या प्रगतीवरून तो मठ्ठ नाही हे मास्तराना कळून चुकले होते. गोपाळाचीहि तीच गत होती. शाळेंत पाय ठेवल्यापासून तो बाळाचा सर्व कामात साथी होता. खेळावयाच्या जागी काय किंवा वर्गांत काय, बाळ आहे तेथे गोपाळ दिसलाच पाहिजे व गोपाळ दिसला की बाळ कोठे तरी जवळ आहे असे समजले जाई. यामुळे त्या दोघांचें नांव दुक्कल असे पडलें होते. या दुकलीची कांहीं ना कांही चिलबिल नेहमी चालू असायची. वर्गांत एखाद्याना एखाद्या खोडीचा आळ त्यांच्यावर आला नाही असा दिवस सहमा जात नसे—गणेश चतुर्थीचा चंद्र हटकून दिसावयाचाच जसा काही त्यांना—त्यामुळे एखाद्याने खोडी केली व करणाऱ्याचा पत्ता लागला नाही की या जोडगोळीचें नांव आपातत: किंवा क्रमप्राप्त म्हणून म्हणा घेतलें जाई. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें विष्णूचीहि त्यांच्याशीं गट्टी जमली होती. वर्गांत तो त्याच्या बाकावर बसत असे. त्यामुळे ते तिघे खोड्या करतांना एकत्र सापडू लागले. "समान शीले लीलासु सख्यम्" अशा शब्दांनी सस्कृतचे मास्तर त्यांची व्याजस्तुति करीत व खोडी करणारा सापडला नाही म्हणजे 'त्रयाणाम् धूर्तानां' ही गोष्ट मुलांना सांगून त्या तिघांचे नांव पर्यायाने सूचित करीत असत. भूगोलाचे मास्तर त्या तिघांना कधी त्रिकूट व कधी त्रिमूर्ति म्हणून सबोधीत असत व त्यांनी या तिघांच्या बाकाला 'त्रिमूर्तींचा बाक' असे नांव दिलें

करमणूक होत असे व वर्ग सुटल्यावर त्या थट्टेची आठवण त्या तिघांना करून दिल्याशिवाय ती राहात नसत.

दिवाळीची सुटी संपून आजच पुन्हा शाळेला सुरुवात झाली होती. वर्ग सुरू होण्यापूर्वी एकत्र जमून आपण दिवाळी कशी आनंदांत घालविली, काय काय खाल्लें, कोठेंकोठें गेलों, काय काय खेळलों, फटाके किती उडवले इत्यादि गोष्टींचे रसभरित वर्णन मुले एकमेकाजवळ करीत होती. त्या आठवणीने त्याच्या मनात आनंदाचें भरते येऊन त्यापैकी लहान मुलें तर नाचू बागडूं लागली होती. सुट्टी लवकर कशी संपली याचेंच त्यांना आश्चर्य वाटत होते. इतक्यांत शाळा सुरू होण्याची घंटी झाली व जड पायाने प्रत्येकजण वर्गात जाऊन बसला. कितीहि टाळाटाळ केली तरी वर्गांत जाऊन बसणे प्राप्त होते. त्या दिवशी किती मुलांचे लक्ष मास्तरांच्या शिकवण्याकडे होते हा प्रश्नच आहे. वर्गांतील अभ्यास चालू असतां ताज्या आठवणीच्या दिवाळीतील मौजा विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर दिसत असतील तर त्यात नवल नाही. गोपाळ दिवाळीत केलेल्या मौजांचें वर्णन मास्तरांना ऐकूं जाणार नाही इतक्या हळू पुस्तकाच्या आडून बाळाजवळ मधून मधून करीत होता. आनंदपूरची ती लहान शाळा, शाळेसमोरील पटांगण, नदीचा स्वच्छ प्रवाह, नदीचा घाट व घाटावरील देवळे, नदीपलीकडलें वन, नदीच्या वाळवंटांतील स्वत: बालमित्रासह खेळलेल्या खेळाची आठवण करून देणारे लहान मुलांचे खेळ, शेपटया उंच करून स्वैर धावणारी खिल्लारें, सूर्यकिरणानी आरक्त झालेला डोंगर हा सर्व देखावा बाळाच्या डोळ्यासमोर उभा राहून मी काल आनंदपुरांत होतो याची आठवण त्याला करून देत होता. त्या दिवशी इतर मुलाप्रमाणे बाळालाहि प्रत्येक विषयाचा तास नेहमीपेक्षा मोठा व कंटाळवाणा वाटत होता. पहिला तास भूमितीचा होता. भूमितीच्या आकृतीऐवजी ओढयाच्या काठी गाईचें वासरूं पाणी पीत आहे असे चित्र बाळाने काढून ठेवलें. ते पाहून गोपाळने एका पडक्या किल्ल्याचें चित्र रेखाटलें. ती दोन्ही चित्रे घेऊन विष्णूने गोपाळच्या चित्रात किल्याशेजारीं सिंहाचें व बाळाच्या चित्रांत पाण्याजवळ एका पायावर उभा असलेल्या बगळयाचें चित्र रेखाटून दुरुस्ती केली. मुलें नुकतीच सुटीवरून

परत आलीं होतीं म्हणून म्हणा किंवा मास्तरांचे तिकडे लक्ष गेलें नाही म्हणून म्हणा पण ती वेळ निभावली.

भूमितीच्या तासानतर सस्कृतचा तास आला, त्या वेळीहि तीच स्थिति होती. गणिताच्या मास्तरांनी वर्गाच्या बाहेर पाय टाकतांच मुलांनी जो गोंगाट सुरू केला तो सस्कृतचे मास्तर दारांत पाय टाकीपर्यंत चालू होता. मास्तरांनी दारावर जोराने छडी आपटली तेव्हा मुलें भानावर आली. संस्कृतच्या मास्तरांचा थाट थोडा चमत्कृति उत्पन्न करण्यासारखा होता. त्यांची ती वामनमूर्ति व मोठी शेंडी, दाढीमिशासुद्धा साफ घोटलेले डोके, भालप्रदेशावरील भलामोठा त्रिपुड्र, डोक्याला पगडबद जरीचा फेटा, कडक कॉलरचा पांढरा शुभ्र शर्ट, त्यावर काळे जाकीट, त्यावर लोंबत असलेला चकाकणारा छडा, बटने उघडी टाकलेला कोट, खिशातून बाहेर डोकावणारा भडक रगाचा रुमाल, उजव्या डाव्या हातांत चमकदार आंगठ्या, नागपुरी रेशीमकाठाचें धोतर, पायात बूट, पायमोजे अशी त्यांची मूर्ति व हातवारे करीत हेल काढून शिकवणे व मधून मधून डबी उघडून तपकीर नाकांत कोंबणे, या त्यांच्या लीला अगवळणी पडत चालल्या होत्या तरी त्यांतील चमत्कृति मुलाची दृष्टी आकर्षित केल्याशिवाय राहात नव्हती. त्याचे ते विचित्र हेल नवीन मुलांना आश्चर्यकारक वाटत असतच पण ते हेल शाळेभर घुमू लागले की जुन्या मुलांचेहि लक्ष तिकडे वेधल्याशिवाय राहात नसे. मास्तर फार हुशार होते व त्याची स्मरण-शक्ति अचाट होती. एकदा त्यांना इंग्रजी शिकण्याची इच्छा झाली, तेव्हा ती भाषा यावी म्हणून सस्कृत इंग्लिश कोश त्यांनी पाठ करून टाकला. अमरकोशाप्रमाणे हा कोश चांगला नाही म्हणून थोडा त्रास झाला येवढेंच ते म्हणत. त्या दिवशीं आपल्या अचाट स्मरणशक्तीचें प्रदर्शन करून मुलांना थक्क करून सोडण्यांत त्यांनी बराच वेळ घालविला. बाकीचा वेळ दिवाळीचा इतिहास सांगण्यांत सपल्यामुळे मुलांना तो तास तितका जड गेला नाही.

त्यानंतर पदार्थविज्ञानाचा तास आला. कांही ना कांही सबब पुढे करून सायन्सच्या वर्गांत मुलें उशिरां गेली. उशिराने का होईना पण वर्ग सुरू व्हावयाचा तो झाला. त्यांच्या विषयाला योग्य असा रुक्ष विज्ञान

शिकवणाऱ्या मास्तरांचा स्वभाव होता. आपल्या विषयाच्या व त्या दिवसाच्या अभ्यासाबाहेर एक शब्दहि ते मुलाशी बोलत नसत. हवेचा दाब चहूकडून असतो असें समजावून दिल्यावर, पाण्याने भरलेली काचेची एकतोंडी नळी पाण्याने भरलेल्या भांड्यात फक्त तोंड बुडवून वर उलटी उभी करून ठेवली तर भांड्यांतील पाण्यावर बाहेरील हवेचा वरून दाब असल्यामुळे नळीतील पाणी खाली उतरत नाही असा प्रयोग वरील सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ त्यानी करून दाखविला. नतर त्यानी पाण्याने भरलेला एक काचेचा पेला घेतला व त्यावर कागद ठेवून तळहाताने तो कागद पेल्यावर दाबून धरल्यावर तो पेला उलटा केला व कागदाखालून हात हळूच काढून घेतला, आणि हवेचा खालून दाब असल्यामुळे कागद न पडतां चिकटून राहतो व पाणीहि सांडत नाही हे सिद्ध करून दाखविलें. बाळ आपल्या मित्रांना घेऊन मागच्या बाकावर बसला होता. खोडकर मुले कोठेहि बसोत किंवा प्रश्न टाळण्याकरिता मास्तरची दृष्टी चुकवून बसण्याचा कितीहि प्रयत्न करोत मास्तरने लक्ष त्यांच्याकडे गेल्याशिवाय राहात नाही. अशा प्रसगी मास्तर शिकवीत असलेल्या विषयाचें आम्ही मनन करीत आहोत असा साळसूदपणा आमची मित्रमडळी दाखवी.

वेळ कटाळवाणा जात आहे व काही गंमत करावी या हेतूने गोपाळ उभा राहिला. मास्तराना वाटले गोपाळला कांही शका आली आहे. म्हणून तो प्रयोग पुन्हा करून पाहण्यासाठी त्यानी गोपाळला आपल्या टेबलाशी बोलावले. गोपाळला आलेली अभ्यासी वृत्तीची लहर पाहून त्याच्या सहाध्यायाना आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. गोपाळने काचेचा पेला पाण्याने भरून घेतला व त्यावर कागद ठेवला नतर कागदावर हात ठेवून पेला जरा वाकडा करून इतक्या जोराने उलटा केला की, त्यातील पाणी सडा घातल्याप्रमाणे वर्गभर शिंपडले गेलें. सर्व मुलें हासूं लागली व मास्तरांच्या चेहऱ्यावरील गांभीर्य थोडा वेळ मागे सरून तेथे क्षणिक स्मित दृग्गोचर झाल्याशिवाय राहिलें नाही. हवेचा दाब चहूकडे आहे हे सिद्ध होऊं शकले नाही व प्रयोगातील कांही चूक आपण दाखविली आहे अशा विजयी पण गंभीर मुद्रेने गोपाळ जागेवर जाऊन बसला. "तरीच म्हटलें गोपाळला आज अभ्यासाची

गोडी कशी उत्पन्न झाली ! गोपाळ तूं हूडपणा केव्हा सोडून देणार? " असें म्हणून मास्तर पुन्हा आपल्या कामाला लागले. थोड्याच वेळांत घंटी वाजली.

त्यानतर इतिहासाचा तास सुरू झाला. टापटिपीची आवड असलेले, सूटवर खुलून दिसेल असा नेकटॉय घातलेले, भाग काढून केसांची नीट रचना केलेले, तुकतुकीत पण फिक्कट चेहऱ्याचे, गालाची हाडें निघालेले व डोळे खोल गेलेले, अगदी अशक्त व रोड 'फू केले तर उडून जातील' असें थोडक्यांत आमच्या इतिहासाच्या मास्तरांचे शब्द-चित्र काढतां येईल; त्याला त्याच्या उंच नाकावर खुलून दिसणाऱ्या चष्म्याची जोड दिली की ते वर्णन पूर्ण होईल. आज विषयाच्या संदर्भाने ज्यांचे नांव क्रमिक पुस्तकांत नुकतेच कोठे डोकावू लागले होतें त्या शूर बाजी प्रभूच्या पराक्रमाचा प्रसंग मास्तर मुलाना सांगत होते. बाजी प्रभूची अलोट स्वामीभक्ति, शौर्य व धैर्य यांचे रसभरित वर्णन मुक्त कंठाने व अस्खलित वाणीने मास्तरनी केलें. नतर मुलाना सामर्थ्यवान व पौरुषयुक्त होण्याबद्दल कळकळीचा उपदेश करून 'शू शू' करीत मास्तर खाली बसले. शौर्याच्या वर्णनाच्या आवेशाने मास्तरांना आलेला थकवा पाहून व सामर्थ्यवान होण्याचा त्यांचा उपदेश ऐकून मुलांच्या चेहऱ्यावर सहर्ष स्मित झळकू लागले. आपल्या शिकवण्याचा झालेला सुपरिणाम पाहून मास्तरांनाहि समाधान वाटलें.

'पाणी पिण्याची सुटी' झाली, तेव्हा मुले आनदाने उड्या मारीत हिंडू लागली. उन्हाळ्याची किवा दिवाळीची सुटी संपल्यावर प्रथमत: ज्या दिवशीं शाळा सुरू होते तो दिवस किती कंटाळवाणा जातो याची माहिती शाळेत असलेल्या विद्यार्थ्यांना किंवा विद्यार्थीदशेंतून गेलेल्यांना सांगण्याची जरूरी नाही. त्या दिवशी मधल्या सुटीपूर्वीचे तास कसेबसे गेले. मधल्या सुटीची घंटा वाजविण्याला चपराशी विसरला तर नाही अशी कल्पना कित्येकांच्या मनांत डोकावली असावी, व घंटी केव्हा होईल अशा उत्सुकतेने ते मार्गप्रतीक्षा करीत होते. घड्याळाचा काटा पुढे सरकवितां येईल तर काय बहार होईल असें गोपाळ विष्णूच्या कानांत पुटपुटला देखील. मुलांच्या

एका दोघांनी कांहीतरी निमित्ताने बाहेर जाऊन घटी आधी वाजवण्यासबंधाने चपराशाला सुचवून पाहिलेहि. पण तो डुकल्या घेत पडलेला, तो कशाला त्यांचें ऐकतो. शेवटी एकदाची नेहमीच्या वेळेवर घटा वाजली. वर्गांतून बाहेर पडतांच वर्गांतील मुलानी गोपाळने केलेली गमत इतर वर्गांतील मुलांना सागितली; तेव्हा ती मुले पोट धरधरून हासली व गोपाळला शोधून काढून तो प्रयोग करून दाखव म्हणून विनोदाने त्याच्यामागे लागली. बाळ, गोपाळ व विष्णू मधल्या सुटीत नेहमी दगामस्ती करीत शाळेच्या आवारात हिडतांना दिसावयाचे. पण आज त्याना गोपाळ एकटाच आढळला. त्याला चुपचाप बसलेला पाहून व त्याच्या थट्टेला त्याच्याकडून फारसें प्रोत्साहन न मिळाल्यामुळे त्यांना वाटले की, वर्गात केलेल्या खोडीमुळे ओशाळून हा चूप बसला असेल. त्या त्रिमूर्ति एकत्र न दिसल्यामुळे काही मुलाना आश्चर्य वाटलें. बाळ व विष्णू नुकतेच घाईघाईने तेथून गेले होते. त्याना जाताना पाहिलेला एक मुलगा म्हणाला "नाही रे! त्यांचा काही तरी कट चालला असावा."

घटी झाली व मुलें आपापल्या वर्गांत जाऊन बसली. भूगोलाचा तास होता तो. मास्तर विषय समजावून देण्यांत अगदी गढून गेले होते. मास्तर सुस्वभावी व प्रेमळ होते. आपला विषय ते सुलभ व चटकदार रीतीने सांगत असत. निरनिराळ्या देशातील माहिती सागण्यास तेथील मजेदार व चमत्कारिक गोष्टीपासून ते सुरुवात करीत व चित्रे दाखवून विषय चित्ताकर्षक करीत. मुलांचें मन अभ्यासांत अगदी तन्मय झाले होतें, इतकें की आपली जागा सोडून व्यंकट नांवाच्या पोराजवळ जाऊन बसतांना बाळाला कोणी पाहिले देखील नाही. व्यंकटने आपल्या हंटिंग कोटाचे बद गबाळपणे तसेच लोंबत ठेवले होते. बाळाने कोणाच्या न कळत त्या बंदांना मागे एक गाठ दिली, एका मुलाच्या छत्रीचा पांढरा अभ्रा काढून व्यंकटच्या कोटाला बांधून दिला, आणि त्यांत पुष्कळशी पुस्तकें ठेवून एक गाठोडें बाधलें; पण गाठोडें बांधण्यापूर्वी चेंडूप्रमाणे गोल असलेली एक लहान वस्तू त्या गाठोड्यांत जपून ठेवून दिली. गोपाळ व विष्णू समोर बसले होते. ते बाळ व त्रिंबक यांच्याकडे सारखे पाहत होते. त्यांना मनांतल्या मनांत गमत वाटत होती. व्यंकट

जरा हालला की बाळाने चुपचाप बसावें. पण इकडे गोपाळ व विष्णू यांना कसेंसेंच होऊन त्यांनी चुळबुळ करूं लागावी. एकदा तर व्यंकटने इतकी हालचाल केली की तें गाठोडे खाली पडू नये म्हणून बाळाला फार काळजी घ्यावी लागली. त्या वेळीं गोपाळ व विष्णू यांचे चेहरे चिंतायुक्त दिसले. गोपाळला तर इतका राग आला होता की, जवळ असता तर त्याने व्यंकटला जोराचा धक्का देऊन गप बस म्हणून सांगण्याला कमी केलें नसतें. 'व्यंक्या' असे रागाचे शब्द अर्धवट त्याच्या तोंडांतून बाहेर पडणार तोंच विष्णूने त्याला जोराने दाबलें; तेव्हा तो भानावर आला

बाळाने खूण केल्याबरोबर कांही कामाला उठून जावें अशा तातडीने विष्णू बाहेर गेला. त्याने व्यंकटला बाहेर येण्याबद्दल खुणावले. व्यंकट दारासमोरच बसला होता. त्याचें लक्ष विष्णूकडे गेलेंहि. पण तो बाहेर गेला नाही. त्याचे सर्व लक्ष मास्तरांकडे होतें चारपांच वेळा बोलावल्यावरहि जेव्हा व्यंकट बाहेर जाईना तेव्हा विष्णूला काळजी उत्पन्न झाली. घटी वाजवायला फक्त दहा मिनिटें राहिली होती. आपली खटपट वाया जाणार म्हणून विष्णूला वाईट वाटू लागले. 'विष्णू बोलावतो' असें बाळानेहि व्यंकटला खुणावून पाहिलें, तरी तो हालेना. इतक्यात विष्णू कुठेसा जाऊन आला व चुपचाप वर्गांत येऊन बसला. बाहेरून व्यंकटचा भाऊ त्याला खुणावून पेन्सिल मागू लागला. त्यासरशी व्यंकट उठून एकदम चालूं लागला. तों काय ? एकदम धाडकन आवाज होऊन खोली धुराने भरून गेली. एकदम सर्वांचें लक्ष दचकल्याप्रमाणे 'काय आहे ?' म्हणून तिकडे गेलें. तेव्हा व्यंकट वर्गाच्या मध्यभागी उभा आहे व त्याच्यामागे एक मोठे गाठोडे लोंबत आहे असा देखावा दिसला. व्यंकट ओशाळा झाला होता. त्याने आपले बंद सोडवून घेतले व तो जागेवर जाऊन बसला.

विष्णू बाहेर जातांना दिसला म्हणून मास्तरांनी प्रथम त्यालाच पकडलें. पण मी व्यंकटजवळ बसलों नव्हतों असें त्याने सांगितलें. वर्गाकडे वळून हें कोणीं केलें असें मास्तरांनी विचारतांच, 'मी केलें' असें बाळाने कबूल केलें व होईल ती शिक्षा भोगण्याच्या तयारीने तो उभा राहिला. मास्तरांना भयंकर राग आला होता. याप्रमाणे रागावलेले त्यांना पूर्वी

कोणी पाहिलें नव्हतें. बाळाने अपराध कबूल केल्यामुळे त्यांचा राग बराच कमी झाला. ते म्हणाले, "आज तू अपराध कबूल केलास म्हणूनच सुटलास. खोड्या करणें सोडून न देशील व अभ्यासाकडे लक्ष लावणार नाहीस तर तुझें कल्याण होणार नाही. अशा रीतीने नुकसान करून घेणे तुझ्यासारख्या मुलाला योग्य नाही." नतर विष्णूकडे वळून ते रागाने म्हणाले, "या खोडींत सामील असून सर्व दोष एकट्या बाळाच्या माथी मारून तूं सुटू पाहतोस, यामुळे तुझ्या अपराधात भर पडत आहे. तू अपराध लपवू इच्छितोस हें अत्यत लाजिरवाणे आहे. आपण केलेल्या गोष्टीचा परिणाम भोगावयास तयार नसणे हा चुकारपणाचा स्वभाव चांगला नाही."

## प्रकरण ११ वें

# झेंडऱ्याचा खेळ व पहिली चकमक

गोपाळच्या संगतीत राहिल्याने बाळ खोडकर होत चालला आहे व खोडकरपणामुळे विद्याभ्यासाकडे त्या दोघांचेंहि दुर्लक्ष होत आहे असें कांही मास्तरांचें मत होत चालले होते. विष्णूहि नेहमी त्याच्याबरोबर राही व त्यांच्या खोडयांत सामील असे. त्याच्या कांही ना काही खोडया नेहमी चालू असत, व मास्तराच्या कानावर नेहमी त्याच्या कागाळ्या येत असत. पण त्यांचा स्वभाव हूड आहे असे समजून मास्तर तिकडे जरा कानाडोळा करीत. त्या त्रिकुटाबद्दल दुमत नव्हतेंच; पण ही पोरें उनाड आहेत असा मास्तराचा ग्रह व्हावयाला सुरुवात मात्र झाली होती. ते परीक्षेंत कधी नापास झाले नव्हते म्हणून मास्तर त्याना वाईट समजत नव्हते येवढेंच.

शाळेच्या उत्तरेस मुलाच्या खेळण्याच्या पटागणाच्या पलीकडे एक टेकडी होती. त्या टेकडीवर मुलें हवा खाण्याला जात असत. तेथून शाळेचे विस्तृत पटांगण व इमारती, त्यापलीकडे गावांतली घरें, घरांच्या छपरापेक्षा उच दिसणारी देवळांची शिखरें व गजबजलेले रस्ते यांचा देखावा फार सुदर दिसे. जरा पूर्वेस नजर टाकल्यास समोर खळखळ वाहणारा ओढा व त्यापलीकडे बगिचांतील नीट व्यवस्थेने लावलेल्या वृक्षांच्या रांगा दिसत. गावाच्या आसपास नजर टाकल्यास जिकडे तिकडे शेतें दिसून येत पश्चिमेस व उत्तरेस सुंदर वन दिसून येई. पावसाळयांत गावाच्या सभोवतीची भाताची हिरवीगार कोवळी रोपें फार मनोहर दिसत. आकाश काळयाकुट्ट ढगांनी व्यापिलें आहे अशा वेळी ओळीने उच उडत जाणाऱ्या बगळयांच्या पंक्ति गावाला पांढऱ्या शुभ्र फुलांचें प्रचंड तोरण बांधल्याचा आभास उत्पन्न करीत. त्या दृश्यांत ऋतुमानाप्रमाणे हिवाळयांतील सौंदर्याच्या नाविन्याची भर पडून, कांही ठिकाणीं पिकांनी भारावलेलं धानाचीं शेतें सवर्णाचा पिवळा रंग धारण करीत आहेत. शेतकरं

पाखरांना हाकीतच आहेत, पाखरें पिकावरून एकदम आकाशांत भरारी घेत आहेत व आपल्या अनेकविध आवाजांनी सर्व प्रदेश भरून टाकल्यावर मंडलाकृति दोनचार फेऱ्या मारून पुन्हा पिकावर येऊन बसत आहेत, ठिकठिकाणीं शेतांची कापणी झाली असून शेतात पिकांच्या राशी घातल्या आहेत व शेतकरी बैल जुपून खळ्यांत धानाच्या मळणीची तयारी करीत आहेत हे चित्र नेत्राना आकर्षून घेई; व अधार पडल्यावर दूर अंतराळांतून मद मद ऐकू येणाऱ्या मळणीच्या वेळी म्हटलेल्या गाण्याच्या रूपाने शेतकऱ्यांचा आनद, खळ्यातील शेकट्या जळत असतां ज्योतीच्या रूपाने प्रकट होणारा निशादेवीच्या हृदयाचा आनद, कोल्ह्याच्या ओरडण्याच्या व काजव्याच्या चमकण्याच्या रूपाने वनराजीचा आनद, सुगंधी व सुखद स्पर्शाच्या रूपाने वायूच्या मनातला आनद व तारकाच्या नर्तनाने आविष्कृत होणारा नभोमडलाचा आनद–असा सर्वत्र दिसून येणारा आनंद अंतःकरण अगदी भुलवून टाकी. वसतऋतूतील नवजीवनाचे दृश्य परमाववीने चित्ताकर्षक दिसे. जणु काय होलिकोत्सवांत बालकाना झालेल्या आनंदाचे प्रतिबिब निसर्गावर उमटलें आहे. त्या टेकडीवरून दिसणारा देखावा कोणत्याहि ऋतूत मनोवेधकच असे.

त्या टेकडीवर मुले खेळाकरता जमत असत. कधी टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या चिंचेच्या झाडावर ते डाबडुबलीचा (सुरपारंब्या) खेळ खेळत, तर कधी टेकडीवरून गोफणीने धोडा लांब कोण फेकतो याची चढाओढ लावीत. अन्यहि खेळ खेळावयास मुलें तेथे जमत. पुष्कळ मुलें खेळू शकतील असा झेंड्याचा खेळ मुलाना फार आवडत असे. खेळांत खेळणारांची सख्या नियमित नसल्यामुळे सर्व मुलाना या खेळात भाग घेतां येत असे. मुलें दोन बाजूत सारखी वाटली जात. नतर एक बाजू टेकडीच्या मध्यभागी भगवा झेंडा रोवून त्याच्या सरक्षणार्थ तयार होई. दुसऱ्या बाजूची मुले टेकडीवर चारी बाजूनी हल्ला करून निशाण हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत व निशाण हस्तगत झाल्यास ती बाजू विजयी होई. मग बाजूची आलटापालट होऊन निशाणाचें रक्षण करणारी मुलें हल्ला करण्यास जात व विजयी मुलें निशाणाचें रक्षण करण्याचे काम करीत. बाळ, गोपाळ व विष्णू यांची दगाधोपा करण्याकडे स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळे, ते

या खेळांत अग्रेसर असत. हे तिघे प्राय: एकाच बाजूला होत असत व हे तिघे एका बाजूला असले म्हणजे दुसऱ्या बाजूला यांना जिकणें दुरापास्त होत असे. या खेळाला सुसंघटित स्वरूप यावें म्हणून हेडमास्तरांनी एकदा चढाओढीचा सामना करण्याचें ठरवून, लहान मुलांना हुरूप यावा म्हणून पांच रुपयांचें बक्षीसहि जाहीर केले होतें. वरच्या वर्गातील मोठ्या मुलांना या सामन्यांतून मुद्दाम वगळण्यांत आलें होते.

सामन्यासंबंधी मुलांमध्ये खूप हुरूप दिसून येत होता. शनिवारची दुपार मुलांनी मोठ्या आनदाने घालविली. सारा दिवस त्यानी सामन्या-संबंधी ऊहापोह करण्यात घालविला. शनिवार मावळून रविवारचा दिवस केव्हा उगवतो असे मुलांना होऊन गेलें होतें. किती मुले खेळणार याची चवकशी करतां शंभर मुले तयार झालीं. रविवारी दोनप्रहरीच बाळ व गोपाळ वसतिगृहांत आले व डाव जिकण्याकरिता काय केले पाहिजे, याचा विचार करूं लागले. खेळास साडेचार वाजतां सुरुवात व्हावयाची होती. त्या त्रिकुटाची चाललेली तयारी व घाई पाहून बंडूला त्याची थट्टा करावीशी वाटली. तो म्हणाला, "चलारे आपण पूर्वेकडे धावत जाऊ, म्हणजे साडेचार लवकर वाजतील व आपणास लवकर खेळावयाला मिळेल.

"या वेळी साडेचार कुठे वाजले असतील ?" गोपाळने विचारिले.

"कोचीनचीनच्यापलीकडे फिलिफाईनमध्ये जावे लागेल," बंडू म्हणाला.

"काहो भूगोलाचार्य ! पण आपण जाणार कसे ?" विष्णू म्हणाला.

"त्यांत काय ? जादूची सतरजी घेऊ म्हणजे सर्वांना तीवर बसून जातां येईल," बंडू म्हणाला. हें ऐकून जमलेली मुलें टाळ्या पिटूं लागली.

"आपली ही सुदर जागा सोडून आपण नाही कुठे जाणार. हेडमास्तर थोडेच येतील आपलें काम सोडून," कांही मुलें म्हणाली.

"तर मग घड्याळाचा काटा सरकवितात त्याप्रमाणे सूर्याला पुढे सरकवून दिलें की आता वाजतील साडेचार," बंडू म्हणाला.

बाळाने त्याला चूप करण्याकरिता म्हटलें, "मूर्खाप्रमाणे काय बडबडतोस ? आम्हाला नको दाखवूस आपली प्रोफेसरी ऐट."

बोलतां बोलतां चार वाजले. गड्यांची वाटणी झाली. बाळाला सेनापति नेमून त्याच्या हाताखाली लढावयाचें असें त्याच्या पक्षाने ठरविलें.

बाळाच्या पक्षाकडे प्रथम हल्ला करण्याचें काम देण्यांत आलें. आपल्या पक्षाच्या चार तुकड्या करून बाळने एक तुकडी विष्णूच्या हाताखाली दिली, दुसरी गोपाळच्या हाताखाली, तिसरी मुकुदा नांवाच्या एका चपळ मुलाच्या हाताखाली दिली आणि चवथी आपल्या हाताखाली घेतली. बाकीच्या तिन्ही तुकड्यांना हल्ला करावयास सांगून, बाळ स्वत: एक कठीण चढण चढून आपल्या लहान तुकडीसह झेंड्याच्या रोखाने जाऊन लपून बसला. ठराविक अतरावर आल्याबरोबर तिन्ही तुकड्यांनी जयघोष करून ठरल्याप्रमाणे तीन बाजूनी निकराचा हल्ला केला. विरुद्ध पक्षांत गणेश, मधू, विनायक व रघू ही चौकडी होती. निशाणाच्या रक्षणाचें काम हे लोक ईर्षेने करीत होते. त्यांच्या मनांत बाळ, गोपाळ व विष्णू यांचा चागला समाचार घ्यावयाचा होता. त्या तिघाना गाठण्याच्या इराद्याने गणेश-कपू आपल्या पक्षाला जोर देत घुमत ह ता. तिन्ही बाजूने जोराचा हल्ला मुरू होताच रेटारेटी करीत पुढे घुसून विष्णूने निशाणाला हात घातला, पण गणेश व मधूने त्याला जोराने मागे खेचलें. त्याच वेळीं गोपाळ व मुकुदा याच्या तुकड्यानी भारी लगट केली. विरुद्ध बाजूचे लोक अगदी भांबावून गेले. विष्णूच्या हातून निशाण हिसकाविण्याकरता गणेश व मधू यांच्या मदतीला विनायक व रघू धावले. बाळही ऐनवेळी येऊन पोहोचला. त्याने जोराने लगट केली व एका झटक्यासरशी जमिनीत रोवलेलें निशाण हातांत घेतले व त्याच्या पक्षाचा विजय झाला.

यानंतर निशाणरक्षणाचे काम बाळाच्या पक्षाला करावें लागले. टेकडीच्या चाऱ्ही बाजूनी विरुद्ध पक्षाचे लोक हल्ला करूं लागले. बाळने एक अंतर ठरवून दिले होतें. त्या सीमेच्या आत होता होई तों विरुद्ध पक्षास न येऊं देण्याची बाळच्या पक्षाने शिकस्त केली. कोंडी फोडून एखादा मुलगा आंत आल्यास त्याला बाळ चढून आला होता त्या कठीण उतारावरून खाली ढकलून देण्यांत येई. तेथून सुटला की खाली पोहोचे-पर्यंत त्याला थांबतांच येत नसे. खाली पोहोचल्यावर दुसऱ्या बाजूने वर आल्याशिवाय त्याला खेळांत भाग घेतां येत नव्हते. विरुद्ध बाजूने निकराचा हल्ला चढविला व ते लोक आवरेनासे होऊन ठरलेल्या मर्या-देच्या आंत घुसूं लागले तेव्हा बाळने शिटी वाजवली. ताबडतोब निशाणा-

भोवती वर्तुळांचा तिहेरी फेरा घालून बाळाचा पक्ष निशाणाचें रक्षण करू लागला व वर्तुळाच्या त्या तिहेरी कोंडीस फोडून निशाण मिळविणें विरुद्ध पक्षास त्यांनी अशक्य करून टाकले. इतक्यात वेळ भरली व खेळ समाप्त झाला. गणेशकपू खजील झाला. निशाण उच फडफडवीत विष्णू आनंदाने मिरवू लागला. मास्तरनी पाच रुपये बाळाच्या हातांत दिले. बाळने स्वतःची कांही रक्कम त्यांत सामील केली. त्या रकमेची मिठाई आणून लहानमोठ्या सर्व मुलानी मोठ्या आनंदाने खाल्ली.

बाळ, गोपाळ व विष्णू याना गणेशकपूबद्दल वाटणारी भीति आता कमी झाली. त्या दुष्ट कंपूच्या समोरून बाळ, गोपाळ व विष्णू न भिता ऐटीने जात येत तेव्हा त्या लोकाच्या अंगाचा जळफळाट होत असे. ते सुडाच्या कल्पनेने प्रेरित होऊन योग्य सधीची मार्गप्रतिक्षा करू लागले.

# प्रकरण १२ वें

# बाळ वसतिगृहांत राहावयास गेला

जमीदारसाहेबांचें घराणे जुन्या तऱ्हेचें बाळबोध वळणाचे होते. त्याच्या घरी चहा पिणें किंवा बिस्किटासारखा बाजारचा तयार माल आणून खाणें वर्ज्य होते. पण नवीन विचाराची माणसेंमंडळी त्याच्या येथे कामानिमित्त नेहमी येत असे. त्या लोकाकरिता त्याच्या घरी चहा वगैरेची तयारी असे. अशी मडळी आली म्हणजे त्याच्याकरता चहा होत असे, तेव्हा प्रसंगाने बाळालाहि तो मिळत असे. विष्णू वसतिगृहात राहणारा; तेथे तो नेहमी चहा करून पीत असे. बाळाला पुष्कळ वेळां विष्णूकडे चहा घेण्याचा प्रसग येई. बाळकडे विष्णू आला की बाळ त्याच्याकरिता मुद्दाम चहा करावयास लावी.

शनिवारची गोष्ट. कमळपूरला सर्कस आली होती. कमळपूर जरी जिल्ह्याचे ठिकाण होते तरी ते एका जगली जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होते; व नागपूरपासून जरा आडमार्गालाच पडे, त्यामुळे नाटक कंपन्या व सर्कशीसारखे करमणुकीचे प्रकार तेथे सहसा येत नसत. जंगली जनावरें मिळाली तर पाहावी या हेतूने सर्कशी मात्र मधून मधून येत असत. अशाच हेतूने ही सर्कस तेथे आली होती. भपकेदार जाहिराती आठ दिवस अगोदरपासून लावल्या गेल्या होत्या. त्यांतील अपूर्व धाडसाच्या कामांची चित्रे पाहून आपणास सर्कस केव्हा पाहावयास मिळेल असे मुलांना झालें होतें. वसतिगृहांतील मुलाना शनिवारी व रविवारीच फक्त सर्कस पाहावयास जाण्याची मोकळीक मिळाली होती. म्हणून विष्णूबरोबर शनिवारीं सर्कशीला जावयाचें बाळ व गोपाळ यांनी ठरविले होते.

विष्णू सध्याकाळीच परवानगी घेऊन वसतिगृहांतून निघाला. बाळने विष्णू व गोपाळला आपल्याकडे जेवावयला बोलावले होतें. सर्कस साडेनऊ वाजतां सुरू व्हावयाची होती, पण हे गडी आठ वाजतांच जेवण आटोपून कपडे घालून तयार झाले. सर्कशीची जागा मुळीच दूर नव्हती, म्हणून

बाळाची आई लवकर निघण्यास तयार होईना. घड्याळ फारच सावकाश चालत आहे असें त्या मलांना वाटूं लागलें. 'घड्याळ बंद तर पडलें नाहीना ?' म्हणून त्या मुलांनी तीनतीनदा कानाला लावून पाहिलें. पुन्हा पाहतात तों सवा आठ वाजले होते. किती अवकाश आहे व सर्कशीच्या जागीं किती गर्दी झाली आहे, हें पाहण्याकरिता ते तिघेजण जरा बाहेर येऊन व्हरांड्यांत उभे राहिले. उत्सुकतेने येणाऱ्या अस्वस्थतेमुळे दुसरें कांही सुचेनासे होऊन विष्णूला चहा पिण्याची इच्छा झाली. आईला चहा मागावा तर स्वयपाकीणबाईने चहावर व्याख्यान झोडलें असते, पण मित्राची इच्छा अपूर्ण राहावी हेहि त्याला बरें वाटेना. विचार करीत तो देवघरांत येऊन उभा राहिला. चहाचे सामान व स्टोव्ह स्वयपाकघरांतच होता. बाळने सर्व सामान माडीवर नेऊन तेथे चहा करावयाचे ठरविलें. पण ही गोष्ट आईला कळूं नये अशी त्याची इच्छा होती. स्वयपाकघरांतून देवघरात व देवघरांतून माजघरांत जावे लागून मग माडीवर जावयाचा जिना होता. स्वयपाकीणबाई काम आटोपून हात धुण्याकरिता बाहेर गेली, तेवढ्यांत बाळाला एक युक्ति सुचली. त्याने डबे उघडून चहासाखरेच्या पुड्या करून खिशांत टाकल्या, कपबशा गोपाळ व विष्णूच्या खिशात कोंबल्या आणि गज व पाण्याचा तांब्या गोपाळजवळ व स्टोव्हसह दुधाचे भांडे विष्णूजवळ देऊन त्याना त्याने दाराशी उभे केलें. त्याला इतकी घाई झाली होती की त्या धडपडीत काही भांडा खणखणाट करीत खाली पडलीच. तेव्हा 'मांजरी फार लोचट आहे' असे म्हणून तिला हाकलण्याचा आव आणून बाळने ती वेळ मारून नेली. देवघरात जमीदारीणबाई पोथी वाचीत बसल्या होत्या; मांजर 'म्याव म्यांव' करीत व पजे चाटीत त्यांच्याजवळ जाऊन बसली. बाळहि सोबत्याना अंधार झाल्याबरोबर तडक जिन्याचा रस्ता धरण्यास बजावून आईजवळ जाऊन बसला व एकदम इतक्या जोराने शिंकला की समई विझून अंधार झाला आणि गोपाळ व विष्णू उड्या मारीत तडक माडीवर निघून गेले. समईजवळ काड्याची पेटी पडली होती; ती घेऊन बाळने समई लावली व आईला पोथी लवकर आटोपावयास सांगून तो माडीवर निघून गेला. स्टोव्ह भुर भुर जळूं लागून चहाचें भांडें स्टोव्हवर चढलें. इकडे स्वयंपाकीणबाई स्वयंपाकघरांत

येऊन पाहते तों जमिनीवर चहासाखर सांडली आहे. भांडी अस्ताव्यस्त पडली आहेत व दुधाचें फडताळ उघडें आहे; तेव्हा ती बाई 'कुणीं बाई नासधूस केली' म्हणून ओरडतच देवघरांत येऊन गुजराथी पाणक्याच्या कागाळ्या सागू लागली. 'मने किती लबाड आहेस ग तू,' असें म्हणत जमीदारीणबाईनी त्या मांजरीला चापटी लगावली व मांजरहि गुरगुर करीत त्याच्या हाताला अंग घासत इकडून तिकडे फिरूं लागली. स्वयंपाकीण बाईनेहि एकदम मोर्चा फिरविला. 'शर्त आहे बाई या मांजरीची' असे म्हणत ती सर्कशीला जाण्याची नयारी करूं लागली. जमीदारीणबाई पोथी सपवून उठल्या व मुलांना बोलावण्याकरिता माडीवर गेल्या. मुलें चहा नुकताच कपबशीत ओतून पिण्याच्या तयारीत होती. थोडचा वेळापूर्वी मुलांनी चालविलेल्या धडपडीचा जमीदारीणबाईना आता उलगडा झाला, व मुलानी केलेली युक्ति ध्यानात येऊन जमीदारीणबाईंना हसू येऊ लागलें. त्यानी ते पाहण्याकरिता स्वयपाकीणवाईला बोलावले. मुलाचे चहापिणे व तो पडलेला पसारा पाहून ती बाई म्हणू लागली, "चहा पिण्याची आता शर्त झाली बाई, मी नसता का चहा करून दिला." असे म्हणून तिने व्याख्यान झोडण्यास सुरवात केली. 'विष्णुसारखा तुम्हाला चहा करता येत नाही आजीबाई' बाळने आजीबाईला चिडविण्याच्या उद्देशाने उत्तर दिले. ते ऐकून ती बाई अधिकच क्षुब्ध झाली व आपल्या सुग्रणतेबद्दल व नवीन मुलाच्या ढगाबद्दल कितीतरी वेळ बडबडत राहिली.

वेळ होताच ते सर्व सर्कशीला गेले. सर्कशीतली धाडसाचीं व चपळाईची कामे, पहिलवानाचे अचाट सामर्थ्याचे खेळ, मस्कऱ्यांची गमत, जादूगाराचे चमत्कार, व शेवटी वाघचित्ते यांची भयप्रद कामें ही पाहतांना, भीति, आश्चर्य, विनोद, कौतुक, आनंद इत्यादि विकारांनी त्या मुलांची मने इतकी व्यग्र झाली होती की सर्कस झाल्यावर, 'ती फारच लवकर सपली आणखी कांही वेळ का नाही होत,' असें मनांत येऊन त्यांना तेथून पाय उचलणे जिवावर आल्यासारखें झालें. सर्कशीच्या कामाचे रसभरीत वर्णन करीत ते घरी आले. रस्त्याने स्वयंपाकीणबाईने त्यांनी चहा पिण्याकरिता केलेल्या हिकमतीची आठवण दिली. तुमची करामत कांही कमी नव्हती असा तिचा शेरा ऐकून त्यांना आनंदाने

हसूं लोटलें. ती रात्र त्यांनी मोठ्या आनंदांत घालविली. कितीतरी दिवस ते त्या दिवसाची आठवण विसरले नाहीत. काही दिवसपर्यंत तर सर्कशीतील कांही खेळाचे प्रयोग ते स्वतः करून पाहत असत.

गोपाळच्या वडिलांची बदली कमळपूरहून परीक्षेच्या चारपाच महिने आधी झाली होती. गोपाळला बरोबर न्यावें किंवा न न्यावे याची 'भवति न भवति' करून शेवटी गोपाळच्या वडिलानी त्याला कमळपूर येथें वसतिगृहांत ठेवावयाचे ठरविले. बाळालाहि स्वाभाविकपणे मित्रा-बरोबर वसतिगृहात राहण्याची इच्छा झाली. दोनचार दिवसानी जमीदारसाहेब कमळपूरी आल्यानतर हा विषय त्याच्यापुढे निघाला. हेड-मास्तर फार थोर आहेत, सर्व मुलावर ते पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करितात व नीट लक्ष ठेवतात म्हणून हेडमास्तरच्या परगावच्या मित्रानी आपलीं मुले मुद्दाम त्यांच्या हाताखाली ठेवली होती, ही गोष्ट जमीदारसाहेबांना माहीत होती. त्यांनी बाळाच्या मर्जीप्रमाणे हेडमास्तरांचा विचार घेऊन बाळाला वसतिगृहात राहण्यास रुकार दिला. हेडमास्तर व जमीदारसाहेब यांच्या बोलण्यात बाळामबधी त्याचा अभ्यास, व्यायाम, स्वभाव व वागणूक इत्यादिविषयी गोष्टी निघाल्या. बाळाबद्दल हेडमास्तराचें मत चांगलें आहे हें कळल्याने जमीदारसाहेबास समाधान वाटलें. बोलण्याच्या ओघात बाळाच्या हूडपणाचा उल्लेख आला होता. त्याच्या हूडपणामुळे वसतिगृहांत त्याला ठेवण्याला जमीदारसाहेबाचे मन एकदम तयार होईना. पण हेडमास्तरांनी बाळावर लक्ष ठेवण्याचे आश्वासन देऊन त्यांना अगदी निर्धास्त राहण्यास सांगितलें. हेडमास्तराच्या आश्वा-सनानें संतुष्ट होऊन त्यांचे आभार मानल्यावर जमीदारसाहेबांनी त्यांचा निरोप घेतला. बाळाच्या वसतिगृहांत राहण्यास जाण्याच्या आड जमीदारीण-बाई या वेळी आल्या नाहीत. जमीदारसाहेबांच्या हेडमास्तरांशी झालेल्या गोष्टी ऐकल्यामुळे व विशेषतः गोपाळ व विष्णू ही चांगली मुलें त्याच्या संगतीत होतीं म्हणून त्याना बरें वाटलें. जेवतांना बाळाच्या वसतिगृहांत राहावयास जाण्यासबंधी गोष्टी चालू होत्या. जमीदारसाहेब बाळाला म्हणाले, 'हेडमास्तर म्हणत होते तू आतांशा फार हूडपणा करतोस म्हणून' ते ऐकून स्वयंपाकीणबाईने सर्कस पाहावयास जाण्याच्या दिवशीं बाळाने चहा पिण्या-

करता केलेल्या युक्तीची गोष्ट काढली तेव्हा जमीदारीणबाईंनी कौतुकाने व हसत हसत ती सर्व हकीगत आपल्या पतीला सांगितली. जमीदारसाहेबांनाहि ती युक्ति ऐकून गमत वाटली. ' तूं चहा पिऊं लागलास वाटतें ' ते बाळाकडे वळून म्हणाले. बाळाची वसतिगृहांत रवानगी केल्यानंतर जमीदारसाहेब सपत्नीक आपल्या गावी निघून गेले.

विष्णूच्या खोलीतून निघून जाण्याची नारायणाची इच्छा होती. वर्षाच्या सुरुवातीसच त्याने सोबतीने अभ्यास करणाऱ्या मुलाच्या खोलीत जागा मागितली होती. बडू व त्रिंबक यानाहि बरोबर अभ्यास करणाऱ्या मुलाबरोबर राहण्यास मिळाले तर हवें होतें. बाळालाहि आपल्या मित्रांबरोबर राहावयास पाहिजे होतें. त्या सर्वांची सोय पाहून हेडमास्तरांनी त्यांचें म्हणणें मंजूर केलें. बाळ, गोपाळ व विष्णू यांना एकत्र राहावयास मिळाल्याने हार्दिक आनंद झाला. मनाप्रमाणे झाल्यामुळे त्यांच्या आनंदाला सीमा उरली नाही. त्यांच्या हसण्याखिदळण्याला, थट्टामस्करीला व खोड्यांना ऊत आला. तरी पण त्यांचा आनंदी व मोकळा स्वभाव, सरळ वृत्ति व सुशील वर्तन यांमुळे त्याच्या खोड्या इतर मुलांना प्रिय वाटत. बाळ, गोपाळ व विष्णू याना सर्व मुले चाहतात व वसतिगृहांत त्यांचें महत्त्व वाढत आहे या गोष्टीचें गणेश चौकडीला वैषम्य वाटू लागले. ते लोक मनांतल्या मनांत जळूं लागले होते, व त्या त्रिकुटाच्या मागे त्यांची निंदाहि करूं लागले होते.

पुस्तक साधारण आहे. कांहीं वर्णने
मात्र अगदीं ऐतिहासीक (इतिहासाशी संबंध नसतां
वाटतात पाल्हाळ फार आहे. मामुलीगो
फार व महत्व दिले आहे. भाषा बरी आहे.
[illegible]
[illegible]

## प्रकरण १३ वें

# विचित्र मुलगा

विष्णूच्या खोलीच्या उत्तरेस एकएकटे राहण्याकरता ज्या खोल्या होत्या त्यांपैकी पहिल्या खोलींत कोण राहतो, हे वसतिगृहात नवीन आलेल्या मुलाना बरेच दिवस कळत नसे. त्या खोलीचा दरवाजा बहुतेक बद असे. त्यामुळे नवीन आलेल्या मुलांना त्या खोलीत कोण असतो याबद्दल कांही दिवसपर्यंत कुतूहल राही. गणेश चौकडीपैकी एखाद्यास विचारल्यास तो त्या मुलांना त्या खोलीत वास्तव्य करणाऱ्यासबधाने विचित्र गोष्टी सांगून भेवडावीत असे. तेथे जादूगार राहतो व त्याचे जादूचे प्रयोग तेथे नेहमी चालू असतात हें ऐकून ती नवीन मुलें प्रथम साशक होत असत. विष्णू त्या खोलीच्या जवळ असल्यामुळे लहान मुले साहजिकच मग विष्णूला विचारीत. त्या खोलींत एक अत्यत हुशार मुलगा राहतो असें विष्णूने सांगितल्यानंतर त्या मुलांना त्या हुशार मुलाला पाहण्याची इच्छा उत्पन्न होऊन ते विष्णूच्या खोलीकडे त्या हुशार मुलाला पाहण्याच्या हेतूने येरझारा करीत. तो दृष्टीस पडला की त्याबद्दलचें कुतूहल कमी होऊन, त्यानतर मुलांचें तिकडे जाणेयेणे कमी होत असे व मग तिकडे कोणाचे फारसे लक्ष जात नसे. त्या खोलीत हेडमास्तर खुद्द कधीकधी बराच वेळ जाऊन बसत असत, त्यामुळे त्या खोलीतील मुलाबद्दल सर्वच मुलांना आदर वाटत असे. बंडू व नारायण विष्णूची खोली सोडून गेले, तेव्हा गणेश कंपूने अशी गप्प उठविली होती की, शेजारच्या जादुगाराला भिऊन ते दूरच्या खोलीत गेले. गणेशकपूने त्या खोलीला 'जादूची गुहा' व त्या खोलीच्या मालकाला 'गुहेंतील जादुगार' असें म्हणण्यास सुरुवात केली होती. ही त्यांची मस्करी ऐकून एखाद दुसऱ्या भित्र्या मुलाखेरीज सर्व मुलांनी त्या कंपूची कानउघाडणी केली.

त्या खोलींत राहणाऱ्या मुलाचें नांव वासुदेव होतें. तो वयाच्या मानाने फार उंच होता. त्याच्या इतका उंच मुलगा शाळेंत तर नव्हता,

इतकेंच काय पण, इतका उंच मनुष्य त्या गावांत नव्हता. उंचीप्रमाणे तो शरिराने धिप्पाड होता. त्याचें शरीरसामर्थ्यहि अचाट होतें. नदीला अफाट पूर असतां त्यांत तो बिनधोक उडी घाली. दोन दोन तास पाण्यांत राहणें किंवा मैल दीड मैल पोहत जाणें याचें त्याला कांहीच वाटत नसे. तीन चारशे जोर व बैठका काढणें त्याच्या खिसगणतीतहि नसे. त्याच्या धिप्पाड-पणामुळे त्याच्या बरोबरीची मुलें त्याला बलभीम म्हणत. वर्गात तो शांतच असे व मास्तरहि त्याला कठीण प्रश्नाखेरीज फारसें कांही विचारीत नसत. एरवी देखील कोणाशी फारसा बोलताना तो दिसत नसे. एखादा तास मध्ये सुट्टी असल्यास किंवा रिकामा वेळ सापडल्यास तो पुस्तका-लयाच्या एखाद्या कोपऱ्यात मोठमोठी पुस्तकें घेऊन वाचत बसलेला दिसे. तो इतकें काय वाचतो याचेच बाळाला आश्चर्य वाटत असे. कित्येक वेळां बाळाने ती पुस्तके चाळून पाहिली, तेव्हा क्रमिक पुस्तकांच्या बाहेरचीं इतिहास, भूगोल, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र इत्यादि शास्त्रावरील पुस्तकें बाळाला आढळून आली. निरनिराळ्या देशांचा इतिहास, भूवर्णनांतली देशदेशाची विविध माहिती व चालीरीतीचे वर्णन, भौगोलिक चमत्कार, आकाशातील तारकाची वर्णनें, समुद्रतळचे चमत्कार, एस्किमोचें वर्फाच्या घरांतील जीवन यासारखी विविध माहिती गोळा करण्यात वासुदेव गढलेला असे. बाळ, गोपाळ व विष्णू यांची वासुदेवाशीं साधारण ओळख झाल्यानतर त्याने दिलेल्या प्रोत्साहनाने ते त्याच्याकडे आताशा वारंवार जाऊं लागले होते. वासुदेवाबरोबर ते कधी बोलत बसत किंवा फिरावयास जात. तेव्हा तो त्यांना जगांतील अनेक चमत्कारिक गोष्टी सांगून त्याचे मनरजन करी; त्यामुळे त्याच्या सहवासांत राहणे त्यांना आवडू लागलें होतें. वासुदेवाबद्दल त्या तिघांना अर्थातच आदर वाटत असे, व त्याच्या ज्ञाना-विषयी तर त्याना अचबाच वाटत असे. वासुदेवालाहि ही सरळहृदयी मुलें फार आवडत असत. मनोरंजन करतां करतां त्यांना पुष्कळ माहिती देऊन ज्ञानप्राप्तीची हौस त्या तिन्ही मुलांमध्ये उत्पन्न करण्याचा तो प्रयत्न करीत असे.

बाळ प्रथम जेव्हा वासुदेवाच्या खोलीत गेला, त्या वेळी तर तो आश्चर्याने थक्कच झाला. वासुदेवाची खोली म्हणजे त्याला एक अजब

घरच वाटलें. बराच वेळ तो इकडे तिकडे पाहतच राहिला. तेथे अनेक प्रकारच्या वस्तू दिसत होत्या. समोर भिंतीवर चार नकाशे टांगले होते. त्यांपैकी एकांत निरनिराळ्या संशोधकांनी कोणकोणते प्रदेश केव्हा शोधून काढले तें दर्शविलें होतें, दुसऱ्या नकाशांत कोणत्या देशांत कशा तऱ्हेची राज्यव्यवस्था अमलांत आहे हें दाखविलें होतें; तिसऱ्या नकाशांत देशादेशांतील पाहण्यासारख्या चित्ताकर्षक गोष्टी दाखविल्या होत्या, व चवथ्या नकाशांत स्थल, तारीख व संशोधकाचें नांव यांसह अनेक शास्त्रीय शोध निर्दिष्ट केले होते. हे नकाशे वासुदेवाने स्वतः मोठ्या मेहनतीनें तयार केले होते. त्याच्या टेबलावर दोनचार चित्रांची पुस्तकें पडली होती. त्यांपैकी एकांत अनेक पशुपक्षी व जलचर प्राणी यांचीं चित्रें व वर्णनें होतीं, व दुसऱ्यांत निरनिराळ्या देशांतील लोकांचीं चित्रें व वर्णनें होती. तेथेच टेबलावर संस्कृत व मराठी साहित्यविषयक, तसेंच रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल, इतिहास इत्यादि शाळेंत चालणाऱ्या पुस्तकांव्यतिरिक्त अनेक पुस्तकांचा ढीग पडला होता; व त्या पुस्तकांतील पानें लाल, निळ्या पेन्सिलीच्या खुणांनी चित्रित केलेली दिसत होतीं. त्याच टेबलावर एक वह्यांचा ढीग पडला होता. वाचलेल्या पुस्तकांतील टिपणांनी त्या भरून गेल्या होत्या. खिडकीशीं एक दोन कुंड्या होत्या. त्यांत कांही वेल परीक्षणाकरितां लावलेले होते. दोन पिंजऱ्यांमध्ये विचित्र रंगांचे पक्षी ठेवले होते. त्यांची निगा राखण्यांत व त्यांना बोलणें शिकविण्यांत वासुदेवाचा बराच वेळ जाई. 'हे पहा माझे सोबती' असें म्हणून त्याने ते पक्षी बाळाला दाखविले, तेव्हा पक्ष्यांकडे लागलेल्या त्याच्या प्रेमळ दृष्टीत हर्षहि दिसून येत होता. मांजराचा त्रास होऊं नये म्हणून छपरांतून तारा सोडून त्या तारांना ते पिंजरे लटकावून दिले होते. खाली जमिनीवर काचेच्या झाकणाचें व वरच्या तोंडाचें एक कपाट होतें. त्यांत कप्प्या-कप्प्यांतून अनेक रंगांचीं फुलपाखरें टाचण्यांनी टोचून ठेवलीं होतीं. दुसऱ्या एका तशाच पेटींत निरनिराळ्या पक्ष्यांची अंडीं जपून ठेवली होतीं. एका कोपऱ्यांत एक बेडकाचा, एक सशाचा व एक बगळ्याचा असे तीन हाडाचे सापळे नीटनेटके लावून ठेवले होते. माणसाच्या हाडाचा सापळा फार किंमत पडते म्हणून तो आतापर्यंत घेऊं शकला नव्हता. पण तो

त्याने नुकताच मागविला होता म्हणून तो खुशीत होता; व तो रचून झाल्यावर बाळाला दाखवण्याचें त्यानें कबूल केलें. एका पेटीत निरनिराळ्या आकारांचे व रंगांचे गोळे ठेवले होते. तें काय असावे हें बाळाच्या लक्षांत आलें नाही व त्याने त्यासंबधी वासुदेवाजवळ पृच्छा केली. न बोलतां वासुदेवाने एक तक्ता जमिनीवर मांडला व म्हणाला, "पहा आता मी आभाळांतली सर्व ग्रहमाला या माझ्या खोलीत आणून दाखवितों." असें म्हणून, 'हा सूर्य, हा शनि' असें म्हणत सर्व ग्रहांचीं नांवें घेऊन सर्व गोळे त्याने त्या तक्त्यावर टोचून दिले. मगळाला लाल, त्याप्रमाणे इतर ग्रहांना त्याच्या त्याच्या वर्णनाप्रमाणे त्य.ने रंग दिले होते. ते नभोमंडळ पाहून बाळाचा वासुदेवाच्या हुशारीबद्दल वाटत असलेला आदर साहजिकच द्विगुणित झाला. नतर वासुदेवाने बाळाला निरनिराळ्या राजांची नाणी दाखविली, व त्या त्या राजाचा इतिहास सांगितला. हें सागत असता वासुदेवाचें सारे लक्ष त्या पिंजऱ्यांतील पाखरां-कडे लागले होतें. मधून मधून तो पाखरांना दाणापाणी देत असे व त्यांच्याशी लडिवाळपणें बोलत असे. ते बोलत असता एकदा पिंजऱ्यांतील पाखरानी पंख फडफडवले, तेव्हा वासुदेव कावराबावरा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला. तो बाळाकडे वळून म्हणाला (तेव्हा त्याला गहिवर आला होता) "यांपैकी एका पाखराला चार दिवसांपूर्वी मांजराने खाल्लें. मांजराच्या भीतीने हीं पाखरें अशींच मधून मधून चमकतात. सोबती मेल्यामुळे हा पहा कसा दुःखी दिसतो. या राहिलेल्या पाखरांना मांजरा-पासून कांही उपसर्ग पोहोचूं नये म्हणून परवा तारा आणून हे पिंजरे मी उंच अडकवून ठेवले आहेत." त्या दिवसापासून वासुदेवाच्या खोलीच्या आसपास मांजर दिसलें की तो सोडगा घेऊन त्याच्या मागे लागत असे, इतका त्याला मांजराचा राग आला होता.

वासुदेवाच्या खोलींत वर सांगितलेल्या वस्तूखेरीज आणखी पुष्कळ वस्तू होत्या. लोकांना त्यांचें कांहीच वाटत नव्हतें, पण वासुदेवाने त्या वस्तू फार मेहनतीने मिळविल्या होत्या. तेथे पुष्कळसे निरनिराळ्या रंगांचे दगडहि त्याने चिठ्ठ्या लावून ठेवले होते. अशा वस्तू मिळविण्याकरता तहान भूक विसरून जंगलांत तासाचे तास तो घालवीत असे व आसपास

दहावीस मैल पायी हिंडून, त्याला पाहिजे त्या वस्तू मिळवून आणीत असे. त्याबद्दल केलेल्या श्रमाची त्याला पर्वा वाटत नसे.

वासुदेवाची खोली वस्तूंनी इतकी भरून गेली होती की तेथे रिकामी अशी जागा मुळीच नव्हती म्हटलें तरी चालेल. खिळे मारून व तारा टांगून वस्तू ठेवण्याकरता त्याने जागा तयार केली होती. पुस्तकाच्या टेबला-शेजारी त्याने दुसरें टेबल ठेवलें होते. त्यावर पुष्कळ बाटल्या ठेवल्या होत्या. त्यातली द्रव्यें घेऊन त्याचे नेहमी कांही ना कांही प्रयोग चाललेले असत. त्याच्या खोलीतून नेहमी धूर व विचित्र तऱ्हेचे वास निघत असत त्यावरून वासुदेव कांही प्रयोग करीत आहे हे इतर मुलांना माहीत होऊन ते एकमेकांत 'वासुदेवाची जादुगिरी चालली असेल' अशी थट्टा करीत. अशा रीतीने कधी वाचत बसला असतां व कधी प्रयोग करण्याच्या वेळी गंधक वगैरेचा धूर काढीत बसला असता रात्रच्या रात्र वासुदेव जागून काढीत असे. एकदा असाच कांही प्रयोग करीत असतां वासुदेवाचा खल चालू होता. खलाचा आवाज चालू असतां मध्ये जोराचा धडाका झाला. तेव्हा पुष्कळशी मुलें घाबरून वासुदेवाच्या खोलीकडे धावली. हेडमास्तरहि घाईघाईने येऊन पोहोचले; पाहतात तो, वासुदेवाची खोली धुराने भरून गेली होती, त्या खोलीतील पक्षी किलकिलाट करून पंख फडफडवीत होते, व वासुदेवाने पाळलेली खार व मुंगुस धूम खोलीबाहेर धावत होते. खोलीच्या मध्यभागी खल खाली पडला होता व वासुदेव समोर उभा असून त्याचे हात व कपडे काळे झाले होते. हें दृश्य पाहून मास्तरांना विस्मय वाटला. चवेकशीअंती वासुदेवाला काही इजा झाली नाही असें कळलें तेव्हा त्यांचा जीव खाली पडला. असे धोक्याचे प्रयोग सहसा न करण्याची ताकीद देऊन हेडमास्तर तेथून निघून गेले.

## प्रकरण १४ वें

# चटोर चौकडीचे चाळे

मागे एका प्रकरणांत सांगितले आहे की कमळपूरच्या हायस्कूलच्या वसतिगृहांत वाईट व दुष्ट मुलाचा एक कंपू होता. त्या कंपूचा गणेश मुख्य होता व त्याचे सार्थीदार मधू, विनायक व रघू हे होते. अभ्यासांत हे यथा तथाच होते ! मास्तरानी घरून करून आणावयास सांगितलेला अभ्यास किंवा लेखन हे कधीच करावयाचे नाही, व सर्व वेळ यांनी उनाडक्यांत घालवावयाचा. नतर हुशार पण गरीब स्वभावाच्या मुलाकडून त्याची वही मागून घेऊन त्यावरून नक्कल करून घ्यावी हा त्याचा परिपाठ असे. त्या मुलाने आपली वही दाखविण्यास का कू केली की ती दुष्ट मुले त्याला दटावीत व मारण्याचा धाक घालून त्याची वही मागून घेत. तोहि मुलगा ब्याद टाळण्याच्या हेतूने किंवा भीतीने गुपचुप त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागत असे.

या कपूच्या हातून चागले काम सहसा होत नसे. केव्हाहि दुष्टपणाचें काम शोधण्यात किंवा द्वाडपणा करण्यात ते गढून गेलेले असत. असल्या त्यांच्या कामात त्याच्यासारखी इतर एकदोन मुलें त्यांना सामील होतीं. त्यांपैकी दिग नावाचा एक मुलगा अगदीच हलकट व बिलदर होता. या कंपूचे खेळण्याचे पत्ते जुने झाले होते, तेव्हा नवीन पत्ते मिळवून आणण्याचे काम दिगूकडे सोपविण्यात आले. दिगूच्या घराजवळ मगळबाग नावाचें एक दुकान होते, त्यात सर्व तऱ्हेच्या वस्तू विकत मिळत असत. दिगू दुकानांत गेला व त्याने पत्ते मागितले. नोकराने पत्त्याचे चारपांच जोड दिगूपुढे टाकले. दिगू शेजारी राहणारा असल्यामुळे त्याची दुकानदाराशीं ओळख असून तो तेथे जात येत असे. त्या नोकराचें लक्ष दुसरीकडे आहे असें पाहून दिगूने पाहतां पाहता एक जोड खिशांत टाकला, व पत्ते चांगले नाहीत अशा सबबीवर 'नको' असे सांगून तो निघून गेला. आपल्या कंपूत आल्यावर तो आपला पराक्रम वर्णन करून सांगू लागला. त्या वेळीं

त्या कंपूंत एकहि असा मुलगा निघाला नाही की, जो या उघड चोरी-बद्दल दिगूची कानउघाडणी करील. उलट ते सर्व दिगूच्या कौशल्याची तारीफ करूं लागले. काच्याहि ध्यानांत आलें नाही की यामुळे आपण दिगूचें किती तरी नुकसान करीत आहोंत. या पापाचरणाबद्दल एकालाहि तीळमात्र वाईट वाटल्याचें दिसून आलें नाही. या प्रोत्साहनामुळे उनाड म्हणवून घेण्यांत दिगूला गमत वाटूं लागून, तो दिवसेदिवस मूर्खाप्रमाणे वागूं लागला—नव्हे त्यांत त्याला धन्यता वाटू लागली. एकदा तो विश्रांति-गृहांत गेला होता. दुकानदाराने उधार देण्याचें नाकारले, तेव्हा या स्वारीला राग आला. 'नगदी लाव' असें म्हणून दिगू आपल्या मित्रासह दालनांतील एका टेबलाशी जाऊन बसला. ते टेबल एका खिडकीजवळ होतें. आंतल्या बाजूला असलेले खाण्याचे पदार्थ खिडकीतून दिसत होते. खिडकीच्या गजांतून हात घालून ते काढून घेता येण्यासारखे होते. दिगूच्या खोडसाळपणाच्या सहज प्रवृत्तीला डवचणी मिळाली होती. त्याने मनात कांही निश्चय केला व मिष्कीलपणाने पाहात त्याने नोकराला एकदम पुष्कळसे पदार्थ आणण्याचा हुकूम सोडला. नोकर पदार्थ आणण्याकरता पुढच्या दालनांत गेला, तेव्हा दिगूने आपल्या हातातील वेताची काठी आंतल्या खोलींत असलेल्या श्रीखडाच्या भांड्यात बुडविली व तीवर आलेलें श्रीखड त्याने गट्ट करून टाकलें. नतर त्याने पेढ्याच्या ताटांतले पेढे घेऊन आपल्या मित्रात वाटून दिले. बराच वेळ हा क्रम चालू ठेवल्या-नंतर दुकानदाराची चांगली खोड मोडली अशी फुशारकी मारीत तीं मुलें दुकानांतून बाहेर पडलीं. त्यांच्या हासण्याखिदळण्याला फारच ऊत आला होता, पण त्या मुलांचा टारगटपणा नेहमीच चालत असे, म्हणून दुकान-दाराला कसलाहि सशय आला नाही. आताशा त्याचा स्वभाव इतका व्रात्य होत चालला होता की, मित्रांना हसविण्याकरिता रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्यांची टवाळी करण्यात त्याला मौज वाटत होती. एकदा एक गवळी दुधाने भरलेली चरवी घेऊन चालला होता. पावसामुळे रस्त्यावर चिखल झाला होता. दिगूने जातां जातां त्या गवळ्याला टांग मारली व जणूं काय तो लंगडा आहे असें भासविण्याकरिता एक टांग वाकडी फेकीत लंगडत चालत राहिला. टांग लागल्यामुळे गवळ्याचा पाय घसरला, त्याची

दुधाची चरवी हातांतून सुटली व खाली पडून त्यातलें दूध सांडलें. गवळयाने दिगूकडे पाहिलें तों दिगू एक पाय फरपटत लगडत चाललेला दिसला. त्याने बतावणी इतकी हुबेहूब केली की गवळयाला वाटलें तो लंगडा आहे. गवळी चडफडत निघून गेला.

मागे बाराव्या प्रकरणात सांगितलें आहे की कमळपूरला सर्कस आली होती. ती जवळ जवळ आठ दिवस तेथे मुक्काम करून राहिली होती. पहिल्याच दिवशी गणेश, मधू, विनायक व रघू ही चौकडी मास्तरांना विचारून सर्कशीला गेली होती. बराच वेळ आधी जाऊन बसल्यामुळे ते कंटाळले. सर्कस सुरू होण्यास अवकाश होता म्हणून जरा भटकून येण्याच्या उद्देशाने ते बाहेर आले. आत जाण्याच्या वेळी बाहेर जातांना दिलेला तेवढा पास परत घेतला. पहिलें तिकीट त्यांच्यापाशीच राहिलें. आंत आल्यावर मधूला एक युक्ति सुचली. त्याने आपल्या मित्रांची तिकिटे गोळा केली व तो बाहेर आला. दिगू व त्याचे आणखी दोन दोस्त बाहेर उभे होते. त्यानी पैसे आणले नव्हते, पण तेथे आल्यावर त्यांनाहि सर्कस पाहण्याची इच्छा झाली. मधूने त्या प्रत्येकाला एक एक तिकीट दिलें व तो त्यांना आत घेऊन गेला. मधूच्या युक्तीमुळे त्यांच्या तीन मित्राना सर्कस फुकट पाहण्यास मिळाली. दुसऱ्या दिवशी चौकडीतले चारी वीर शाळेत फुशारकी मारू लागले की सर्कसवाले आमचे दोस्त आहेत व तिकीटे विकत न घेता आम्हाला फुकट सर्कस पाहावयास मिळते. एक ना दोन अशा अनेक बाता शाळेंतील मुलाजवळ ते चौघेजण मारूं लागले. काही मुलांना त्यांचे म्हणणें खरें वाटून त्यांच्या मदतीने आपल्याला फुकट खेळ पाहावयास मिळाल्यास चांगले, या भावनेने ती मुले त्या चौघांची मनधरणी करूं लागली. गणेशकपूला सर्व मुलाना खूष करून आपल्याकडे ओढून घेण्यास ही संधि बरी आहे असे वाटलें.

त्या कपूच्या मनांत बाळ, विष्णू व गोपाळ यांच्याविषयी पराकाष्ठेचा द्वेष भरला होता व त्यांच्यावर सूड घेण्यास मिळावा म्हणून ते टपून बसलेले होते. एकदा ती शिकार त्याच्या हातून सुटून गेल्याबद्दल त्यांच्या मनांत आढी पडलेली होती. विष्णूच्या खोलीचें दार बंद नसतें तर त्याच दिवशीं गणेशकंपूने त्या तिघांचा चांगला समाचार घेतला असता.. पाणी

पिण्याची सुट्टी होऊन सर्वच मुले आली व त्यांचा बेत फसला. विष्णूच्या खोलीचीं दोन तावदानें त्या दिवशी फुटली होती. हेडमास्तरांनी चौकशी केली, पण प्रथम काच कशी फुटली याचा पत्ता लागला नाही. विष्णूला विचारलें तेव्हा त्याने कानावर हात ठेवला व काच कशी फुटली ते मला माहीत नाही असें सांगितले. वाईट म्हणा किंवा चांगली म्हणा पण वसतिगृहांत अशी चाल पडून गेली होती की कोणी कोणाची चुगली खाऊं नये. एखादा मुलगा चुगली खाणारा सापडला तर त्याला इतर मुले बोलबोलून सतावून सोडीत. चुगलखोराबद्दल सहानुभूति मोठ्या मुलाना नसे. उलट चुगलखोरालाच शासन करण्यास ते उद्युक्त असत. विष्णू हा धीट व प्रामाणिक मुलगा होता ; तो कांही गणेशकपूला भीक घालणारा नव्हता; तरी पण वसतिगृहाच्या रिवाजाबाहेर जाऊन चुगली खाणे त्याच्या स्वभावाला शोभणारें नव्हतें. गणेशकपूशी आपले भांडण आहे किंवा त्यांनी दगड फेकल्यामुळे तावदान फुटलें, याचा पत्ता विष्णूने हेडमास्तरांना लागू दिला नाही. गणेशकंपूला वसतिगृहाच्या मागून येतांना पाहिल्याचें चपराशाने सांगितल्यावरून त्या गोष्टीचा पत्ता लागला होता. वसतिगृहाच्या मागच्या बाजूस गेल्याचें त्यांना नाकारतां येईना, तेव्हा आम्ही विटीदांडू खेळत होतों; त्या वेळी गिल्ली लागली असावी इतकें गणेशकपूने कबूल केले विष्णूनेंहि त्यांची विटी लागली असेल कदाचित् असें म्हणून वेळ मारून नेली. त्यानंतर गणेशकपूला तावदानाची किंमत भरून द्यावी लागली विष्णूने चुगली खाल्ली असा त्यांनी गिल्ला करून पाहिला. पण त्याच्याकडे कोणींच लक्ष पुरवलें नाही, कारण सर्वांना माहीत होते की, खेळतांना गिल्ली लागल्याचे गणेशकपूने कबूल केलें होतें.

गणेशकंपूला इतर मुलांची मने आपणाकडे वळवून घेण्याकरिता सर्कशीच्या रूपाने चांगली संधि फुकटाफाकट मिळाली होती. त्यांनी या संधीचा उपयोग करून घेतला. दररोज तीन मुलांना याप्रमाणे बऱ्याच मुलांना त्यांनी सर्कस फुकट दाखविली होती. ती मुलें सर्कस दाखविल्यामुळे खूष आहेत असें पाहून गणेशकंपूने बाळ, गोपाळ व विष्णू यांच्या कागाळ्या सांगून व निंदा करून त्यांची सोबत न करण्याविषयी त्या मुलांना सांगावें व म्हणावें, 'ते तिघे लुच्चे आहेत. झेंड्याच्या खेळांत

खोटेपणा करून बाळाने डाव जिंकला. तुम्ही त्या तिघांची दोस्ती करूं नका.'

रोजच्या रोज हेडमास्तरापासून सर्कशीस जाण्याची परवानगी गणेश-कपूला मिळणें शक्य नव्हते. पण या लुच्च्यांनी, मास्तरांना कळणार नाही अशा रीतीने, परवानगी न घेतां सर्कस पाहण्याची बिलदर युक्ति शोधून काढली. वसतिगृह बंद झाल्यावर आपल्या खोलीतला दिवा विझवून निजल्याचा बहाणा या मुलानी करावा वसतिगृहाचा चपराशी फार देव-भोळा माणूस होता त्याला यानी सांगावे की देवळांत सप्ताह आहे तेथे आम्ही जातो परत आल्यावर प्रसाद म्हणून विकत घेतलेले बत्तासे ते त्याला देत. त्याची बतावणी रखवालदाराला खरी वाटून तो त्या मुलांना रात्रीच्या वेळीं बिनबोभाट बाहेर जाऊ देत असे अशा रीतीने आपण सर्क-शीला जात असल्याचा मागमूस त्यानी मास्तरांना लागू दिला नाही.

गणेशकंपूचा दामू नावाचा एक मित्र होता. त्याचा बाप आंधळा होता. घरी बाप व मुलगा याशिवाय तिसरे माणूस नव्हतें. बापाला दहा रुपये पेन्शन मिळत होते. त्यावर दोघाचा चरितार्थ चालत असे. दामू आपल्या आंधळ्या बापाची सेवाचाकरी मनापासून करीत असे. स्वयपाक करणे, धोतरे व भांडीं धुणे, बापाचा हात धरून नेऊन त्याला स्नान घालणे, ही सर्व कामे तो करीत असे. बापाच्या आंधळेपणामुळे दामूला थोडा त्रास होत असे; शाळा व बाजारहाटाकरता बाहेर जाईल तेवढाच; बाकीचा वेळ तो घरीच डांबून असे. त्याला गणेश कपूने सर्कस दाखविण्याचे ठरविले बापाला एकटे टाकून दामूला जावेसे वाटेना, पण सर्कस पाहण्याची इच्छा तर होतीच. गणेशकंपूने आग्रह केल्यामुळे व फुकट सर्कस दाखविण्याची लालूच दाख-विल्यामुळे सर्कशीला जाण्याचा मोह दामू आवरूं शकला नाही, व त्याच्या वयाकडे व स्थितीकडे पाहतां त्यांत नवल नाही. दामूचा आंधळा बाप निजला असें पाहून गणेशने खूप आग्रह केला व त्या आग्रहाला बळी पडून दामू शेवटीं निघालाच. त्याने सर्कस पाहिली नव्हती. त्यामुळे त्याला किती तरी गंमत वाटली. मधूनच आंधळ्या बापाची आठवण झाली की त्याला कसें-सेंच होई व बापाला टाकून आल्याबद्दल वाईट वाटूं लागे. मध्येच उठून जावें असें त्याला कितीदा तरी वाटलें. पण हा खेळ झाल्यावर जाईन,

तो खेळ झाल्यावर जाईन, असें करतां करतां शेवटपर्यंत तो तेथे बसला. घरीं म्हातारा बाप एकटाच होता. दामूने शेजारच्या प्रभाकराला गुपचुप आपल्या घरीं जाऊन निजण्यास सांगितले होतें. पण तो तेथे जाण्यापूर्वीच म्हातारा जागा होऊन त्याने मुलाला हाक मारली, मुलाने ओ दिली नाही म्हणून त्यानें चाचपडत जाऊन आंथरुणावर पाहिलें तों दामू नाही. म्हाताऱ्याने दामूला मोठ्याने हाक मारण्यास सुरुवात केली. शेजारच्या प्रभाकराला कळून चुकलें की आता ही गोष्ट लपवितां येणार नाही. तेव्हा त्याने दामू सर्कशीला गेल्याचें सांगितलें. म्हाताऱ्याला फार दु:ख झालें. "दामू मला एकट्याला टाकून गेलास ना? मला विचारलेहि नाहीस. वाईट मुलांच्या संगतीला तर तूं लागला नाहीस?" अशा रीतीने मधून मधून दु:खोद्गार म्हाताऱ्याच्या तोंडून ऐकूं येत होते. परत आल्यावर दामूने ते शब्द ऐकले. बापाला झालेले क्लेश पाहून दामूला रडू कोसळलें. त्याने बापाची क्षमा मागितली व पुन्हा बापाला एकटे टाकून न जाण्याचे व वाईट मुलांच्या संगतींत न राहण्याचें त्याने बापाला वचन दिलें.

गणेशकंपूला आम्ही फार धीट आहोत याची घमेंड होती. मास्तरांना आम्ही भीत नाही असें लहान मुलाना दाखविण्यांत त्याना प्रतिष्ठा वाटत असे. असें सांगण्याने लहान मुलांवर आपला वचक बसतो असा त्यांचा समज होता. या बढाईखोरपणामुळे मधूची एकदा चागलीच फजीति झाली. मधू शरिराने कृश व वयाच्या मानानें ठेंगणा होता. त्याला थोडी थोडी मिसरूडही फुटूं लागली होती. प्रथम गमतीने मुलें त्याला आजोबा म्हणूं लागली. पण पुढे तें त्याचें टोपणनांवच पडून गेले.

भूगोलाचे मास्तर कांही दिवसांकरता सुट्टीवर गेले होते व त्यांच्या जागीं तात्पुरते एक मास्तर भरती करण्यांत आले होते. त्यांचें नांव पुरखे होतें. ते शरिराने स्थूल व उंच होते व त्यांचें रूप पाहून मुलांनी 'अगडबंब' ही पदवी त्यांना बहाल केली होती. 'वूड'चा भूगोल त्या वेळीं शिकविण्यांत येत असे. भूगोल शिकविण्यासबधी या मास्तरांच्या कांही विशिष्ट कल्पना असाव्या. भूगोलाच्या पुस्तकांतील अक्षर ना अक्षर मुलांना पाठ असावें व डोळे झाकूनहि मुलांना नकाशावर विचारलेलें ठिकाण दाखवितां यावें ही त्यांची महत्त्वाकांक्षा असे, आणि त्याप्रमाणे मुलांना

तयार करीन असा त्यांचा अट्टहास होता. भूगोलाचें पुस्तक शब्दकोशा प्रमाणे बारीक टाइपांत छापलेले होतें. त्यांतील बारापंधरा पाने तोंडपाठ करून येण्यास मुलांना ते सांगू लागले. पहिल्याच दिवशी मुलांना हा प्रयोग कठीण वाटला. धडा पाठ नाही म्हणून प्राय: सर्वच मुलांना छडीचा प्रसाद मिळाला. दुसऱ्या दिवशी मार चुकवावा म्हणून कांही मुलांनी इतर अभ्यास मागे टाकून भूगोल पाठ करण्याचा प्रयोग करून पाहिला. पण त्यामुळे फायदा न होता उलट दुहेरी नुकसान मात्र झाले–इतर अभ्यास न झाल्यामुळे त्या त्या मास्तरांचे बोलणे ऐकावें लागलें व मार चुकला नाही तो नाहीच. अशा रीतीने दोन आठवडे गेले. मुलांना कांही सुचेना. मधूने बंड करण्याचें ठरवून त्या बडाचें पुढारीपण पतकरलें. पण मांजराच्या गळयांत घाट कोणी बांधावी हें उदराच्या सभेंत ज्याप्रमाणे ठरेना, त्या-प्रमाणे ‘मारत्याचा हात धरवतो, पण बोलणाराचे तोंड धरवत नाही,’ ही म्हण पूर्व भागापुरती तरी खोटी ठरण्यासारखा तो प्रसंग होता. आम्ही भूगोल अशा रीतीने पाठ करू शकत नाही असे सर्वांनी एकदम सांगावें अशी मधूने सूचना केली; पण प्रत्यक्ष वर्गांत गेल्यावर प्रत्येकाच्या डोळयां-पुढे काजवे चमकूं लागून जीभ टाळूला चिकटली व कोणाच्याहि मुखां-तून शब्द बाहेर निघाला नाही. वर्गांतून बाहेर आल्यावर मधू सर्वांना टाकून बोलला व भित्रेपणाबद्दल त्याची त्याने निंदा केली. उद्या आपणच या गोष्टीचा सोक्षमोक्ष करणार असें मधूने मुलांना निक्षून सांगितले. दुसऱ्या दिवशी भूगोलाचा तास सुरू झाला. आपली तऱ्हा नवीन आहे, म्हणून मुलांना जमत नाही; आणखी नेटाने प्रयत्न केल्यास रोज दहा-पंधरा पानें मुलांना सहज पाठ करतां येतील असें मास्तरांना वाटत असावें. त्या दिवशी कोणीच धडा पाठ करून आला नसल्यामुळे प्रथम सर्वांनाच उभें करण्यांत आलें. थोडा वेळ पाठ करण्याकरता देण्यांत आला. तरी मुले चुकूं लागलीं, तेव्हा मास्तरांनी एकेकाची हाजरी घ्यावयास सुरुवात केली. प्रत्येकाला वाटत होतें की, एखादा तरी हिंमतबहाद्दर निघेल व मास्तरांना साफ सांगेल की, अशा रीतीने पाठ करणें अशक्य आहे. पण प्रत्येक वेळीं सर्वांची आशा व्यर्थ जाऊन वर्गावर पसरलेली निराशेची छाया वाढत गेली. मधू-आजोबा जिकडून पाळी होऊन गेली आहे व त्या दिवशीं पाळी

येण्याचा संभव कमी अशा ठिकाणीं बसत असत; त्यामुळे त्यांचा मार पुष्कळ वेळां चुकत असे, व त्यांना फुशारक्या माराव्रयास मिळत की, मी मास्तरांचा मार कधीच खाणार नाही. मुलांनाहि चुटपुट लागून राहिली होती की, मास्तरांची या वीराशी केव्हा गाठ पडते. कर्मधर्मसंयोगाने मुलांचा समाचार घेत मास्तर आजोबापुढे जाऊन उभे राहिले. आजोबांना धडा पाठ येत नव्हताच. मास्तरांनी मारण्याकरिता छडी वर उचलली. सर्व मुलें माना उच करून, कान टवकारून, व डोळे वटारून आता काय होणार अशा उत्सुकतेने पाहू लागली. "मास्तर मी तुम्हाला मारू देणार नाही" आजोबा उद्गारले. मास्तरांनी त्याच्याकडे प्रथम तुच्छतेने पाहिले, नंतर रागाने आजोबांना मानगुटीला धरून वर उचललें व 'काय म्हणता मारू देणार नाही?' असें म्हणत सपासप आठदहा छड्या लगावल्या, आजोबा धाडकन जमिनीवर पडले.

हा प्रकार हेडमास्तराना कळला असावा असा मुलांचा पक्का भरवसा होता; ते मास्तर दुसऱ्या दिवसापासून मारेनासे झाले. लवकरच दुसरें कांही काम मिळाल्याच्या सबबीवर ते शाळा सोडून गेले. त्या दिवसापासून शाळेत छड्या मारणे बंद झाले; छडीची शिक्षा देणें जरूरच पडलें तर तें काम हेडमास्तर स्वत: करीत असत.

## प्रकरण १५ वें

# चोरी की अजाणपणा

मागे आठव्या प्रकरणांत सांगितलें आहे की वसतिगृहाच्या पूर्वेस पटांगणाच्या पलीकडे एक ओढा होता व त्या ओढ्याच्या पलीकडे एक बगीचा होता. ओढा शेजारच्या डोंगरातल्या जिवत झऱ्यांतून निघाला होता. तो ओढा लहान असून जवळच नदीला मिळाला होता. उन्हाळ्यांतही त्यात झुळझुळ पाणी वाहत असे, व जन्मतः औदार्य अंगी असलेल्या पण क्षीणवित्त झालेल्या एखाद्या श्रीमानाच्याप्रमाणे तो पांथस्थाची तृषा हरण करीत असे. पावसाळ्यात मात्र लहरी श्रीमंताच्या वृत्तीप्रमाणे त्याच्या वृत्तीमध्ये पालट होई व ज्याप्रमाणे लहरी श्रीमंत आपल्या अलोट संपत्तीची धूळधाण करतो त्याप्रमाणे तो ओढा पावसाळी पूर येतांच गर्वाने फुगून जाऊन आपले विमल जीवन गढूळ करून टाकी.

आषाढापासून कार्तिकमार्गशीर्षांपर्यंत ओढ्यात बरेच पाणी राहत असल्यामुळे इकडून तिकडे जाण्यायेण्याला लाकडाचा एक तात्पुरता पूल गावकरी तयार करीत असत. ओढ्यापलीकडची बाग कमळपूरच्या एका श्रीमान् गृहस्थाची होती. त्यांना बगिचाचा फार शोक होता व त्याकरता त्यांनी पुष्कळ खर्च केला होता. त्या बागेची रचना चित्ताकर्षक होती, व तीत अनेक प्रकारची फुले, भाज्या व फळफळावळ यांची झाडें त्यांनी लावली होती. फुलांच्या सुवासाने व सुन्दर दृश्याने मन आकर्षिलें जाई व फुरसतीच्या वेळी मुलांचे पाय साहजिक तिकडे वळत असत. बागेचे मालक सहृदय होते. ते म्हणत "फुलामुलांच्या सहवासाने बाग कशी खुलून दिसते. फुलाचा सुवास व मुलाचे हास्य चहूकडे घुमूं लागलें की स्वर्गसुखाहून श्रेष्ठ सुख मला प्राप्त होतें." ते श्रीमान् गृहस्थ रोज नेमाने सकाळसंध्याकाळ बगिचांत येऊन देखरेख करीत असत. सिद्ध आंब्यांचीं कलमे आणवून आमराई व जबलपूरकडून पेरूंचीं कलमें आणवून त्यांनी पेरूची बाग तयार केली होती. संध्याबद्दल तर ह्या

प्रांत प्रसिद्धच आहे. रामफळ, सीताफळ, केळी, फणस वगैरे तऱ्हेतऱ्हेचीं झाडें त्या बागेंत होतीं. दोन मोठ्या विहिरींवर चारचार मोटा चालवून पाटाने बागेत जिकडे तिकडे पाणी खेळविलें होतें. बाळ, गोपाळ व विष्णू कधी कधी त्या बागेंत फिरावयास जात असत.

त्या बगिच्यांतील पेरूचा बाग अगदी ओढचालगतच होता. त्या ठिकाणीं ओढा अरुंद असून त्याच्या किनाऱ्याच्या दरडी उंच होत्या. त्या बाजूने जनावरें येण्याची भीति नसल्यामुळे कुंपण फारसें मजबूत नव्हतें. शाळेतील कांही मुलांनी त्या बाजूला रस्ता पाडून न कळत बागेत जाऊन पेरू खाणें सुरू केलें. बाळ आपल्या दोघा मित्रांसह ओढयाच्या काठाने फिरत असतां त्यांच्या वर्गातील कांही मुलें मोठे पेरू खात येतांना त्यांना दिसलीं. पेरू कोठून आणले असें त्या मुलांना विष्णूने विचारतां, त्यांनी त्या बागेकडे बोट दाखविले.

"कोण देतो पेरू तेथे ?" गोपाळने विचारले.

"कशाला कोणी द्यायला पाहिजे ? आपणच तोडावे म्हणजे झालें," त्या मुलांपैकी एकजण म्हणाला.

"पण कोणी रागावणार बिगावणार नाही ना ? विष्णू म्हणाला.

"कोण रागावतो, आम्ही नाही का आणले ? " पेरू खात त्या मुलाने पुन्हा उत्तर दिलें.

चांगले पेरू दिसल्यामुळे आपण काय करीत आहोत याचें भान न राहून ते तिघेही पेरूच्या बगिच्याकडे धावले. चार काठ्या बांधून उभा केलेल्या त्या हालत्या पुलावरून पलीकडे जाऊन नाल्याच्या काठाने ते त्या पेरूच्या बागेशीं पोहोचले. एक चांगलें झाड पाहून त्यावर ते तिघेजण चढले. चांगले चांगले पेरू खावयास मिळाल्यामुळे त्यांना फार आनंद झाला. पेरू खाण्याच्या आनंदांत त्यांनी झाड खदखदा हालवलें आणि नाचण्याकुदण्यास व गाण्या-ओरडण्यास सुरवात केली. वानरें आली असतील असें वाटून बागवानाने त्यांना भिवविण्याकरता प्रथम टिनाचें डबडें फडफड वाजविलें. त्या मुलांचें तिकडे लक्ष कशाला जातें! शेवटीं बागवान हातांत सोटा घेऊन व कुत्र्याला छू छू करीत तेथें आला. त्याचा कुत्रा त्या झाडाखाली येऊन उभा राहिला व जोराने भुंकं लागला. त्या कुत्र्याचें भोकणें व बाग-

वानाचें ओरडणें ऐकून ते 'तीन शिलेदार' भानावर आले. एखादा आळ यांच्यावर आला नाही असा एखादा आठवडा जात असेल किंवा नाही याची शकाच आहे. गणेश चतुर्थीचा चंद्र यांना वर्षभर दिसत असल्यास न कळे. चोराला जशी चांदण्याची भीति तशी खोडीच्या आळाची भीति त्याना आताशा वाटूं लागली होती. बागवानाने त्यांना पकडून हेडमास्तरांकडे नेण्याचा धाक घातला, तेव्हा त्या मुलांची पांचावर धारण बसली.

कधी कधी मुले येऊन चोरून पेरू खातात हे बागवानाच्या ध्यानात आले होतें, व त्या चोरी करणाऱ्या मुलांना पकडण्याकरता तो टपून होता. बागवानाला येतांना पाहून एक दोन वेळा मुले त्याला चुकवून पळून गेली होती. म्हणून त्या मुलांपैकी कोणाला तरी पकडून एकदा चांगली अद्दल घडवावी म्हणजे ती पुन्हा इकडे येणार नाहीत असे त्याच्या मनाने घेतलें. ही मुले हातीं सापडल्यामुळे त्याला मोटा आनद झाला होता. तो म्हणाला, " बोला रावसाहेब! मला चुकवून रोज पळून जात होते नाही? आता सापडले की नाही माझ्या हातात. चला आता मास्तरपाशी म्हणजे पेरूवाणी गोड छडीचा मार तुमच्या हातावर मिळतो कसा तो पहा! चोरी करतां नाही?" चोरीचे नांव ऐकून त्या मुलांना राग आला. चोरीची कल्पना त्यांच्या मनाला कधीच शिवली नव्हती. आपण करीत असलेल्या कृत्याला लोक चोरी म्हणतील असें त्यांच्या लक्षांत आले असतें तर त्यांना अत्यत खेद झाला असता व ते त्या कामापासून परावृत्त झाले असते. बागवानाशीं दोन हात करावे व त्याला सपाटा दाखवावा असें रागाच्या भरांत त्यांच्या मनांत आले. पण त्याचा तो भयंकर कुत्रा त्याच्या बरोबर होता; त्याची त्या मुलांना भीति वाटली. त्या कुत्र्याचे उग्र भुकणें व भयकर जबडा पाहून त्या बागवानाला तंबी देण्याचा विचार त्याना सोडावा लागला. चोरीच्या आरोपांत सापडून हेडमास्तरांसमोर खजील होण्याचा प्रसंग येण्यापेक्षा बागवानाच्या हातावर तुरी देऊन पळून जाणे त्यांना जास्त श्रेयस्कर वाटलें. त्याप्रमाणे त्यांनी आपसांत कांही विचार केला.

बाळ म्हणाला, " चला आपण झाडावरून ओढयाच्या पलीकडे उडी मारून पळून जाऊ."

विष्णू म्हणाला "आणि उडी अलिकडे पडली तर कपडे भिजून फजिती होईल, व वरून हेडमास्तराचा मार बसेल तो निराळाच."

गोपाळ म्हणाला, "तो कुत्रा आहे ना! तो एका उडींत पलीकडे येईल. मग कसें कराल ? मला त्याची भीति वाटते."

त्याच्या धाडशी स्वभावाप्रमाणे तो विचार एकदम सोडून द्यावासा बाळाला वाटेना. त्याने आपला बेत अमलात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. तो ज्या फांदीवर होता तीवरून ओढयाच्या बाजूला लोंबकळत असलेल्या फांदीवर तो उडी मारून गेला व हळूहळू त्या फादीच्या टोकाशी जाऊ लागला. तें पाहून बाळ काय करणार तें बागवानाच्या लक्षांत येऊन चुकलें. तो म्हणाला, "कशाला राव येवढी धडपड करता? हातापायाला इजा होईल. चुपचाप मास्तरपाशी चला कसे!" त्याच्या बोलण्याकडे बाळ कशाला लक्ष देतो! ओढयावर लोंबकळणाऱ्या फादीवरून उडी मारण्याच्या प्रयत्नास तो लागला. पलीकडचा किनारा बराच दूर होता, तेथवर उडी मारणे शक्य नव्हते व पाण्यांतच उडी जाण्याचा संभव जास्त, या गोष्टी बाळाच्या लक्षांत येऊं लागल्या; तरी पण फादी हाल्वून तो उडी मारण्याचा प्रयत्न करू लागला, तोंच त्याच्या पायाखालची फादी काडकन वाजली; तेव्हा आपण आयतेच अलीकडे पडून बागवानाच्या हातात सापडणार त्यापेक्षा तो नाद सोडून द्यावा हे बरे असे बाळाने ठरवले. त्याने खाली त्या कुत्र्याकडे पाहिलें ते हा तर त्याला जास्तच भय वाटलें.

आता मात्र त्या मुलांसमोर मोठें संकट उभें राहिलें. अशा रीतीने पकडले जाऊन हेडमास्तरांसमोर उभें होणें त्यांना प्राणसंकट वाटत होतें. त्यांनी बागवानाला पैसे देण्याची लालूच दाखवून पाहिली, पण व्यर्थ! बाळ म्हणाला, "आम्ही तुझे आजपर्यंत झालेलें सर्व नुकसान भरून देतों, मग तर झालें बाबा! आम्हांला का त्रास देतोस? आम्हांला मार बसल्याने तुझा काय बरें फायदा होईल?" पण तो ऐकेना. मुलें नेहमी पेरू तोडून नेत असल्यामुळे मालक त्याच्यावर रागावले होते. त्याने मुलांना पकडण्याचा प्रयत्न केला. पण ते पळून जात. यामुळे तो बागवान चवताळून गेला होता. त्या मुलांना हेडमास्तरांकडे नेण्याखेरीज दुसरी कोणतीहि गोष्ट करावयास तो तयार नव्हता. तो म्हणाला "माझ्या

हाती सापडत नव्हतां, मला गुंगारा देत होतां. हाती सापडल्यावर मी सोडीन होय ? "

बाळ म्हणाला, " आम्ही आजपर्यंत कधीच तुझ्या बागेत पायदेखील टाकला नाही. "

तेव्हा तो बागवान म्हणाला "तुम्ही नाही तुमचे दोस्त आले असतील· माझ्या गरिबाचे नुकसान झालें कीं नाही ? त्याबद्दल नको तुम्हाला शिक्षा. "

तो बागवान ऐकत नाही व दुसरा तर कांही मार्ग नाही हे जाणून नाइलाजाने त्या मुलानी कबूल केले की, ' आम्हाला उतरू दे. आम्ही पळून जाणार नाही. ' ते तिघे खाली उतरल्यावर बागवान त्यांना हेडमास्तरांकडे घेऊन चालला. काय प्रकार आहे हे लक्षात येऊन काही मुले बागवानाशी हमरीतुमरीवर येऊ लागली. पण बाळाने त्यांना मुळीच प्रोत्साहन दिले नाही ; उलट मना केले. हेडमास्तरसमोर येताच बागवानाने आपले गाऱ्हाणे त्याच्यापुढे माडले. तो म्हणाला, " रोज मुले पेरू तोडायला येतात, मी धरायला गेलों की पळून जातात. पेरूची नासधूस होते म्हणून मालक माझ्यावर गागाथनान माझ्या गरिबाची रोटी अशाने निघून जाईल. " अशा रीतीने बराच वेळ त्याने हेडमास्तरपाशी कुरकुर चालविली. त्याचे बोलणे ऐकून हेडमास्तराना मुलाचा राग आला. त्या गरिबाचें नुकसान माझ्या शाळेतील मुलानी करावे याची त्यांना चीड आली. बागवानाचें नुकसान किती झाले होते हे विचारून घेऊन, ते त्या तीन मुलांकरवी त्यानी त्या बागवानाला देवविले, व त्यानतर त्या बागवानास त्यांनी जाण्यास सांगितले. त्यांची मुद्रा फार क्रुद्ध व गभीर दिसत होती. प्रत्येकाला तीन तीन छडया त्यानी जोराने लगावल्या. राग थोडा शांत झाल्यावर ते गंभीरपणाने म्हणाले, " तुम्हांला मी चांगले समजत होतों, म्हणून तुमच्या खोड्याकडे आजपर्यंत मी दुर्लक्ष केलें. ताळतंत्र सूटून तुम्ही अगदी वाहवत चाललेले दिसतां. तुम्हांला लाज वाटावयाला पाहिजे की, तुम्ही त्या गरीब बागवानाचें नुकसान करून, त्याच्या नोकरीवरहि गदा आणीत होतां. त्यांतून चोरीसारखा भयंकर व लाजिरवाणा अपराध करून शाळेचें नांव खराब करतां व दुसऱ्या मुलांना वाईट धडा घालून देतां. "

## प्रकरण १६ वें

# परत येण्याला उशीर

मागे तेराव्या प्रकरणात सांगितले आहे की, वासुदेवाला शास्त्रीय ज्ञानाची फार हौस असे. त्याकरता त्याचे कांही ना काही प्रयोग चाललेले असत. त्यांत भीति वाटण्यासारखे प्रयोग असण्याचा संभव असे. म्हणून हेड-मास्तर वासुदेवाला धोक्याचे प्रयोग न करण्याची मधून मधून सूचनाहि देत; तरी पण वासुदेवाचा उद्योग नेहमी चालूच असे. त्या मुलाच्या हुशारीबद्दल व चांगुलपणाबद्दल हेडमास्तराना खात्री होती. त्या बाबतीत वासुदेवाला हेडमास्तराचें एक प्रकारें प्रोत्साहन होते म्हटले तरी चालेल! ज्या मुलाची बुद्धि जिकडे चालेल त्या बाजूने हेडमास्तर त्या मुलाला प्रोत्साहन देत, व त्यांत त्या मुलाने स्वतंत्र बुद्धि प्रकट केल्यास त्याना फार आनद होई. कांही धोका होऊ नये येवढ्याखेरीज अन्य रीतीने वासुदेवावर लक्ष ठेवण्याचें तसे कांही कारण नव्हतें. मनमोकळेपणाने वागण्याची वासुदेवाला एक प्रकारची मुभाच होती. हेडमास्तर महिन्यांतून चार सहा वेळा वासुदेवा-कडे येत असत. ते वासुदेवाशी सर्व विषयाची चर्चा करीत व जरूर त्या सूचना व माहिती त्याला देत. वासुदेवाचा शास्त्रीय वस्तूचा सग्रह पाहून त्याने त्यांत काय भर घातली याची ते माहिती करून घेत. वासुदेवाची प्रगति पाहून त्यांना समाधान होत असे. हेडमास्तरांचे वासुदेवावर इतर मुलांपेक्षा कांही विशेष प्रेम होतें यांत कांही संशय नाही. एखादा बागवान आपण लावलेल्या आवडत्या रोपाची निगा राखतो, त्याप्रमाणे मास्तर वासुदेवाच्या सद्‍गुणांची जोपासना करीत व बुद्धीची वाढ करण्यास त्याला प्रोत्साहन देत. रोपा फोफावून फळाफुलांनी प्रफुल्लित होईल या विचा-राने बागवानाचें हृदय जसें भरून येते त्याप्रमाणे वासुदेवाच्या गुणांच्या व बुद्धीच्या विकासाच्या विचाराने व त्याच्या कर्तृत्वाच्या व भावी कीर्तीच्या आशेने व कल्पनेनें हेडमास्तरांचें हृदय भरून येत असे. मुलाच्या यशाचीं सुखस्वप्नें बापाला सुखद व आल्हाददायी असतात तशी

वासुदेवाच्या यशाची सुखस्वप्नें हेडमास्तरांना सुखप्रद व आल्हाद दायी असत.

बाळ, गोपाळ व विष्णू या आमच्या तीन मित्राना वासुदेवाची सगत आवडू लागली होती. दुसऱ्याचा चांगुलपणा स्वत: चांगलें असल्याशिवाय कोणाच्या नजरेंत भरणार आहे ? वासुदेवाने आपल्या चागल्या गुणांनी या तिन्ही मुलांना आकर्षून घेतलें होतें. वासुदेवाच्या सहवासांत त्यांचा बराचसा वेळ जाऊं लागला होता. त्याच्याबरोबर ते फिरायला जात असत. वासुदेवाने भोवतालचा जगली प्रदेश अनेक वेळां धुडाळून काढला होता. पक्षांच्या व जनावरांच्या जाती पाहण्याकरता व त्यांची माहिती करुन घेण्याकरता तो दूरवर हिंडत असे. पाच सात मैलांच्या अतरावर शाल वृक्षाचे मोठे वन होतें. त्या जगलांत मोठे वृक्ष पाडून तक्ते बनवण्याचा कारखाना चालू होता. त्या कारखान्यांत जंगली लोक कामावर येत असत. चार चार झोपड्याची त्याची खेडी जगलांत इतस्तत. पसरलेली होती. वासुदेव त्या लोकांत जाऊन मिसळत असे. त्यांच्या चालीरीतीचें अवलोकन करणें, त्यांच्यांत प्रचलित असलेल्या गोष्टी ऐकून टिपून ठेवणें; व त्यांची गाणी ऐकून त्यांचा अर्थ लावणे हा त्याचा आवडता विषय होता. त्या लोकाचा विश्वास त्याने सपादन केला होता. अशा रीतीने आजपर्यंत वासुदेव एकटाच हिंडत असे. आता त्याला बाळ, गोपाळ व विष्णू यांची जोड मिळाली. ती मुलें धीट होती व धाडसाची कामे करण्याला त्यांची नेहमी तयारी असे. नदीनाले, पर्वतपहाड, दऱ्याखोरी व घनघोर वन-प्रदेशातून पायपिटी करून वासुदेवाने त्यांना नैसर्गिक सौन्दर्याची रमणीय स्थळें दाखविली होती. फराळाचे भरपूर बरोबर घेऊन अशा रीतीने पांच सहा तासांचा दौरा काढून ते संध्याकाळीं परत येत. तेथे त्यांचा वेळ मजेने जाई. एखाद्या नादाला लागले की त्यांत त्यांचा किती तरी वेळ निघून जाई व त्यांतच त्यांना मौज वाटत असे. त्यांतून एखाद वेळ असें रानावनांतून हिंडतांना हरणाचा कळप, मोरांचा समुदाय किवा ससे एका-एकी समोर भेटून ते बिचकून सैरावैरा धावू लागले की मोठी मौज दिसे. जमिनीवर जनावरांच्या पावलांची चिन्हें दिसली की ती कोणत्या जना-वराचीं आहेत हें तो त्यांना ओळखायला शिकवीत असे. एखादा जुनाट

विशाल वृक्ष दिसला की वासुदेव त्या मुलांना त्या वृक्षाच्या वयाचा अंदाज सांगूं लागे. वृक्षाचें आयुष्य सालीच्या कवचाच्या पुटावरून कसें ओळखावें, एक एक पूट किती वर्षांनी तयार होत असेल अशा तऱ्हेची किती तरी माहिती वासुदेव त्या मुलांना देत असे. संध्याकाळपर्यंत मौजेने वेळ घालवून ते परत येत असत.

वासुदेवाशी मैत्री झाल्यापासून सुटीच्या दिवशी खेळाचे सामने नसले की आमचे वीरगडी वासुदेवाबरोबर हटकून फिरावयास जात असत. अरण्य व पर्वत यांतून भटकताना वासुदेव त्यांना सृष्टिनिरीक्षणाचे धडे देत असे. अमुक झाड कोणत्या जातीचें आहे, मॅंगनीजचा पथ्थर कसा असतो, दगडी कोळसा व त्यांत फरक काय इत्यादि अवलोकन करीत दोन दोन, चार चार तास त्यांना घेऊन वासुदेव आसपासच्या प्रदेशातून हिंडत असे. सातपुडा पर्वत कसा बनला आहे, त्याचें सातपुडा हे नांव कसें पडलें, त्या पर्वतामुळे भौगोलिक काय परिणाम होनात, तेथे कोणत्या जंगली लोकांच्या जाती आहेत, त्या जातीच्या चालीरीती काय आहेत, या गोष्टींची वासुदेव त्या मुलांना माहिती देई. त्या मनोरंजक माहितीमुळे त्या मुलांची ज्ञानप्राप्तीबरोबरच करमणूक होत असे. व इतस्ततः भटकण्यांत झालेले श्रम हसण्याखिदळण्याच्या नादांत त्यांना कळून येत नसत.

वासुदेव आपल्या मित्रांना घेऊन वसतिगृहाच्या पटांगणात उभा होता. पावसाळा सपत आला होता. सतत पडणारा पाऊस बंद होऊन, एखाद वेळ अवचित आभाळ भरून येऊन धो धो पाऊस पडला की पुन्हा साफ होऊन चक्क ऊन पडत होतें. मधून मधून उन्हाचा आणि सावलीचा मिचामिचीना खेळहि पाहावयाला मिळत होता. ओढे नाले खळखळ वाहात होते व जिकडेतिकडे लतावृक्षांवर टवटवी दिसत होती. ते उभे होते तेथून समोर सुळक्यासारखा उंच गेलेला पहाड दिसत होता. एखाद्या मत्त वृषभाप्रमाणे त्या शिखराशी जणूं काय टकरा घेत आहे असा एक मेघ दिसत होता. नंदीबैलाच्या पाठीवर घातलेल्या झुलीप्रमाणे इंद्रधनुष्य त्या ढगावर चमकत होतें. तें दृश्य पाहून त्या पहाडावर जाण्याचा वासुदेवाला अनावर मोह झाला, व त्या गोष्टीला त्याच्या तिन्ही मित्रांनी अनुमोदन दिलें. त्या पहाडावरील रंगारंगाच्या दगडांचा संग्रह करण्याकरता वासुदेव तेथे

पुष्कळ वेळां गेला होता. निश्चय होतांच ही बालगोपाल मंडळी तो पहाड चढून जाऊ लागली. पटापट उडया मारीत अर्धअधिक पहाड ते हां हां म्हणतां चढून गेले. पहाडाच्या पायथ्याशी असतां जो ढग त्याना शिखराला बिलगलेला दिसत होता तो आता अगदी जवळ जवळ दिसू लागला. दाट धूर किंवा धुके पसरले असता जसे अगदी दिसेनासे होते, त्याप्रमाणे त्याना हाताच्या अतरावर असलेली वस्तूहि दिसेना. त्याच्या अगाला ओलावा लागू लागला व जणू काय आपण वाफेतून पोहत आहोत असा त्याना भास झाला अशा स्थितीत जरा जपून त्याना वर चढावे लागलें. अशा रीतीने काही वेळ मार्ग आक्रमण केल्यावर वरच्या बाजूने त्यांना सूर्यप्रकाश दिसूं लागला व थोडयाच वेळात ते साफ ढगाच्या बाहेर पडून वरच्या बाजूला आले. ज्या ढगातून जवळ जवळ पोहत आल्याचा त्यांना भास झाला होता तो ढग आता त्यांना खालच्या बाजूला हेलावत असलेला दिसू लागला. दबा धरून बसलेल्या जनावराचे रूप त्याने धारण केले. थोडयाच वेळांत तो हळूहळू विरून जाताना दिसला. आतापर्यंत खालच्या बाजूला काहीच दिसत नव्हते, त्या जागी सूर्याच्या आरक्त किरणांनी उज्वलित झालेले भूपृष्ठ दिसू लागलें. दूरवर हिरवळीचा समुद्र पसरला होता. डोंगराच्या रांगांवर कोवळी सोनेरी किरणे पडून तो प्रदेश खुलून दिसत होता. सध्यासमयीं घरी परत जाणाऱ्या पक्षाच्या किलकिलाटाने आकाश निनादित झालें होतें. त्या सुदर देखाव्याने आमच्या धाडशी व धीरललित मित्राची मनें लुब्ध झाली व आपल्या श्रमाचे चीज झाल्याचे समाधान त्याना प्राप्त झालें.

अनिमिष नेत्रानी दृश्याचे अवलोकन करीत ते गडी खाली उतरूं लागले. डोंगर उतरता उतरताच त्यांना उशीर होऊन अधारहि पडू लागला. त्यानी खाण्याकरता घेतलेली फळे व मेवामिठाई केव्हाच सपून गेली होती. श्रमामुळे त्यांना चागली भूक लागली होती. पहाडाच्या पायथ्याशी एक खेडें होतें. तेथे जाऊन दूध पिऊन ताजेतवाने झाल्यावर ते परत जावयास निघाले. वसतिगृहापर्यंत पोहोचतात तो त्यांना नऊ वाजून गेले. जेवण्याच्या वेळी ते हजर नव्हतेच. पण हजेरीच्या वेळी देखील त्यांचा पत्ता नव्हता. ते येतांच त्यांना ताबडतोब आपणांकडे पाठवून देण्याचा हुकूम हेडमास्तरांनी रखवालदाराला देऊन ठेवला. दाराशी येतांच रखवालदाराने त्यांना हेड-

मास्तरांकडे जाण्यास सांगितलें. भीत भीत बाळ, गोपाळ व विष्णू हेडमास्तरांच्या खोलींत शिरले. त्यांच्याबरोबर वासुदेव होताच. त्यांचे चिखलाने भरलेले व ओले झालेले कपडे पाहून हेडमास्तरांना आश्चर्य वाटलें व रागहि आला. पण वासुदेवाकडून सर्व माहिती मिळाल्यावर त्यांचा राग शांत झाला. प्रथम त्याना असा सशय आला होता की, ही खोडकर मुले कांही तरी उपद्व्यापात गुतली असावी व म्हणून त्याना उशीर झाला. वासुदेवाच्या सांगण्याने त्याचा सशय दूर झाला. त्यानी त्या मुलाना एकदम कपडे बदलून यावयास सांगितले. गरम चहा पाजल्यानतर ते त्याना आपल्या-बरोबर जेवावयाला घेऊन बसले. जेवताना वासुदेव सर्व हकीगत सांगत होता व हेडमास्तर मन लावून ती ऐकत होते. अनेक विषयावर त्याचे सभाषण चालू होते. मधून मधून सूचक प्रश्न करून हेडमास्तर आमच्या तिन्ही मित्राना संभाषणात भाग घ्यायला लावत होते. वासुदेव मास्तराशी बरोबरीने बोलतो, मास्तर त्याला मान देतात व आज आपण वासुदेवा-मुळे वाचलों, नाही तर आपणास शिक्षा मिळाली असती, या गोष्टी लक्षांत येऊन त्या तिन्ही मुलाचा वासुदेवाविषयीचा आदर विशेषच वाढला.

तीं मुले गैरहजर असल्याचा पत्ता इतर मुलाना व विशेषतः गणेश-कपूला जेवणाच्या वेळी व नतर हजेरीच्या वेळी लागला. ती मुले आल्या-बरोबर माझ्याकडे धाडून दे असा हेडमास्तरनी रखवालदाराला केलेला हुकुमहि सर्व मुलाना कळला होता. ती मुले हेडमास्तराकडे गेली तेव्हा गणेशकंपूला मोठा आनद झाला. त्या मुलाना चागला प्रसाद मिळेल अशी सर्वांची खात्री झाली होती. हेडमास्तराच्या खोलीतून त्याना आनंदाने येतांना पाहून सर्वांना आश्चर्य वाटले व गणेशकपूची निराशा झाली

# प्रकरण १७ वें

# भांडण विकोपास गेलें

शनवारचा दिवस होता. शाळा सकाळची होती दुपारीं कांही वेळ अभ्यास केल्यावर चारच्या सुमारास बाळ, गोपाळ व विष्णु आपल्या खोलीत बोलत बसले होते. शिळोप्याच्या गप्पा मारीत बसण्याची वाईट सवय या मंडळींना नव्हती. त्यांना कांही तरी उद्योग नेहमी हवा असे। आज खेळालाहि काही कारणाने सुटी मिळाली होती, म्हणून ओढ्या-कडे फिरावयास जावे असे विष्णूने सुचविले. सर्वांचें एकमत होऊन पुस्तकें 'फट् फट्' मिटवण्यात आली; व कपडे घालून ते तिघेजण भेटतील त्यांच्याशी विनोद व कुचाळक्या करीत आणि आपल्या हास्याने वसतिगृह दुमदुमवून टाकीत फाटकाबाहेर पडले. खेळण्याच्या पटांगणातहि मुले भेटली; दोनदोन चारचार अशा गटाने ती मुले खेळ बंद असल्यामुळे फिरत होती त्या सर्वांना उचित शब्दाचा अहेर अर्पण करीत व टिवल्याबावल्या करीत बाळ आपल्या मित्रासह पटांगणाच्या बाहेर पडला व ओढ्याच्या मार्गाला लागला. खूप थकवा येईपर्यंत ते वाळवंटात कुस्ती खेळत राहिले, नंतर गुढगाभर पाण्यात उभे राहून काही वेळ प्रवाहाची शोभा पाहात उभे राहिले. निर्मळ पाणी पिऊन मन तृप्त झाल्यावर, काठाशीच हातपाय पसरून मनसोक्त गप्पा करीत ते बसले; पाण्यांत दगड टाकून उत्पन्न झालेल्या वाढत्या वर्तुळाची शोभा पाहा-ण्याचे व 'किती भाकरी खाशील' असें म्हणत चापट दगड तिरपा मारून कोणाचा दगड पाण्याच्या पृष्ठभागावर जास्त वेळ नाचत राहतो याची स्पर्धा लावण्याचे त्याचे हातचाळे चालूच होते. अभ्यास, खेळ, परीक्षा इत्यादि अनेक विषयावर त्यांचे बोलणें स्वैरपणें चालू होते. चित्रपटांतील चित्राप्रमाणे किंवा आकाशात भटकणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे ते विषय अप्रतिहतपणें शब्दरूपाने त्यांच्या भाषणांत येत होते. अशा रीतीने चालू असलेल्या गप्पाष्टकांत ते पूर्ण रंगून गेले होते.

गणेशकपूचें याच वेळी कांही खलबत चालू होतें. मधू, विनायक, गणेश, रघू आणि दिगू ही मंडळी त्या चौकडीच्या खोलींत जमून कांही महत्त्वाच्या विषयाचा खल करीत आहे असे त्यांच्या चेहऱ्यांवरून व हळूहळू बोलण्यावरून दिसून येत होते. त्यांचीं पुस्तकें समोर उघडी पडलेली होती. रघू अध्यक्षाप्रमाणे खुर्चीवर बसला होता. वाचण्याचा आव आणून मधून मधून तो पुस्तकाकडे पाहात होता, पण त्याचे सारें लक्ष आपले दोस्त काय बोलतात इकडे होतें. मधू पलगावर बसून वहीवर उदाहरण सोडवीत होता पण तें न जमल्यामुळे त्याने पोपटाचे चित्र काढलें, व त्याखाली विनायकचें नाव लिहिले, आणि अशा रीतीने उदाहरण सोडविण्यांत हार झाली या गोष्टीचा वचपा काढून घेतला. विनायक खोलीमध्ये फेऱ्या घालीत सस्कृतचे श्लोक पाठ करीत होता. त्याने ते चित्र पाहिले. विनायक म्हणाला "वा ! छान आहे त्या विष्ण्याचें चित्र ! अगदी कसा पोपटासारखा आहे तो." इतक्यात त्याचें लक्ष चित्राखाली लिहिलेल्या स्वतःच्या नावाकडे गेलें. "तुझ्या बुद्धीच्या विणेच्या तारा बेसूर झाल्या आहेत, खुंट्या पिग्गाळून त्या सुरांत लावतो," असे म्हणुन त्यानें मधूचा कान पिरगाळला व आपले नांव खोडून त्या जागी त्याने विष्णूचें नांव लिहिलें. दिगू खिडकीशी शीळ घालीत उभा होता, तोहि ते चित्र पाहण्याला आला. गणेश हातातील पुस्तक भिरकावून देऊन दिगूच्या खांद्यावर हात ठेवून वाकून चित्र पाहू लागला. गणेशला तें चित्र पाहून हर्ष झाला. तो म्हणाला, "एक माकडाचे, एक रेड्याचे व एक आस्वलाचे चित्र काढ." मोठा कडाक्याचा वाद होऊन माकडाच्या चित्राला गोपाळचे व रेड्याच्या चित्राला बाळाचे नांव देण्याचे ठरले, व अस्वलाच्या चित्राला वासुदेवाचें नांव देण्याचे एकमताने ठरलें. सर्वांना ही कल्पना फार आवडली व ते 'खो खो' करून हसू लागले. मधू पुन्हा चित्रे काढण्यात गढून गेला.

अनुकूल परिस्थिति पाहून गणेशकपूच्या मनांतील सुडाच्या कल्पनेने उचल खाल्ली होती. पुष्कळशा मुलाना फुकट सर्कस दाखविल्यामुळे, त्यांतील बहुतेक मुलें पूर्वीप्रमाणे आपल्या विरुद्ध नसतील अशी गणेशकपूची अटकळ होती. म्हणून आपण बाळ, गोपाळ व विष्णू याना मार दिल्यास त्याबद्दल जास्त गवगवा होणार नाही व मास्तरांजवळ कोणी आपली कागाळी

करणार नाही असा भरवसा गणेश कपूला वाटू लागला होता. त्या संबधाने बराच वेळपासून त्याचें खलबत चालू होते. दिगूने बाळला आपल्या मित्रांसह ओढ्याकडे जातांना पाहिले होते. वादविवादाच्या नादांत व चित्रें पाहण्याच्या गडबडीत ही गोष्ट तो अजिबात विसरला होता; आठवण होताच त्याने हर्षाची टाळी पिटली. त्या तिघांना ओढ्याकडे जातांना पाहिल्याचे त्याने आपल्या मंडळीस सांगितले व साधल्यास याच वेळी त्याची कणीक चांगली मऊ करावी अशी सूचना केली. विनायक व गणेश यांनी लगेच अस्तन्या वर करीत एकदम तिकडे जाण्याविषयी आपले मत दिले. चित्रे खाली ठेवून मधूने त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला. रघू जो आतापर्यंत गप्प बसून होता, तो टेबलावर जोराने हात आपटून म्हणाला 'चला रे गड्यानो! आज चांगली संधि आहे. ही वाया जाऊ देता उपयोगी नाही.

तावडतोब सर्व मंडळी खोलीतून बाहेर पडली. 'गमत दाखवितों चला' असे म्हणून मधूने जातां जाता चार पोराना आपल्याबरोबर घेतलें. धूम ठोकत ते नऊ जण ओढ्याकडे गेले. ओढ्याजवळ आल्यावर दबत दबत व त्या त्रिकुटाची चाहूल घेत ते ओढ्याच्या काठाने जाऊ लागले. लवकरच ज्या ठिकाणी बाळ, गोपाळ व विष्णू बसले होते त्या ठिकाणी ते येऊन पोहोचले. गणेशला वाटले की नऊ जणाना पाहून ही पोरें भितील व आपले म्हणणे गुपचूप ऐकून घेतील. तो प्रथम बाळाच्याजवळ जाऊन बसला व म्हणू लागला, "पेरू चोरल्याबद्दल हेडमास्तरानी तुम्हाला उगीच मारले. त्या बागवानाने चुगली खाल्ली, चला आपण त्याला मारू व त्याच्या देखत पेरू तोडून आणू." बाळाने या गोष्टीला नकारात्मक उत्तर दिले.

"तुम्ही आमच्या टोळीत सामील का होऊ नये? आपण दोस्ती करू; आपली दोस्ती झाली म्हणजे वसतिगृहांतील सर्व मुलांवर आपलें चांगलें वजन राहील," गणेश दुसऱ्या रीतीने त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करू लागला.

" काय करावयाचें आहे आपल्याला दुसऱ्या मुलावर धाक ठेवून? मला त्याची कांही जरूर वाटत नाही," बाळाने उत्तर दिले.

" नाही रे, ही पोरें आताशा फार शेफारलीं आहेत. आमचें कांही एक ऐकत नाहीत, त्यांना वाटते तुमची त्यांना मदत आहे," रघू म्हणाला.

" मला नाही समजत ती मुले कशी शेफारली आहेत ती " बाळ म्हणाला.

गोपाळ मधेच म्हणाला, " आहे जा आमची त्यांना मदत. तुम्ही त्याना त्रास देतां म्हणून प्रतिकार करण्याकरता आम्ही त्यांना मदत करतों."

हे ऐकून गणेशकपू व त्यांचे साथीदार फारच संतापले. त्या तिघाना सर्वजण अद्वातद्वा बोलूं लागले. मधू म्हणाला, " मी पूर्वीपासून म्हणत होतों या चढेल पोरांची एकदा चांगली खरड काढली पाहिजे, म्हणजे त्या पोरांना मदत देण्याची यांना पुन्हा हिमत होणार नाही."

विनायक म्हणाला, " परवा त्या वामन्याला माझी तेवढी पुस्तके वर्गांतून आणायला सांगितली. विष्ण्याच्या चिथावणीने तो तसाच निघून गेला; पण माझे त्याने ऐकलें नाही."

ते सर्वजण त्या तीन मुलांच्या अंगावर तुटून पडले व त्यांच्याशी धक्काबुक्की करूं लागले. ते तिघेजणहि विरोध करण्याच्या विचाराने उभे झाले. इतक्यांत एकेकाच्या अंगावर तीन तीन जण धावून गेले. त्यांनी दुष्टपणाने एकेकाला मारण्यास सुरुवात केली व वगिचाच्या कुपणाशी त्यांना रेटून धरलें. कुंपणाच्या काट्यानी त्याचे कपडे फाटले व काट्यांचे ओरखडे अंगाला लागले. त्याना कुपणाशी घट्ट रेटून धरण्यात आलें होतें; अंगहि इकडच्या तिकडे हालवतां येत नव्हते व जरा अग हालले की काटे बोचत. आता तरी हीं पोरें शरण येतील अशी आशा त्या दुष्ट कपूला वाटूं लागली, पण त्या तिघांतून एकहि हटला नाही की डरला नाही. त्या दुष्ट कपूने यांना शरण आणू या भरवशाने तसेच त्यांना कुपणाशी दाबून धरलें व ते म्हणू लागले, " बऱ्या बोलाने कबूल व्हा, नाही तर आम्ही सोडणार नाही."

वासुदेवाची इतर सर्व गोष्टीप्रमाणे अभ्यास करण्याची तऱ्हाहि विचित्र होती. ज्या ठिकाणीं माणसाची चाहूल लागणार नाही व त्रास होणार नाही अशी एकांताची जागा तो अभ्यासाकरता निवडून काढीत असे. आपल्या खोलीत अभ्यास न करतां तो नदीच्या काठी, जंगलांतल्या एखाद्या

झाडावर, डोंगराच्या माथ्यावर किंवा दरीखोऱ्यांतल्या निवांत जागी तासन तास अभ्यास करीत वसत असे. अशा ठिकाणी चारपांच तास तो एका बैठकीत घालवी व सुटीच्या दिवशी तर एखादा वेळ सारा दिवस तो तेथे बसून काढीत असे. एकदा वसतिगृहाच्या मागच्या बाजूने जात असतां त्याला एक कल्पना सुचली. शेतकरी लोकांनी शेतें राखण्याकरता केलेले माळे त्याने पाहिले होते. ओढ्याच्या काठी एकात ठिकाण पाहून तेथे असलेल्या एखाद्या झाडावर माळा बांधावा असें त्याच्या मनात आले. त्याप्रमाणे एक आंब्याचे मोठें झाड पाहून त्यावर त्याने एक माळा बांधला. तो बांधून झाल्यावर त्याला फार आनद झाला की, " आता मला अभ्यासाकरता एकांत ठिकाण पाहण्याकरता वसतिगृहापासून दूर जावें लागणार नाही " वसतिगृहापासून एका हाकेच्या टप्प्यात इतकी गुप्त व निवांत जागा मिळाल्याने तो सकाळ सध्याकाळ वाटेल तेव्हा तेथे जाऊन बसू लागला. एक वेळ अगदी सकाळी बाळ, गोपाळ व विष्णू यांना आपली अभ्यासाची जागा दाखविण्याकरता वासुदेवाने नेले. ती वसंत ऋतूंतील बहरीची सकाळची वेळ होती. आब्याच्या मोहराचा सुवास हवेमध्ये दरवळून राहिला होता. वारा मद मद वाहत होता व त्यामुळे वृक्षांची पाने हळूहळू डुलत होती. सूर्योदय व्हावयाचा सुमार होता, व सूर्यबिंब अर्धे उदयगिरीवर दिसू लागले. पक्षीगणांचा किलबिलाट चालू झाला. ढगावर निरनिराळ्या रगाच्या छटा दिसत होत्या. गावातून गाई-वासरें चरावयास निघत होती व त्याच्या घटांचा मृदु आवाज कानांच्या द्वारें मनाला हर्षित करीत होता. त्याच्या खुराने उडालेली धूळ आरक्तवर्ण दिसत होती. वानर या डाहळीवरून त्या डाहळीवर उड्या मारीत होते. हा मनोहर देखावा पाहून त्यांचें मन मोहित झालें व ती जागा शोधून काढल्याबद्दल त्यांनी वासुदेवाची मनसोक्त स्तुति केली. त्या जागी आताशा वासुदेव नेहमी अभ्यासाकरता येऊन बसत असे.

तो दिवस शनिवारचा असल्यामुळे वासुदेव नित्याप्रमाणे त्या ठिकाणी दुपारी दोन वाजेपासून येऊन बसला होता. तो कांही संस्कृत श्लोक पाठ करीत होता, आणि त्यांत इतका रगून गेला होता की बाळ, गोपाळ व विष्णू जवळच ओढ्याच्या काठी केव्हा येऊन बसले तें त्याला

समजले देखील नाही. त्यानंतर गणेश कपूतील लोक केव्हा आले हेंहि त्याला माहीत झालें नाही. त्यांचे मोठमोठ्याने भाडण होऊन प्रकरण हातघाईवर येईपर्यंत त्याचे लक्ष तिकडे वेधलें नाही. अभ्यास सपवून तो जाण्याची तयारी करीत होता, तेव्हा तो गोगाट त्याच्या कानावर आला. त्याने मारामारी सुरू असलेली पाहिली. त्या ... दुष्ट कपूतील लोकांनी कुंपणाशी रेटून धरलेले पाहून वासुदेवाला क्रोध आला. वासुदेवाला सहसा कधी राग यावयाचा नाही किंवा तो दुसऱ्याच्या भानगडीत पडावयाचा नाही. त्याचें लक्ष तिकडे जाऊच शकत नव्हतें असे म्हटल्यास अधिक शोभेल. सर्व प्रकार त्याच्या लक्षात येऊन तो घाईने झाडावरून खाली उतरला. त्याने प्रथम रघूने व दुसऱ्या दोन मुलानी कुंपणाशी रेटून धरलेल्या बाळाला पाहिले. तो धावतच जवळ आला. तेव्हा त्याला बाळाचे फाटलेले कपडे व अंगावरील ओरखडे दिसले. वासुदेवाचा क्रोध आता अनावर झाला. त्याने रघूला व जवळच असलेल्या 'आजोबाला' एकेका हाताने मानगुटीला धरून वर उंच उचलले व डोक्यावर डोकें आपटून त्याची टक्कर केली व मग चेंडूसारखे त्यांना दूर भिरकावून दिले; तो ते पाण्यात आपटून त्याचे कपडे ओले झाले. रघू व मधूला बाहुलीप्रमाणे सहज उचलून चेंडूप्रमाणे फेकून देण्याचे वासुदेवाचें तें अचाट सामर्थ्य पाहून इतर मुले घाबरली त्यांनी त्या धिप्पाड मूर्तीकडे पाहिलें व तो विचित्र मुलगा वासुदेवच आहे अशी त्यांची खात्री झाली. त्याची ती क्रुद्ध मुद्रा पाहून इतर मुलानी तेथून धूम ठोकली व त्यांच्यामागून रघू व मधू आजोबा धूम पळत गेले.

त्या वेळी चागली सध्याकाळ झाली होती व अधकारही पडला होता. वासुदेवाबरोबर बाळ, गोपाळ व विष्णू वसतिगृहाकडे यावयास निघाले. रस्त्यात वासुदेवाने सर्व हकीकत विचारून घेतली, तेव्हा त्याला भांडणाचे कारण कळून चुकलें व गणेश कपूबद्दल त्याच्या मनात तिटकारा उत्पन्न झाला. थोडक्याच वेळांत ते आपल्या खोलीत येऊन पोहोचले व फाटके व मळलेले कपडे बदलून दुसरे कपडे त्यांनी घातले. ती मुलें आपले फाटके कपडे बदलत असतां, त्यांच्या अंगावरील ओरखडे व अगांतून एक दोन ठिकाणीं निघालेले रक्त दिव्याच्या उजेडांत वासुदेवाला पाहावयास मिळाले तेव्हा त्या व्रात्य कंपूच्या दुष्टपणाची त्याला चांगली कल्पना झाली, व दुष्ट-

पणाच्या भरांत ते काय करतील व त्याच्या दुष्टपणाची मजल कोठवर जाईल हे त्याला दिसून आले. त्या दुष्ट कपूवर नजर ठेवावयाचे ठरवून पुन्हा त्यांनी कोणाला त्रास दिल्यास आपणाला कळविण्याविषयी वासुदेवाने त्या तिन्ही मुलाना बजावून सांगितले. बाळ, गोपाळ व विष्णू कांही भित्री मुले नव्हती. आपणच त्या दुष्ट कपूची चागली खोड मोडू असें त्यांनी वासुदेवाला आश्वासन दिले, व सागितले की, 'कोणाहि चागल्या मुलाला दुष्ट कपूपासून आम्ही उपद्रव होऊ देणार नाही व आम्हीच त्याना पाहून घेऊ. आज अचानक त्यानी पुष्कळ जणानी येऊन हल्ला केल्यामुळे आम्हाला काही करता आले नाही. नाही तर आजच त्याना आम्ही हात दाखवला असता.' असें दड थोपटून गोपाळ म्हणाला; गोपाळचा तो आविर्भाव पाहून बाळाला हसू आले विष्णूनेंहि आपल्या डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताची मूठ जोराने आदळून गोपाळप्रमाणेच आपले मत जाहीर केलें. त्या तिघाना आनदित झालेले पाहून व त्याची पुढील तयारी पाहून वासुदेवाने त्या तिघांच्या हिंमतीची तारीफ केली. त्याची खात्री झाली की ही मुलें त्या दुष्ट कपूच्या दरडावणीला भीक घालणार नाहीत.

या प्रसगाची बातमी हा हा म्हणता वसतिगृहातील व शाळेतील इतर मुलाना माहीत झाली. सर्कस [illegible] जी मुलें गणेशकंपूचा पूर्वीं-प्रमाणे द्वेष व तिटकारा करीनाशी झाली होती, ती पुन्हा त्यांच्याविषयी मनांत तिटकारा बाळगू लागली लहान व कमजोर मुले पूर्वीपासूनच बाळाच्या पक्षाचा आश्रय घेत होती. बाळाची त्या मुलांना मदत असल्या-मुळे गणेशकपू वचकत असे व त्या मुलांना उघड त्रास देण्याची त्या कंपूला हिंमत होत नसे. त्या दुष्ट मुलानी तिघांना अचानक गाठून हल्ला केल्या-बद्दल [illegible] सहानुभूति असलेल्या मुलांना हळहळ वाटली; त्यातून आपल्याकरतां बाळ व त्याच्या दोन मित्राना मार खावा लागला या जाणिवेने तर त्या तिघाबद्दल त्या लहान मुलाचा आदर व सहानुभूति अधिकच वाढली. शाळेंतील मोठ्या मुलाना जेव्हा हा प्रकार समजला तेव्हा गणेशकपूबद्दल त्याना तुच्छता वाटली. मोठ्या मुलांना बाळ व त्याचे दोन साथीदार याची हिंमत व स्वभाव पूर्णपणें माहीत होता. अशामुळे ती मुलें डरणार नाहीत, उलट ती आपल्या पायावर उभे राहण्या-

सारखी आहेत व ती आपला वचपा काढून घेतील याची मोठ्या मुलांना जाणीव असल्यामुळे त्यांनी तिकडे फारसें लक्ष दिलें नाही.

बाळ व त्याचे दोन साथीदार यांना मारणाऱ्या मुलांपैकी परशराम नांवाचा एक मुलगा होता. तो हूड असला तरी त्याची दुष्टपणाची मजल गणेश व त्याचे दुसरे दोस्त याच्याइतकी मर्यादेबाहेर गेली नव्हती. मधूने सर्कस [illegible] परशरामाची मधूशी दोस्ती जमली होती. तो बाळाला मारण्यात सामील झाला होता, पण झालेला प्रकार पाहून त्याला फार वाईट वाटले. कित्येक मुलांनी ही गोष्ट मास्तरांना सागण्याकरता बाळाला सुचवून पाहिले. पण त्याने चुगली खाण्याचे साफ नाकारले; विष्णू व गोपाळपाशी तीच गोष्ट निघाली असता, त्यानीहि तेच उत्तर दिले. ते म्हणत, "आमचे हात काही केळी खावयास गेले नाहीत. आम्ही पाहून घेऊ गणेशला व त्याच्या दोस्ताना." मास्तरांच्या कानावर गणेशकंपूच्या दुष्टपणाची गोष्ट घालावी असे म्हणावयास आलेल्या मुलाच्या मनांत या उत्तराने त्या तिघाबद्दल अभिमान उत्पन्न झाला. बाळ, गोपाळ व विष्णू यांचा हा दिलदारपणा पाहून केलेल्या कृत्याबद्दल परशरामाला वाईट वाटले व मधूच्या भानगडीत आपण कशाला पडलो असे त्याला झाले. मधूच्या भानगडीत पुन्हा न पडण्याचा त्याने निश्चय केला. बाळ गोपाळ व विष्णू याची माफी मागावी असे त्याला वाटू लागलें बाळ, गोपाळ व विष्णू हे दिसले की, त्या दिवसाची आठवण होऊन त्याला जी ऐट वाटत असे ती वाटेनाशी झाली व त्याला ओशाळल्यासारखें वाटू लागले. शेवटी त्याने एकदा त्या तिघांना गाठून त्यांची क्षमा मागितली तेव्हा त्याला समाधान झाले.

## प्रकरण १८ वें

# कट का केला ?

१९०७ साली जिकडे तिकडे स्वदेशी चळवळीचें वारे पसरूं लागले होतें. सुरुवातीस कमळपूरसारख्या लहान शहरास त्या चळवळीचा उपसर्ग लागणें शक्य नव्हते. तसें म्हटले तर मोठमोठ्या ठिकाणी घडणाऱ्या घडामोडीचे परिणाम कमळपूरसारख्या सुरक्षित असलेल्या जागी एकदम जाणवत नसत नदी पुराने दुथडी वाहू लागल्यानतर तिच्या काठी असलेले कानेकोपरे पाण्याने भरतात न भरतात तोच तेथील पाणी ओसरू लागतें, त्याप्रमाणे कमळपूरची स्थिति होती. डोगराला हादरून मोडणाऱ्या दूरवर होणाऱ्या आवाजाचा प्रतिध्वनि ओसाड दऱ्याखोऱ्यात अस्फुटपणें व्हावा व तेथेच विलीन व्हावा त्याप्रमाणे राजधानीच्या शहरी राजकीय वातावरणात घडलेल्या फरकाचा परिणाम कमळपुरांत होत आहे तोच पुन्हा पूर्ववत स्थिरस्थावर व्हावे तरी पण नागपूरसारख्या नजीकच्या शहरीच कांग्रेस होणार होती, तेव्हा साहजिकच स्वदेशीचा प्रचार करणे, वर्गणी जमा करणे वगैरे कार्याकरता कमळपुरांत एकदोन सभा होऊन त्यांत स्वदेशीसबधी रसभरित व्याख्याने झाली. शाळेतील मोठी मुले व्याख्यानास जात; त्याच्याबरोबर लहान मुलेहि जात मोठ्या मुलाना ती व्याख्यानें समजत पण लहान मुलाना त्या व्याख्यानांचा पूर्ण बोध न झाल्यामुळे मोठ्या मुलानी सागितलेल्या गोष्टीवरून त्याना समाधान मानून घ्यावें लागे पण साधारणपणे सर्वच मुलाना ही गोष्ट पटत असे की, आपण स्वदेशी कपडे वापरावे, स्वदेशी साखर खावी व स्वदेशी वस्तू घ्याव्या, म्हणजे त्यांत आपलाच फायदा आहे. स्वराज्य म्हणजे रामराज्यासारखें सुखाचे राज्य हिंदुस्थानांत सुरू होईल ही कल्पना मुलाना रम्य व सुखमय वाटे. काही म्हणत शिवाजी पुन्हा अवतार घेऊन स्वराज्य स्थापन करील. प्रातिनिधिक सस्थांसबधी त्या वेळी मुळीच शिक्षण दिलें जात नव्हतें व प्रातिनिधिक सस्थाहि मुलांना फारशा डोळ्यासमोर

दिसत नव्हत्या; त्यामुळे फारच थोड्यांना त्यासबधी कल्पना होऊं शकत असे.

ही व्याख्यानें होऊन गेल्यानतर एकदोन दिवसात शाळेंत मुलांमध्ये त्यासंबधाने जोराने खलबतें होऊं लागली. ज्या मुलांच्या अगावर देशी कपडे नव्हते त्या मुलांवर टीका सुरू झाली. पोशाखात टोपी ही सहज उचलून घेण्यासारखी वस्तू असल्यामुळे देशी नाही असा संशय आला की ती पटकन त्या मुलाच्या डोक्यावरून उडविली जाई व त्यानंतर शाळा सुरू होईपर्यंत त्या मुलाच्या हाती ती न लागावी या हेतूने इकडून तिकडे चेंडूप्रमाणे फेकली जाई. पुढे पुढे तर प्रत्येक वर्गात हा एक खेळच होऊन बसला. पावसाळ्याच्या दिवसात मुलाना बाहेर खेळायला मिळत नसे. या नवीन निघालेल्या खेळाने मुलाची सोय झाली. बरीच मुलें स्वदेशी टोप्या घालून शाळेत येऊ लागली होती. त्यामुळे टोप्या उडवाउडवीच्या खेळा-साठी टोप्या मिळेनाशा झाल्या. टोप्या उडवण्यात थोडी धक्काबुक्की व मारामारी होतच असे. मारामारी व धक्काबुक्कीतून दोन पक्ष करून टोपी हस्तगत करण्याच्या खेळात हळूहळू या खेळाचें रूपांतर झालें. या खेळात अर्थातच बाळ, गोपाळ व विष्णू हे हौशी गडी प्रामुख्याने भाग घेत असत

१९०८ सालचा जुलईचा महिना मोठा धामधुमीचा होता. लोकमान्य टिळकांवर खटला चालू होऊन जवळ जवळ एक महिना होत आला होता व निकाल थोडक्याच दिवसात लागणार होता. मोटी माणसें वर्तमान-पत्रांतून आलेल्या बातम्या मोठ्या उत्सुकतेने वाचत असत. वर्तमानपत्र आल्याबरोबर चारपांच जणांनी जमून एकाने वाचावें व इतरांनी ऐकावे असा क्रम चाले. लहान मुलाना त्यांतले फारसें कळत नसे. फक्त, टिळकां-सारखे थोर देशभक्त देशाकरता कार्य करतात म्हणून सरकार त्यांना उगीच त्रास देतें येवढा ठोकळ परिणाम मुलांच्या मनावर होत असे, व अशा विभूतींना त्रास दिल्याबद्दल विलायती टोप्या वगैरे जाळून ते आपला राग व्यक्त करीत असत. टिळकांना शिक्षा झाल्याची बातमी मधली सुटी होण्याच्या थोडा वेळ अगोदर पोहचली व हळूहळू ती कुजबूज सर्व शाळे-भर पसरली. मधल्या सुटीत सर्व मुलें एका ठिकाणीं जमली व त्यांनी शाळेंत न जाण्याचें ठरवलें. शाळेच्या रस्त्यावर उभे राहून त्यांनी भिऱ्या

व अर्धकच्च्या मुलांना थोपवून धरण्यास सुरुवात केली व शाळा ओस पाडली. वासुदेव कधीच कोणाच्या भानगडीत न पडणारा, पण तोहि त्या दिवशीं दुपारी शाळेत गेला नाही. इतर मुलांपेक्षा तो या बाबतीत जास्त माहितगार होता. रोजचें वर्तमानपत्र तो वाचीत असल्यामुळे रोजची ताजी बातमी त्याला कळत असे. मुलांची सभा भरवून एकदर हकीगत त्यानें समजावून सांगितली.

तो आठवडी बाजारचा दिवस होता. बाजार बद पाडावा म्हणून तीं मुलें बाजाराकडे वळली व दुकानदाराना विनवून दुकानें बद करावयास सांगूं लागलो. दुकानदारांनाहि अर्थात् वाईट वाटून त्यानी दुकानें आवरली व हां हां म्हणता बाजार उठून गेला. बाजारपेठेतील दुकानें आपण होऊनच बद झाली. मगळबागचा मालक जरा हट्टी होता त्यातून सरकारी नोकरांचें व अधिकाऱ्यांचेंच त्याला गिऱ्हाईक जास्त ७.ग न.मळे तो दुकान बद करावयाला मागेपुढे पाहू लागला. मुलांनी फारच हट्ट धरला. तेव्हा मुलांना खुश करण्याकरता दुकानाची सर्व दारे बद करून व समोरचे एकच दार उघडे ठेवून तो दुकानात बसून राहिला. तेवढ्याने मुलाचे समाधान होईना. दुकानदाराने दुकान अजिबात बद करून घरी जावे अशी मुलांची इच्छा होती.

इतक्यात इतिहासाचे मास्तर त्याच्या दुकानाकडे येताना मुलांना दिसले. हे मास्तर फार सालस होते. मुलांना त्यांनी कधीच मारलें नाही किंवा ते कधी कमीजास्त बोललेहि नाहीत. मुलाना ‘ अरे ’ अशा एकेरी नांवाने त्यानी कधी हाक मारली नाही. मुलांना देखील ‘ अहो जाहो ’ असें बहुवचनी सबोधणेंच त्यांना बरें वाटत असे. ते आपला वेळ कधीच वाया जाऊं देत नसत. शाळेंतहि शिकवण्यानतर मध्ये जो वेळ मिळे त्यांत ते एका हातांत पुस्तक घेऊन दुसऱ्या हाताच्या बोटाने डोक्यावरच्या केसांना पीळ देत किंवा दाताने मिशा कुरतडत वाचनात गढलेले दिसत. त्याचा शांत स्वभाव, मुलांशीं अदबीने वागण्याची रीत व त्यांचा एकदर चांगुलपणा यांचा मुलाच्या मनावर परिणाम होऊन ते मुलांमध्ये फारच प्रिय झाले होते. इतिहासाच्या वाचनाने का म्हणा ना त्यांच्या अंगी देशभक्तीचें वारें खेळत होतें. कांग्रेसकरता वर्गणी गोळा करणें वगैरे चळवळींत ते लक्ष घालत होते हें मुलांना माहित होतें. नुकताच त्यांनी मुलांकरता

लाठीकाठीचा वर्ग सुरू केला होता व स्वसंरक्षणार्थ लाठीकाठी शिकण्याविषयी ते मुलांना कळकळीने उपदेश करीत होते.

मास्तर मंगळबाग दुकानासमोर आले ते तडक दुकानांत शिरले. मास्तर दुकानांत काय घेतात हे पाहण्याकरता मुले दुकानाच्या दाराशीच उभीं होतीं. मुलांना दुकानाशी धरणे घेऊन बसलेले पाहून मास्तरांना कोडे पडलें; मुलें येथून जाण्याची आशा करणे व्यर्थ आहे असें जेव्हां दुकानदाराने मास्तरांना सांगितलें तेव्हा मास्तर बरेच अडचणीत पडल्यासारखे दिसले. मास्तरांनी दुकानदाराला कपबशांचे तीन जोड कागदांत गुडाळून देण्यास सांगितले. तो पुडा घेऊन मास्तर दाराबाहेर पाय ठेवतात तोच मुलानी "मास्तर तुम्ही काय घेतलेंत ?" असा प्रश्नाचा भडिमार मास्तरावर सुरू केला. मास्तराचा देहस्वभावच सौजन्यपूर्ण असल्यामुळे त्याना मुलांशी खोटें बोलावेंसे वाटेना. त्यांनी काय घेतले ते प्राजलपणे मुलांपाशी कबूल केले. अशा विशिष्ट दिवशी विदेशी माल घेतल्याबद्दल मुलानी एकच गिल्ला करण्यास सुरुवात केली; तेव्हा आपण हा माल दुसऱ्याकरिता घेत आहोंत असे सांगून व मुलांची माफी मागून मास्तरांनी कशीबशी तेथून आपली सुटका करून घेतली.

दुसऱ्या दिवशी मुलें शाळेत गेली. आज काही तरी शिक्षा आपणाला होणार असे सर्व मुलांना वाटत होतें. पहिला तास गेला, दुसरा गेला मधली सुट्टी झाली तरी मुलांची उत्कंठा कमी होण्यासारखे कांही घडण्याचें चिन्ह दिसेना. मुलांना वाटले मधल्या सुट्टीत सर्व मास्तर एकत्र जमून कांही तरी ठरवतील. पुन्हा वर्ग सुरू झाले. शेवटचा तासहि संपत आला तरी आधल्या दिवसाच्या गैरहजेरीबद्दल मास्तरांकडून कांहीच हुकूम मुलांना मिळाला नाही व तो प्रसंग जणू काय कांहीच झाले नाही अशावरी निघून गेला.

या प्रसंगानंतर कांही दिवसांनी पुन्हा एकदा कट करून शाळेतून पळून जावें अशी क्लृप्ति कांही टवाळ पोराच्या डोक्यांतून निघाली. या वेळीं कटाचें पुढारीपण मधू ऊर्फ आजोबांनी आपल्याकडे घेतलें. अभ्यास, कर्तव्य व शिस्त यापेक्षा मुलांचें स्वातंत्र्य व हक्क याकरता आजोबा फार दक्ष असत. त्यासंबंधी ते नेहमी विचार करीत व जागरूक असत. मुलांच्या

हक्काचा प्रश्न कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत उपस्थित करण्यांत त्यांना अभिमान वाटत असे. असाच प्रसंग घटस्थापनेच्या दिवसाच्या निमित्ताने आजोबाने घडवून आणला. अर्थात या त्यांच्या योजनेंत त्याच्या चौकडीतील सर्व मित्र सामील होते. घटस्थापनेच्या दिवशी सुटी मिळावी व ती न मिळाल्यास कट करून आपण त्या दिवशी शाळेत जाऊ नये असा बूट मुलांमध्ये पसरवण्याचे काम त्यांनी सुरू केले. शाळेतील सर्व मुलें या कटांत सामील होणे शक्य नव्हतें. मधूच्या आग्रहामुळे व गणेशकंपूच्या प्रयत्नाने सहाव्या व पांचव्या वर्गांत कट होऊन घटस्थापनेच्या दिवशी शाळेत न जाण्याचें ठरले. बाळ, गोपाळ व विष्णू या कटात सामील होण्याला तयार नव्हते, पण त्याच्या वर्गांतील सर्वच मुलाचें मत कटाला अनुकूल पडल्या-मुळे नाइलाजाने त्यानीहि गैरहजर राहण्याचें कबूल केलें. घटस्थापनेच्या दिवशी सुटी मिळावी म्हणून मुलानी एक अर्ज केला होता. त्यावर विचार होऊन सकाळी शाळा करण्यात आली होती. मधूसारख्या मुलाचे येवढ्याने समाधान होण्यासारखे नव्हते. मास्तरानी आमचे म्हणणे पूर्णपणे मजूर केलें नाही हें त्याचें गाऱ्हाणे राहिलेंच तसे म्हटले तर घटस्थापनेच्या दिवशी मुलांना सुटी घेण्याचे कांही कारण नव्हते. त्यामुळे इतर वर्गांतील मुलें त्या दिवशी गैरहजर राहण्याच्या कटात मुळी सामील झालीच नाहीत. मधूला घटस्थापनेच्या सणानिमित्त काही धर्मकार्य करावयाचें होतें असें थोडेच होतें. काही तरी उपद्व्याप करावा व मास्तराना आम्ही जुमानीत नाही अशी ऐट व फुशारकी मारतां यावी, याच हेतूने हा सर्व व्यूह त्याने रचला होता. बाळ, गोपाळ, विष्णू यांना फशी पाडावे हाहि त्यांचा अंतस्थ हेतु होताच पण तो त्याने कोणाला कळूं दिला नाही.

ठरल्याप्रमाणे सहावा व पाचवा हे दोन वर्ग ओस राहिले. मधूच्या पुढारीपणाखाली सहाव्या वर्गांतील सर्व मुले शाळेच्या आवाराबाहेर ठरीव ठिकाणी उभी राहिली. मधूच्या कांही जिगर दोस्तानी आपणाकडे पुढारी-पण घेऊन पांचव्या वर्गांतील मुलांना बाहेर काढलें होतें. राहतां राहिले बाळ, गोपाळ विष्णू व जनू नांवाचा एक गरीब नादार मुलगा. जनूला तर इतर मुलांनी जवळजवळ ओढूनच वर्गाबाहेर नेलें. त्याला नेणाऱ्या मुलांपैकी कांहींनी त्याला फुकट पुस्तकें मिळवून दिली होतीं म्हणून जनूला

त्यांची भीड तोडवेना. त्या मुलांनी जनूला आश्वासन दिलें की, आम्ही तुझें कांही नुकसान होऊं देणार नाहीं, तुझ्याबद्दल आम्ही जबाबदार आहोंत. अशा रीतीने केवळ नाइलाजाने बिचाऱ्या जनूला शाळेत गैरहजर राहावें लागलें. स्वतःच्या [illegible] व कट मूर्खपणाचा आहे असें मन ग्वाही देत असतां वर्गांतील मुलाखातर बाळ, गोपाळ व विष्णू वर्गाबाहेर पडले होते.

आश्विनाचा आल्हाददायक महिना; पर्णपुष्पाच्छादित वनाची शोभा, अकृत्रिमपणामुळे अधिकच खुलून दिसत होती. शेतांत धानाची रोपें फुलावर आली होती; तेथून येणारा अन्नपूर्णा देवीच्या सुहास्याचा सुवास चहूंकडे पसरून मनाला प्रसन्न करीत होता. शेतकरी प्रसन्न मनाने व कृतकृत्य बुद्धीने त्या शेताकडे बघून धन्यता मानूत घेत होता. गुराख्याची मुले नवरात्रांतील गाणी गात आनदाने बागडत होती.

मधूच्या पुढारीपणाखाली निघालेली मुले रस्त्याने हळूहळू चालली होती. दंगामस्ती व धक्काबुक्की करणे आणि अद्वातद्वा बोलणे याशिवाय त्या मुलांचा एक क्षण जात नव्हता. आपण शाळेतून का निघालो व त्याला कांही वास्तविक कारण आहे किंवा नाही हें त्या मुलापैकी किती जणाना सांगतां आलें असतें याची शका आहे; कोणी त्याविषयी विचारच केला नव्हता हेंच खरें. बाळ, गोपाळ व विष्णू यांना मी माझ्या पुढारीपणाखाली शाळेतून काढले यातच मधूला अभिमान वाटत होता. मधू या वेळी पूर्ण आवेशात होता. त्याने आपली चर्पटपंजरी सुरू केली, "आम्ही इग्रजी का शिकावें ! ही दुसऱ्याची भाषा आहे. ती शिकण्यापेक्षा शाळेत शिकावयास न गेलेलें बेहेत्तर." अशा रीतीने त्याने आपल्या अकलेचे तारे तोडणे सुरू केले. त्याच्या भाषणात अडथळा करणाऱ्या एक दोन मुलांची त्याने तेथे हजेरीहि घेतली.

इतस्ततः हिंडतां हिंडतां तो मुलांचा घोळका नदीवर येऊन पोहोचला. नदींतून भरपूर पाणी प्रसन्नपणें वाहत होतें. बराच वेळ मुले वाळवटांत खेळत राहिली, त्यानतर नदीत यथेच्छ पोहलीं. पावसाळा नुकतांच संपलेला असल्यामुळे अजूनहि नदीचा प्रवाह बराच जोराचा होता. बाळ वगैरे कांही मुलांनी हिमत करून नदी दोन तीनदा पार केली. ज्यांना पोहणें येत नव्हतें अशीं मुलें थोड्या पाण्यांत पोहणें शिकण्याचा प्रयत्न करीत राहिलीं.

दिवस बराच वर चढला; व इकडे पोटात कावळे ओरडू लागले. तेव्हा ती मुलें परत फिरलीं. घरी परत येताना कट करून आज आपण शाळेत का गेलों नाही याचे पुष्कळाना खरोखरच आश्चर्य वाटू लागले. मोकळे-पणानें वागावयास मिळाल्यामुळे जरी सर्व मुले उल्हासित दिसत होती, तरी घरी वडील मडळी काय म्हणतील व उद्या शाळेत काय शिक्षा मिळेल याची काळजी निर्ढावलेल्या मुलाखेरीज सर्वांना वाटू लागली होती.

दुसऱ्या दिवशी दोन्ही वर्गांतील मुलाना एका ठिकाणी बोलावण्यात येऊन प्रत्येकाला आधले दिवशी शाळेत न येण्याचे कारण विचारण्यात आले. बाळ, गोपाळ व विष्णू यानी ठरवून ठेवल्याप्रमाणे—सर्व मुले गेली म्हणून आम्ही गेलो येवढेच गैरहजेरीचे कारण सागितले. पण पुढारी कोण होता ते सांगण्याचें त्यानी नाकारले. जनूची पाळी आली; त्या बापड्याला उत्तरहि सुचेना; तो रडू लागला. हेडमास्तरानी प्रत्येक मुलाला तीन तीन छड्याची शिक्षा दिली, व चार महिने जनूची नादारी काढून टाकून त्याच्या-कडून फी वसूल करण्याचा हुकूम दिला

जनूची नादारी गेली तेव्हा बाळ व त्याच्या विचाराच्या इतर मुलांना फारच वाईट वाटले. आधले दिवशी मी कटांत सामील होत नाही असे साफ सर्व मुलाना सागितले असते तर बरे झाले असते अशी जनूला हळहळ वाटत होती. आम्ही तुझे नुकसान होऊ देणार नाही असे आश्वासन देणारी मुले आता जनूला टाळू लागली, व तो भेटलाच तर म्हणत "तुझे तुला नव्हतें का कळत? आपल्या कृत्याबद्दल आपल्याला शिक्षा भोगणे प्राप्त आहे. करतानाच विचार करावयास हवा होता. आता हळहळून काय उपयोग?"

शेवटी बाळने जनूची चार महिन्याची फी भरली, त्यामुळे बिचाऱ्या जनूचें कसेबसें निभावले

# प्रकरण १९ वें

## मास्तरांची सभा

मागे सोळाव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे की, सर्व मुलांवर पोटच्या पोराप्रमाणे हेडमास्तराचे प्रेम होते, व मुलांच्या हिताकरता ते रात्रंदिवस झटत असत. मुलाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक उन्नतीकडे लक्ष देणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे ते समजत व तेवढ्याकरता अहर्निश यत्न करीत असत. खेळाच्या व अभ्यासाच्या वेळी ते मुलाबरोबर राहत व त्यांच्यांत मिसळून त्यांच्या अडचणी काय आहेत त्या समजावून घेऊन दूर करीत असत. आपल्या मोठेपणाची जाणीव त्यांना नव्हती म्हटलें तरी चालेल. प्रेमळपणाच्या, आपुलकीच्या व साध्या वागणकीमुळे मुलांना ते जवळचे वाटत असत; त्यामुळे मुले त्यांच्याशी अदबीने पण मोकळेपणाने वागत असत. ते मुलांना म्हणत "तुमच्या चुकांचा मला मुळीच राग येत नाही. चूक करणे हे स्वाभाविक आहे पण त्या चुकीचा फायदा अनुभवजन्य ज्ञानाच्या रूपाने न घेणे अक्षम्य आहे. नुकसान चुकांमुळे होत नाही, चुकांचा फायदा न घेतल्याने होते चुका न करतां उत्कर्षाचा मार्ग तडक गाठणारे दैववान पुरुष फार थोडे." मुलांच्या सान्निध्यांत राहून व त्याच्या नैसर्गिक प्रवृत्ति काय आहेत त्या अवलोकन करून, ज्या बाजूने जो मुलगा आपली बुद्धि चालवील त्या बाजूने त्याला प्रगति करण्याला ते वाव देत. ते स्वत: निर्व्यसनी व निरभिमानी होते. ते जितके हुशार होते तितकेच सालस होते. त्यांच्या चारित्र्याचा मुलाच्या मनावर परिणाम होऊन, त्याचा आदर्श पुढे ठेवून त्याप्रमाणे वागण्याचा मुले मनापासून प्रयत्न करीत. वासुदेवासारखा चांगला उमेदीचा मुलगा आढळल्यास हेडमास्तर तनमन लावून त्याला सर्वतोपरी गुणसपन्न करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत व नांवलौकिकास चढण्याची त्याची पूर्ण तयारी करून देत. इतरहि मुलांवर त्यांची चांगली देखरेख असे. मुलांच्या नैसर्गिक शक्ति सूक्ष्मपणें अवलोकन करून कोणता

मलगा कोणत्या धद्याला लायक आहे याचा आडाखा बांधून त्याप्रमाणे मुलांच्या पालकांना ते सल्ला देत. विद्यार्थ्यांप्रमाणे पालकांचाहि हेडमास्तरांवर पूर्ण भरंवसा असे. मुलाना मारून त्यांच्या कोमल हृदयांत भीति उत्पन्न करण्यासबंधी त्यांच्या मनांत तिटकारा असे, व नैतिक अपराध किंवा वाईट सवयी याखेरीज इतर कारणाकरता ते मुलांना मारत नसत. त्या त्या विषयांतील उपयुक्तता व खुब्या मुलांच्या निदर्शनास आणून तो विषय ते चित्ताकर्षक करीत असत, व मुलांची अवलोकनशक्ति व चिकित्सक बुद्धि जागृत करून मुलात त्या विषयाची आवड उत्पन्न करीत. कोणत्याहि मुलाला मठ्ठ व वाईट समजून त्याच्याकडे दुर्लक्ष ते करीत नसत. स्वभाववैचित्र्याला व बुद्धिस्वातंत्र्याला जगांत भरपूर वाव आहे व त्याप्रमाणे योजना केल्यास बुद्धीतील व स्वभावातील एककल्लीपणा चागल्या गुणाच्या विकासामुळे निघून जाऊ शकतो असे हेडमास्तरांचें म्हणणें असे. मुलगा मठ्ठ किंवा वाईट आहे या सबबीवर त्यांनी शाळेंतून कधीच काढून लावला नाही; उलट अशा सबबीवर मुलाला शाळेतून काढून टाकणे म्हणजे आपला कमकुवतपणा जाहीर करणे आहे असें त्यांचें ठाम मत होते.

शाळेतील प्रत्येक मुलावर व्यक्तिशः त्याचें लक्ष असे. प्रत्येक मुलाचें जास्तीत जास्त हित कसे साधतां येईल याविषयी ते नेहमी विचार करीत असत. अभ्यास, खेळ, वर्तणूक व सुदृढता या प्रत्येक बाबतीत हरएक मुलासबंधाने हेडमास्तर इतर मास्तराजवळ वारवार चवकशी करीत व जरूरीप्रमाणे त्या त्या मुलासबधाने उपयुक्त सूचना करीत किंवा अन्य उपाययोजना करीत. एखादा मुलगा अशक्त असला की, ते त्याला खेळकर मुलाच्या सगतीत देत व एखादा मुलगा खेळाडू असल्यास त्याची एखाद्या अभ्यासी मुलाबरोबर जोडी घालून देत. अनुकरणाने जोडीदाराचे गुण लागून अनायासें दोन्ही मुलांचें हित होत असे. गणेश, मधू, विनायक व रघू या कपूवरहि त्यांचें बारीक लक्ष होतें व योग्य उपायांनी त्या मुलांनाहि चांगल्या मार्गाला लावतां येईल असा त्यांना भरवसा होता, व झटून प्रयत्न केल्यास निराश होण्याचें कारण नाही असें त्याना वाटत होतें. बाळ, गोपाळ व विष्णू या मुलांसबंधाने त्यांना खात्री होती की, ती मुलें केवळ

हूड आहेत व त्यांच्या अंगी दुर्गुण नाहीत, येवढेंच नाही पण त्यांच्या अंगीं चांगुलपणा व कांही चांगले गुण प्रामुख्याने वास करीत आहेत; कदाचित् लबाड मुलाच्या चिथावणीने किवा एकमेकांच्या चुरशीने साहसाच्या कामाला तिघे प्रवृत्त होऊन त्याच्या हातून अविचाराचें वर्तन होत असावें व अजाणपणामुळेच पुष्कळशा सकृतदर्शनी खराब दिसणाऱ्या पण वास्तविक निरुपद्रवी गोष्टी त्याच्या हातून होत असाव्या.

दिवसेंदिवस बाळाच्या कांही ना काही कागाळचा हेडमास्तरांच्या कानावर येत गेल्यामुळे या प्रकरणांत त्याना जास्त लक्ष घालावे लागले. हेडमास्तर स्वतःशीच विचार करीत बसले होते, "या तीन मुलांच्या वागणुकीचा आढावा घेतां काय निष्कर्ष काढता येईल? त्याच्याविरुद्ध पहिली तक्रार म्हटली म्हणजे अस्वलाच्या पिजऱ्यात उडी घालण्याची: यांत त्यांच्या हातून कोणताच प्रमाद घडलेला दिसत नाही. त्यानी आपला जीव धोक्यांत घातला ही गोष्ट खरी; त्याबरोबरच प्रसगावधान व हिंमत हे सहसा न दिसणारे गुण त्याच्या अगी दिसून आले; या गुणाची किंमत फार आहे. दुसरी गोष्ट त्यांनी वर्गात उडविलेल्या फटाक्याची: वर्गात शिस्त बिघडल्याचा आरोप त्याच्यावर शाबीत होईल, पण त्यामुळे त्यांच्याकडे कोणताहि वाईटपणा–नैतिक कमीपणा येत नाही. अजाणपणे अशा गोष्टी मुलाच्या हातून होतातच. तिसरी बाब वसतिगृहांत उशिरा परत येण्याची: यात वासुदेवाबरोबर हिंडून सशोधनाची आवड त्याना लागणार असल्यामुळे, केवळ शिस्त मोडली या आरोपावर भिस्त ठेवून चालावयाचें नाही. शिस्तीकडे दुर्लक्ष करून चालावयाचे नाही हे जरी खरें तरी गुणागुणांतील उच्चनीचता सापेक्ष असून परिस्थिति लक्षांत घेऊन तारतम्यानेच ती ठरवली पाहिजे. यानतरची गोष्ट म्हणजे कट करून दोनदा शाळेतून गैरहजर राहण्याची: पहिल्या प्रसगाच्या वेळीं सर्वच मलें गैरहजर होतीं व त्याच्या भावना लक्षांत घेतां त्यासबधी जास्त विचार करण्याची जरूरच नाही. दुसऱ्या प्रसगी म्हणजे घटस्थापनेच्या दिवशी पांचव्या व सहाव्या वर्गातील मुलें पळून गेलीं व कट करून गैरहजर राहिलीं–ही गोष्ट खास योग्य नाही. त्या कटाचा पुढारीपणा मधूकडे होता. बाळाने त्याचप्रमाणे विष्णू व गोपाळ यांनी दिलेलें उत्तर मात्र

प्रामाणिकपणाचें दिसते. स्वतःच्या मर्जीविरुद्ध पण सर्व मुलाच्या मताप्रमाणे वर्तन त्याना करावें लागले असणें शक्य आहे. त्यानी दुसऱ्यावर दोष न लादता मिळालेली शिक्षा मुकाट्याने सहन केली. राहता राहिली बागवानाचे पेरू घेण्यासबधाची गोष्ट : हा अपराध मात्र असमर्थनीय आहे. हीच एक गोष्ट अशी आहे की, जीसबधाने कोणत्याहि तऱ्हेने त्याचें करणें रास्त होते असे म्हणता येणार नाही. पण या एकाच खोडीकरता—नव्हे अपराधावरून त्याचे इतर गुण दृष्टीआड करतां येणार नाहीत. एकदरीत पाहतां असें दिसतें की, ही तीन मुले एकत्र असल्यामुळे एकमेकाच्या प्रोत्साहनाने व चढाओढीने प्रत्येकजण काही तरी खोडी करून जातो. यावर उपाय म्हणजे त्याची जोडी फोडून प्रत्येकाला एकेका धिम्या व अभ्यासी मुलाच्या सगतीला लावून द्यावे. याचा सुपरिणाम असा होईल की, त्या शात व अभ्यासी मुलाच्या सगतीने याच्या अंगच्या खोडकरपणाला कांही आळा बसेल व त्याच्या सगतीने याचा काही अभ्यास होईल. तरी पण आपण एकटेच काही न ठरवता त्याचा ज्या ज्या मास्तराशी सबध येतो त्यांना विचारूनच ठरवणे बरे."

याप्रमाणे काही वेळ विचार केल्यानतर सर्व मास्तर एकत्र जमले असता हेडमास्तरानी ही गोष्ट काढली. बाळ, गोपाळ व विष्णू यांच्यासबधी व्यक्तिशः प्रत्येक मास्तराचे काय मत आहे याची हेडमास्तरनी विचारपूस केली. त्या घडीला तरी त्या तिन्ही मुलाविषयी कोणत्याहि मास्तरचें फारसें अनुकूल मत पडले नाही. कोणी त्याच्या वर्गातील दुर्लक्षाविषयी, कोणी त्याच्या खोड्याविषयी, कोणी अभ्यास करून न येण्याविषयी, अशा रीतीने प्रत्येक मास्तर त्यांच्याविषयी कांही ना काही प्रतिकूलच बोलले. तेव्हा हेडमास्तरानाहि थोडा विचार पडला. तरी पण आपण ठरवलेली विचारसरणी बरोबर आहे असा त्यांचा विश्वास होता. म्हणून त्यांनी आपले विचार सर्व मास्तराना थोडक्यात सांगितले. सर्वच मास्तरना ती मुलें हुषार व सद्गुणी असल्याचे कबूल होते. त्यांची मुख्य कुरकुर त्यांच्या उनाडपणाबद्दल होती. तें ऐकून हेडमास्तर म्हणाले, "ती मुले वयाने लहान आहेत. बालस्वभावाप्रमाणे अजाणपणे हूडपणा करीत असतील, पण त्यामुळे अभ्यासांत नुकसान होत नाही येवढेंच आपण पाहिले म्हणजे पुरे

आहे. लहान मुलांनी वयातीत माणसाप्रमाणे वर्तन करावे किंवा वर्गीत अगदी बाहुल्याप्रमाणे व थडपणाने बसून राहावें अशी अपेक्षा केल्याने लहान मुलांना त्रास होऊन त्यांच्या स्वाभाविक वृत्ती दाबल्या गेल्यामुळे ती संकुचित मनाची व कुचकामाची होतात, ही गोष्ट प्रत्येक शिक्षकाने व पालकाने लक्षांत घेतली पाहिजे. पतगाची दोरी पतगाचा तोल राखण्याकरता असते. पतंग वर उडवून दिला पाहिजे; वर गेला की वरच्या वातावरणाचीच त्याला ओढ लागते. " असा इशारा देऊन आपण त्या मुलांविषयी काय योजना करणार ती त्यांनी सर्व मास्तरांना कळविली; आणि त्यांची योजना इतर मास्तरांनाहि पसंत पडली.

## प्रकरण २० वें

# त्रिकूट तुटलें

मागील प्रकरणात सागितल्याप्रमाणे बाळ, गोपाळ व वष्णू या मुलासंवधी सर्व मास्तरांचे मत माहीत करून घेतल्यानतर व त्यांना आपली उपाययोजना कळविल्यानतरहि हेडमास्तर आणखी कांही वेळ विचार करीत बसले. ते स्वत.शीच वाळामबधाने बोलू लागले, " हा थोरामोठ्याचा मुलगा आहे. समजा तो थोडा अल्लड असला तरी तेवढ्या-वरून तो वाईट ठरत नाही तो मुलगा चागला आहे हे माझें मत बदलण्या-मारखे काहीच, मास्तराच्या या बैठकीत झालेल्या गोष्टीवरून, समोर आल्याचे मला दिसत नाही—नव्हे माझे झालेले मत बदलणे मला बरोबर वाटत नाही. येवढे मात्र खरें की, बाळ, गोपाळ व विष्णू या तिघांना यापुढे एकत्र राहू देता उपयोगी नाही. तो सदू चांगला अभ्यासी मुलगा आहे ; गर्भश्रीमंताचा मुलगा, खायलाप्यायला विपुल, कोणती काळजी नाही की काही ददात नाही. पण तो नेहमी आजारी असतो. केवळ अभ्यासावरून किंवा हुशारीवरून मुलाची किमत करणें योग्य नाही ; त्यांचे इतर गुणहि पाहिले पाहिजेत. बाळाचा दिलदारपणा व खेळाडूपणा पाहा. या गुणांत सदूला कोरे शून्य मार्क मिळतील. सदू नुसता घरघुशा आहे; त्यामुळे व्यवहार व जगाची माहिती त्याला कळणे शक्य नाही. बाळाला याच्या सगतीत ठेवला तर दोघांचाहि फायदा होईल. सघर्षणाने बाळाचे सद्गुण सदूला व सदूचे चागले गुण बाळाला लागतील. बाळ हा विष्णू व गोपाळ यांचा म्होरक्या आहे. तो अलग झाला की ती दोन्ही पोरे निवळतील. "

याप्रमाणे काय करावयाचे ते निश्चित केल्यावर हेडमास्तरांनी बाळाला बोलावून आणण्याचा हुकूम चपराश्याला दिला. चपराशी आला तेव्हा बाळ अगदी आनंदांत गर्क होता. चपराश्याचा निरोप ऐकून घ्यायला तो तयार नव्हता. कटाळून चपराशी परत जायला निघाला

तेव्हा बाळ भानावर आला; व त्याच्या मागोमाग जायला निघाला. हेड-मास्तरांचा गभीर चेहरा पाहून बाळ थोडा चपापला. या भेटीचा खास हेतु काय असावा हें त्याच्या लक्षात येईना. बाळ समोर उभा राहिल्यावर हेडमास्तर त्याला म्हणाले, "तूं, विष्णू व गोपाळ फार उनाडक्या करतां! तुम्हांला यापुढे एका खोलींत मी राहूं देणार नाही, म्हणजे तुमच्या खेड्यांना आळा बसेल. सातवीच्या मुलांच्या खोल्या रिकाम्या झाल्या आहेत, त्यांपैकी एका खोलींत तूं व सदू राहा. नीट अभ्यास केलास तर यदा तू पास होशील. यंदा पास झालास तर पुढील वर्षी प्रवेशपरीक्षेला तुला वसावें लागेल. सदूबरोबर अभ्यास केलास तर तुझा फायदा होईल. आताच सदूचें व तुझें सामान तुझ्या सध्याच्या खोलीसमोरच्या खोलीत ने पाहू." असें सांगून हेडमास्तरांनी बाळाला जावयाला सांगितले व सदूलाहि या नवीन योजने-प्रमाणे हुकूम सोडला.

झालेली हकीकत बाळाने येऊन गोपाळ व विष्णू याना सांगितली. बाळ आपल्या खोलीतून जाणार या बातमीने त्याना वाईट वाटलें. हेड-मास्तराचें आपल्याविषयी वाईट मत होत चालले आहे असा त्याच्या मनावर परिणाम त्या बातमीने झाला; त्यामुळे हेडमास्तरानी दिलेल्या हुकुमामुळे त्यांना भयहि वाटलें. बाळाला सदूसारखा मेषपात्र सोबती मिळाला याचें त्या तिघांनाहि वाईट वाटले. विष्णू म्हणाला, "काय तो तुझा मित्र! जरा दांडगाई करशील तर तो रडू लागेल. तुलाहि तो रड्या बनवील, व त्याच्यासारखाच पुस्तक घेऊन तूं दिवसभर बसशील."

एका क्षणांत ही बातमी सर्व वसतिगृहभर पसरली. बाळ, विष्णू व गोपाळ यांची जोडी तुटल्याचा गणेशकपूला आनद झाला, पण सदूला बाळाच्या नव्या खोलींत बाळाबरोबर राहण्याचा हेडमास्तरांनी हुकूम दिला हें ऐकून सदू आपल्या हातचा गेला या गोष्टीबद्दल वाईट वाटलें व त्यांच्या आनंदांत विरजण पडलें.

बाळ, गोपाळ व विष्णू या तिघांनी मिळून बाळाचें सामान भराभर समोरच्या खोलीत नेऊन टाकलें. सदूचें सामान नोकर आणत होता व तो आपल्या नव्या खोलींत एका खुर्चीवर पुस्तक वाचीत बसला होता. बाळसारखा आडदांड मुलगा खोलीत आला आहे, तेव्हा त्याचे मित्र जमून नेहमी

दगामस्ती करतील व त्यामुळे आपल्याला त्रास होईल अशी भीति सदूला वाटल्याशिवाय राहिली नाही.

सामान नीट व्यवस्थेने लावतांनाहि, त्या तिघांची दगामस्ती मधून मधून चालूच होती व जोडी तुटल्याबद्दल खेदाचे उद्‌गारही त्याच्या मुखांतून निघत होते.

"तुला नवीन मित्र मिळाला, आता तू आमच्याकडे कशाला येशील ?" विष्णूने सदूकडे पाहून डोळे मिचकावले.

"तू नाही आलास तरी आम्ही तुझ्याकडे येऊच," गोपाळ पुस्तकें टेबलावर ठेवीत म्हणाला.

"एक दीड वर्षाकरता हेडमास्तरांनी आपली जोडी तोडली नसती तर–" बाळ मनाशीच बोलल्याप्रमाणे पुटपुटला.

सदूला वाटले बाळाला माझ्याबरोबर राहणे आवडत नाही. सदू अत्यत सुस्वभावी व कोमल मनाचा मुलगा होता. बाळाला आपल्याबरोबर राहणें आवडत नाही या कल्पनेने सदूला वाईट वाटले. आपल्यामुळे दुसऱ्याला दु.ख किवा त्रास व्हावा ही कल्पना त्याच्या कोमल मनाला असह्य झाली. काही तरी बोलावे म्हणून तो बाळापाशी जाऊन उभा राहिला. तेव्हा इग्रजी पद्धतीने ओळख करून देण्याची ऐट आणून गोपाळ व विष्णू याना बाळ म्हणाला, "हे आमचे सहाध्यायी सदोबा." नतर गोपाळ व विष्णूकडे तुच्छतेने पाहिल्यासारखे करून बाळ सदूला म्हणाला, "ज्याच्या सगतीत राहणे योग्य नाही ते हे आमचे जुने मित्र गोपाळ व विष्णू." सदूला थोडे हसू आले. विनोद व खेळकर वृत्ति त्याला माहितच नव्हती. त्या मुलाचे मोकळेपणाने बोलणे व थट्टाविनोद करणे यामुळे सदूची करमणूक झाली. त्या मुलांनी आपल्या मनाचा तोल पूर्णपणे सांभाळून घेतला होता. कोणत्याहि गोष्टीचें ओझें मनावर फार वेळ राहू देणें बालस्वभावाला अनुसरून नाही. त्यानतर एकमेकांच्या अभ्यासासबधी चौकशी सुरू झाली. सदूची परीक्षेची पूर्ण तयारी पाहून अशा प्रकारची आपली तयारी नसल्यास आपण पास होणार नाही अशी भीति त्या तिघांना वाटू लागली.

सदूबरोबर राहू लागल्यानंतर कांही दिवस बाळाला जड्च गेले. त्याला

दंगामस्ती करण्याची नेहमीची सवय होती. स्वभावाप्रमाणे व सवयीप्रमाणे गप्प बसणें बाळाला शक्य नव्हते; तो सदूशी दंगामस्ती करावयास गेला की सदूचें तोंड गोरेंमोरें होई. हूडपणास अनुसरून बाळ कधी त्याला उद्धट-पणें बोलून जाई, तेव्हा सदू चुपचाप बसून राही. त्यामुळे बाळाला वाईट वाटे. आघाताला प्रत्याघात नाही, प्रतिस्पर्धी समोर नाही, यामुळे त्याचे सर्व अवसान नष्ट होऊन हिरमोडहि होत असे. त्याला वाटे की, सदू-सारख्या गरीब व सालस मुलाला त्रास देऊ नये हे प्रत्येक वेळी मी विसरून कसा जातों? त्या झपाटयांत तो आपल्या मित्रांकडे निघून जात असे व झालेल्या विरसाचा सर्व वचपा काढून घेत असे. आळस व कटाळा पूर्वी त्याला कधी माहीत नव्हता; पण नवीन व्यवस्थेमुळे कधी कधी त्याला कटाळा येत असे. त्या वेळी तो आपल्या जुन्या मित्राकडे जाऊन मनसोक्त दंगामस्ती करून पूर्ववत् ताजातवाना होत असे. कांही दिवस असे गेल्या-नंतर नवीन व्यवस्था त्याच्या अंगवळणी पडत चालली. त्यातून परीक्षा जवळ येत चालली होती म्हणून सदूच्या अनुकरणाने अभ्यास करावा असे त्याला वाटू लागले. अभ्यासात सदूची मदत त्याला होत असे. समजावून सांगून सदू त्याच्या अडचणी दूर करीत असे; त्यांत सदूला आनंद वाटत असे. सदू कोणाच्या भानगडीत न पडणारा मुलगा होता. तो नेहमी आपल्याच उद्योगांत—अभ्यासांत असे. त्याचा स्वभाव प्रेमळ व शांत होता. बाळकडे त्याचे खेळकर सोबती नेहमी येत, तेव्हा त्यांचें हमणे खिदळणे चालत असे; तरी त्यापासून सदूला उपसर्ग होतो असे सदूच्या मुद्रेवरून बाळाला कधीच दिसलें नाही. त्यामुळे सदूबद्दलचे बाळाचें मत बदलत चाललें. सदू म्हणजे एक पुस्तकांतला किडा व माणूसघाण्या मुलगा आहे असा त्याच्या-संबंधी बाळाचा ग्रह झाला होता तो पालटत चालला. सदूच्या अंगचा मन-मिळाऊपणा व सालसपणा यांचा बाळाच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्याच्या एकलकोंडेपणाबद्दल व नेहमी पुस्तक घेऊन बसण्याच्या सवयीबद्दल बाळाचा अनुकूल ग्रह होणे त्याचा स्वभाव लक्षांत घेतां शक्य नव्हतें. या मुलाला सारखें पुस्तक घेऊन इतका वेळ बसवतें कसें याचेंच बाळाला आश्चर्य वाटत असे.

इकडे सदूच्याहि मनांत बाळासंबंधी प्रतिकूल नसला तरी फारसा

अनुकूल ग्रह नव्हता. बाळाची धामधूम करण्याची प्रवृत्ति लक्षांत घेतां तें साहजिक होतें. प्रथम तो बाळाशी जरा बेतानेच वागू लागला. पण बाळाचा मोकळा व उमदा स्वभाव, निर्भीड व सरळ वागणूक, मुखावर दिसणारी हास्याची व विनोदाची झाक आणि सहवासात येणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला हर्ष वाटावा अशी वागण्याची ढब, यामुळे सदूचें मन सहजगत्या त्याच्याकडे आकर्षित झालें. बाळाकडे इतके दोस्त का जमतात याचे इंगित सदूच्या लक्षात येऊ लागले. बाळाकडे तासतास त्याची मित्रमंडळी येऊन गप्पाविनोद करीत बसत ही गोष्ट प्रथम सदूला बरी वाटत नसे व जरी तो बाहेरून तसे दिसू न देण्याविषयी खबरदारी घेई तरी या लोकांचा त्रास आपल्याला होऊ नये असे त्याला मनापासून वाटत असे. पुढे पुढे त्या मुलाच्या विनोदाच्या गोष्टी ऐकून करमणूक झाल्यामुळे सदूचे दिवस उल्हासात जाऊ लागले व त्यामुळे पूर्वी अभ्यासाचा जो एक प्रकारें कंटाळा येत असे तो येईनासा झाला. काही दिवसांपूर्वी बाळाचे दोस्त आले म्हणजे सदू जो शेवटपर्यंत हातचें पुस्तक खाली न ठेवतां तसाच बसून राही, तो आताशा त्या मुलाच्या गप्पागोष्टीत व विनोदात भाग घेऊ लागला होता. प्रथम त्याला फारसे बोलणे आवडत नसे व अभ्यासाव्यतिरिक्त तो कधी कोणाकडे जात येत नसे. पण बाळाच्या संगतीत राहिल्यापासून तो मधून मधून फिरावयास जाऊ लागला. खेळणे व थट्टाविनोद करणे या गोष्टी त्याला पूर्वीप्रमाणे टाकाऊ वाटेनाशा झाल्या. आपल्या स्वभावात थोडा पालट पडत चालला आहे हें उमजून आल्यावर सदूचे सदूलाच आश्चर्य वाटूं लागलें. मोकळेपणाने वागल्याने व हिंडल्याफिरल्याने सदूला चांगली भूक लागू लागली होती व त्याच्या मुद्रेवर टवटवी दिसू लागली होती. बाळाच्या सुस्वभावाचा पगडा सदूच्या मनावर बसण्याला फार दिवस लागले नाहीत. चार आठ दिवसातच तो सदूला आवडू लागला. पण बाळाच्या खेळाडू व विनोदी सुस्वभावाचा सुपरिणाम सदूच्या लक्षांत येण्याला जरा वेळ लागला. प्रथम सदूला वाटे की बाळ उगीच आपला वेळ खेळांत खर्च करतो. कांही दिवसांनी हें त्याचें मत बदलून त्याला एवढेंच वाटू लागलें की, बाळाने वाजवीपेक्षा जास्त वेळ खेळात खर्च करूं नये. केवळ सतत अभ्यास करीत राहणें यांतच आपलें सार्थक आहे व हेंच आपलें कर्तव्य

आहे, याव्यतिरिक्त आपल्याला कांहीच करणें उरत नाही, अशी जी सदूची विचारसरणी होती ती हळहळू बदलत चालली. विनोदप्रिय व खेळाडू वृत्तीच्या बाळाची उमद्या वागणुकीमुळे चार मुलांवर छाप राहते; उलट आपण एकलकोंडेपणाने अलग राहतो, त्यामुळे इतरांशी आपला संबध येत नाही व त्यांना आपला उपयोग होत नाही या दोन स्थितीतील तफावत सदूला कळूं लागली.

याप्रमाणे न कळतच एकमेकांच्या स्वभावांतील उणीव ते भरून काढीत होते. ते एकमेकांना आवडू लागले व लवकरच त्याची दाट मैत्री जमून ते एकमेकांवर भावडाप्रमाणे प्रेम करू लागले. सदू विचारवत असल्यामुळे झालेली स्थित्यतरे त्याच्या लक्षात येत. बाळाच्या कार्यप्रवृत्त मनाला या गोष्टीकडे लक्ष द्यायला फुरसत नसे. तो स्वभावत.च चांगल्या गोष्टी करून जात असे.

बाळ जोडीला असल्याने त्याचा अभ्यास करवून घेणे हे सदूला आपले कर्तव्य वाटूं लागले. नापास झाल्यास बाळाचे नुकसान होईल या जाणिवेने सदू जमेल तेव्हा त्याला अभ्यासाला घेऊन बसू लागला. अशा रीतीने बाळाचा बराच अभ्यास सदूने करून घेतला होता; उलट बाळाच्या आग्रहामुळे सदू खेळास जाऊ लागला व त्याची प्रकृति निकोप होऊन त्याच्या चेहऱ्यावरील पिगटपणा गेला व त्या जागी टवटवी दिसू लागली

परीक्षा जवळ येत चालल्या होत्या; मुलाचे अभ्यास जारीने चालू होते. सदू अभ्यासी मुलगा म्हणवला जात असे. परीक्षा जवळ आली तेव्हा त्याचा अभ्यासांत जास्त वेळ जाऊ लागला. विनायक व रघू यांना आम्ही हुशार आहोंत असें म्हणवून घेण्याची फार हौस असे. ते चोरून अभ्यास करीत व परीक्षा जवळ आली तरी आम्ही अभ्यास करीत नाही असें दाखविण्याकरता, दुसरी मुलें अभ्यास करतांना दिसली की, त्यांच्याकडे जाऊन ऐट आणून सांगू लागत, 'पाहा आम्ही दिवसभर खेळतों. तुम्ही इतका अभ्यास कसा करू शकतां कोण जाणे !' सदूकडे पाहून 'घोक्या' म्हणून ते त्याला चिडवीत. बाळ, गोपाळ व विष्णू हे नित्यक्रमाप्रमाणे खेळायला नियमितपणें हजर राहात असत. मुलें दिवसभर अभ्यास कसा करूं शकतात याचें त्यांना आश्चर्य वाटत असे. एक दिवस सदूचा व बाळाचा

अभ्यासाबद्दल वाद झाला. कांही वेळ अभ्यास झाल्यावर एकदम पुस्तक मिटून बाळाने खेळावयास जायची तयारी चालविली. सदूला वाटलें की, उरलेली चार पानें सपवून मग अभ्यास थांबवावा. बाळाने त्याला साफ सांगितले "यापुढे एक अक्षरहि माझ्या लक्षांत राहणे शक्य नाही. मी नापास झालों तरी चालेल ; पण खेळणें सोडणार नाही."

" परीक्षा झाल्यावर खेळ आहेच, तोपर्यंत खेळणे बद केलेस तर" सदू म्हणाला.

" मी खेळ सोडला तर माझा अभ्यासच होणार नाही. खेळलों तर पोटभर खाईन व अभ्यासाची ताकद येईल. एक वेळ जेवू नको म्हटलें तर चालेल, " बाळने उत्तर दिलें.

" बरें, तर आजपासून रात्री जेवू नकोस म्हणजे अभ्यासाकरता जागू शकशील. रात्र सुरू व्हावयाला अवकाश आहे तोवर हे खावयाला तुझ्याकडून कांही हरकत नसल्यास चल ये, " विष्णू खोलीत प्रवेश करीत असता म्हणाला. गोपाळ बरोबर होता, त्याच्या हातांत विष्णूच्या घरून आलेल्या फराळाच्या सामानाचा डबा होता.

समोर ठेवलेले पदार्थ—लाडू, चिवडा, करज्या भराभर खावयास बाळाने सुरुवात केली. गोपाळ म्हणाला, " जवळ जवळ महिनाभर उपास करावा लागणार आहे अशा तयारीने तू सपाटा चालविला आहेस. जागून अभ्यास करण्याला आजपासून सुरुवात करणार आहेस ना ? "

" खेळून आल्यावर रात्री आपल्याला झोप येते बुवा, " बाळ म्हणाला.

" तर मग तू अभ्यास करणार केव्हा ? " सदूने प्रश्न केला.

" चहा का पीत नाहीस रात्री ? म्हणजे अभ्यास होईल जागून, " विष्णूने सूचना केली.

" अरे ! तो चहा पिऊन घेईल अन् निजेल. " गोपाळ हसत हसत म्हणाला.

फार अभ्यास केल्यामुळे म्हणा किंवा अशक्ततेमुळे म्हणा पण परीक्षेच्या पंधरा दिवस आधी सदूला जोराचा ताप आला. बाळ, गोपाळ व विष्णू यांनी त्याची चांगली शुश्रूषा केली. त्यांनी दोन दिवस आपल्या अभ्यासाकडे दुर्लक्ष केलें. दोन दिवसांनी सदूला बरें वाटूं लागलें. आजारी-

पणांत आपली परीक्षा बुडते कीं काय याचें सदूला वारंवार भय वाटत होतें. बरा झाल्यावर, बाळाने, आपला अभ्यास बाजूस सारून, त्याची जी शुश्रूषा केली तीबद्दल सदूने कृतज्ञता व्यक्त केली. बाळ, गोपाळ व विठ्गू यांच्याप्रमाणे मी वागलों असतों का असे सदूच्या मनांत येऊन त्या तिघां-बद्दल सदूला आदर वाटू लागला. आपण आपली परीक्षा व आपला अभ्यास यापलीकडे कांही पाहत नाही. पण बाळाचा व त्याच्या मित्राचा अभ्यास फारसा झाला नसताहि त्यानी आपला अमूल्य वेळ खर्च केला असा विचार मनांत आला म्हणजे आपण केवळ पुस्तकी ज्ञानाची किंमत करतो याची त्यालाच लाज वाटूं लागली.

# प्रकरण २१ वें

## अभ्यासासंबंधी मुलांचे विचार

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे बाळ व सदू एकत्र राहू लागल्या-नतर परीक्षेच्या कांही दिवस आधी त्या मुलांमध्ये एक मनोरजक वाद झाला तो येथे सांगणें जरूर आहे.

फाल्गुनाचा महिना मुलाना फार धादलीचा असतो. परीक्षा जवळच आलेल्या असतात. परीक्षा जवळ दिसू लागल्यामुळे मुलांना अभ्यासाशिवाय दुसरें कांही सुचेनासे होतें. जिकडे तिकडे विद्यार्थी अभ्यास करून राहिले आहेत; कांहीची घोकपट्टी चालली आहे, काही टिपणे वाचीत आहेत व व काही परीक्षेत कोणते प्रश्न येणार याचा वाद करीत आहेत, असाच देखावा कोठेहि दिसावयाचा !

थडीचे दिवस सपून नुकतीच वसत ऋतूला सुरुवात झाली होती. वृक्षाना नवीन पालवी फुटून, झगझगीत वस्त्रे धारण करून लग्नमडपांत जमलेल्या पाहुण्याप्रमाणे वृक्षांनी कोवळ्या पानावर हिरवा, जांभळा, तांबूस वगैरे रंग धारण केले होते. जुनी वाळलेली कांही पाने कोठे कोठे झाडाना चिकटून होती. त्यातून वारा वाहू लागला की सळसळ आवाज होत होता. शिरीषपुष्पावर वसतबहर खुलून दिसत होता. त्याच वृक्षाच्या वाळलेल्या शेंगातून वारा वाहू लागला म्हणजे वाळचासारखा खुळखुळ आवाज वसतोत्सवाचें आगमन सुचवीत होता. वृक्षाच्या पानांवर वायूंच्या लहरी उठूं लागल्या म्हणजे ती पाने कंपायमान होत. आम्रवृक्षाच्या दाट छायेतून कोकिलाच्या कोमल कूजनाचा ध्वनि वसतोत्सवात समीलित होण्याकरता मुलांना गुनवीत होता. पण मुलांचें तिकडे लक्षहि नव्हते. होळीपुरतें कसेबसें एखाद दुसरा दिवस खेळून मुले पुन्हा अभ्यासात चूर झाली.

दुपारची वेळ. बाळ विष्णूच्या खोलीत खुर्चीवर बसला होता. समोर एक पुस्तक उघडे पडलेले होतें. वह्या व पुस्तके टेबलावर इतस्तत: पसरलेली होतीं. कोपर टेबलावर टेकून डाव्या हाताने डोकें खाजवत व उजव्या

हाताने पुस्तकाची पानें चाळत असलेला बाळ वाचनांत गढून गेला होता. भिंतीला टेकून असलेल्या आपल्या पलगावर गोपाळ बसला होता. समोर भूगोलाचे पुस्तक पडलें आहे, दोन्ही हातांत नकाशाचें पुस्तक घेतलें आहे, पाठ वळकटीला टेकली आहे अशा थाटांत भूगोलावरील प्रदेशांचा शोध लावण्यांत गोपाळ रमला होता. एका हातात पुस्तक घेऊन हळूहळू पावलें टाकीत येरझारा घालीत विष्णूचें वाचन चालू होतें. जो तो आपल्या अभ्यासांत गढून गेला होता. परीक्षा चारसहा दिवसांवर आल्या-मुळे वर्ग रोडावले होते. ज्यांना कठीण भाग मास्तरकडून समजावून घ्यावयाचे होते किंवा ज्यांना मास्तरांनी शाळेत बोलावले होतें अशांखेरीज बाकीची मुले आपल्या खोलीत बसून अभ्यास करीत होती. ही सवलत फक्त वरच्या वर्गांना होती. खालच्या वर्गांतील विद्यार्थी अजूनहि वक्त-शीर शाळेंत जात होते. अर्ध्या तासाने सर्वच मुलें मधल्या सुटीत परत आलीं असती. पुस्तकाचें एक मोठें ओझें घेऊन आपल्या खोलीतून घाई-घाईने बाहेर पडताना सदू गोपाळला दिसला. गोपाळने हातांतील पुस्तक खाली ठेवले व 'ए ओझेवाल्या गाढवा इकडे ये' म्हणून त्याने सदूला हाक मारली. हाक ऐकून सदू तिकडे वळला. आपल्या दोन्ही हातानी गढघ्याला विळखा घालून गोपाळने शरीराचे गाठोडे बनवले व उजव्या गुढघ्यावर हनुवटी टेकून तो डोलू लागला. कीव करण्याची मुद्रा धारण करून तो सदूकडे पाहू लागला. विष्णू विरुद्ध बाजूला असलेल्या खिडकीपर्यंत पोह-चला होता; तो सपसप पावलें टाकीत दाराशी आला. सदूजवळचा पुस्त-कांचा बोजा त्याने काढून घेतला व गोपाळपाशी जाऊन म्हणाला, 'तुला बोलूं नको म्हटले होतें ना! दप्तराच्या या बंदांनी तुझ्या जिभेला लगाम घालतों व एका गाढवावरचें ओझे काढून या दुसऱ्या गाढवावर लादतों म्हणजे या ज्ञानाच्या भाराखाली तुझे लांब कान झाकून जातील." असे म्हणून विष्णूने ती पुस्तकाची पिशवी गोपाळच्या पाठीवर आदळली. या धांदलींत सदूची टोपी गोपाळजवळ पडली.

"या टोपींतील डोकें हरवलें आहे," सदूची जवळ पडलेली टोपी उचलून घेत गोपाळ ओरडला.

"टोपीच्या किमतीइतकी देखील त्या डोक्याची किमत नाही," विष्णूनें उत्तर दिलें.

"पुष्कळ निरुपयोगी गोष्टी त्या डोक्यांत साठविल्या आहेत; पहा एखादा उकिरडा हुगत पडले असेल तें," बाळ म्हणाला.

सदूने विष्णूला एक चपराक दिली व एक हात टोपी व दुसरा हात दप्तर घेण्यासाठी त्याने पुढे केला. गोपाळच्या हातची टोपी गेली पण त्याला दप्तर सापडले. त्यातून एक एक पुस्तक काढून तो पाहू लागला. शेवटी संस्कृतचे पुस्तक हातात घेऊन 'लुट् टू व्यॅलो' असे जोरजोराने तो घोकू लागला. "लुट् म्हणजे काय रे?" विष्णूने आपलें इतिहासाचे पुस्तक बाजूला ठेवून विचारले.

"त्यात काय आहे रे? लुट् म्हणजे व्यॅलो."

"व्यॅलो म्हणजे काय?"

"व्यॅलो म्हणजे लुट्," गोपाळने पुन्हा ठसठशीत आवाजात उत्तर दिलें.

बाळ आतापर्यंत हा प्रकार मुकाट्याने पाहत होता. तो ओरडला, "अशी पोपटपची काय करतोस? 'लुट् टू व्यॅलो' 'व्यॅलो म्हणजे लुट्' ऐकले काय बडबतोस ते. पण दोहोंचा अर्थ काय?"

सदू त्याची गमत पाहून हसू लागला. तो म्हणाला, "पण काय रे? लुट्चा अर्थ मराठीत का दिला नाही? म्हणजे चटकन नसता का आपल्या ध्यानात आला." सदू शाळेत जाण्याचे अजिबात विसरून गेला.

गोपाळने पुन्हा सुरुवात केली, "लुट् टू व्यॅलो, लुट् टू व्यालो, इंग्रजी पुस्तकांत मराठी अर्थ कसा देतील? इंग्रजी अर्थच बरोबर आहे. डॉ. भांडारकराना मराठी येत नव्हते असें समजतां का?"

विष्णूने टाकलेले इतिहासाचे पुस्तक बाळाने घेतले, व तो ते वाचू लागला, "शिवाजी हू वाज् दी चीफ् ऑफ् मौटेन......"

विष्णूच्या ओरडण्याने बाळाचें वाक्य अर्धवटच राहिले, "पण काय रे इतिहास इंग्रजींतून काय म्हणून शिकवितात?"

"अरे सोपी गोष्ट! परीक्षा इंग्रजीतून होते म्हणून," हुशार विद्यार्थी मास्तरला चटकन उत्तर देतो त्याप्रमाणे गोपाळ म्हणाला.

वासुदेव याच वेळीं तेथे आला होता. त्याने मध्येच म्हटले,

" देशी राजांना इंग्रजीत शिव्या दिल्या म्हणजे त्या तितक्या झोंबत नाहींत म्हणून."

वासुदेवाची प्रवेशपरीक्षा संपत आली होती. एखाद दुसरा सोपा विषय राहिला होता. परीक्षा संपल्यावर तो शाळा सोडून जाणार होता. या मुलांची संगत सुटणार म्हणून आताशा तो वारंवार यांच्याकडे येत असे. एक खुर्ची घेऊन तो बाळाच्या शेजारी जाऊन बसला. सदू गोपाळच्या शेजारीं बसला होता. विष्णू टेबलावर कोपरें टेकून ओणवा उभा राहून आपल्या इंग्रजीच्या पुस्तकाकडे पाहत होता.

वासुदेवाला पाहून विष्णूला आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्याचा मोह उत्पन्न झाला. त्याने आपले बोलणें चालू ठेवले, " आपण इंग्रजीतून इतिहास शिकतो. कारण तो मराठीतून चूक ठरतो म्हणून. ' शिवदुशाराव 'याचें मराठीत भाषांतर सदाशिवराव असें करतात. ते साफ चूक आहे."

" भाषांतर या शब्दाचा अर्थ कसा करता प्रोफेसरसाहेब?" बाळाने अडवलें. तिकडे लक्ष न देतां विष्णूने आपले बोलणे चालू ठेवलें, " भूगोल इंग्रजीतून कां शिकवतात हे तर सहज समजले पाहिजे. भूगोल प्रायः इंग्रजांच्या ताब्यात आहे म्हणून. गणित इग्रजीतून शिकलेच पाहिजे. केंब्रिज हें गणित विद्येचे माहेरघर आहे. तेथे मराठीतून गणित कसें शिकवनां येईल ?"

विष्णूचें विद्वत्ताप्रचुर भाषण ऐकून सर्वांना गमत वाटली. गोपाळने इकडेतिकडे फेकलेली आपली पुस्तके सदू गोळा करू लागला. त्या गडबडीत त्याचा तास चुकला होता. आपल्या काही अडचणी मास्तरांना विचारण्याकरतां सदू शाळेत जाणार होता, पण उशीर झाल्यामुळे आता तो तेथेच थांबला.

" बा विष्णो ! तू केवढा विद्वान आहेस रे ! मग वर्गांत तुझी बुद्धि कशी अडेलतट्टूप्रमाणे अडून बसते किंवा चौफेर उधळते !" बाळ म्हाणाला

" मध्ये बोलूं नका. " मास्तरांच्या बोलण्याचा आविर्भाव आणून विष्णू पुन्हा बोलू लागला, " भूगोल मराठीत शिकवल्याने हिमालयाला क्षुद्रपणा वाटून एखादा मैल तो उंचीत कमी व्हावयाचा ! इतिहास मराठीत शिक-

वल्याने मराठींत केलेली स्तुति क्लाईव्हच्या आत्म्याला कळणार नाही. इतिहासाचें तेज त्यामुळे कमी होईल."

"क्लाईव्ह कोणत्या तारखेला जन्मला चटकन सांग," बाळ मध्येच म्हणाला.

विष्णू एकदम गोंधळल्यासारखा झाला. त्याला वाटले असावें खरोखरच मास्तरानी प्रश्न विचारला कीं काय ! त्याने काखेंत हात चोळत म्हटलें, " सांगतो मास्तर. जिभेवर उत्तर आहे." विष्णूची तारांबळ पाहून सर्वजण हसूं लागले.

सदू हा सर्व खेळ गुपचूप पाहात होता. त्याच्या सरळ स्वभावाला अनुसरून तो पुन्हा म्हणाला, "खरेच ! हे सर्व विषय मराठीतूनच का शिकवूं नयेत. आपल्याला सोपे नाही का जाणार ? "

गोपाळ भेदरल्यासारखे करून म्हणाला, " नको रे बाबांनो मराठी ! त्या ऱ्हस्वदीर्घाच्या वळणांतून व अनुस्वारांच्या गोटाडीतून मार्ग काढतां काढतां माणूस मेटाकुटीला येतो."

"मराठीचे स्पेलिंग इंग्रजीसारखे कठीण झाल्याशिवाय इंग्रजीची योग्यता मराठीला कशी प्राप्त होईल ?" बाळ म्हणाला.

"मातृभाषेचा असा अपमान करू नये," सदू म्हणाला. "माझ्या बाबांना कुठे इंग्रजी येते. आपले काम ते करतात की नाही. आमच्या आईला इंग्रजी येत नाही. पण तिचें कुठें अडले आहे त्यामुळे."

"नसेल ! तुझी आई म्हणूनच विद्वान–नव्हे विदुषी–नाही. इंग्रजी शिकल्याशिवाय आजकाल विद्वत्ता येणार कशी ? आम्ही सर्व विद्वान् होणार समजलास?" विष्णू एक खुर्ची ओढून तीवर बसता बसता म्हणाला.

"ती राजभाषा आहे म्हणून शिकली पाहिजे," बाळ म्हणाला.

"आम्हाला कुठे राजाशी बोलायला जावयाचे आहे," गोपाळ म्हणाला.

"इन्स्पेक्टरशी तर इंग्रजीत बोलले पाहिजे ना ?" विष्णूने उत्तर दिलें.

"इन्स्पेक्टरला मराठी येत नाही, हें तुला माहीत नाही ?"

"आम्हां इतक्या लोकांना इंग्रजी शिकण्याचा त्रास देण्यापेक्षा," सदूने पुन्हा प्रश्न केला, " तेच का नाही शिकत मराठी ? म्हणजे मग

आमची परीक्षा मराठीतच नाही का होणार ? मास्तर तरी असें का करतात ? का नाही आम्हाला सर्व विषय मराठींतून शिकवत ! त्यांना तरी मराठी येतें ना ! त्यांनी आमची परीक्षा मराठीतून का घेऊ नये ? ”

“ त्याना परवानगी पाहिजे ना मराठीतून शिकवायला ! ते कसे मराठीतून शिकवतील व परीक्षा घेतील ? ” गोपाळने उत्तर दिलें.

“ त्यांना कोणाची परवानगी पाहिजे ? ”

“ कोणाची म्हणजे ! इन्स्पेक्टरची–डायरेक्टरची–सर्व साहेबाची,” बाळाने उत्तर दिलें.

“ त्यानी परवानगी का देऊ नये ! आपल्याला सोपे जाईल हे त्यांना कळत नाही काय ? ”

“ मराठीतून शिक्षण चांगले होऊच शकत नाही ही ठाम–निश्चित गोष्ट आहे. दोन आणि दोन चार होतात हे मराठीतून चांगले समजावून देतां येत नाही असें सर्वच विद्वान् लोक म्हणतात. ”

विष्णू उभा राहिला व सदू आणि बाळ याना गप्प राहण्यासाठी दटावून पुन्हा बोलू लागला, “ तूच म्हणालास तुझ्या आईला इंग्रजी येत नाही म्हणून. इंग्रजीत आमटीला करी म्हणतात. करी आण म्हटलेस तर तुझी आई कढी आणील. मग बोल, आपल्यालाच नाही, सर्वांना इंग्रजी शिकण्याची आवश्यकता नाही कशी ? ”

बाळ खुर्चीवरून उठला व विष्णूजवळ जाऊन त्याचे दोन्ही कान धरून म्हणाला, “ इसापनीतीतील को·ल्याप्रमाणे त्या करीच्या भाड्यात तुला बुडवून काढतो म्हणजे मग तुला इंग्रजी विसरून ‘ जनावरांच्या लटक्या राजाची ’ भाषा बोलावी लागेल. ”

“ मराठीत नाही का ऱ्हस्वदीर्घ व अनुस्वार मुलाना सतावून सोडीत, ” गोपाळ आपला अर्धवट राहिलेला विषय पुढे चालविण्याच्या उद्देशाने बोलू लागला. “ नाव हा शब्द वापरल्याने नाही का अर्थ लक्षांत येत ? त्याचे नाव काय ! असा प्रश्न विचारल्याने कोणी ‘ त्याची होडी काय ’ असा नाही ना अर्थ करीत ? ”

बाळ म्हणाला, “ व्याकरणकारांना शब्दभेद ठरवावयाचे असतात ना ? त्याकरता ते असे फरक करतात. ”

गोपाळ चवताळून बेडकाप्रमाणे ओरडला, " अरे ! तो व्याकरण-कारांचा खेळ होतो पण आमचा जीव जातो ना ! "

बाळ म्हणाला, " त्यापेक्षा इग्रजी नाही का जास्त कठीण ? त्यात तर कसलाच ताळमेळ नाही. ' सी ओ एल् ओ एन् इ एल ' याचा उच्चार म्हणे ' कर्नल. ' स्वरव्यजनाचा असाच घोटाळा. सी अक्षराचे दोन उच्चार ! आम्हा विद्यार्थ्यांचा विश्वासघात करण्याकरिता कांही ना काही अडचणी चहूकडे पसरवून ठेवल्या आहेतच ! "

" मास्तराना वाटते आम्ही विद्वान होऊ...." विष्णू म्हणाला.

" नाही परीक्षा पास होऊ नये, " गोपाळने अर्धवट राहिलेल्या वाक्याला पुस्ती जोडली.

विष्णूला पुन्हा पूर्वीप्रमाणे आवेश आला, " पदार्थविज्ञानशास्त्र मराठीतून शिकवल्यास काय अग्नि दु:खाने अश्रु गाळून पाण्याचे पाट वाहतील ? का वर्गात मराठीतून सूर्यमालेचें वर्णन सुरू झाले म्हणजे ग्रहाची गति बद पडेल ? याना वाटतें तरी काय ? "

सदूची एकएक वही घेऊन गोपाळ पाहू लागला, " ही निबध-रचनेची वही, ही शुद्धलेखनाची वही, ही अर्थाची वही, ही भाषातराची, ही व्याकरणाची, ही आणखी एक—अबब ! एकेका विषयाकरिता सात सात वह्या तर पाच विषयाकरता पस्तीस वह्या. या वह्यांच्या ओझ्याखाली बिचारा सदू कसा चिमणीसारखा दीन होऊन गेला आहे. "

" आता पूर्वीचा ' बहुश्रुत ' शब्द अयोग्य होईल. सदूला ' बहुलेख्या ' म्हणावें लागेल, " स्टोव्ह पेटवत विष्णू म्हणाला. " नव्हे खर्डेघाशी, " बाळने दुरुस्ती सुचविली. स्टोव्ह धडधड जळू लागला. त्यांतून भुर् भुर् निळाया ज्वाला निघू लागल्या. थोड्याच वेळात चहा तयार झाला. सदूने प्रत्येकासमोर एकएक पेला भरून ठेवला. वासुदेवाने चहा घेण्याचें नाकारले. ' चहा हें थंड देशांतले पेय आहे, आपण उष्ण देशांतले राहणारे. आपण चहा एखादवेळ औषध म्हणून घ्यावा. सर्बतासारखी थड पेयेंच आपणाला योग्य ', असें म्हणून वासुदेवाने दूध, पाणी व साखर यांच्या मिश्रणाने थंडगार पेय बनविलें व तेंहि सर्वांबरोबर बसून तें पिऊ लागला. वासुदेव आतापर्यंत सर्वांचें बोलणें स्तब्धपणे ऐकत होता. वासुदेव बोलूं लागला :

" तुम्हां सर्वांचें बोलणे मी लक्ष देऊन ऐकलें. तुमचें म्हणणें वाजवी आहे. आपल्याला मातृभाषेतून शिक्षण दिल्यास आपले पुष्कळ निरर्थक श्रम वाचतील. आपल्याला प्रत्येक विषय नीट कळून आपले विचार चांगल्या रीतीने प्रगट करतां येतील. इंग्रजी शिकून आपण केवळ पढीक झालों आहोंत. साधी कल्पना किती तरी प्रयासानी व शब्दांचें अवडबर माजवून आपण इंग्रजीत सागू शकतों. तिकडचेंहि आपणाला नीट येत नाही व एथलेंहि सुटतें. असे अर्धवट आपण होतो. आपल्या कल्पना आपल्या भाषेत धडपणे सागतां न आल्यामुळे आपल्यातील बिनशिकलेल्या लोकाशी आपल्याला नीट बोलतां येत नाही व त्याना आपले विचार नीट सागतां येत नाहीत, म्हणून त्यांच्यापासून आपण दूर राहतो. आपले विचारहि अर्धवट इंग्रजी तऱ्हेचे होतात व येथील विचारांशी त्यांचा मेळ राहत नाही. आपला आचारहि तसाच होतो, इंग्रजांची केवळ नक्कल करण्यात आपण खुष असतों.

"कांही अडचणी असतील ; नाही असे नाही. उदाहरणार्थ मराठीत पुरेशी क्रमिक किंवा शास्त्रीय विषयावर पुस्तकें नाही म्हणतात. पण त्यावर पुस्तकें लिहिणें हाच उपाय आहे. तो टाकून सर्वांनाच इंग्रजी शिका म्हणणे हा द्राविडी प्राणायाम नाही काय ? काही थोड्या जणानी निरनिराळ्या परकीय भाषा शिकून त्या भाषांतील ज्ञानभांडार मातृभाषेतून सर्वांना प्राप्त करून दिलें म्हणजे पुरे आहे. "

लवकरच परीक्षा होऊन निकाल लागला. सदू परीक्षेत उत्तम रीतीने पास झाला, व उत्तम गुण मिळविल्याबद्दल त्याला कांही बक्षिसे मिळाली. बाळ, गोपाळ व विष्णू हेहि परीक्षेत उत्तीर्ण झाले. शाळेत पाय टेवल्यापासून जी त्यांची गट्टी जमली होती ती तशीच कायम राहिली. बाळ सदूला गमतीने म्हणाला, "तू पास झालास तसे आम्हीहि पास झालों. मग जीव तोडून अभ्यास करून तूं अधिक काय मिळवलेस ? " मी अभ्यासांत चांगला आहें, मी बक्षिसें मिळविली याची मातबरी सदूला पूर्वीप्रमाणे वाटेनाशी झाली होती. बाळाच्या उमद्या व थोर स्वभावाची किंमत त्याला जास्त वाटूं लागली होती. शरीरसामर्थ्याचें महत्त्वहि त्याला पटलें होतें.

# प्रकरण २२ वें

## भांडणाची पुनरावृत्ति

बाळ सुरुवातीपासून मोठ्या मुलांमध्ये खळत असे. खेळात त्याचें कौशल्य व प्रगति पाहून मोठी मुले खुशीने त्याला खेळावयास घेत असत. चारपांच वर्षांच्या आतच तो मोठ्या मुलांच्या सामन्यामध्ये मधून मधून खेळू लागला होता. पुढे पुढे तर प्रत्येक सामन्यात त्याचे नाव पक्कें ठरून गेले होतें. लवकरच तो नायक (कॅप्टन) होईल असे जवळ जवळ ठरून गेले होते. क्रिकेट, फूटबॉल, हॉकी वगैरे खेळांत तसेंच आट्यापाट्या, खोखो, डूडू, सुरपारब्या, विटीदाडू या देशी खेळात तो निष्णात होता. उच उडी, लांब उडी, धांवणे, पोहोणें इत्यादि खेळात त्याने पुष्कळ वेळा इनामे मिळविली होती. उत्तम खेळाडूचे गुण अगी असलेली इतरहि मुले होती. पण सर्वांगीण निष्णातपणा व नायक होण्याला लागणारे गुण बाळाच्या अगी असल्यामुळे तोच नायक होण्याला योग्य आहे असे—मास्तर व मुलें—सर्वानुमतें नक्की ठरल्यासारखें झालें होतें. यापूर्वी मधूनमधून दुय्यम नायकाचे काम त्याच्याकडे देण्यांत आले होते. दुय्यम गणाच्या (टीम) नायकाचें काम त्याने कित्येक दिवस केले होतें. खेळण्याची त्याची तडफ व सर्वांना सभाळून नेण्याचा त्याचा स्वभाव, यामुळे त्यानें चागले नाव कमावलें होतें. हॉकी, फूटबॉल, क्रिकेट यांच्या सामन्यात दुय्यम गणाला अनेक वेळा त्याने विजय मिळवून दिला होता.

सहावीतून सातवीत गेल्याने बाळाला आनद झाला होता. सदू, गोपाळ व विष्णू पास झाल्याने त्याच्या आनदाला सीमा उरली नव्हती. शाळेंतील कार्यक्षेत्रांत मोठेपणा तसाच कर्तेपणा याच मडळीकडे आला होता.

प्रवेश परीक्षेला बसलेल्या मुलांपैकी काही निघून गेले होते. राहिलेले जाण्याची तयारी करूं लागले होते. शाळेंत शिवजयन्तीचा उत्सव दरवर्षी होत असे. दोनचार दिवसांवर उत्सव येऊन ठेपला होता. मुलांच्या तर्फे उत्सवाची तयारी सपाटून चालू होती. उत्सवाची सर्व कामगिरी

कर्तेपणाने बाळाकडे व त्याच्या मित्रांकडे होती. परीक्षा संपून गेल्यामुळे व वरच्या वर्गात गेल्यामुळें त्यांची मनें उल्हसित झाली होती. अहमहमिकेने ते शिवजयंतीची तयारी करीत होते. सदू पूर्वीप्रमाणे एकलकोंडा राहिला नव्हता. तोहि आपल्या मित्रांना मनोभावाने मदत करीत होता. प्रवेश परीक्षा झाल्यामुळे शाळा सोडून जात असलेल्या मुलाना आपल्याकडे दुढ्ढाचार्यपणा आला आहे असे वाटे. त्याच्याकडेच आतापर्यंत कर्तेपणा असे. पण चार शिळोप्याच्या गप्पा मारण्याचा हक्क आपणाला प्राप्त झाला आहे असे ते समजू लागले होते. पूर्वीच्या संमेलनांतल्या व उत्सवातल्या मौजेच्या गोष्टी आठवून ते बोलत बसत होते. उत्सव व संमेलनें कशी करावी याबद्दल उपदेशाच्या गोष्टी ते जमलेल्या मुलाना सांगत होते.

शाळेतील प्रमुख नायक निवडण्याविषयी त्याच्या गोष्टी सुरू होत्या. ती निवडणूक शिवजयंतीच्या उत्सवांत होणार होती. मागला नायक पुरुषोत्तम नांवाचा एक विनोदी मुलगा होता व व्यवस्थापक मंडळाचा मंत्री वासुदेव होता. पुरुषोत्तमाला रघू व मधू ही मुले कशी आहेत हे माहीत होतें. त्याला ती मुले आवडत नव्हती. रघू व मधू यानाहि माहिती होते की पुरुषोत्तमाचा कल बाळाला नायक करण्याकडे आहे. रघूच्या मनांतून पुढील वर्षाकरता आपणच नायक निवडले जावे असे फार होते. बाळाइतका नसला तरी रघू खेळांत चांगला तरबेज होता. तालमीची त्याला फार हौस होती व त्यापायी त्याने एक दोन वर्षे गमावली होती. बाळ लहान असला तरी तो रघूचा प्रतिस्पर्धी असल्यामळे रघू मनांतून बाळाचा द्वेष करीत होता. बाळाचा नकशा उतरावा व आपला बडेजाव व्हावा या दुहेरी हेतूने त्याला नायक व्हावेंसें वाटे. पुरुषोत्तमाने आपला पक्ष घ्यावा व आपणास निवडणुकीत मदत करावी म्हणून तो त्याची अनेक प्रकारें खुशामत करू लागला. मधूलाही वाटे की आपण मंत्री व्हावे म्हणजे आपली इज्जत वाढेल. वासुदेवपाशी ही गोष्ट काढण्याची त्याला हिंमत होत नव्हती. वासुदेवाने वाळवटांत चेंडूप्रमाणे फेकून दिल्या दिवसापासून वासुदेवाची त्याला भीतीच वाटत होती. मधूलाहि ही गोष्ट पुरुषोत्तमाजवळ काढावी असें वाटलें. रघू व मधू आताशा दिवसांतून तीन चार वेळां पुरुषोत्तमाची गाठ घेऊन त्याचें मन अनुकल करून घेण्याचा प्रयत्न वारंवार करीत होते. आपल्या मित्रमंड-

ळींत बसला असतां पुरुषोत्तम सहज थट्टेने म्हणाला, "सूर्य व चंद्र यांना राहु व केतु यापैकी एकेकच ग्रह भीति दाखवीत असतो. पण मला रघू व मधू या राहुकेतूच्या जोडीने गागरून टाकले आहे. मी झोपत देखील या जोडीच्या मुद्रा पाहून दचकून उठतो. 'मला नायक करा' 'मला मत्री करा' असें त्याचें नेहमीचे रडगाणे माझ्या कानांत सारखे घूमत असतें."

शाळेत दरवर्षी खेळांचे सामने व समेलन याखेरीज गणेशोत्सव, हनुमानजयति व शिवाजीचा जन्मदिवस हे उत्सव साजरे केले जात. मागल्या वर्षी मत्री या नात्याने सर्व उत्सवाची व्यवस्था वासुदेवाने ठेवली होती. गणपति-उत्सवात त्याने एक नवीनच टूम काढली होती. त्याने एक लहानसें प्रदर्शन भरविले होते व त्यात मुलांनी तयार केलेल्या हस्त-कौशल्याच्या वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. प्रदर्शन फारच यशस्वी झाले होतें. ते पाहण्याकरता लोकाची गर्दी जमत असे. नकाशे, पृथ्वीचे गोल, भूरचनेचे नमुने,चित्रे,ड्राइगचे नमुने इत्यादि वस्तू मुलानी प्रदर्शनात मांडल्या होत्या. काहीनी मातीची चित्रे तयार केली होती. त्यात देवताची, ऐति-हासिक पुरुषाची व मोठमोठ्या व्यक्तीची चित्रे होती. कांहीनी खेळांतील सायकल, गाडीचे इजिन, विमान इत्यादि कलाकौशल्याचे नमुने तयार केले होते. एकाने जाड कागदाचे घर बनवून ते चागले सजवले होतें. त्या प्रद-र्शनात इतरापेक्षा वासुदेवाच्याच सर्वात जास्त वस्तू होत्या. वासुदेवाने आपल्या खोलीतील सर्व सामानच तेथे आणून मांडले होतें. त्यात ग्रहमाला व लाकडाचे एक घड्याळ या वस्तू फार प्रेक्षणीय होत्या. त्याच्या इतर वस्तू शास्त्रीय विषयाच्याच होत्या. त्याचे निरनिराळ्या रंगाचे दगड चित्ताकर्षक रीतीने माडून ठेवले होते. शेजारीच बगळ्याचा सापळा व फुलपाखरांचें कपाट ठेवले होते. प्रदर्शनाखेरीज इतरहि कार्यक्रम त्याने चागला आखला होता. त्याने स्वतः गणपतीपूजेवर एक प्रवचन केलें होतें.

शाळेचे वार्षिक समेलनहि वासुदेवाने कोणाला नांवें ठेवतां येणार नाहीत अशा रीतीने नीटनेटकेपणाने पार पाडलें होतें. त्यांत खेळांचे सामने, वादविवाद, गाणीं, नकला, मेजवानी वगैरे कार्यक्रम त्याने नियमित वेळी इतक्या थाटाने व व्यवस्थेने साजरा केला की, सर्वांनी त्याची तारीफ केली. काटकसर करून उरलेला पैसा लोकोपयोगी कार्याकरता देण्याचा

त्याने ठराव पास करून घेतला. तीनचार वर्षांपासून वासुदेवानें. दर शनिवारी सायकाळीं जेवणापूर्वी रामदासस्वामीकृत भीमरूपी स्तोत्र म्हणण्याचा प्रघात पाडला होता व त्या निमित्ताने दर शनिवारीं प्रसाद वाटणे सुरू केले होतें. शनिवारी आरती झाल्यावर प्रसाद ग्रहण करून मग सर्वांनी जेवावयास बसावें; त्यामुळे शनिवारी सायकाळी आरतीकरता सर्वांनी एकत्र जमण्याचा प्रघात पडून गेला होता. पुढे हा एक वसतिग्रहाचा कार्यक्रम ठरून शनिवारकरिता मुले आळीपाळीने प्रसाद आणू लागली. कांही दिवसांनी वर्गणी जमवून मारुतीची मूर्ती जेवणाच्या दालनांत उच व ठळक ठिकाणी माडण्यात आली होती. ही मूर्ती हनुमज्जयतीला मोठ्या समारभाने मांडण्यात येऊन त्या दिवशी एक मेजवानी करण्यांत आली. पुढील वर्षीहि हा उत्सव साजरा करण्यात येऊन तो एक वार्षिक कार्यक्रम ठरून गेल्यासारखा झाला. उत्सव वासुदेवाने सुरू केला होता. या वर्षी तो शाळा सोडून जाणार होता. आपण हजर राहणार असा हा शेवटचा उत्सव म्हणून तो विशेष थाटाने साजरा व्हावा अशी वासुदेवाची इच्छा होती. बाळ, पुरुषोत्तम वगैरे मुलानी मनावर घेतल्यामुळे तो मोठ्या थाटाने पार पाडण्यात आला. सूर्योदयापूर्वी उठून स्नाने करून मुलांनी मारुतीची पूजा व आरती केली व जयघोष करून प्रसाद ग्रहण केला. नतर क्रीडांगणावर सर्व मुले जमली. तेथे कुस्त्या, मलखांब, लेजीम, लाठीकाठी, वजनें उचलणे वगैरे खेळ करण्यात आले. नंतर वासुदेवाने हनुमच्चरित्र व उत्सव यावर अर्धा तास व्याख्यान दिले. शाळेतील उत्सवाचा इतिहास सांगितल्यावर तो म्हणाला :—

"रामाला सहाय्य करण्याचे कबूल करून रामाची सेवा जेव्हापासून मारुतीने अंगिकारली तेव्हापासून अचल भक्ति, एकनिष्ठपणा व दृढ निश्चय यांच्या योगाने त्याने स्वामीकार्य साधलें. मारुतीने समुद्र पार केला व लकेला जाऊन सीतेचा शोध लावला. सीतेला धीर देऊन परत आल्यावर मोठे सैन्य तयार करून तो रामाच्या नेतृत्वाखाली लकेवर चाल करून गेला. राम वनवासांत असहाय स्थितींत असतां त्याने रामाला धीर दिला. लक्ष्मणाला शक्ति लागली तेव्हा त्रिभुवन धुडाळून औषधें आणून लक्ष्मणाला बरे केलें. रावण मारला जाऊन रामकार्य साधलें. रामराज्य सुरू झालें

सर्व संकटांना चुरडून, रात्रीचा दिवस करून, भीतीला भिववून व राक्षसांना निर्दाळून मारुतीने रामकार्य साधले व आपली अचल भक्ति व्यक्त केली. मारुतीची मूर्ति नेहमी दक्षिणेकडे तोंड करून द्रोणागिरी पर्वत हातांत घेऊन उड्डाण करीत आहे अशीच असते. ही मूर्ति आपणास काय शिकवते! मनुष्याने निधड्या छातीने स्वकर्तव्य करण्यास नेहमी तयार असावें असें नाही का शिकवत ! अंगीकृत कार्य करताना काळालाहि दरडावत प्रत्येक क्षणाला मारुती स्वामीपुढे उभा होता. त्याच्या अंगी अवधान व तत्परता होती. मारुती सामर्थ्याचा अवतार व धैर्याचा मेरू होता. मारुतीने येवढे कार्य कसें साधले ! ते साधण्याचें त्याचें मुख्य साधन म्हणजे ब्रह्मचर्य, त्याच्या साहाय्याने त्याने अचाट सामर्थ्य मिळवून अद्भुत कार्य साधलें मित्रानो ! आपल्याला काही कार्य साधण्याची इच्छा असल्यास मारुतीची भक्ति करून त्याच्याजवळ आपण सामर्थ्याची याचना केली पाहिजे. सामर्थ्य हीच यशाची किल्ली आहे. सामर्थ्य मिळविण्याकरता नमस्काराचा व्यायाम घेतला पाहिजे. आम्हा विद्यार्थ्यांना मारुती हेच दैवत आहे. त्याचा उत्सव केल्याने त्याचे गुण आपल्या दृष्टीसमोर उभे राहून ते मिळविण्याची आपणाला इच्छा होते. मारुतिरायाने सुरू केलेली लोकसेवेची उपासना–रामदासशिवाजीनें चालू ठेवलेली ही उपासना, परंपरागत आलेली ही उपासना आम्ही चालू ठेवली पाहिजे. उपसना चालू ठेवण्याचा निश्चय आपण एक मुखानें जाहीर करू या —

**उपासनेला दृढ चालवावें । भूदेव संतांसीं सदा नमावें ।।**
**सत्कर्मयोगें वय घालवावें । सर्वां मुखीं मंगल बोलवावें ।। "**

'बजरंगबली की जय' या जयघोषाने ते मैदान दुमदुमून गेले. उत्सवाच्या वेळी हेडमास्तर हजर होते. मुलांचा उत्साह पाहून त्यांचे हृदय उचंबळून आले. मुलांच्या सर्व उत्सवप्रसंगी ते हजर राहत असत. वासुदेवाने सुरू केलेल्या उत्सवाला प्राप्त झालेले स्वरूप पाहून त्यांना आनंद झाला. त्यांनी वासुदेवची मुक्त कंठाने स्तुति केली. दुपारी मेजवानी होऊन तो कार्यक्रम समाप्त झाला.

या कार्यक्रमांत वासुदेवाबरोबर बाळाने प्रामुख्याने भाग घेतला होता. विष्णू व गोपाळहि त्याला मदत करीत होते. सदूनेहि थोडाबहुत हातभार

लावला होता. गणपति–उत्सव, समेलन, हनुमज्जयती वगैरे कार्यक्रमांत हीच मडळी प्रामुख्याने भाग घेऊन मत्र्याला मदत करताना दिसत होती. पुढील वर्षाची जबाबदारी याच्यावरच पडणार असे ठरल्यासारखे झाले होतें. गणेशकपूला मात्र याचें वैषम्य वाटत होते. रघू, मधू, गणेश व विनायक यांपैकी प्रत्येकाने एकेक दोनदोन गचाडचा खाल्ल्या असल्या कारणाने ते बाळाबरोबर सहावीतून सातवीत गेले होते. त्याना बाळ व त्याचे दोस्त [illegible] केवळ पोरें आहेत असें वाटत होते. दोन परीक्षा जास्त दिल्यामुळे आपण जास्त अनुभवी व शाळेच्या वातावरणात मुरलेले आहोन अशी त्याची भावना होती. वयानेहि त्यापैकी प्रत्येकजण बाळ व त्याच्या मित्रांपेक्षा दोन वर्षांनी तरी मोठा होता. त्याना वाटे की पुढील वर्षाची व्यवस्था आमच्या हाती का असू नये आणि नायक व मत्री याच्या जागी आमच्यापैकीच कोणी का नसावा ? मधू तर इतर सर्वापेक्षा चार वर्षे जास्त शाळेत राहिला होता. त्यामुळे शाळेतील रीतीभाती व खास गोष्टी इतरांपेक्षा आपल्यालाच जास्त माहीत आहेत असे मोठ्या अभिमानाने सांगून पुढील वर्षाकरता मत्री होण्याला आपलीच लायकी जास्त आहे असे सिद्ध करण्याचा तो प्रयत्न करीत होता. पुरुषोत्तमाने सहज गमतीने म्हटले की, पुढील वर्षी सदूलाच मत्री करावे, तेव्हा मधू उसळून म्हणाला, "त्या कालच्या पोराला काय समजते ? मी कैक समेलने व उत्सव पाहिले आहेत–मी मत्री झालो म्हणजे पहा, कसे काम करून दाखवतो ते "

बाळ नायक व सदू मत्री होणार अशा बातम्या जौ जो उठू लागल्या तों तो रघू व मधूचा जळफळाट वाढू लागला. सर्वांचें मन वळवून आपल्याला मते मिळवावी म्हणून ते हरप्रयत्न करू लागले. बाळाला हाणून पाडण्याकरता ते निरनिराळ्या युक्त्या योजू लागले. मोठ्या मुलाच्या त्यांनी विनवण्या केल्या, बरोबरीच्या मुलाना गळ घालणे सुरू केले व लहान मुलांना धाकदपटशा दाखविण्याला कमी केले नाही. कसेहि करून बाळाला हाणून पाडलेच पाहिजे असा त्यांचा निश्चय होता.

बाळ वसतिगृहांत आल्यापासून गणेशकपूला तो दुष्मनाप्रमाणे भासू लागला होता. तो स्वतः गणेशकपूला धाब्यावर बसवीत असे. त्याने त्यांचे कधीच चालू दिलें नाही, की त्याना भीक घातली नाही. विष्णू व गोपाळ

प्रारंभापासून बाळाचे मदतनीस होतेच. त्याचाहि गणेशकपू द्वेष करीत असे. ही मुले इतर मुलाना बिघडवतात व त्यामुळे ती मुले आमचे ऐकत नाहीत या गोष्टीबद्दल त्याचा विशेष राग बाळ व त्याच्या मित्रावर होता. हे त्रिकूट उदयाला येण्यापूर्वी लहान मुले बिनबोभाट त्यांची कामे ऐकत असत. त्या बिचाऱ्याना गणेशकपूची भीति वाटत असे त्यामुळे मास्तरांना चोरी सापडल्यास मार बसेल हे माहीत असताना देखील ती भित्री मुले याचे गृहलेखन लिहून देत. त्या कपूने पैसे, पुस्तके वगैरे वस्तू उसन्या घ्याव्या परतु परत देऊ नये, उलट परत मागणाराला दरडवावे, तरी देखील त्याच्या दुष्टपणाला भिऊन लहान मुलानी हे सर्व गुपचुप सहन करावें. चुगली खाणे वाईट समजले जात असल्यामुळे बिचाऱ्याना दुहेरी जाच सहन करावा लागे. पण बाळ, गोपाळ व विष्णू यानी गणेशकपूला जुमानणे बद केल्यावर, त्याच्या प्रोत्साहनाने सर्व लहान मुले बाळाच्या पक्षाची झाली व गणेशकपूला टाळू लागली अखेर त्यानी गणेशकपू-विरुद्ध उघडउघड बड केले. तो कपू सदूकडूनहि गृहलेखन लिहून घेत असे किंवा त्याची नक्कल करीत असे तो श्रीमताचा मुलगा होता म्हणून त्यानी त्याच्याकडून वारवार पैसे उसने घ्यावे व परत देऊ नये. यामुळे सदूला त्या लोकापासून त्रास होत असे पण तो त्याला मुकाट्याने सहन करावा लागे.

## प्रकरण २३ वें

# कुस्ती मारली

बाळ, गोपाळ व विष्णू याची जोडी तोडली जाऊन बाळ अलग राहू नग-ाागान नगे--ा बरेच फावले. त्याना बाळाची नालस्ती करण्याकरता अनायासे हा एक प्रसग प्राप्त झाला होता " बाळ, गोपाळ व विष्णू ही उनाड मुले आहेत. ती वासुदेवाच्या नादी लागून उगीच भटकत राहिली व परत येण्याला उशीर झाला म्हणून हेडमास्तरानी त्याना घरी नेऊन मारले. त्याना चोरीची सवय लागली आहे. पेरूच्या चोरीकरता हेडमास्तर त्याना शाळेतून काढून लावणार होते. त्याना अखेरची ताकीद देऊन अलग करण्यात आले. पण काही तरी प्रकरणात ही मुलें पुन्हा सापडून शाळेतून लवकरच काढली जातील," अशा तऱ्हेने बाळाची व त्याच्या मित्राची निदा गणेशकपूने चालविली होती सर्वांच्या समोर असें म्हणण्याची त्याना हिमत होत नसे म्हणून एकेका मुलाला गाठून ते बाळाच्या उनाडक्याचा पाढा त्याच्यासमोर वाचीत असत रघू, गणेश, मधू व विनायक एक दिवस पाचसात मुलांना घेऊन या त्रिकुटासबधी बोलत होते.

मधू म्हणाला, " तो सदू तरी मूर्खच दिसतो. त्याने साफ म्हणावयाला पाहिजे होते की मी त्या उनाड पोराबरोबर राहणार नाही. पण ते पोर फारच भित्रे आहे. त्याच्याच्याने एवढे देखील बोलवले गेले नाही."

त्यावर रघू म्हणाला, " त्या बाळचाला नक्कल करायला पाहिजे स्वत. उनाडपणा करावयाचा व सदूला सर्व सांग म्हणून त्रास द्यावयाचा तो यदा नापास झाला पाहिजे म्हणजे त्याची चांगली खोड मोडेल आपण सदूला सांगू की तू बाळाला अभ्यासांत बिल्कूल मदत करूं नको.'

मधू उठला व त्याने सदूला आपल्या खोलीत बोलावून आणले. खोटयानाटया गोष्टी सागून मधूप्रभृति लोकांनी सदूचे कान भरण्याचा प्रयत्न केला व बाळाची सगत सोडण्याला ते सदूला सांगू लागले, " बाळ

वाईट मुलगा आहे. त्याच्या नादी लागल्याने तुझा अभ्यास होणार नाही व तूं नापास होशील. तू त्याच्या खोलीतून निघून जा किंवा त्याला अभ्यास सांगण्यात आपला वेळ खर्च करू नकोस, म्हणजे तो नापास होईल व त्याची चांगली फजीती होईल."

हें सर्व पुराण सदू गुपचुप ऐकून घेत होता. शेवटी आपल्या बोलण्याचा काही परिणाम झाला असेल असे समजून मधूने बाळासंबंधी तुझें मत काय आहे असें सदूला विचारले सदू सरळ स्वभावाचा. त्याने सरळपणे बाळ चांगला मुलगा आहे अशी त्याची तारीफ केली व बाळामुळे मला अभ्यासांत मदत होते असेंहि तो बोलून गेला. सदूचे मन वळवणें साधले नाही असें पाहून रघूने आपला खरा उद्देश निराळ्या रीतीनें त्याच्यासमोर मांडला. तो म्हणाला, "मला यंदा नायक निवडले तर आपल्या गणा (टीम) चे नाव राहील. मी सर्व सामने जिंकून दाखवीन. तूं मला नायक निवडून येण्याला मदत कर. तू चांगला मुलगा आहेस. तुझे म्हणणे बरीच मुले ऐकतील. तू ही गोष्ट कबूल करशील तर तुला आम्ही मंत्री निवडून आणू. पुरुषोत्तम व वासुदेव तुलाच मंत्री निवडून देण्याला कबूल होतील. बोल तुझें काय मत आहे ते." हे सर्व मायावी बोलणे सदूच्या लक्षांत आले किंवा नाही तें काही सांगतां येत नाही. त्याने सरळ उत्तर दिले, "बाळाला नायक निवडण्याचें सर्वच मुलांनी ठरविले आहे. माझेहि मत तसेच आहे. पुरुषोत्तम तर त्यालाच मदत करणार आहे. मी मंत्री झालों काय किंवा न झालों काय, बाळाला नायक निवडलेच पाहिजे."

मधू एकदम म्हणाला, "तर मग मंत्री निवडून येण्याला मला मदत कर व बाळालाहि सांग की तो मला मंत्री निवडण्याला तयार असेल तर आम्ही त्याला नायक बनवू."

सदू म्हणाला, "मला काय, मी नाही होणार मंत्री. तू हो. पण तुला मंत्री निवडण्याला मुलें तयार नाहीत. वासुदेवाने तर साफ सांगितलें की तुला मंत्री निवडूं नये."

वासुदेव व पुरुषोत्तम यांच्या साहाय्याने बाळ आपल्याविरुद्ध कट करीत आहे असें वाटून गणेशकंपूतील सर्व लोक चिडले. ते सदूला अपशब्द

बोलूं लागले, व त्यांनी त्याला मारण्याचा धाकहि घातला. मधू रागाने चडफडला, "तुम्ही कसे निवडून येता तें पाहतों. वाळवटांत खाल्लेला मार बाळ्या विसरला वाटतें. त्याला सभाळून रहा म्हणावे." सर्वच जण रागाने बडबडू लागले. सदू मुकाट्याने तेथून निघून गेला.

त्यानतर गणेशकपूने सदू, बाळ, गोपाळ व विष्णू याच्या कुरापती काढण्यास सुरुवात केली. एकेकट्याला गाठून त्रास देण्यास व धक्काबुकी करून भिवविण्यास त्यानी प्रारभ केला बाळ, गोपाळ व विष्णू पक्के होते. मारामारी करण्यास ते नेहमी तयार असत. गणेशकपूशी त्यांच्या साधारण एकदोन मारामाऱ्या झाल्याहि. त्यातहि ही मुलें दबली नाहीत सदूला मात्र भेदरविण्याचा त्या कपूने कसून प्रयत्न केला त्यांना वाटे सदू भिऊन आपल्या पक्षाला येऊन मिळेल. कोणाच्या भानगडीत न पडणारा तो मुलगा. त्याने झगडे कधी पाहिले नाहीत की केले नाहीत. मारामारीच्या वेळी तो हजर असला की घाबरून जाई. रघूला आपल्या तालीमबाजीची मोठी घमेंड होती. या भुरट्या मारामारीत बाळाला चागला हात दाखवतां येत नाही, त्याला कुस्तीत पाडून आपला श्रेष्ठपणा सिद्ध केला पाहिजे या हेतूने रघूने बाळाला कुस्ती खेळण्याकरता आव्हान दिले. रघूच्या पोकळ डौलाची माहिती व अजमास बाळाला होता. त्याने रघूचें आव्हान स्वीकारलें. गणेशकपूने ठरविले होते की बाळाने आव्हान नाकारलें तर आपण त्याची फटफजीति करू. पण तो त्याचा अदाज चुकला.

कुस्तीची जागा व दिवस मुकरर झाला. कुस्तीकरता बाळातर्फे पुरुषोत्तम व रघूतर्फे गणेश पच ठरले. सर्व मुलामध्ये तावडतोब ही बातमी पसरली. एप्रिलचा महिना होता म्हणून सकाळची शाळा होती संध्याकाळी सर्व मुले शाळेच्या मागे जमली. रघूच्या पक्षाची मुले एका बाजूला बसली होती. रघूचे मित्र त्याची तारीफ करून त्याला प्रोत्साहन देत होते. त्यांपैकी एखादा उपरोधिकपणे एखादा कमीअधिक शब्द बाळाला बोलत होता. विष्णू व गोपाळची काय गडबड! असे कर, तसा पेच घाल, त्या रेड्याला असा उलथून पाड अशी बाळाजवळ त्यांची सारखी बडबड चालू होती. सदू मात्र बिचारा भांबावल्यासारखा एकीकडे बसून तें सर्व पाहात होता. रघू वयाने मोठा होता, तेव्हा त्याच्या वल्गना ऐकून

तो बाळाला कदाचित् पाडील असे सदूला भय वाटत होतें. तू नायक होऊं नकोस व मी मंत्री होत नाही असे बाळाला सागावें असें त्याच्या मनांत आले. पण स्वतःच्या भित्रेपणाची त्याची त्यालाच लाज वाटून त्याच्या तोंडातून शब्द निघाला नाही. माझ्या दोस्तीमुळे बाळाला रघू बरोबर लढावे लागत आहे असें मनात येऊन त्याला खेद झाला. मी ताकद कमावून भित्रेपणा सोडला असता तर मला भेवडावयाचा रघूला व त्याच्या साथ्याचा काय मगदूर होता, असा विचाराचा गोधळ त्याच्या मनात चालला होता.

बरोबर सहा वाजता लगोट व चड्डी नेसून रघू व बाळ समोरा-समोर कुस्तीला आले. या कुस्तीच्या निकालाचा अदाज कोणालाच करता येईना. रघू मोठा आहे तो कुस्ती मारील असे बहुतेकाना वाटत होते, पण बाळाने जिकावे अशी साधारणपणे सर्वांचीच इच्छा होती,व बाळाने आपली ताकद अजमावल्याविना आव्हान स्वीकारले नसावे असा काहीचा तर्क होता

सलामी झाली बाळाला यव चीत करीन अशा अहकारयुक्त व तुच्छता-दर्शक मुद्रेने रघू बाळकडे पाहात होता. बाळाची सर्व भिस्त चपळाई करून रघूला एकदम चीत करण्यावर होती. उलट रघूच्या मनात बाळाला खाली दाबून ताकदीच्या बळावर चीत करावयाचे होते. बाळाने एकदोनदा डूब देऊन खाली घुसून रघूची कबर किंवा तगडी गाठण्याचा प्रयत्न केला. रघू सावध होताच; रघूने बाळाचे मानगूट धरून त्याला खाली दावण्याची कोशीस केली. चपळाईने पवित्रे बदलत रघूला अचानक गाठण्यासाठी बाळ त्याच्या डाव्या उजव्या बगलेला फिरत होता. चार पाच मिनिटे अशा रीतीने दमवल्यावर रघूला बेसावध गाठून बाळने बगल देऊन त्याची कबर गाठली व सर्व बळ एकवटून टांग मारली. रघू धाडकन जमिनीवर पडला. अशा अवचित रीतीने कुस्तीचा शेवट झाला. सर्वांची मने आनंदाने भरून गेली. बाळाच्या ताकदीविषयी सर्वांना अचबा वाटला.

अथपासून सदू टक लावून कुस्ती पाहात होता. बाळ रघूच्या तावडीत जाईल व पडेल अशी त्याला क्षणोक्षणी भीति वाटत होती. रघू धाडकन पडला तरी त्याने पुन्हा एकदा नीट न्याहाळून पाहिले. रघू

पडला हें पाहून त्याला हर्ष झाला, व त्याचा दम खाली पडला. विष्णू व गोपाळ तर बाळाला उच उचलून धरून नाचू लागले. इतक्यांत रघू उठून उभा राहिला. त्याने व त्याच्या कपूने तक्रार केली की त्याची पाठ जमिनीला लागली नाही. विष्णू व गोपाळ ही तक्रार खोटी आहे असे म्हणूं लागले. पंचांनी विचार करून कुस्ती पुन्हा व्हावी असा निकाल दिला. पचांचा निकाल ऐकून विष्णू व गोपाळ याना गप्प बसावें लागले. त्यांनी बाळाला त्वेषाने सागितले की उताणा पाडून त्याची पाठ जमिनीला लावल्याशिवाय रघूला सोडू नकोस. उसनी ऐट आणून 'बाळ आता चीत होतो, मघाशी त्याने लुच्चेगिरी केली' अशी बतावणी मधू व विनायक यांनी सुरू केली.

या खेपेला रघू निकराने व त्वेषाने लढू लागला. बाळाला पकडण्याकरता त्याच्या अंगावर जातो असे तो दाखवू लागला. जणू काय मघाशी घालमेल झाली होती. पण आता एका क्षणांत बाळाला मी चीत करतों असा आविर्भाव तो आणत होता; पण मनातून तर त्याला भीति वाटत होती. आपला प्रतिस्पर्धी काही हार जाणार नाही व जरा जपूनच लढल्यास निभावेल हें तो समजन चुकला होता. बाळाची हिमत आता वाढली होती. प्रथम त्याला रघूच्या अवजडपणाची भीति वाटत होती; ती निघून गेल्यामुळे तो आत्मविश्वासाने लढू लागला. तरीही तो पूर्वीप्रमाणे सावधगिरीने व चपळाईने कुस्ती खेळत होता. दोघेहि सावधगिरीने लढू लागल्यामुळे कुस्ती लवकर सुटण्याचा रग दिसेना. एक वेळ तर रघूने बाळाला खाली आणले होतें. पण त्याने दाबून धरण्यापूर्वीच चपळाईने बाळ त्याच्या हातून निसटला व रघू सावरून उभा राहतो न राहतो तोच बाळाने पुन्हा त्याची कबर गाठून व टाग मारून त्याला सपशेल चीत केले. पण पूर्वीप्रमाणे रघूने तक्रार करू नये म्हणून त्याला दाबून ठेवण्यासाठी बाळ खाली वाकला तोंच रघूने जोराने एक लाथ बाळाच्या तोंडावर मारली. दाताखाली ओठ चेंगरल्यामुळे बाळाच्या ओठातून रक्त निघू लागले. रघू कुस्ती हारला असा पचांनी निकाल दिला. वासुदेव रघूला तुच्छतापूर्वक टाकून बोलला, तेव्हा खाली मान घालून कपडे घालावयास रघू निघून गेला. इतक्यांत हेडमास्तर तेथे आले व काय गडबड आहे म्हणून त्यानी वासुदेव व पुरुषोत्तम यांना

विचारलें. त्या दोघानी सर्व हकीकत त्याना विदित केली. त्या दोघांशी बोलत हेडमास्तर फिरावयास निघून गेले. बाळाची स्तुति व रघूची निंदा करीत मुले वसतिगृहाकडे वळली.

त्यानतर चार दिवसानी शिवजयतीचा उत्सव आला. या वर्षी हा उत्सव वसतिगृहांत न करता डोगराच्या पायथ्याशी जगलात करावा असा बूट निघाला. शेजारच्या डोगराच्या पायथ्याशी दरीप्रमाणे असलेल्या एका मोकळ्या जागी आब्याचें झाड होते. त्या ठिकाणी आम्रवृक्षाच्या बडाशीं मुलानी ओटा तयार केला व आसन माडून त्यावर श्रीशिवाजी महाराजांची तसबीर ठेवली. तसबिरीला हार घालून व गुलाल उधळून मुलानी जय-घोष केला. श्रीशिवाजी महाराजांच्या आयुष्यातील निरनिराळ्या प्रसगांवर कांही जणांची भाषणे झाली. लहान मुलापेकी कोणी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची गोष्ट, कोणी 'आग्र्याहून सुटका,' कोणी बाजी प्रभूची स्वामीभक्ति वगैरे गोष्टी सागितल्या. मोठ्या मुलापैकी सदूने दादो कोडदेव व जिजा-बाई यानी शिवाजीला कसे शिक्षण दिले हे सागून, दादो कोडदेव यांचा करारीपणा व जिजाबाईची महत्त्वाकाक्षा व राष्टभक्ति ह्या गुणांच्या प्रत्यक्ष अवलोकनाने ते शिवाजीला कसे पाप्त झाले हे सागितलें व शिक्ष-णाच्या महत्त्वाचे दिग्दर्शन केले. नतर वासुदेवाने श्रीसमर्थानी शिवाजीला महाराष्ट्र धर्म कसा शिकवला हे सागून व शिवाजीने आपल्या गुरूप्रमाणे त्याग अगी बाणवून केवळ कर्तव्य म्हणून राज्याचे पालन कसे केलें हें दर्शवून "आधी प्रपच करावा नेटका" या ओवीचा अर्थ विशद करून सांगितला व प्रत्येकाने आपलें कर्तव्य कसे नीट केले पाहिजे व नेभळेपणा कसा सोडला पाहिजे हे स्पष्ट करून सागितले. बाळाने शिवाजीच्या योग्यतेवर चार शब्द सागितले. दगल करून दुसऱ्याच्या राज्याचा अपहार करू पाहणारा नेपोलियन व सिकदर याच्याशी शिवाजीची तुलना करणे चुकीचें आहे; शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून स्वधर्माचें व गरिबाचे रक्षण केलें व सुव्यवस्था निर्माण केली म्हणून त्याची योग्यता जास्त आहे असे बाळाने प्रतिपादन केलें. त्या दिवसाकरता मुलांनी मुद्दाम झुणका भाकर करून आणली होती, ती सर्वांनी भक्तिभावाने ग्रहण केली. नतर सर्वांनी 'हरहर महादेव' असा जयघोष केला.

नंतर 'गड आला पण सिंह गेला' हा खेळ मुले खेळली. कड्यासारखी जागा पाहून त्यावरून दोर बाधून मुले वर चढून गेली. 'गड आला' हे दर्शविण्याकरता आसपासचा पाला गोळा करून तो मुलानी पेटवून दिला. ते वसत ऋतूचे दिवस होते. वृक्षांना नवीन पालवी फुटून ते मनोहर दिसत होते. पळसाच्या तांबड्या फुलांनी सगळे रान फुलून निघाले होते. वनश्रीची शोभा पाहून व सर्व दिवस मौजेने घालवून सायकाळी मुले परत फिरली त्यांचा तो दिवस मोठ्या आनंदात गेला. त्याच दिवशी परत आल्यावर नायक व मंत्र्याची निवडणूक झाली. बाळाचे नाव नायकाच्या जागेकरता व सदूचें नांव मत्र्याच्या जागेकरता सुचविण्यात आले झालेल्या फजितीकडे दुर्लक्ष करून रघूचे नाव बाळाचा प्रतिस्पर्धी म्हणून व मधूचे नाव सदूचा प्रतिस्पर्धी म्हणून सुचविण्यात आले. रघूने आपले नाव परत घेतले व मधूचा पुष्कळ मतांनी पराभव झाला. बाळ व सदू अनुक्रमे नायक व मत्री या नात्याने निवडून आले.

---

# प्रकरण २४ वें

## दिवाळीची सुट्टी

उन्हाळयाची मुटी सपून शाळा सुरू झाली. बाळाला प्रवेश परीक्षेला बसावयाचे होते नियमित अभ्यास करून पहिल्याच वेळी प्रवेश परीक्षा पास झाली पाहिजे अशी बाळाला ईर्षा उत्पन्न झाली होती. सदूसारखा साथी मिळाल्यामुळे बाळाचा अभ्यास नियमितपणे होऊ लागला. मधून मधून अभ्यास टाकून उनाडक्या करण्याची व भटक्या मारण्याची इच्छा बाळाला होत असे. अशा वेळी सदूहि फारसा ताणून धरत नसे त्यालाहि खेळण्याची गोडी लागली होती पूर्वीप्रमाणे उनाडक्याच्या विरुद्ध तो नसे वसतिगृहात व शाळेत त्या दोघाचे वजन वाढले होते नायक व मत्री या नात्याने त्याची शाळेत जबाबदारी वाढली होती शाळेतील सर्व प्रसंग त्याना उरकवावे लागले तिकडेहि त्याना लक्ष द्यावे लागून त्यात त्यांचा वेळ खर्च होई मास्तर व मुले या सर्वांशी त्याचा सबध येऊ लागला होता अभ्यास, खेळ, मत्री व नायक या नात्याने कामे करणे यात त्याचा वेळ भराभर जाऊ लागला पावसाळा लागला गणपति–उत्सव पार पडला हिवाळा सुरू होऊन दिवाळीची सुटी जवळ दिसू लागली दिवाळीच्या सुटीत आपल्या गावी चलण्याकरता बाळाने सदू, गोपाळ व विष्णू याना आमत्रण दिले होते. त्यानीहि मोठ्या हौसेने व व आनदाने आनदपुरी जाण्याचें कबूल केले.

शेवटी सुटी सुरु होण्याचा दिवस येऊन पोहचला सुटी दहा दिवसांची होती. दिवाळीच्या आधी एक दिवस सुटीला सुरुवात होणार होती. कमळपूरपासून आनदपूर अजमासे पधरा कोस दूर होते. तेथपर्यंत चांगली सडक होती. बाळाने एक दिवस आधी बैलाची गाडी बोलावून ठेविली होती. दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेस निघण्याचें मुलांनी निश्चित केलें होतें. विष्णू व गोपाळ यानी बैलगाडीने कधीच प्रवास केला नसल्यामुळे त्याना फार हौस व उत्सुकता वाटत होती. झुंझुरते दिसू लागताच मुलांनी

जाण्याची तयारी केली व अरुणोदयाला ते चालू लागले. सदू, गोपाळ व विष्णू गाडीत बसले. बाळ घोड्यावर स्वार होऊन त्याच्याबरोबर चालू लागला. प्रातःकाळचा शरद ऋतूतील झुळझुळ वाहणारा गार वारा मातेच्या प्रेमळ हस्ताच्या स्पर्शाप्रमाणे सुखद वाटत होता. सडकेच्या बाजूच्या वृक्षावरील फुलांच्या सुवासाने सर्व प्रदेश सुवासमय झाला होता. गावापासून ते मैल दीड मैल चालून आले होते व चारी बाजूला मोकळे मैदान दिसत होते. पूर्वेच्या बाजूला उमाठ्यावर सूर्यबिंब दिसू लागले. पक्षीगण मित्राचा उदय झालेला पाहून प्रसन्न चित्ताने किलकिलाट करीत, भराऱ्या मारीत आकाशात मित्राच्या सन्मानार्थ संमुख होत होते. बैलांच्या गळ्यांतील घुंगुरमाळेचा घणघण आवाज आगमनान पसरून जणू स्थिरावण्यास जागा न मिळाल्यामुळे प्रतिध्वनीच्या रूपाने परत येऊन द्विगुणित होत होता. बैल चागले चपळ होते व भरभर चालत होते. मुलाची अंतःकरणे भोवतालच्या सौन्दर्याच्या दर्शनाने हर्षित होत होती व तारुण्याच्या उल्हासाचा आस्वाद देत हास्याच्या लहरी आसमतात पसरवून देत होती. सर्वत्र नवयौवनाचा प्रभाव प्रगट करीत ती मुले मार्गाचें आक्रमण करीत होती. पुढील सुखाच्या अपेक्षेने त्याचा आनद द्विगुणित होत होता.

गाडीवानाला बाजूस सारून गाडी चालविण्याचे कौशल्य दाखविण्याची हौस विष्णूला आली. विष्णूने कासरे हाती धरले. हाकणारा आपल्याला स्वैरसचार करण्याला परवानगी देत आहे असे बैलांना वाटले असावे. ते वाकडे तिकडे चालू लागले. विष्णूने आडमुठेपणाने एकामागून एक कासरा ओढण्यास सुरुवात केली. एक बैल पुढे गेला की त्याचा कासरा ओढून दुसऱ्याला ढील द्यावी व दुसरा पुढे गेला की पहिल्यास ढिले सोडून दुसऱ्याला ओढून धरावे, अशा रीतीने त्याने बैलाची तारांबळ उडवून दिली. शेवटी दोन्ही बैल एकदम उधळले व त्यानी गाडी रस्त्याच्या खाली उतरवून दिली. समोर एक झाड आले, त्याला गाडी अडून उभी झाली. बिरडी निघाल्यामुळे बैल मोकळे झाले व जूं सोडून एका बाजूला जाऊन उभे राहिले. सारथ्याचे विष्णूने दाखविलेलें कौशल्य अनुभवल्यानतर सारथ्याची हौस भागविण्याची फारशी इच्छा गोपाळला

राहिली नाही. गाडी जुपतांना गाडीवान म्हणाला, "लिवणे सोपे आहे धनीसाब ! आमच नांगऱ्याच काम तुम्हांस न्हाही उमगणार."

साडेदहाच्या सुमारास आमची सुखप्रवासी मंडळी अर्ध्या रस्त्यावर असलेल्या नदीवर येऊन पोहोचली. येथून पलीकडे जगल लागत असून कांही वेळ चढणाचा मार्ग आक्रमण केल्यानतर आनदपूरचे पठार लागत होतें. चढाव चढू लागण्यापूर्वी बैलाना विश्राति देणे जरूर होतें. ती पडावाची जागा होती गाडीवानाने बैल सोडले. इतका वेळ मार्ग क्रमून आल्यामुळे मुलाना सडकून भूक लागली होती. स्नानें करून त्यांनी फराळावर यथेच्छ ताव मारला. वाळवटात नदीच्या काठी मोकळ्या जागी तें अन्न मुलाना फार रुचकर लागले. नदीचे थंडगार पाणी पिऊन त्याच्या श्रमाचा परिहार झाला. क्षुधा व तृषा शात झाल्यावर तकवा येऊन इकडे तिकडे लक्ष देण्यास मुलाना फुरसत मिळाली.

त्या ठिकाणी नदी जगलातून बाहेर पडत असून तेथील वनश्रीची शोभा अवर्णनीय होती. नदीच्या काठचे लतापुष्पानी आच्छादलेले वृक्ष, त्यावर उडणारे रगारगाचे पक्षी, रस्त्याने अवचित भेटलेले मोरांचे समुदाय व हरणाचे कळप, हे दृश्य पाहून मुलाना तो देखावा स्वर्गीय वाटला. जों जो ते पुढे चालले तो तो वनश्रीचे सौदर्य वृद्धिगत होत होते. चढण चढू लागल्यावर दिसणारा देखावा हृदयाला चटका लावणारा होता जिकडे तिकडे हिरवेंगार दिसत होतें. एखाद्या ठिकाणी ओढा खुळखुळ वाहत लहानशा धबधब्याच्या रूपाने खाली पडताना दिसत होता. त्यातून निघालेले निर्मळ पाणी पाटांतून काढून लावल्याप्रमाणे झुळझुळ वाहत होते. ओढ्याच्या काठी पारिजातकाच्या फुलांचा सुवास दरवळून प्रत्यक्ष इद्राच्या नदनवनाची सर त्या वनाला आणून देत होता. एके ठिकाणी त्या वनप्रदेशाचें हृदयच जणू सरोवर लागले. त्यात पाढरी तांबडी कमळे फुलली होती व काठाशी कर्दळीची व कण्हेरीचीं झाडें पुष्पाच्छादित झाली होती. त्या तलावाच्या काठून रस्ता जात होता. सूर्य पश्चिम क्षितिजाजवळ जाऊ लागला होता. तें सरोवर वनाने वेष्टिलेले होतें. पलीकडे पहाड होता. रस्त्याच्या एका बाजूला हा सुदर देखावा तर दुसऱ्या बाजूला एक भयानक खोल दरी दिसत होती. त्या सर्व प्रदेशावर मावळत्या सूर्याची आरक्त किरणें

पडल्यामुळे तेथील सौदर्य खुलून दिसत होते. सूर्यबिंब पश्चिम क्षितिजाखाली दिसेनासें झाल्यावर त्या नयनमनोहर आरक्ततेच्या जागी कृष्णवर्णाची छाया त्या वनावर पसरू लागली. हळूहळू त्या कृष्णछायेची भेसुरता वाढत चालली.

बाळ गोष्टी सांगत चालला होता, " या रस्त्यावर पूर्वी दरवडेखोराचा त्रास होता—तो आता नाही; पण वाघ वगैरे हिस्र पशूपासून भय आहे. गाडी चालतां चालता एखाद वेळ वाघ बेलाला घेऊन जातो व अशा भीतिप्रद जागी असहाय्य स्थितीत ईश्वरावर भरवसा ठेवून बिचाऱ्या गाडीवानाला रात्र काढावी लागते. ही जागा वाघ भेटण्याची आहे व हा तलाव त्याचे सध्याकाळचे पाणी पिण्याचे ठिकाण आहे. येथे तो कोणाला ना कोणाला आठपधरा दिवसातून हटकून भेटतो."

त्या वनाची भीषणता पाहून व बाळाने सागितलेल्या गोष्टी ऐकून आतापर्यंत आनदाने नाचणारी मुले घाबरली. अशा रानातून ते केव्हाच गेले नव्हते. दिवसाहि भीति वाटावी असे ते भीषण अरण्य! सायकाळचा भीतिदायक काळोख व वाघाच्या भीतीची कल्पना, यामुळे जगलातून आपण केव्हा पार पडू असें त्या मुलाना होऊन गेले व त्याचे बोलणे बद पडले. त्यांची झालेली स्थिति पाहून बाळ त्याना मधून मधून चिडवीत होता.

लवकरच जगलाचा मार्ग सपला व त्या मुलाच्या गोष्टी पूर्ववत सुरू झाल्या. आठाच्या सुमारास गाडी जवळजवळ आली व ते घरी पोहोचले. घोड्यावरून उतरून बाळाने मातापितराना नमस्कार केला. मुलाना पाहून उभयतांना आनंद झाला. बाळाची धाकटी बहीण धावतच समोर आली व हात धरून त्याला घरात घेऊन गेली. 'तुझ्या मित्राची नांवे काय? त्यांना दिवाळीकरता ठेवून घेशील ना? मी आपले फटाके दिले तर ते राहतील ना? माझ्या मैत्रिणी जास्त की तुझे मित्र जास्त!' असा तिने प्रश्नांचा भडिमार सुरू केला. कसलीशी आठवण होऊन ती भरकन घरांत गेली व आपलें दप्तर घेऊन आली. आपले पुस्तक उघडून ती धडा वाचून दाखवूं लागली. 'तुला वाचता येईल का माझे पुस्तक?' तिने बाळाला विचारलें. तेव्हा खूप हशा पिकला. शेवटी तिच्या प्रश्नाचा अत येईना म्हणून आईने मनीला नवीन पुस्तक पाहण्याच्या मिषाने घरात नेलें. मुलांनी

ऊन पाण्याने स्वच्छ स्नाने केली व मुग्रास भोजनानतर ती विश्रांति घ्यावयास गेली. सारा दिवस आनदात घालविल्यामुळे, अनेक सौंदर्ययुक्त प्रदेश नेत्राखालून गेल्यामुळे व दिवसभरच्या प्रवासाच्या थकव्यामुळे आंथरूणाला पाठ टेकत नाही तोच मुलांना निद्रेने घेरले.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी सर्वजण लवकर उठले. तो अभ्यंगस्नानाचा दिवस होता. लहान मुलाना सण 'उद्या' आहे ही उत्सुकता किती तरी आतुर करते. मनी दोनदोन तासानी जागी होऊन सकाळ झाली म्हणून उठून बसे. सकाळ झाली तेव्हा तिची काय धादल! 'पाणी, तापले किंवा नाही, स्नानाची तयारी झाली किवा नाही, पणत्या लावा, माझे फटाके कुठे आहेत?' अशी तिची सारखी लुडबूड चालू होती. तिच्या लुडबुडीवर लक्ष ठेवणे हेच एक मोठे काम होऊन बसले होतें. आज आनद तिच्या हृदयांत मावत नव्हता. किलकिल करीत भिरभिर उडणाऱ्या लहान पाखराप्रमाणे मनी गुणगुण करीत घरभर हिडत होती.

सकाळी स्नानें व फराळ झाल्यावर बाळ आपल्या मित्राना घेऊन दिवाणखान्यात आला. तेथे पेडा भरून ठेवलेले जनावराचे जबडे, शस्त्रास्त्रे, ऐतिहासिक पुरुषाची चित्रे व आधुनिक पुढाऱ्याच्या तसबिरी पाहण्यांत त्यानी बराच वेळ घालविला. आदल्या दिवसाचा शीण होताच म्हणून तो दिवस त्यानी घरी राहूनच घालविला. एकएक चित्र दाखवून बाळाने आपल्या पूर्वजाचा इतिहास मित्राना सांगितला. भोसलेशाही नागपुरी पागोटे घालून तरवारीच्या म्यानावर हात ठेवून ऐटीने उभा असलेल्या एका मराठी वीराची तसबीर बाळाच्या आजोबाच्या तसबिरीच्या शेजारी होती. ती रामा नाइकाची तसबीर पाहून बाळाचे हृदय भरून आले. रामा नाइकाने त्याला अगाखाद्यावर खेळवले होते. रामा नाइकाने पुन:पुन्हा सांगितलेल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी एकून ऐकून बाळाला पाठ झाल्या होत्या. त्या गोष्टी ऐकून स्वकुलाच्या थोर पुरुषांबद्दल योग्य आदर त्याला वाटू लागला होता. रामाजीच्या पराक्रमाच्याहि गोष्टी त्याला अवगत होत्या. रामाजीच्या तसबिरीपुढे बाळ उभा होता. पुन्हा त्या गोष्टी सांगण्याकरता रामाजी तोंड उघडत आहे असा त्याला भास झाला. त्याचे शब्द बाळाच्या कानांत घुमू लागले.

बाळाने आपल्या मित्रांना रामाजीचा इतिहास व रामाजीने सांगितलेला स्वतःच्या कुळाचा इतिहास कथन केला. नतर बाळ आपल्या मित्रांना कोटाशी घेऊन गेला व कोटावर उभे राहून एकएक जागा दाखवून शेवटच्या लढाईचा इतिहास सांगू लागला. " ती पहा टेकडी. तेथून इंग्रज किल्ल्यावर तोफेने मारा करीत होते. ती पहा जागा, तेथे तोफेचा गोळा लागून भितीला भगदाड पडले. तेथे भगदाडाच्या तोंडाशी लढतां लढता रामाजी नाईक जखमी झाले होते. ती पहा कपाळावर खोक दिसत आहे याच जागी माझ्या पणजोबानी भीष्माप्रमाणे पराक्रम केला. असें रामाजी म्हणत होते" नतर बाळाने तिसऱ्या प्रकरणात सागितलेल्या लढाईचा वृत्तांत रामाजीच्या व पणजोबाच्या पराक्रमासह साद्यत कथन केला. अशा रीतीने मित्राचें मनरजन करीत त्याने दुपारपर्यंत वेळ काढला

बाळाचे वडील जुन्या परंपरेत वाढलेले व जुन्या परंपरेप्रमाणे चालणारे होते. दिवाळीच्या दिवसात मुलांनी खूप खावे, खूप खेळावें व चार दिवस आनदांत घालवावे अशी त्यांची इच्छा होती. पत्ते, गजिफा, सोंगट्या, बुद्धि-बळें व इतर अनेक बैटे खेळ मुलांना त्यानी आपल्याबरोबर खेळायला लावले एवढ्या मोठ्या माणसाशी खेळताना बाळाच्या मित्राना भीड वाटू लागली पण जमीदारसाहेब त्याच्याशी मोठ्या प्रेमाने व मोकळेपणाने वागू लागल्या-मुळे त्यांची भीति कमी झाली, व तेहि मोकळ्या मनाने पण योग्य आदर दाखवून खेळांत सामील होऊ लागले.

दिवाळीच्या चार दिवसात शत्रूलाहि आनदात ठेव अशी जमीदार-साहेब ईश्वराजवळ मागणी मागत. त्या चार दिवसात जो कोणी समोर येईल त्याचें मन आनदांत असावें असे त्या उदार मनाला वाटे. त्या चार दिवसांत त्यांच्या येथे मुक्तद्वारच होते. कोणीहि गोड तोंड केल्याविना घराच्या बाहेर पडत नव्हता. सर्वाचा सन्मान करून आश्रिताना कपडे, पैसे, धान्य वगैरे इनाम देऊन ते खुष करीत. दहावीस जणाना जमवून दोनप्रहर-पासून चारपाच वाजेपर्यंत व रात्री मध्यरात्रीपर्यंत ते सोगट्याचा डाव मांडीत. आग्रह कर करून ते लोकांना बोलावून आणवीत व खेळायला बस-वून घेत. सर्वांना आनंद व्हावा म्हणून ते हरतऱ्हेने प्रयत्न करीत.

बाळाच्या मित्रांनाहि ते सर्वांबरोबर खेळायला घेऊन बसत होते, व

सध्याकाळीं खाण्याचा खूप आग्रह करीत होते. त्या छोट्या पाहुणे मंडळीचे चार दिवस आनंदांत जावे म्हणून जमीदारसाहेबांप्रमाणे जमीदारीणबाईहि झटून प्रयत्न करीत होत्या. आपल्या आदरातिथ्याने त्यांनी मुलांची रेलचेल उडवून दिली होती. मनीहि आपल्यापरी बाळाच्या मित्रांना आपल्या बाल्य लीलांनी हसवून त्यांची करमणूक करीत होती.

दुसऱ्या दिवशी बाळ आपल्या मित्रांना घेऊन फिरावयास गेला. आनंदपूरची छोटी शाळा, नदी, पलीकडलें वन व खेळावयाच्या जागा बाळाने मित्रांना दाखविल्या. त्या परिचयाच्या जागांचा इतिहास सांगतांना बाळाला आनद होत होता. एकएक गोष्ट आठवून त्याने आपल्या मित्रांना सांगितली. बाळाच्या लहानपणचे एकदोन मित्र रस्त्याने त्यांना भेटले. बाळाने मोठ्या प्रेमाने त्याच्याशी गोष्टी केल्या. बाळाला पाहून त्यांनाहि मोठा आनद झाला. पण दोघांच्या परिस्थितीतील फरक जाणून ते मोठ्या अदबीने बोलत होते. पूर्वीचा मोकळेपणा त्यांच्या वागण्यांत व बोलण्यांत नव्हता. ते कास्तकार झाले होते. शेतीचे काम करण्याखेरीज खेड्यांतील लोकाना दुसरा काय उद्योग ! बाळ मोठा माणूस ! शिकन मोठा झालेला. त्याच्याशीं बालपणच्या मित्रत्वाच्या नात्याने बोलणे त्यांना बेअदबीचें वाट लागलें. बाळपणच्या मित्राच्या वागण्यांतला फरक बाळाच्या मनाला पटेना व बुद्धीला उमगेना. त्याने पुष्कळ वेळ विचार केला—याचें कारण काय ?

मंडईच्या दिवशी बाळाच्या मित्रांना खेड्यांतील उत्साहाचें दृश्य पाहावयास मिळाले. दोन प्रहरपासून मध्यरात्रीपर्यंत गोवाऱ्यांच्या नाचण्याचा व दढारीतील गाण्याचा आवाज सारखा घुमत होता.

बाळाच्या घरी चार दिवस दिवाळीचा पाहुणचार घेतल्यावर त्यांचे मित्र आपापल्या घरी निघून गेले.

---

# प्रकरण २५ वें

# शाळेंतील खेळ

कमळपूर हे नागपूर विभागांतले जिल्ह्याचे ठिकाण होते. या विभागातील सर्व हायस्कुलांमध्ये क्रिकेट, फुटबॉल, हॉकी वगैरेचे सामने होत असत. विभागांत सात आठ हायस्कुले असल्यामुळे सर्वांत श्रेष्ठ ठरणाऱ्या गणाला निदान तीन तरी सामन्यात खेळावें लागत असे. बाळ स्वत सर्व खेळात निष्णात होता. त्याने आपल्या गणाला शिकवून तयार केले होतें. दररोज क्रीडागणावर खेळणाऱ्या मुलावर नजर ठेवून कोणता मुलगा कोणत्या खेळात चांगला आहे व त्या खेळात तो कोणत्या जागेकरता लायक आहे हें पाहून विचारपूर्वक हॉकी, फुटबॉल, क्रिकेट यांपैकी प्रत्येक गण त्याने तयार केला होता. प्रत्येक गणांतील जो इसम ज्या जागेकरता लायक आहे त्याला कामाची चागली तालीम देऊन सर्वांनी खेळतांना एकजुटीने कसें खेळलें पाहिजे व कोणत्या चुका टाळल्या पाहिजेत हे बरेच दिवस लक्षपूर्वक खेळायला लावून बाळाने सर्व गडयाच्या मनावर बिंबवून दिलें होतें. प्रत्येकाने आपल्याच बळावर खेळण्याचा प्रयत्न केला असता खेळ कसा फसतो, एकमेकांना मदत कशी केली पाहिजे, पण ती करतांना आपली जागा सोडून दुसऱ्याच्या जागेत जाऊन ढवळाढवळ केल्याने कसे नुकसान होतें हें जाणून लुडबूड कशी टाळली पाहिजे या सर्व गोष्टींचे बाळाने प्रत्येकाला शिक्षण दिलें होतें. आपली बाजू चढावाच्या व बचावाच्या वेळीं कशी मजबूत व एकजुटीची असावी, व दुसऱ्याची बाजू कोठें कशी कच्ची आहे हें शोधून त्याप्रमाणे चढाव कसा करावा याचे बरोबर ज्ञान त्याने आपल्या गणाला दिलें होतें व तें नीट लक्षांत यावें म्हणून आपल्याच शाळेचा दुसरा गण घेऊन त्याच्या बरोबर तो नेहमी सामने करवीत असे.

अशा रीतीने गण तयार झाला होता म्हणून यंदा आपण सर्वच सामन्यांत जिंकू असा भरवसा कमळपूरच्या मुलांना वाटत होता. अपेक्षे-

प्रमाणे क्रिकेट व फुटबॉल यांचा अखेरचा सामना जिंकून कमळपूरच्या गणाने यशाचे पेले मिळविले होते. हॉकीतहि त्यानी दोन सामने जिंकले होते व शेवटच्या सामन्याची तयारी केली होती. तो सामना जिंकल्यास त्यांना हॉकीचा यशाचा पेला मिळणार होताच, शिवाय हॉकी, फुटबॉल व क्रिकेट या तिन्ही खेळात जिंकणारांकरता एक खास ढाल असे, तीहि मिळणार होती; त्यामुळें तर हा शेवटचा सामना जिकलाच पाहिजे अशी ईर्षा कमळपूरच्या मुलांना लागून राहिली होती व बाळाच्या नेतृत्वाखाली आपण तो खास जिकू अशी प्रत्येक खेळाडूची हिंमत होती.

विभागांतील सर्व शाळांचें एक शिक्षणसमेलन होत असे, त्यांत खेळहि होत. रस्सीखेच, धावणें, वजने उचलणे व फेकणें, लांब उडी, उच उडी, कुस्ती, मल्लखांब, आटद्या पाटद्या, खोखो वगैरे सर्व तऱ्हेचे खेळ तेथे खेळले जात व त्यांत जे विजयी होत, त्यांना इनामे मिळत असत. त्यांतील बहुतेक सर्व कामांत भाग घेऊन बाळाने पुष्कळ इनामे व बिल्ले मिळविले होते व सर्वांगीण प्रविणतेबद्दल एक सोन्याचा बिल्ला देण्यांत येत असे तोहि बाळाने मिळविला. सर्व ठिकाणाहून आलेल्या मुलात व मास्तर लोकांत बाळची वाहवा होऊन त्याचें नांव सर्वतोमुखी झाले.

समेलने व त्याबरोबरचे खेळ आळीपाळीने हायस्कूल असलेल्या गावी होत असत. त्यावर्षी कमळपूरपासून जवळ असलेल्या भांडक गावीं हें समेलन होणार होतें. त्याकरता बरीच मडळी जमली होती. सर्व कार्यक्रम पार पडून हॉकीचा शेवटचा सामना व्हावयाचा राहिला होता. कमळपूरच्या गणाने दोन शाळांना हारवलें होतें व शेवटच्या सामन्याकरता ते भांडकला आले होते. दुसऱ्या बाजूने नागपूरचा एक गण इतर गणांना हारवत शेवटच्या सामन्यांत कमळपूरच्या गणाशी स्पर्धा करण्याकरता आला होता.

सकाळीं साडेसात वाजतां सामन्याला सुरुवात व्हावयाची होती. कमळपूरच्या गणाचा वेष पिवळा व नागपूरच्या गणाचा वेष गुलाबी होता. दोन्ही बाजूंचे गडी बरोबर साडेसात वाजतां आपापली जागा घेऊन उभे राहिले. पंचहि हातांत शिट्या घेऊन तयार झाले. क्रीडांगणाच्या चारी बाजूंनी पाहणारांची गर्दी उसळून लोक आतुरतेने खेळ सुरू होण्याची वाट

पाहूं लागले. खेळ सुरू होण्यापूर्वी कांही उद्योग पाहिजे म्हणून म्हणा किंवा आलेल्या आवेशामुळे म्हणा पाहणारांमध्ये कोण जिंकेल याबद्दल वाद होऊन कांही जणांनी पैजहि लावली होती.

बाळाने आपली बाजू चांगली निवडून तयार केली होती व त्यांत त्याने आपल्या नेतत्वाचें सर्व कौशल्य खर्च केले होतें. एका स्थिर व धीराच्या मुलाला त्याने गोलरक्षकाचें काम दिलें होतें. गोपाळ व रघू यांच्यावर बाळाने पिछाडी सांभाळण्याचें काम सोपवलें होते. ते दोघेहि धिप्पाड व दणकट होते. ते जोराने टोला देत असतां चेंडू घेण्याकरता समोर येण्याची कोणालाहि भीतीच वाटे. स्वतः बाळ इतर चार चपळ मुलांना घेऊन मोहऱ्यावर झाला होता. मध्यावर विष्णूबरोबर इतर दोन चपळ व धडधाकट मुलांना त्याने मुक्रर केलें होतें. बाळाने निवडक मुलांची बाजू तयार केली होती. त्याकरिता व्यक्तिशः चांगली खेळणारी पण समुदायाने खेळण्याला नालायक अशा कित्येक मुलांना वगळण्यांत आलें होते. रघूला बाळाने कसें घेतलें याचें कांही मुलांना आश्चर्य वाटलें. बाळाचा स्वभाव दिलदार व गुणग्राही होता ; खुनशीपणा त्याच्या अगांत मुळीच नव्हता. रघू चागला खेळणारा आहे हें पाहतांच बाळाने त्याला निवडले. रघूचेंहि मन बाळाने आपल्या दिलदारपणाने आकर्षित केलें.

दोन्ही बाजू सज्ज होऊन उभ्या राहिल्यावर बरोबर साडेसात वाजतां शिटी झाली. खेळ सुरू झाला. खट्खट् यष्टिका वाजूं लागल्या. चेंडू नजर ठरणार नाही इतक्या गतीने टोलावला जात होता. प्रेक्षक डोळ्यांची टक लावून व माना उंच करून आतुरतेने खेळ पाहात होते व सारखे 'वाहवा शाबास, पुढे धका, पळा, हाणा, मारा,' असे ओरडत होते. पंचाच्या शिट्या मधून मधून वाजत होत्या. तेवढ्यापुरती धावपळ बंद होऊन क्रीडांगणावर स्तब्धता दिसे. पण दुसऱ्या क्षणी वाऱ्याच्या झपाट्याने पुढेमागे हेलकावे खाणाऱ्या व एकमेकांना रेटणाऱ्या ढगांप्रमाणे खेळ पुढेमागे हेलकावे खात होता. डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तों चेंडू या गोलापासून त्या गोलापर्यंत जाई व त्यामागून चेंडूशी स्पर्धा करण्याकरताच की काय मुलांची दौड सुरू होत असे.

नागपूरच्या बाजूचीं मुलें स्वतःला पटाईत समजत होती.

त्यांना वाटलें की, आपण मोठ्या शहरचे खेळणारे, आपण कमळपूरच्या खेळणारांना सहज जिंकूं. पण मधली सुटी सपण्याची वेळ आली तरी त्यांना कांहीच करतां आलें नाही. तेव्हा त्यानी निराळ्या रीतीने खेळ-ण्याला सुरुवात केली. धडाधड यष्टिका आपटून त्यांनी कमळपूरच्या मुलांना भेवडावयाला सुरुवात केली व त्या गडबडीत एक गोल त्यांनी मारलाच. वेळ आणीबाणीची होती. त्याच गडबडीत आणखी दोन गोल होऊन जावयाचे, व तसें झाल्यास मग आपला पक्ष नाउमेद होऊन जिकण्याची आशा कमी व्हावयाची व विरुद्ध पक्षाची हिंमत वाढून त्यांना बचावाशिवाय दुसरें काही करावयाचें न राहिल्यामुळे ते बेफिकीरीनें पण निर्भयपणे खेळून आणखी गोल मारावयाचे बाळ शांत मनाचा व न डगमगणारा होता. त्याने परिस्थिति चटकन लक्षात आणली व मधल्या वेळेपर्यंत कसेंबसे निभावून नेऊन नतर नेटाने खेळून डाव उलटवावयाचा असे धोरण आखले. तो मागे आला आणि रघू व गोपाळ यांच्या मदतीने शिकस्त करून मधल्या सुटीपर्यत विरुद्ध बाजूस थोपवून धरून त्याने गोल होऊ दिला नाही. इतक्यांत मधल्या सुटीची शिटी झाली. बाळाने ताबडतोब आपल्या गड्याना जमवून दुसऱ्या अर्ध्या वेळांत कसें खेळावयाचे हे ठरविले व त्याप्रमाणे प्रत्येकाला त्याच्या त्याच्या कामाची सूचना दिली. बाळ व रघू याचे खलबत होऊन पुढील धोरण त्यांनी एकमताने ठरवले. बाळने चटकन हुडकून काढले की विरुद्ध बाजूचे लोक एकजुटीने किंवा नेटाने फार वेळ खेळू शकत नाहीत व आपण जर चेंडू एकमेकांकडे सरसर हाणीत ठेवला व विरुद्ध बाजूच्या लोकांच्या हाती लागू दिला नाही तर ते हैराण होऊन सैरावैरा धावून थकून जातील; नतर आपण एकजुटीने त्यांच्या हाती चेंडू लागूं न देतां पुढे नेऊन गोल करू. व्यक्तिशः विरुद्ध बाजूचे गडी चांगले होते म्हणून बाळाने आपल्या गड्यांना निक्षून बजावलें होतें की, मागच्या किंवा बाजूच्या गड्याला चेंडू देऊनही विरुद्ध बाजूच्या गड्याच्या हाती चेंडू पडूं देणे टाळलें पाहिजे.

पुन्हा शिटी वाजली. खेळणारे आपापली जागा घेऊन उभे राहिले होते. नागपूरचे गडी आम्ही जिंकणार या भावनेने ऐटीत उभे होते.

प्रेक्षक लोकांनाहि वाटूं लागलें, ' हेच चढाव जोराने करतात हेच जिंकतील व कमळपूरचे लोक बचावाला ठीक असले तरी चढाव करूं शकत नसल्यामुळे हारतील! '

खेळ सुरू होण्याची शिटी झाली. खेळ सुरू झाला. कमळपूरच्या या खेळाडूच्या हातांतून त्या खेळाडूच्या हातांत चेंडू धावू लागला. उजवीकडे आडवणाराचा मारा जास्त झाल्यास चेंडू मागे जाऊन, तेथून डाव्या बाजूस व डाव्या बाजूने पुढे जाऊं लागला. चेंडू एका गड्याच्या हातांत न राहिल्यामुळे नागपूरकरांना मारा करणे कठीण जाऊं लागलें. ते आता चढावाचें धोरण विसरूनच गेले. त्यांच्या आघाडीच्या लोकांना तर चेंडू मिळेनासा झाला. बचाव करतां करतां मागच्यांची पुरेवाट झाली. बाळ आघाडीवर मध्यभागी खेळत होता. त्याच्या अगावर चेंडू काढून घेण्याकरता दोनदोन तीनतीन विरुद्ध बाजूचे गडी धावून जातात न जातात तोंच दुसरीकडून चेंडू पुढे सरकला. तात्काळ डावीकडून खटकण चेंडू गोलच्या रिंगणाकडे मारला गेला. बाळाने, धावत जाऊन, तो आडवला. आतां गोल होणार म्हणून दोन–तीन जण बाळाच्या अंगावर धावून गेले. खटकन यष्टिका आपटून चेंडू घेऊन जाण्याची हुलकावणी देऊन बाळ बाजूला सरला. गोपाळने क्षणार्धात चेंडूला टोला दिला. बाळावर धावून जाणारे पाहात राहिले. चेंडू गोलमध्ये गेला. बाळाने चेंडू आडवला तेव्हा गोपाळ मागे येऊन उभा होताच. बाळाने ठरवून ठेवले होते की, चेंडू अडवून तो बाजूला सरला की ताबडतोब मागच्या गड्याने टोला मारून गोल करावा. बाळ जाणून होता की, चेंडू अडवून बाजूला मी हटू लागलों की, हुलकावणी लक्षांत न येऊन मुले माझ्यावर तुटून पडतील, गोपाळकडे त्याचें लक्ष राहणार नाही, व त्याला आयतीच मोकळी जागा मिळून बिनचूक गोल मारतां येईल.

दोन्ही बाजू बरोबर होतांच, प्रेक्षक लोकांत एकच कल्लोळ सुरू झाला. खेळाचा निकाल काय होणार याबद्दल जो निश्चितपणा वाटत होता तो जाऊन अनिश्चितपणामुळे खेळांत नवचैतन्य व कुतूहल उत्पन्न झालें. नागपूरकर खेळाडूंना हा गोल कसा झाला हें कळलें देखील नाही. त्यांना वाटतच होतें की बाळाने चलाखी करून हा गोल मारला. कमळपूरकरांची

हिंमत आता वृद्धिंगत झाली. शिटी झाली. यंत्राप्रमाणे खट्खट् यष्टिका वाजूं लागल्या. उजवीकडून डावीकडे, पुढून मागे, मागल्या बाजूने इकडचा तिकडे चेंडू भरभर कमळपूरकरांच्या हातात फिरू लागला. विरुद्ध बाजूचे गडी भांबावल्यासारखे झाले. त्यांच्या हातीं चेंडू लागेना. धावतां धावतां ते थकून गेले. पुन्हा डावीकडून चेंडू जोराने रिंगणांत आला. रिंगणांत धावून बाळाने पुन्हा चेंडू आडवला. या वेळीं त्याच्यावर चार जण धावून आले. बाळ बाजूला सरकतो न सरकतो तोंच गोपाळने चेंडू सरळ गोल-मध्ये मारला. कमळपूरकराचा एक गोल जास्त झाला. बाजू उलटली. नागपूरकरांनी शिकस्त केली. ते सर्व चागले खेळणारे होते पण त्यांचें कांही चालू शकलें नाही. एक–दोन–तीन चार असे त्याच्यावर भराभर गोल होत गेले. आपण बाळाला अडविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतां गोल होतात कसे हें त्याना कळेना. खेळ त्याच्या आवाक्याच्या बाहेर गेला. त्यांच्यावर एकदर चार गोल झाले. खेळ सपायला फारच थोडा वेळ राहिला होता. नागपूरकर नाउमेद झाले. त्याचें काही चालेना. शेवटची शिटी वाजली व खेळ सपला बाळाने हिंमत राखून काम केलें व बाजू उलटवली.

कमळपूरच्या खेळाडूची फार प्रशसा झाली. त्याच्या नायकाचें नांव सर्वतोमुखीं झालें. लहान मुलें त्याला पाहण्याकरता त्याच्याभोवती गोळा होऊ लागलीं. बक्षिसे वाटण्यात आली. सर्वांगीण श्रेष्ठतेचें सोन्याचें पदक बाळाला देण्यांत आले. पदक देतांना बाळाच्या नैपुण्याचा व नायकत्वाचा खास उल्लेख करण्यांत आला. नतर अल्प उपाहार होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

मिरवत मिरवत कमळपूरची मुले स्टेशनकडे चालली. रस्त्याने त्यांनी जयनाद चालविले होते. विजयचिन्हे सर्वांना दिसतील अशा रीतीने त्यानी यष्टिकांना बांधून उच्च धरलीं होती कमळपूरला येईपर्यंत त्यांच्या जिवाला विसावा नव्हता. त्यांनी गाडी अगदी डोक्यावर घेतली होती. त्यांचा तो उत्साह पाहून गाडीतील लोकांना मोठी गमत वाटली.

कमळपूरला पोहोचल्यावर हेडमास्तरांनी एक खास सभा भरवली. शाळेला विजय मिळवून देणाऱ्या गणांचें अभिनंदन करण्यांत आले. ज्यांना

खास इनामें मिळालीं होतीं त्यांचेंहि अभिनंदन करण्यांत आलें. बाळाच्या नांवाचा खास उल्लेख गौरवपूर्वक केला, तेव्हां मुलांनीं टाळयांचा कडकडाट केला.बाळाच्या कृतीबद्दल हेडमास्तरांना मनापासून आनद झाला होता. आपला आनंद उचित शब्दांनी व्यक्त करून त्यांनी खेळांत व इतर सर्व बाबतीत बाळासारखी प्रगति दाखवून आपल्या शाळेचें नांव वाढविण्याचा मुलांना कळकळीचा उपदेश केला शाळेला मिळालेले हॉकी, फूटबॉल, क्रिकेट या खेळांतील विजयाचे पेले व या तिन्ही सामन्यांतील विजयचिन्हें असलेली खास ढाल हीं सर्व जयाची स्मारक चिन्हें शाळेच्या मोठ्या दालनांत ठळक ठिकाणीं ठेवण्यांत आली. त्या दिवशी त्या प्रसंगानिमित्त मुद्दाम सुटी देण्यांत आली होती.

## प्रकरण २६ वें

# परीक्षेनंतर

बाळ या वर्षी प्रवेश परीक्षेला बसावयाचा होता. सदूबरोबर त्याचा अभ्यास नियमितपणे चालला होता. थंडीचे दिवस भराभर निघून गेले. परीक्षा मार्चअखेर होणार होती. तारखेचे एक एक पाऊल झपझप टाकीत मार्च महिना जवळ येऊ लागला व परीक्षाहि मार्च महिन्याच्या पावलावर पावले टाकीत जवळ येताना दिसू लागली. परीक्षेच्या भेसूर स्वरूपाची स्वप्नें मुलाना पडू लागली. एखाद्या राक्षसिणीप्रमाणे किंवा जखिणीप्रमाणे परीक्षा मुलाना भेवडावू लागली होती.

एके दिवशी सकाळी विष्णू बाळाकडे धावत आला. सदू व बाळ अभ्यासात अगदी गढून गेले होते. विष्णू चिताक्रांत असल्याचा आविर्भाव आणून त्यांच्याजवळ जाऊन गुपचुप बसून राहिला. चिताक्रांत असण्याचें कारण बाळाने विष्णूला विचारले. विष्णू म्हणाला, "सकाळी मला एक भयकर स्वप्न पडले. सकाळची स्वप्ने खरी असतात असें म्हणतात. फारच भयकर स्वप्न! काय करावें समजत नाही. चोरून दिवा ठेवून रात्री बारा वाजेपर्यंत मी अभ्यास करीत बसलो होतो. बारा वाजता निजलों तेव्हा डोकें भणभणू लागलें. परीक्षा जवळ आली या भीतीने डोळा लागतांच मी दचकून जागा होत होतो. जरा वेळाने अगाला गार वारा लागला, व मला झोप लागली. काय भयकर स्वप्न ते! एक अक्राळविक्राळ राक्षसीण आपल्या शाळेच्या दालनाच्या दारात उभी राहिली होती. आपण आत सर्व विषयांच्या उत्तरांचे कागद लिहीत होतो. किती तरी मुलें तेथे होतीं—दोन तीन हजार तरी असतील. दालन खूप विस्तीर्ण दिसत होतें-तेथे बसून मुले भराभर लिहीत होती. काही जणाचा चेहरा कोरा व शून्यप्रभ दिसत होता. जिकडेतिकडे अगदी शुकशुकाट होता. त्या स्तब्धतेचा भंग करणारी घणघण घंटा वाजण्यास प्रारंभ झाला. ताबडतोब मुलांची एकच गर्दी होऊन मोठा गोंगाट सुरू झाला मुले भराभर दाराबाहेर

लोटलीं जात होती. कोण लोटतें पाहण्याकरता मीं भीतभीत मागे पाहिले पण कोणी दिसेना. घाबरून मी तुला हाक मारली पण तूहि दूर एका कोपऱ्यांत होतास. घणघण घंटानादात कोणाचें कोणाला ऐकू येणे शक्य नव्हतें. त्या राक्षसणीला दहाबारा विक्राळ तोडें होती. एका तोडातून परीक्षा असा घोष चालला होता. इतर तोंडांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, गणित वगैरे विषयांतील प्रश्नांवर मुलानी लिहिलेली उत्तरे भराभर वाचलीं जात होती त्या राक्षसणीला वीसपंचवीस हात होते. मी जवळच होतो पण गर्दीमुळे सर्व हात नीट दिसत नव्हते. जिकडे तिकडे अंधःकार माजला होता. ती राक्षसीण एकदम दहापाच मुलांना उचलून घेई. तोडे ओरडतच होती. एका तोंडाने म्हणावें, 'हा इतिहासांत नापास, याचे हात तोडा;' दुसऱ्या तोंडाने ओरडावें 'हा इंग्रजीत नापास याचे पाय तोडा;' तिसऱ्या तोडाने ओरडावें, 'याला पीत सागर माहीत नाही, द्या याला फेकून पीत सागरात.' याप्रमाणे त्या राक्षसणीच्या हाताचें व तोडांचे काम सारखे चालू होतें. कोणी हात तुटलेला, कोणी लंगडा, कोणी पीत समुद्रात बुचकळी खाल्ल्यामुळे नखशिखांत पिवळा झालेला, अशाच तऱ्हेच्या मुलाचा घोळका शाळेपुढून चालला होता. राक्षसीण मला पकडणार तोच भीतीने मी किंकाळी मारली. डोळे उघडून पाहतों तो गोपाळ स्टोव्ह पेटवून चहा तयार करीत आहे. हालवून त्याने मला उठवलें, व चहाचा कप मजजवळ दिला. स्टोव्ह अजून भणभण जळतच होता. उगवता सूर्य, मोकळी हवा व चहाचा कप यांच्या योगाने मला धीर आला. धडा पाठ करीत बसलेल्या विद्यार्थ्याप्रमाणे एक पक्षी पुनःपुन्हा तोच तो आवाज काढीत पलीकडल्या लिंबाच्या झाडावर बसला होता. वानर या झाडावरून त्या झाडावर उड्या मारून आम्ही पहा कसे खेळतों म्हणून वाकुल्या दाखवीत होते. पाठीवर पुस्तकांचा भारा लादला म्हणजे पाहतों कशा उड्या मारतात ते !"

विष्णूने पाठ केल्याप्रमाणे स्वप्न कथन केलें व जणू काय खरोखरच स्वप्न पडले असा त्याचा आविर्भाव पाहून बाळ व सदू यांना हसूं लोटलें. त्यांचें हसणें पाहून विष्णू चिडलों असें दाखवूं लागला. बाळ म्हणाला, "या स्वप्नाबद्दल तुला कांही प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. म्हणजे तूं पास होशील. पण आधी नियमाविरुद्ध दिवा ठेवल्याबद्दल शिक्षा होऊं नये अशी

तुझी इच्छा असल्यास दंडाची रक्कम दे, नाही तर हा मी चाललों रिपोर्ट करायला." इतक्यांत गोपाळहि आला. दडाची रक्कम वसूल करण्यांत आली. सर्वजण फराळाच्या दुकानांत गेले. तेथे यथेच्छ ताव मारून फिरत फिरत ते परत आले.

परीक्षेचे दिवस भराभर निघून गेले एकएक विषय संपला की एकएक मणाचें ओझें कमी झाल्यासारखे मुलांना वाटू लागलें. परीक्षा सपली. उत्तरे पडताळून पाहण्यात मुलांनी एक दोन दिवस घालविले. आपल्याला मिळणाऱ्या मार्कांचा अदाज प्रत्येकजण लावू लागला. परीक्षकांच्या लहरीबाबत कांही मार्क बाद करूनहि प्रत्येक मुलाच्या मार्कांची बेरीज बहुतेक एक तृतियाशाहून कमी होत नसे. एखाद्याला एखाददुसरा मार्क कमी पडलाच तर पुन्हा मार्क जोडतांना ती उणीव भरून निघत असे. एका पोराने तर मार्क जोडण्याची शिकस्त केली. कोणी भेटला की त्याने मार्क जोडण्याला सुरवात करावी. ते मार्क शेकडा नव्वद होत. नतर परीक्षकाच्या मुरवतीखातर किंवा परीक्षकाची लहर लक्षांत घेऊन मार्क उतरवत तो साठापर्यंत आणून ठेवी व म्हणे, 'नाही मिळाला श्रेष्ठ दर्जा म्हणून काय झाले, दुसरा दर्जा तर कोठे गेला नाही.' नतर स्वतःच्या कांही चुका व नजरदोष याबद्दल मार्क वजा करून तो ते पंचेचाळीसपर्यंत उतरवत आणी व म्हणे 'अहो तिसऱ्या दर्जांत तर मी खात्रीनें पास झालोच पाहिजे. तेहतीस मार्क मिळणार नाहीत असें कसें होईल!' लवकरच निकाल लागला तेव्हा तो मुलगा नापास झाल्याचे कळलें.

परीक्षा सपल्यामुळे कांहीच उद्योग उरला नव्हता. बाळ आपल्या खोलीत पलगावर लोळत पडला होता. आज त्याला कांही अननुभूत भावना होत होत्या. कांही तरी चुकल्यासारखें—काहीतरी त्याच्याजवळून काढून घेतले जात आहे असें त्याच्या मनाला वाटू लागले होतें. एक प्रकारची खिन्नता किंवा हुरहुर त्याच्या मनाला लागून राहिली होती. पडल्या पडल्या त्याचा डोळा लागला. सध्याकाळच्या वेळी तो अर्धवट जागा झाला. हवेंत उष्मा वाढू लागला होता. पृथ्वी दिवसभरच्या थकव्यामुळे कीं काय उसासे टाकीत आहे अशा रीतीने वाऱ्याचे झोत मदपणे येत होते. बाळ डोळे मिटून पडून होता. त्याला उठून बसावेसें वाटलें. मी आहे या परि-

स्थितींतून अचानक कोठेतरी ओढला जात आहे असा त्याला भास झाला. क्रीडांगण, वसतिगृह, उत्तरेकडची टेकडी, पलीकडलें वन, खळखळ वाहणारा ओढा, आम्रवृक्षावर वासुदेवाने बांधलेला माळा, एकएक वस्तू क्षणभर त्याच्यासमोर दिसे व पुन्हा हवेंत विरून जाई. बाळच्या डोळ्यांसमोर क्षणभर अधार दिसू लागला. त्याने भविष्याच्या अध:कारमय अस्पष्टतेत त्डोळे ताणून पाहण्याचा प्रयत्न केला. त्या सधिप्रकाशाच्या अस्फुटतेतून याला अमूर्त व अव्यक्त सावल्या इकडन तिकडे जातांना व जवळ येतांना दिसूं लागल्या. पण त्या स्पष्ट होईनात. तो काळ त्याला किती तरी दीर्घ वाटला. त्याची उत्कठा वाढू लागली. इतक्यात दुरून प्रकाश येतांना त्याला दिसूं लागला. त्या तेज:पुज प्रकाशान त्याचे डोळे दिपू लागले

बाळ खडबडून जागा झाला; त्याने एकदा डोळे चोळले. सायकाळचें कोवळें ऊन आंत येऊन खोली प्रकाशमय झाली होती. बाळ उठून उभा राहिला व खिडकीपाशी गेला. बाहेर मैदानावर मुले खेळत होती. हाकी, फुटबॉल, डूडू वगैरे खेळात व हास्यविनोदांत मुले व्यग्र होती. सध्यासमय झाल्यामुळे वेळ थोडा उरला होता. मुलें खेळात इतकी व्यग्र होती की, ती प्रत्येक क्षण उजवीत होती–उज्जीवित करीत होती. प्रत्येक क्षण हासत खेळत जात होता. क्षण हातात हात घालून साखळी करून नाचत बागडत जात होते. बालपणच्या खेळांत साखळी करून खेळत जाणाऱ्या क्षणांची जणू काय मुलांशी स्पर्धा चालली होती. सविता क्षितिजा-वरून हा खेळ पाहत होता. हळूहळू एकएक पाऊल मागे टाकत तो अदृश्य झाला. मित्र अस्ताचलापलीकडे जातांच मुलानी बेहदपणे खेळ उधळून लावला. सायकाळी आपल्या घरट्याकडे भराऱ्या मारीत जाणाऱ्या पाखरा-प्रमाणे मुलें वसतिगृहाकडे वळली. क्रीडांगण शून्य झाले. क्रीडांगणावर मुलांना खेळतांना पाहून बाळाला आनंद झाला होता. क्रीडांगणावरली स्तब्धता पाहून त्याच्या मनावर खिन्नता पसरूं लागली. आनद व खिन्नता या द्वंद्वांचें प्राबल्य आलटून पालटून त्याच्या मनावर प्रादुर्भूत होत होते. कांही वेळ तो टेकडीवर जाऊन बसला. तेथून अनेक प्रसंगाची आठवण देणाऱ्या त्या सान्निध्याने परिचित प्रदेशावर त्याने नजर फेकली. तेथे तो किती तरी वेळ बसून राहिला.

तो शनिवारचा दिवस होता. परिपाठाप्रमाणे मुले जेवणापूर्वी आरती-करिता जमलीं. नेहमीप्रमाणे त्यांनी आरती केली. प्रसाद वाटल्यावर बजरंगबलीचा जयघोष करून मुलें भोजनास बसली. नेहमीप्रमाणे त्यांचे हंसणें खिदळणें, गप्पा विनोद चालू होते. दर शनवारी या गोष्टी होत असत. पण आज बाळाला या गोष्टीत काही नवीनपणा दिसत होता. एक प्रकारचा विशेष आनंद, एक प्रकारचा जिव्हाळा–त्याच्या मनाला चटका लावून सोडत होता. तेथे त्याने घालविलेल्या काळांतील सुखानुभवाची एकवटलेली कल्पना त्याचे हृदय उचबळवून आणीत होती. एवढया दीर्घ काळांत कधीहि अनुभवावयास न मिळालेल्या भावना त्याच्या मनाला चटका लावून त्याचें हृदय कंपित करीत होत्या.

त्या रात्री बराच वेळ त्याने मुलांमध्ये गप्पागोष्टीत घालविला. बराच उशीर झाला तरी आपल्या सवगड्यांना सोडून जावेसें त्याला वाटेना. त्यांच्याशी गप्पा मारीत राहावे असे त्याला वाटत होतें. दुसऱ्या दिवशी रविवार होता. प्रत्येक खोलीत जाऊन चार मुलें जमवून त्यांच्याशी बोलण्यांत त्याने दिवस घालविला. सायंकाळी क्रीडागणावर प्रत्येक खेळाच्या ठिकाणी जाऊन तो खेळला. सर्व खेळ संपेपर्यंत तो खेळत राहिला. रात्री गोपाळ, विष्णू व सदू यांच्याशी बरीच रात्र झाली तरी तो बोलत बसला होता. मध्यरात्र होऊन गेली तरी त्याना उठावेसे वाटेना व त्याच्या गप्पा संपेनात.

'बाळ, तू कॉलेजमध्ये जाशील ना रे–कोणत्या कॉलेजांत जाशील ?' विष्णूने जणू काय अहेतुपूर्वक, दुसरे कांही बोलण्यास सुचेना म्हणून प्रश्न केला. बाळाला उत्तर देववेना. मित्रवियोगाची कल्पना त्याच्या तरुण मनांत थारा घेईना. त्याने बाह्यतः तितक्याच सहजपणाने औपचारिक उत्तर दिलें. विषय बदलण्याच्या हेतूने त्याने आस्वलाची गोष्ट काढली. गोपाळ विष्णूला ह्मणाला, "का रे तुझी टोपी अस्वलाने फाडली असती तर तूं काय केलें असतेंस ?"–मी कांही तरी अर्थहीन बोललों असें वाटून गोपाळ मध्येच थांबला.

विष्णू अभिमानपूर्वक बाळाकडे पाहून म्हणाला, "तुला पिंजऱ्यांत उडी मारतांना भीति कशी वाटली नाही. ? "

गोपाळ मध्येच म्हणाला, " त्या अस्वलांच्या नाकावर टोला मारल्याबरोबर कसे चिरचिर करीत ते मागे सरले." सावकाशपणे तीच गोष्ट आणखी कांही वेळ चालू राहिली.

सदू विषय बदलून म्हणाला, " हार झाल्यावर रघूने तुझ्या तोंडावर लाथ मारली–किती दुष्टपणा त्याने दाखविला. मोठ्या मुलाशीं कुस्ती खेळण्याची तुला एकदम हिंमत कशी झाली? माझ्यामुळे ती मुले तुझ्यावर चिडली होती." विषय बदलल्याने भाषणाला पुन्हा रग चढू लागला. तो विषय निरसत्व होण्यापूर्वीच गोपाळने विषय बदलला, " त्या वाळवटांत वासुदेवाने रघूला व आजोबाला कसें चेंडूसारखे दूर फेकून दिले. केवढे अचाट सामर्थ्य वासुदेवाचें!"

अशा रीतीने कांही संदिग्धपणें, काही तुटकपणे, कांही वेळ मोठ्या ईर्षेने, कांही वेळ सथपणाने, ओघाओघाने जे जे विषय निघतील त्यांसबंधी त्यांचे स्वैर भाषण चालू होते. त्याच त्याच गोष्टी तीनतीनदा बोलून झाल्या तरी जिव्हाळा वाटून पुन्हा तोच पाढा तितक्याच उत्सुकतेने पढला जाई. त्याचा त्यांना कटाळा वाटेना. उलट वेळ किती भरभर जातो असें त्यांना वाटत होते. निजावयास जाण्याच्या निश्चयाने ते उठत पण झोप न आल्याने काय करावें ते सुचेनासें होऊन पुन्हा त्यांच्या गप्पा सुरू होत होत्या.

हनुमज्जयंती व श्री शिवछत्रपति–उत्सव यांकरता बाळ मुद्दाम थांबला होता. गोपाळ व विष्णू घरी जाण्याची घाई करीत होते. पण बाळाने त्यांना आग्रहाने ठेऊन घेतलें होतें. सदू व बाळाने दोन्ही उत्सव झाल्यावर जाण्याचें ठरवलें होतें. दोन्ही उत्सव मोठ्या थाटाने पार पडले. बाळ, गोपाळ, सदू व विष्णू यांनी अगदी मनोभावाने त्या उत्सवांत साहाय्य दिलें. प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळीं बाळाला वाटे, 'पुन्हा ही गोष्ट मला पाहावयास मिळणार नाही. हा कार्यक्रम माझ्यापासून दूर होत आहे.' ती गोष्ट जणूं काय हाताने घट्ट धरून ठेवावी–पण ही कल्पना हास्यास्पद व व्यर्थ आहे हें जाणून त्या गोष्टीपासून जितका आनंद प्राप्त करून घेतां येईल तितका घेण्याच्या हेतूने अथपासून इतिपर्यंत प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळीं बाळ हजर राहिला.

दुसऱ्या दिवशीं बाळाला घरी जावयाचे होते. शाळा व वसतिगृह सोडावें लागणार ही कल्पना दिवसभर त्याच्या मनाला अस्वस्थ करीत होती. 'गोपाळ व विष्णू यांच्याबरोबर मी किती तरी खेळ खेळलों. उद्यापासून त्यांच्याबरोबर खेळायला मिळणार नाही. सदू किती सालस मुलगा. एकाच कॉलेजांत न गेल्यास त्याची सगत मला मिळणार नाही,' याप्रमाणे येणाऱ्या कल्पना त्याला चैन पडू देत नव्हत्या. तो दिवस लवकर सपू नये असे त्याला वाटले. पण दिवस भरभर चालला होता. मिनिटे व तास एकमेकांना खो देत बाळची झाप चुकवून केव्हाच पुढे जात होते.

बाळ सदूला म्हणाला, "आपण एकाच कॉलेजात जाऊ म्हणजे आपली सगत तुटणार नाही." बाळ जरा वेळ थाबला. विष्णू व गोपाळकडे त्याने खिन्न मुद्रेने पाहिले—नतर तो म्हणाला, "तुम्ही कॉलेजात चलाल ना रे?" गोपाळने विष्णूकडे पाहात उत्तर दिले, "आम्ही गरिबाची मुलें कॉलेजामध्ये कसे जाणार? कुठे तरी नोकरी करणार झाले." विष्णूने गोपाळच्या म्हणण्याला मान डोलावली. तो काही बोलला नाही.

बाळ व सदू आपली पुस्तके इतर मुलाना देऊन टाकत होते. मधून एखादें पान बाळ चाळून पाहत होता. तो म्हणाला, "परीक्षेपूर्वी सर्व कठीण वाटत होते पण आता पाहतो तो सर्व गोष्टी कशा सोप्या वाटतात. परीक्षाच आपणाला भवडावते नाही? किती सोपी वाटतात ही पुस्तकें! परीक्षा पास होताच आपणाला सर्व कसें येऊ लागतें. बिचारा विद्यार्थी नापास झाला की त्याला काही येत नाही असें ठरतें.

# प्रकरण २७ वें

# शाळेला पुन्हा भेट

नागपूरच्या कॉलेजात बाळ प्रविष्ट झाला होता. नवीन उमेद, नवीन परिस्थिति याच्या मिलाफाने कॉलेजांतील उच्च वातावरणात बाळाचें मन उच्च भावना, नवीन विचार व नवीन महत्त्वाकाक्षा याचा अनुभव घेत होते. कॉलेजांतील मोकळ्या वातावरणात मोकळ्या मनाने सचार करायला मिळाल्यामुळे बाळाचा काळ मोठ्या आनदात जात होता. परीक्षा दोन वर्षांनी आहे, मागल्या वर्षाप्रमाणे या वर्षी मनावर काही दडपण नाही, या विचाराने स्वास्थ्य मिळून त्याचा बराच वेळ खेळण्यात व शहरातील मौजा पाहण्यात जात होता.

कमळपूरच्या शाळेतील वास्तव्याची व विशेषत. शेवटच्या दोन वर्षांच्या अनुभवाची आठवण बाळाच्या मनात अजून ताजी होती व त्या सर्व गोष्टीचा ठसा बाळाच्या मनावर अजून स्पष्ट होता. तो अनुभव मनश्चक्षूच्या आड होणें अशक्य होतें. सर्व गोष्टीची स्मृति इतकी ताजी व जोरदार होती की, त्या सर्व गोष्टी त्याच्या डोळ्यांपुढे उभ्या राहून प्रत्यक्ष घडत आहेत असा भास होई. शाळेतील खेळ, त्रगतिगृहातील त्याचे हास्यविनोद, भाडणे, वासुदेवाची ती धुराने भरलेली खोली—एकामागून एक तो शाळेत घालविलेल्या काळाचा चित्रपट त्याच्या डोळ्यासमोरून भराभर जात असताना, अजून मी शाळेत एका बाकावर बसलों आहे अशा भावनेने कल्पकतेला वाव मिळून मनाचा वारू दटावीत असतां तो क्षणभर देहभान विसरल्यास नवल नाही.

कॉलेजची दिवाळीची सुटी सुरू झाली होती. कमळपूरची शाळा दोन दिवसांनी बद होणार होती. आपल्या कर्तृत्वाचे क्षेत्र पुन्हा पाहावे, आठवणींना उजळा द्यावा व त्या सुखमय जीवनाचे अवलोकन करावे म्हणून सुटी सुरू होण्याच्या एक दिवस आधी बाळ शाळेंत जाऊन पोहोचला. मुलें दप्तरें घेऊन भराभर शाळेंत जात होती. उद्यापासून सुटी मिळणार

म्हणून सर्वजण आनदात होते. मलाहि दप्तर घेऊन शाळेत घटकाभर जातां येईल तर किती बरे होईल असे त्याला वाटलें. प्रथम ज्या दिवशी गोपाळ-बरोबर तो शाळेत आला होता, त्या दिवसाची त्याला आठवण झाली. किती उत्सुकता व नाविन्य त्या दिवशीच्या येण्यात भरले होतें. आज गोपाळ त्याच्याबरोबर नव्हता.

शाळेत बाळ सर्व वर्गांतून हिंडला व सर्व मास्तरांना भेटला. त्याला पाहून मुले व मास्तर सर्वांना आनंद झाला. शाळेत या वर्षी दुसरेच हेडमास्तर आले होते. बाळाला पाहून त्यानाहि मोठा आनद झाला. हेड-मास्तरानी त्याचे स्वागत केले. बाळाचा इतिहास हेडमास्तरांना विदित होता। त्यानी बाळाने मिळवलेली विजयचिन्हे पाहिली होती.

तेथून बाळ वसतिगृहात गेला. सर्वच मुले परिचित होती. सर्वांशी तो चार शब्द बोलला व क्रीडागणावर त्याच्याबरोबर खेळला. पण तेथे असता एक विशिष्ट भावना त्याच्या मनात जागृत होती, त्यामुळे त्याला अस्वस्थता वाटत होती दुवा तुटल्याप्रमाणे त्याला तेथे आपले अस्तित्व विलग वाटत होते. शाळेत त्याला समरस होऊन तादात्म्य मिळाले नाही. ज्या समाधानाकरता तो धडपडत होता ते त्याला मिळेना. आपण येथे एक प्रेक्षक आहोत ही भावना त्याला तापदायक होऊ लागली. मुलांच्या आनदात मला सामील होतां येत नाही याचे त्याला वाईट वाटू लागले. प्रत्यक्ष अनुभूतीची भाषा त्याच्या तोडून निघेना. मी पाहणारा आहे या कल्पनेने त्याच्या सुखात त्याला कमीपणा वाटू लागला.

कॉलेजात गेल्यावर वसतिगृहात बसून भूतकालातील आपल्या बाल-पणाचा काल तो आठवीत असे. त्या आठवणीनी त्याला आनद होत होता. पण भूतकालातील गोष्टींच्या स्मृतीने होणारा मानसिक आनद सद्यःस्थितीत मिळणाऱ्या मुलाच्या प्रत्यक्ष आनदाच्या स्वरूपाचा असणे शक्य नव्हते. भूतकाली घडलेल्या गोष्टीना वर्तमानकाळाच्या सुखाचा ओलावा कोठून येईल. पख फुटलेल्या व उडून गेलेल्या पाखराना पकडून परत कसे आण-णार ! स्मृतीच्या अदृश्य वातावरणांत उडून गेलेल्या गोष्टीना सुखाच्या लतावेलीने नटलेल्या प्रत्यक्षाच्या उद्यानात कोण आणूं शकणार ?

आपल्या विचारांना टाळण्याकरितां बाळ कॉलेजसबंधी गोष्टी

मनांत आणू लागला. मी कालेजांतील विद्यार्थी आहें या विचाराने बाळला थोडें समाधान वाटलें. सायन्सच्या मास्तरांबरोबर त्याला जावयाचें होतें. त्यांची वाट पाहात वसतिगृहांतील ज्या खोलीत तो राहात होता त्या खोलीसमोर तो उभा राहिला. मुलांशी त्याच्या गोष्टी चालू होत्या. मुलें त्याला कॉलेजसबंधी प्रश्न विचारीत होती व तो त्यांना उत्तरें देत होता. शाळेंत नवीन आलेलीं मुलें, त्याचें नांव ऐकून त्याला पाहण्याला जमलीं होतीं. मास्तर व मुलें सर्व मिळून आपल्याला मान देतात या जाणिवेने बाळाला मनांतून समाधान वाटलें. त्याला थोडा अभिमान उत्पन्न झाला.

सायन्सचे मास्तर आपलें काम आटपून आले, व बाळाला बरोबर घेऊन, जावयास निघाले. बाळ शाळेत होता त्या वेळच्या गोष्टी ओघा-ओघाने निघाल्या. विष्णू व गोपाळ हुशार मुले असून गरिबीमुळे त्या होत-करू मुलांना कॉलेजमध्ये जावयास मिळू नये याबद्दल मास्तरांनी दिलगिरी प्रदर्शित केली. विष्णू व गोपाळ याच्याबद्दल मास्तरांचे मत चांगले आहे हें कळल्याने बाळाला समाधान झालें. प्रसगोपात्त त्यांच्या खोडचासबधाने गोष्टी निघाल्या. तेव्हा बाळ म्हणाला "आम्ही जर एकत्र राहिलो असतो तर कदाचित् खेळण्यांत आमचा जास्त वेळ जाऊन आम्ही नापासहि झालों असतों. मला अभ्यासांत सदूची मदत झाली. आमच्या अभ्यासाच्या ईर्षेने गोपाळ व विष्णू यांनीहि अभ्यास चागला केला. आमच्यांत राहून सदू निःसंशय सुधारला. नाही तर, काय ती त्याची प्रकृति. घरबशेपणा-बद्दल मला त्याचा राग येत असे."

बाळाच्या आत्मविश्वासाच्या व आत्मप्रशसेच्या गोष्टी ऐकून मास्त-रांना कौतुक वाटले. खऱ्या गोष्टी काय आहेत हे बाळाच्या लक्षांत आलें नाही असें मास्तरांना दिसून आले. ज्या गोष्टी सहजासहजी घडून आल्या अशी बाळाची कल्पना होती त्या कुशल योजनेने घडवून आणण्यांत आल्या होत्या व त्यांत हेडमास्तरांचा हात होता हें बाळाला कळणें जरूर आहे हें जाणून मास्तर बाळाला म्हणाले, "खरी परिस्थिति काय होती तें तुम्हाला सांगणें माझें कर्तव्य आहे असें मी समजतों. तुमचा खोडकर-पणा वाढत चाललेला पाहून हेडमास्तरांनी तुमच्यावर बारकाईने लक्ष

ठेवलें होतें. तुमचा अजाण खोडकरपणा व उनाडक्या याचें त्यांना कांही विशेष महत्त्व वाटत नव्हते. पण एकमेकाच्या देखोदेखी व अनुकरणाने तुमच्या खोडया वाढू लागल्या होत्या. तुमचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होईल व दुर्लक्ष करण्याची सवय जडली म्हणजे त्याचा कटाळा येऊ लागेल व त्यामुळे तुमची अभ्यास करण्याची प्रवृत्ति मुळीच निघून जाईल, अशी त्याना भीति वाटू लागली होती. तुम्ही प्रत्येक वर्षी पास होत गेल्याने त्या भीतीची तीव्रता कमी प्रमाणांत असे. घटस्थापनेच्या दिवशी कट करून तुम्ही गैरहजर राहिल्यानतर तुमची उपेक्षा करणें हेडमास्तरांना धोक्याचे वाटू लागले. तुमचे एकत्रित राहणें बद केल्याने तुमच्या प्रवृत्ति योग्य मर्यादेच्या बाहेर जाणार नाहीत अशा विचाराने तुमचें एकत्र राहणे हेडमास्तरानी बंद करावयाचे ठरविले. गुलाना हुशार म्हणवून घेण्यांत फुशारकी वाटत असते. मनुष्य हुशार असला तरी त्याला ज्ञान आपोआप प्राप्त होत नाही. त्याकरता अभ्यास हा केलाच पाहिजे. तुमच्या पुढे अभ्यासाचें चागले आदर्श असावें म्हणून सदूला तुमच्या सान्निध्यांत मुद्दाम आणून ठेवण्यांत आले. तो मुलगा अभ्यासू व शात होता. त्याचा प्रभाव तुमच्यावर पडेल हे हेडमास्तर जाणून होते. सदू घरकोबडा असल्यामुळे जगाचा अनुभव त्याला मुळीच न येऊन त्याचे नुकसान होईल व सारखा अभ्यास करीत राहिल्याने त्याची प्रकृति खालावून तो अगदी निरुपयोगी होऊन जाईल, या भीतीने हेडमास्तरानी त्याला तुमच्यामध्ये ठेवलें प्रथम जरी त्याला जड जाईल तरी हळूहळू तो तुमच्या सगतीने सुधारेल, अशी हेडमास्तरांची दुहेरी योजना होती. तुमचा चाणाक्षपणा ते जाणून होते. एकमेकांच्या संगतींत चांगले गुण तुम्ही घ्याल अशी त्यांची खात्री होती. सद्गुण उपदेशापेक्षा उदाहरणाने लवकर जडतो असें ते नेहमी म्हणत. सर्वच मुलांचे सद्गुण वृद्धिगत व्हावेत व दुर्गुण निघून जावेत याकरता ते दक्षतेने योजना करीत. फार काय, वाईट समजल्या जाणाऱ्या मुलांत देखील चांगले गुण हुडकून काढून त्याच बाजूने ते त्याला प्रोत्साहन देत, व उद्योगाच्या मागे लागल्यामुळे तो मुलगा दुर्गुण आपोआपच विसरून जाई. उद्योगाच्या नांगरटीने दुर्गुणाचें तण मरून सद्गुण वाढीस लागतात असा त्यांचा भरवसा होता. ते कोणत्याच मुलाबद्दल कधीहि हताश होत नसत. तुमच्या कल्याणा-

करता हेडमास्तरानी अहर्निश वाहिलेल्या काळजीबद्दल तुम्ही कृतज्ञ असावें हे नाही का तुमच्या लक्षात आलें? "

" मी हुशार आहे. खेळतां खेळतां मी पास झालों. मला फारसा अभ्यास करावा लागला नाही, " असे विचार मनांत येऊन बाळाला स्वतःच्या हुशारीबद्दल व चांगुलपणाबद्दल अभिमान वाटू लागला होता. आपल्याला योग्य मार्गाला नेण्याचे श्रेय पुष्कळ अशी हेडमास्तरांना आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याचा अभिमान जागृत झाला. आपल्या यशाच्या श्रेयाचा योग्य हिस्सा हेडमास्तरांना देणे योग्य आहे हे त्याच्या लक्षात आले त्याचे मन कृतज्ञतेने भरून आले.

मास्तर पुन्हा बोलू लागले, " एखादा सहृदय गुणी शिल्पकार कल्पकतेने इमारतीचा पाया घालून ते सुदर मदिर पूर्णत्वास येत असता धन्यतेने व अभिमानाने त्याच्याकडे पाहतो त्याप्रमाणे मनाने व शरिराने पूर्ण वाढीस लागून विद्यार्थी गुणवान व ज्ञानवान झाले असता हेडमास्तर ममतेने, आत्मीय बुद्धीने व गौरवाने त्याच्याकडे पाहत व आपण धन्य व कृतकृत्य झालों असे वाटून समाधान पावत असत. त्याचा तो आनद खरोखरच अवर्णनीय असे आजपर्यंत शाळेत काम केल्यानतर त्यांना जास्त विस्तृत क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा झाली. आजच्या परिस्थितीत शिक्षण, सामाजिक प्रश्न व आर्थिक गरजा यांना योग्य वळण द्यावयाचे असल्यास राजकारणात भाग घेऊन आपली राजकीय प्रगति करून घेणे आद्य कर्तव्य आहे असें त्यांच्या मनाने घेतल्यामुळे त्यानी मोठ्या खेदाने आपल्या जागेचा राजीनामा दिला. ते सध्या कौन्सिलातून काग्रेसमध्ये व अन्यत्र देशकार्य करीत आहेत. अजून शाळेवर त्यांचे पूर्वीप्रमाणे प्रेम आहे व शाळेसबधी विचारपूस करून शाळेशी आपला सबध त्यानी कायम ठेवला आहे. ते नेहमी म्हणतात की शाळेत मिळालेला अनुभव मला राष्ट्रकार्याला उपयोगी पडतो व शाळेचे क्षेत्र बाहेरील क्षेत्रापेक्षा कमी विस्तृत असले तरी तें जास्त अर्थपूर्ण व वैचित्र्याने भरलेले आहे. कर्तव्य म्हणून त्यानी काही दिवसांकरता शिक्षणाचे कार्यक्षेत्र सोडले आहे. अनुकूल वातावरणांत शिक्षणक्षेत्रांत परत जाण्यासारखी परिस्थिति केव्हा निर्माण होईल, व पुन्हा आपल्या आवडत्या

शाळेंत जाऊन विद्यार्थ्यांमध्ये केव्हा मिसळेन, याची ते उत्सुकतेने वाट पाहत आहेत."

बाळाच्या मनात हेडमास्तरांविषयी आदर होताच तो आता द्विगुणित झाला. हेडमास्तरांनी आपल्याविषयी अहर्निश काळजी वाहिली व पित्याप्रमाणे प्रेम करून त्यांनी आपल्याला योग्य मार्गाला नेलें याबद्दल बाळाने आपली कृतज्ञता व्यक्त केली. हेडमास्तराची भेट घेऊन आभारपूर्वक आपली कृतज्ञता त्यांना विदित करण्यात्यचें ाने ठरविले.

मास्तरांची रजा घेऊन व सर्व मुलांना भेटून बाळ परत जावयास निघाला. शाळेतून हिंडताना चालू वातावरणाशी मला एकजीव होतां येत नाही याबद्दल बाळाला वाईट वाटत होतें, पण शाळेच्या आवाराच्या बाहेर पाऊल टाकताना ते त्याला जड वाटूं लागले, व त्याच्या हृदयाला क्लेश झाले. बाळाला या विचित्र भावनांचा उलगडा करतां येईना. तो मनाशी म्हणाला "चालू सुखदु:खाच्या संवेदनापेक्षा गतानुभवाच्या स्मृतीने उत्पन्न होणाऱ्या सुखदु:खाच्या सवेदना कांही कमी तीव्र नसतात."